# गुनि-गुरू

डॉ. सौ. मंगला आपटे





पं. जगन्नाथबुवा पुरोहित व पं. द. वि. काणेबुवा
यांचे संयुक्तचरित्र

# गुनि-गुरु

डॉ. सौ. मंगला आपटे

अनुबंध प्रकाशन

अनुबंध प्रकाशन, पुणे

# गुनि-गुरू

© डॉ. सौ. मंगला आपटे

प्रथमावृत्ती : १९। ६।२०१०

प्रकाशक
अ. अ. कुलकर्णी
अनुबंध प्रकाशन
२०२ बालाजी कॉम्प्लेक्स, बालाजीनगर,
धनकवडी, पुणे ४११ ०४३.

मुद्रक
श्री बालाजी एंटरप्राईजेस
तलाठी कार्यालयासमोर,
धायरी फाटा, वडगाव बु।।,
पुणे ४११ ०४२ .

अक्षरजुळणी
समर्थ ग्राफिक्स्, पुणे

मुखपृष्ठ
रविमुकुल

किंमत १५० रुपये



या पुस्तकासाठी सुरुवातीपासून मला भरघोस
उत्तेजन देणारे आणि आपल्या वार्धक्याचा विचार न करता,
सर्वतोपरी मला साहाय्य करणारे,
माझे तीर्थरुप **श्री. पुरुषोत्तम रानडे**
यांचे आशीर्वाद माझ्या पाठीशी
होते म्हणूनच मी हे पुस्तक पूर्ण करू शकले.
म्हणून या ग्रंथाचे संपूर्ण श्रेय त्यांना देण्यासाठी
हा ग्रंथ मी त्यांनाच अर्पण करीत आहे.

**मंगला आपटे**

# प्रस्तावना

माझी शिष्या मंगला आपटे पूर्वाश्रमीची चि. उषा रानडे हिने तिच्या 'गुनि-गुरू' या पुस्तकाची प्रस्तावना मी लिहावी, असा आग्रह धरल्यामुळे आणि हे पुस्तक तिचे तीर्थरुप वडील आणि इचलकरंजी येथील गोविंदराव हायस्कूल ज्यांनी आपल्या कष्टाने नावारूपास आणले असे माझे इंग्रजीचे शिक्षक गुरुवर्य पुरुषोत्तम माधव रानडे यांना अर्पण करण्याचा तिचा मनोदय तिने माझ्याकडे व्यक्त केल्यामुळे मी प्रस्तावना लेखनाचे माझ्या गाण्याच्या चाकोरीबाहेरचे काम करण्याचे मान्य केले आहे.

माझे आजोबा पं. गुंडाबुवा इंगळे हे गानमहर्षी पं. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांचे लाडके शिष्य होते. पं. बाळकृष्णबुवांची तालीम त्यांना सलग सहा-सात वर्षे मिळाली. माझी सगळी गायकी मी गुंडामहाराजांना दिली आहे. तो माझी गायकी पुढे नेईल असे ते अभिमानाने सांगत असत. इ. स. १९०० पासून पं. बाळकृष्णबुवा इचलकरंजी संस्थानाचे दरबार गायक होते. इ. स. १९२७ साली, पं बाळकृष्णबुवांच्या निधनानंतर पं. दत्तोपंत काळेंना त्यांच्या सुरेल गायकीमुळे दरबारी गायकीचा मान मिळाला होता. पण ते अल्पायुषी ठरले. त्यांच्यानंतर माझे तीर्थरुप वडील पं. केशवबुवा इंगळे इ.स. १९३२ ते १९४८ पर्यंत इचलकरंजी संस्थानचे दरबारी गायक होते.

आमच्या घराण्याचा संगीताचा वारसा माझे पणजोबा पं भिकुबुवा इंगळे यांच्यापासून चालू असून आता तो आमची सहावी पिढी म्हणजे माझा मुलगा मिलिंद याचा मुलगा सुरेल यांच्यापर्यंत अखंड चालू आहे. या सांगीतिक नात्याने आम्ही इचलकरंजीशी व तेथील रानडे कुटुंबाशी पिढ्यानपिढ्या बांधले गेले आहोत.

रानडे घराणे मुळचे आसुदचे. संपन्न आणि प्रसिद्ध घराण्याचा वारसा लाभलेले हे घराणे पाच-सहा पिढ्यांपूर्वी इचलकरंजीत वास्तव्य करून आहे. फार पूर्वीचा इतिहास सोडला तर पु. मा. रानडे यांचे खापरपणजोबा

सदाशिवपंत यांच्या भगिनी इचलकरंजी संस्थानच्या राजघराण्यात दिल्या होत्या. त्यामुळे संस्थान मजकुरी ते सदुमामा म्हणून प्रसिद्ध होते. बराच जमीनजुमला त्यांना इनाम म्हणून संस्थानाकडून मिळाला होता. त्यांचे चिरंजीवं बळवंतराव, अफाट शरीरसामर्थ्याबद्दल पंचक्रोशीत प्रसिद्ध होते. सरकार दरबारी रानडे घराण्याचे दुसरे स्थान होते. त्यामुळे पुढे रसिकाग्रणी अधिपती श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे यांच्या दरबारात होणाऱ्या गाणाच्या मैफली माझे शालेय गुरुवर्य पु. मा. सरांना सरकारांच्या शेजारी बसून जवळून ऐकायला मिळाल्या. या संगीत संस्कारांमुळे सरांना लहानपणापासून गाण्याची गोडी लागली. ते स्वतः उत्तम पेटी वाजवतात. संस्थान खालसा झाल्यानंतरही इचलकरंजीत येणाऱ्या कलाकारांच्या गाण्याच्या मैफली आपल्या घरी आयोजित करण्याची परंपरा त्यांनी चालू केली. तसेच संगीत विषयाचा समावेश शालेय अभ्यासक्रमात आणून स्वतंत्र संगीत शिक्षक नेमण्याची प्रथा त्यांनी सुरू केली. आपल्या मुलीने संगीतात उत्तम प्रगती करावी यासाठी ते सतत प्रयत्नशील असत. निवृत्तीनंतर मुख्याध्यापक गुरुवर्य रानडे सरांनी १९७५ साली झालेल्या त्यांच्या सत्कार समारंभात विद्यार्थ्यांनी त्यांना दिलेली सर्वच्या सर्व गुरुदक्षिणा बाळकृष्णबुवांचे स्मारक इचलकरंजीत उभे करण्यासाठी अर्पण केली आणि एका गुरुदक्षिणेचा विनियोग संगीत क्षेत्रातल्या दुसऱ्या एका थोर गुरुचरणी गुरुदक्षिणा म्हणून अर्पण करून एक अपूर्व दाखला लोकांसमोर ठेवला. त्यांनीच चि. सौ. मंगलाला शास्त्रीय संगीत शिकण्यासाठी पं. काणेबुवांकडे जाण्यास उद्युक्त केले. त्यामुळेच पुढील आयुष्यात वडिलांचा पाठिंबा व समर्थ गुरुंच्या मार्गदर्शनामुळे अनेक बक्षिसांची व पदव्यांची मानकरी होण्याचे भाग्य सौ. मंगलाला लाभले आहे.

या पुस्तकाच्या लेखनासाठी आवश्यक असलेली साधनसामग्री गोळा करण्यासाठी मंगलाने अपार कष्ट घेतलेले आहेत. संसारातील जबाबदाऱ्या यशस्वीपणे सांभाळून हे पुस्तक संपन्न करण्यासाठी तिची चाललेली धडपड मी अनुभवलेली आहे. माझ्या मते संगीतोपासक व दर्दी, उत्तम गुरू व उत्तम शिष्य आजपर्यंत उपेक्षितच राहिले आहेत. त्यांचा जीवनपट, इतिहास लोकांना, नवीन पिढ्यांना कळावा, ही प्रबळ इच्छा या पुस्तकामागे दिसते. ज्या देशाला भूतकाळ नसतो त्या देशाला वर्तमानकाळही

नसतो आणि भविष्यकाळही नसतो. अधिकृत माहिती उपलब्ध नसते तिथे. जुन्या पिढीतील लोकांनी सांगितलेल्या आठवणी, अशा मान्यवरांच्या बद्दल भरभरुन बोलत असतात व त्यांचे या क्षेत्रातील मोठेपण सांगत असतात. त्या तपोवृद्धांचे, वयोवृद्धांचे बोलणे संकलित करणे हे एक आव्हान आहे आणि ते आव्हान स्विकारण्याची गरज आहे. सौ. मंगलाने हे आव्हान समर्थपणे पेलले आहे असे मला वाटते. काहीही करून संगीताचे झाड बहरते, फुलते ठेवले पाहिजे, त्याची जबाबदारी आपल्या सर्वांवर आहे. याची जाणीव अशा सांगितिक लेखनांनी व कार्यक्रमाद्वारे गाभाऱ्यातील नंदादीपासारखी तेवत ठेवली पाहिजे.

कै. पंडित जगन्नाथबुवा उर्फ गुनिदास आणि मंगलाचे गानगुरू पं. द. वि. काणेबुवा यांचा गुरू, शिष्य, कलाकार व व्यक्ती अशा विविध रूपातून फुललेला, त्यांच्या व्यक्तिमत्त्वांचा परिचय, नवीन पिढीला व संगीत अभ्यासकांना करून देण्याचा प्रयत्न या पुस्तकाद्वारे चांगल्या पद्धतीने केलेला आहे.

कुटुंबिय, मित्र, सहाध्यायी शिष्य व अन्य कलाकार यांच्या मनातील आठवणी या पुस्तकात शब्दबध्द केलेल्या आहेत. आपल्या आयुष्याची पंधरा–सोळा वर्षे तिने या प्रकल्पासाठी घालविली आहेत. अर्थात अशा प्रकारच्या संशोधक लेखनाला इतका वेळ लागणे हे अवाजवी नाही कारण पूर्वीचा इतिहासही असाच आहे. पं. डी. व्ही. पलुसकर यांच्या अकाली निधनानंतर अडतीस वर्षांनी, त्यांच्याबद्दलच्या चरित्रविषयक आठवणी प्रसिद्ध झाल्या. प्रा. बी. आर. देवधरांनी लिहिलेले पं. विष्णु दिगंबरांचे चरित्र १९७१ साली म्हणजे तब्बल चाळीस वर्षांनी प्रसिद्ध झाले पं. बाळकृष्णबुवा कपिलेश्वरी यांनी लिहिलेले खाँसाहेब अब्दुल करीम खाँ यांचे चरित्र १९७२ साली म्हणजे पस्तीस वर्षानंतर प्रसिद्ध झाले तर केशवबुवा इंगळे यांचे चरित्र २००२ साली म्हणजे तब्बल सदतीस वर्षानंतर प्रसिद्ध झाले.

पं. जगन्नाथबुवांबद्दलच्या प्रसंगानुरूप काही आठवणी जरी इकडे तिकडे प्रसिद्ध असल्या तरी अशा प्रकारचे समग्र चरित्र अद्याप कोणीही लिहिल्याचे आढळत नाही. सौ. मंगलाने बुवांच्या निधनानंतर बेचाळीस वर्षांनी हे कार्य केलेले आहे आणि पं. काणेबुवांच्या निधनानंतर बारा वर्षांनी त्यांच्या चरित्राद्वारे सौ. मंगलाने ही गुरुदक्षिणा अर्पण केली आहे.

पं. गुनिदास एक महान व्यक्तिमत्त्व होते. त्यांचा स्वभाव सेवा, भक्ती व दान करून माणसे जोडण्याचा होता. जिथे ते जात तिथे घरोब्याची खूण ठेऊनच बाहेर पडत. त्यांनी असंख्य शिष्य आणि मित्र नुसते जमविलेच नाहीत तर वर्षानुवर्षे टिकविले. विद्वत्ता, संभाषणचातुर्य, बहुश्रुतपणा, शिष्टाचार, लाघवी प्रेमळ स्वभाव अशा अनेक सद्गुणांमुळेच लोक त्यांच्याकडे आकर्षित होत. माणसाच्या प्रभावाला आयुष्याच्या मर्यादा पडतात. नंतर त्याचा भर ओसरतो. पण संपूर्ण भारतभर आजही तितक्याच टवटवीतपणे, ताजेपणानी गायले जाणारे त्यांचे स्वनिर्मित राग आणि जुन्या रागात त्यांनी बांधलेल्या नवीन बंदिशी आनंद देत आहेत व देत राहतील. ही अमूल्य दौलत हे एक शाश्वत सत्य आहे. त्यांनी जपलेले राग संगीताचे सनातनत्व, सौंदर्यतत्त्व व स्वराकारात लपलेले भावतत्त्व, बुवांच्या निर्मितीला अमरत्व देणारे आहे. शिष्यांच्या स्वतंत्र प्रतिभेला गुलाम न करता, बुवांनी वळण दिले आहे. त्यांच्या शिष्यात त्यांच्या तालमीचा प्रभाव सूक्ष्म सुगंधासारखा आहे. बुवांच्या गुरुशिष्य संबंधातून तर घेण्यासारखे खूप आहे. प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी विद्यार्थ्याची भूमिका पार पाडलीच. शिवाय त्यानंतर गुरुची भूमिकाही त्यांनी चोखपणे बजावली हे बुवांचे वैशिष्ट्य आहे.

पं. काणेबुवांच्या चरित्रात मला आढळतो तो त्यांचा 'वज्रादपि कठोराणी आणि मृदुनि कुसुमादपी' हा स्वभाव. पंडित काणेबुवांनी ग्वाल्हेर गायकी, आग्रा गायकी व सर्वांनाच डोलत ठेवणारी गंधर्व गायकी या तीन गायन शैलींचा सखोल अभ्यास करून त्यावर अविश्रांत रियाझाने, नादब्रह्माच्या दरबारात आपले स्थान सिद्ध केले आहे. निगर्वी, निस्पृह जीवनानी, त्यांनी आपले दत्तात्रय हे नाव सार्थ केले आहे. आपल्या शिष्यांना कोणताही आडपडदा न ठेवता त्यांनी अमोल मागदर्शन केले. शिष्यांना 'नुसते गायक होऊ नका तर सन्माननीय नागरिक पण व्हा' अशी त्यांची शिकवण होती. ही शिकवण सर्वकाल चिरंतन आहे. 'गुरुजनांच्या गंगौघातून माझ्या हाती असलेल्या भांड्यात मावेल तेवढे मी घेतले,' हे त्यांचे विधान बुवांचा विनय दाखवितो तसेच अवाजवी शिक्षणाच्या मागे न लागता, पचेल तेवढेच घ्यावे व गावे हा त्या मागील सूक्ष्म संदेशही दिसतो.

या दोन्ही थोर गायकांना त्यांच्या विद्वत्तेच्या मानाने लौकिकदृष्ट्या फारशी प्रसिद्धी मिळाली नाही हे कटुसत्य आहे. प्रसिद्धी मिळविण्यासाठी ज्या

क्लुप्त्या व युक्त्या कराव्या लागतात त्याचा अभाव त्या दोघांकडेही होता. तसेच दोघांचीही तत्कालिन परिस्थिती त्याला कारणीभूत असावी असे मला वाटते असे जरी असले तरी संगीत शारदेच्या दरबारात या दोन्ही महर्षींना उच्चस्थानी बसविले जाईल हे नक्की. सर विल्यम् जोन्स यांनी लिहिलेल्या आणि लक्ष्मण विंझे यांनी अनुवादित केलेल्या काव्यपंक्ती या दोन्ही कलाकारांना तंतोतंत लागू पडतात.

**तू जन्मता जरि स्वतः रडलास बाळा । आनंदुनिच हसला परि लोक सारा ।।**
**ऐसेच पुण्य करि मरताहि तू रे । तू हसशील परि, विश्व रडेल सारे ।।**

सौ. मंगलाचे ''गुनि–गुरू'' हे ललित चरित्र सर्व संगीत रसिक व बुवाद्वयांचे चाहते यांना एक संदर्भ पुस्तक म्हणून उपयोगी पडेल अशी माझी धारणा आहे. चि. सौ. मंगलाने हा उपक्रम तडीला नेल्याबद्दल तिचे मनःपूर्वक अभिनंदन करतो आणि तिच्या भावी संगीत वाटचालीस माझ्या अनेक अनेक शुभेच्छा देतो.

**– पं. माधव इंगळे**

# मनोगत

कै. पं. जगन्नाथबुवा पुरोहित आणि कै. पं. द. वि. काणेबुवा या गुरूबंधूंचे एकत्रित चरित्रात्मक लेखन ही माझ्या गुरुंना अर्पण केलेली अल्पशी गुरुदक्षिणाच आहे.

माझे गुरु पं. द. वि. काणेबुवा यांच्याकडे इचलकरंजीला माझ्या लग्नापूर्वी संगीताचे शिक्षण घेण्याची संधी मला मिळाली.

इ.स. १९५५ साली काणेबुवा, इचलकरंजीतील कारखानदार गजाननराव माणकापुरे यांच्या आग्रहामुळे मुंबईतील आपले बसलेले बस्तान सोडून आपल्या राहत्या घरी इचलकरंजीला आले आणि शेती व कारखाना सांभाळत संगीताची आराधना करत होते. मीही त्याच काळात संगीताचे प्राथमिक धडे प्रभाकरबुवा शेंडे यांचेकडे घेत होते. शाळेतील स्नेहसंमेलनातील *'सुवर्णतुला,' 'संगीत मानापमान'* व *'संगीत स्वयंवर'* या नाटकातील माझ्या अनुक्रमे सत्यभामा, भामिनी व रुक्मिणी या भूमिका आणि त्यातील सर्व गाणी खूप गाजली होती. अनेक स्पर्धातून मला नाट्य व सुगम संगीतात पारितोषिके प्राप्त झाली होती. १९६६ साली एस. एस. सी. बोर्डाच्या मॅट्रिक परिक्षेत संगीत विषयात बोर्डात पहिला येण्याचा मान मला मिळाला होता. या सर्व पार्श्वभूमीवर मी शास्त्रीय संगीताचे शास्त्रशुद्ध शिक्षण घेण्यासाठी घराणेदार मान्यवर गुरूंच्या शोधात होते आणि माझ्या सुदैवाने असे गुरूवर्य पंडित काणेबुवांच्या रूपाने मला मिळाले. बुवांच्या सहवासातील ती सात वर्षे माझ्या आयुष्यातील सुवर्णकाळ आहे. त्या काळातील माझ्या अविस्मरणीय आठवणी मी बुवांच्या चरित्रात सविस्तरपणे रेखाटल्या आहेत.

माझ्या लग्नानंतर माझ्या पतीच्या भ्रमंतीमुळे आणि माझ्या सासुरवाशिणीच्या नव्या भूमिकेमुळे बुवांचा सहवास मला दुर्मिळ झाला. शिकवणीचे क्षणही मोजके म्हणजे मी जेव्हा माहेरी जाई त्यावेळी किंवा बुवा जेव्हा काही कामासाठी माझ्याकडे येत तेव्हा, माझ्या संसारातील प्रगतीमुळे संगीतातील माझी साधना, बुवांच्या पसंतीप्रमाणे होत नव्हती. तरीही त्यांची माझ्यावरील माया कमी झाली नव्हती. ते माझ्या अडचणी

समजून घेऊन मला धीर देत असत. निराशेच्या क्षणी मला मार्गदर्शन करत. स्त्रियांनी सासरची, नवऱ्याची, मुलांची काळजी प्रथम घेतली पाहिजे, संगीतासाठी संसार वाऱ्यावर सोडता कामा नये. या माझ्या मताशी ते पूर्णपणे सहमत होते आणि म्हणूनच या सर्व जबाबदाऱ्या सांभाळत, जेव्हा जेव्हा संगीत क्षेत्रात मी थोडीफार प्रगती करत होते, तेव्हा काणेबुवा माझ्या पाठीवर, शाबासकीची थाप देत असत. १९७२ साली मराठा मंदिर नाट्यस्पर्धेत मला मिळालेला पहिला क्रमांक आणि सुवर्णपदक, मी दिलेल्या गांधर्व महाविद्यालयाच्या परीक्षा, एस. एन. डी. टी. विद्यापीठाच्या एम. ए. या परिक्षेत मला मिळालेला प्रथम क्रमांक व चॅन्सलर्स प्राइझ या व अशा अनेकक्षणी बुवांनी केलेले माझे कौतुक मी कधीच विसरणार नाही. पुण्यातील आमच्या घोले रोडवरील घरात मी भाकऱ्या करीत असताना संपूर्ण नोटेशनसह स्वहस्ते माझ्या वहीत लिहून मला शिकविलेला राग स्वानंदी गाताना अजूनी माझे डोळे पाणावतात. माझ्याच नाही तर माझा मुलगा भूषण याच्या तबलावादनाच्या प्रगतीकडे आणि माझी मुलगी धनश्री हिच्या हार्मोनियम आणि नृत्यशिक्षणाकडे त्यांचे जातीने लक्ष असे. माझी धाकटी मुलगी आरती, शिकवणीच्या वेळी गडबड करू लागली की बुवा तिला प्रेमाने शेजारी बसवून घेऊन मला शिकवत असत. आमच्या कुटुंबावर त्यांचे प्रेम होते. इतर विद्यार्थ्यांना ते आमच्या कुटुंबाची प्रगती कौतुकाने सांगत. बुवांची इचलकरंजीतील पहिली विद्यार्थीनी या नात्याने मला त्यांच्या घरात सुरुवातीपासूनच प्रवेश होता. एक यशस्वी गृहिणी बनल्यावर मी बुवांच्या अधिक विश्वासातील बनले होते. संगीतातली अनेक किस्से गंमतीजमती ते मला सांगत. आपल्या गप्पात मला सामावून घेत. इतरांना माहीत नसलेले अनेक संदर्भ बुवांनी गप्पांच्या ओघात मला सांगितले आहेत.

या जवळीकीमुळे बुवांचे मोठेपण मला अधिक स्पष्ट होत गेले. त्यांच्या ज्ञानाच्या मानाने त्यांना मिळालेली प्रसिद्धी अपुरी आहे याची जाणीव मला झाली आणि या जाणिवेतून मी जेव्हा अ. भा. गांधर्व महाविद्यालयाच्या संगीताचार्य या परिक्षेला बसण्याचे ठरविले तेव्हा माझ्या शोध प्रबंधाचा विषय 'पं. द. वि. काणेबुवा यांचे व्यक्तित्त्व आणि सांगीतिक वाटचाल' असा ठरविला आणि या विषयाला अनुमती घेण्यासाठी बुवांना भेटण्यास मी इचलकरंजीला गेले. बुवा आपल्या नेहमीच्या सवयीप्रमाणे सोप्यावरील खुर्चीत संगीताचा विचार करत व त्याच नादात त्यांच्या हातापायाच्या हालचाली करत बसले होते. बुवांच्या तंद्रीचा भंग करीत मी थेट विषयालाच हात घातला. बुवांनी माझे म्हणणे शांतपणे ऐकून घेतले आणि म्हणाले की,

एखाद्यावर शोधनिबंध लिहायचा म्हटले की त्या व्यक्तीने त्या विषयात काही नवनिर्मिती करणे आवश्यक आहे, तसे असेल तर प्रबंधास वजन येईल. त्या दृष्टीने मी तुला माझे गुरुबंधू पं. जगन्नाथबुवा पुरोहित यांचे नाव सुचवितो कारण त्यांनी संगीत क्षेत्रातील सर्वच क्षेत्रात चांगले योगदान दिले आहे. नवीन राग निर्मिती, जुन्या रागात नवीन चीजांची निर्मिती, शिष्य परंपरा या विविध अंगांवर भरीव कामगिरी केली आहे. परंतु माझ्या मते त्यांच्या कार्याच्या मानाने त्यांना मिळावी तशी प्रसिद्धी मिळालेली नाही. त्यांचे कार्य लोकांना कळावे अशी माझी मनापासूनची इच्छा आहे तेव्हा शोधनिबंधासाठी तू पं. जगन्नाथबुवा पुरोहित हा विषय घेतलास तर खूपच चांगले होईल त्यासाठी तुला लागेल ती मदत करण्यास मी तयार आहे.

आजकालच्या जगात स्वतःला प्रसिद्धी मिळावी, आपले नाव पुढे यावे यासाठी हपापलेले अनेक मोठे लोक मी पाहात होते आणि त्यासाठी ही मंडळी कोणताही मार्ग आचरण्यास तयार होत, हेही मी अनुभवत होते. अशा स्थितीत 'तू माझ्यावर प्रबंध न लिहिता पं. जगन्नाथबुवांवर लिही' हा बुवांचा सल्ला ऐकून मला आश्चर्याचा धक्का बसला. गुरुआज्ञा प्रमाण मानून मी त्यांचा आग्रह मान्य केला. पण त्याचवेळी मनोमनी ठरविले की प्रथम गुरुआज्ञेप्रमाणे पं. जगन्नाथबुवांचे संशोधन गुरुच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करायचे आणि नंतर गुरुदक्षिणा म्हणून मी प्रथम ठरविलेला विषय हाती घ्यायचा.

पं. काणेबुवांनी त्या नंतरच्या आमच्या भेटीत, त्यांना माहीत असलेली पं. जगन्नाथबुवांबद्दलची सर्व माहिती संदर्भासह दिली आणि पुढील माहिती मिळविण्यासाठी बुवांच्या अनेक ज्ञात व अज्ञात शिष्यांचे परिचितांचे संदर्भ दिले. या सर्व शिष्यांचे काणेबुवांशी मैत्रीचे व सलोख्याचे संबंध होते. पं. जगन्नाथबुवांच्या चरित्राचा अभ्यास करताना मला या सर्व शिष्यांचे व परिचितांचे संपूर्ण सहकार्य मिळाले. जसजशी मी या विषयात रस घेत गेले तसतसे पं. जगन्नाथबुवांच्या व्यक्तिमत्वाबद्दल आणि संगीतातील योगदानाविषयी प्रगल्भ झाले.

पं. काणेबुवांच्या मुळे पं. जगन्नाथबुवांनी आयोजित केलेल्या त्यांचे गुरु पै. विलायतहुसेनखाँ यांच्या पुण्यतिथी महोत्सवात इ.स. १९६७ साली हजर राहण्याची व त्या निमित्ताने आयोजित केलेल्या संगीत समारोहात गायची सुसंधी मला मिळाली होती. मुंबईतील ब्राह्मण सेवा संघ येथे हा समारंभ साजरा झाला होता. अनेक मान्यवर कलाकार व त्याचबरोबर आमच्यासारखे काही नवशिके तेथे हजेरी लावण्यास आले

होते. त्या कलाकारांत पं. जगन्नाथबुवांचे एकापेक्षा एक असे नावाजलेले शिष्य होते. श्रोतृवृंदातही अनेक दिग्गज कलाकार बसले होते. सकाळपासून दुसरे दिवशी पहाटेपर्यंत गायन समारोह अखंड चालू होता. त्या मैफलीत बुवांनी शिकवलेला शुद्ध कल्याण मी सादर केला. त्यावेळी समोर श्रोत्यात मध्यभागी पं. जगन्नाथबुवा विराजमान होते आणि त्यांच्या आजूबाजूस पं. कुमार गंधर्व, पं. जसराज, पं. राम मराठे, पं. यशवंतबुवा जोशी, पं. गिंडेबुवा, पं. वसंतराव कुलकर्णी, पं. जितेंद्र अभिषेकी, विदुषी पद्माताई शाळीग्राम, माणिक वर्मा, योगिनी जोगळेकर, सौ. पूर्णिमा तळवळकर, सुमन माटे ही अव्वल मंडळी बसली होती. सर्व गवयांची गानसेवा झाल्यावर पं. जगन्नाथबुवा (गुनिदास) गाण्यास बसले. पाठीमागे तंबोऱ्यावर होते पं. राम मराठे व पं. काणेबुवा. त्या दिवशीचा त्यांचा शिवमत भैरव अजूनी माझ्या हृदयात ठसला आहे. इतकी भावूक, हृदयस्पर्शी व बुद्धिवादी गायकी मी त्यापूर्वी कधीच ऐकली नव्हती.

त्यानंतर असाच सुयोग १९६८ च्या मे महिन्यात आला. पुण्यात पं.जगन्नाथबुवांचे जीवश्च स्नेही वा. वा. गोखले यांच्या 'मुद्रिका' या बंगल्याचा वास्तुशांत समारंभ होता. त्या कार्यक्रमाला पं.काणेबुवा मला घेऊन गेले होते. तेथे मला पं.जगन्नाथबुवा जवळून पाहता आले,अनुभवता आले, ऐकता आले. पं.जगन्नाथबुवांचे गाणे एकाच वेळी मनाला व बुद्धीला भिडणारे होते. त्या समारंभाच्या दुसऱ्याच दिवशी आपटे रोडवरील डॉ. फडणीस यांच्या बंगल्यावर, माझे गाणे पं. काणेबुवांनी ठरविले होते. त्या कार्यक्रमास पं.जगन्नाथबुवा स्वतः उपस्थित होते. तिसऱ्या मजल्यावरील संगीत हॉल सुरेख सजला होता. संपूर्ण हॉलभर शुभ्र पलंगपोस घातलेल्या गाद्या पसरलेल्या होत्या. श्रोत्यांमध्ये अग्रक्रमी बसले होते पं. जगन्नाथबुवा. त्यांचे गंभीर व्यक्तिमत्त्व पाहून प्रथम मला थोडा धाक वाटला पण जेव्हा त्यांनी हसतमुखाने गाणे सुरू करण्याची खूण हाताने केली. तेव्हा माझी भीती चेपली. त्या मैफलीत पं. बी. आर. देवधर यांनी निर्मिलेल्या चंद्रकंस रागातील पं. जगन्नाथबुवांनी बांधलेल्या विलंबित '*ये दुखवा*' आणि '*द्रुत धन धन...* 'या चीजा त्यांच्यासमोर सादर केल्या. त्यावेळी त्यांची मिळालेली शाबासकी, अत्तराच्या कुपीसारखी माझ्या हृदयात मी अजूनही जपलेली आहे. त्या आनंदाच्या समयी या उत्तुंग व्यक्तिमत्त्वावर संशोधन लेखन करण्याची कामगिरी माझ्या हातून होणार आहे ही कल्पनाही मला स्पर्शली नव्हती. माझ्या गुरुंमुळे हा योग आला आणि या निमित्ताने गुनिदास हे व्यक्तिमत्त्व, व्यक्ती आणि गायक म्हणून कसे आभाळाएवढे विशाल होते याची जाणीव मला झाली. ही

माझ्या गुरुंनी माझ्यावर केलेली कृपाच आहे असे मी समजते.

माझ्या संकल्पाप्रमाणे प्रथम पं. जगन्नाथबुवा या विषयावरील संशोधन प्रबंध लेखन आणि त्या प्रबंधास मान्यवरांची मान्यता हे टप्पे मी पार पाडले. माझ्या प्रबंधाचे पं. सी. आर. व्यास, पं. नीळकंठबुवा अभ्यंकर, पं. भाई गायतोंडे, पं. वि. रा. आठवले, पं. बबनराव हळदणकर, जी. एन. पुराणिक, पं. माधवबुवा इंगळे, विदुषी योगिनी जोगळेकर, लीलाताई करंबेळकर अशा मान्यवरांनी खूप कौतुक केले व या प्रबंधाचे पुस्तकरूपात प्रकाशन व्हावे, अशी इच्छा प्रकट केली. मात्र या प्रबंध निर्मितीमागे, ज्याने मोलाचे साहाय्य केले होते ते पं.वसंतराव कुलकर्णी, पं. जितेंद्र अभिषेकी, श्री. जे. एल. रानडे, विदुषी माणिक वर्मा, पूर्णिमा तळवळकर, वा. वा. गोखले अशा मान्यवरांनी प्रबंध पूर्तीच्या पूर्वीच जगाचा निरोप घेतला होता. तसेच या प्रबंधाला गाइड म्हणून लाभलेले पं. नारायणबुवा पटवर्धन आणि या प्रबंधाचा विषय सुचवणारे माझे गुरू पं. द. वि. काणेबुवा या दोघांचेही निधन या प्रबंधापूर्वीच झाले हा दुर्दैवी सल माझ्या मनात कायम आहे. हा सल मनात ठेवूनच 'गुनि–गुरू' या ललित चरित्रात्मक पुस्तकासाठी संकलन व मुलाखती घेण्याचे काम मी सुरू केले.

या पुस्तकाच्या निर्मितीसाठी प्रथम मी, पं. जगन्नाथबुवांच्यावर लिहिलेल्या प्रबंधावर दिलेले मान्यवरांचे अभिप्राय आणि सूचना यांचा सखोल अभ्यास केला. त्यानंतर त्याच्या अनुषंगाने नव्याने मुलाखती घेणे आणि संदर्भ शोधणे सुरू केले. प्रबंधातील क्लिष्टता कमी करून, पं.जगन्नाथबुवांची ओळख लोकांना लालित्यपूर्ण पद्धतीने कशी करून देता येईल याचा विचार केला.

पं.काणेबुवांचा जीवनपट उलगडून त्यावर चरित्रात्मक लेखन करण्यासाठी पं. काणेबुवांच्या अनुभवसंपन्नतेचे कानेकोपरे सर्व बाजूने तपासणे आश्वासक होते. त्यासाठी प्रथम मी बुवांचे घरी जाऊन त्यांचे चिरंजीव चंद्रकांत काणे (कार्यकारी संचालक दत्ताजीराव कदम टेक्निकल इन्स्टिट्यूट) आणि त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. प्रतिभा यांना भेटले. दोघांनीही कृतज्ञतापूर्वक माझ्या सर्व प्रश्नांची उकल केली. त्यानंतर बुवांच्या पत्नी श्रीमती मालतीबाई म्हणजे आमच्या वहिनी यांच्याशी संवाद साधला. त्यांच्या बोलण्यातून आलेले संदर्भ गोळा करण्यासाठी, संबंधित व्यक्तींना भेटले. बुवांच्याबद्दल वर्तमानपत्रातून वेगवेगळ्या वेळी आलेल्या लेखांचे आणि बातम्यांचे संदर्भ मिळविले व त्यांचे संकलन केले. बुवांच्या इतर शिष्यांचेही आपल्या गुरुबद्दलचे विचार आणि भावना जाणून घेण्यासाठी त्यांच्या मुलाखती घेतल्या. बुवांना ज्या ज्या गुरुंकडून गानविद्या प्राप्त झाली त्या त्या गुरुंच्या चरित्रांचे वाचन केले. तसेच काणेबुवा ज्या

इचलकरंजी संस्थानात लहानाचे मोठे झाले त्या नगरीतील आणि त्या बाजूच्या परिसरातील त्यावेळचे सांगीतिक वातावरण आणि सामाजिक परिस्थिती 'याची देही याची डोळा' अनुभवलेले माझे पंचाण्णव वर्षाचे वडील श्री. पुरुषोत्तम माधव रानडे यांनी अतिशय तन्मयतेने सांगितलेली माहिती मी संकलित केली. या सर्व सुहृदांच्या साहाय्यामुळे मी पं. काणेबुवांचे चरित्र सविस्तरतेने साकारू शकले.

असे चरित्रात्मक परंतु अभ्यासपूर्ण लेखन करण्याचा आणखीन एक उद्देश म्हणजे संगीतप्रेमी मंडळींना संगीतोपासक जरी नाही तरी संगीत जिज्ञासू करणे हा होय. संगीताच्या गप्पांमध्ये तज्ज्ञ गुरुवर्यांनी केलेली विधाने कधी कधी चुकीची असू शकतात कारण असे गुरूवर्य जसे विचारी असतात तसे विकारीही असतात. शिवाय अशी विधाने कधी कधी इतर गोष्टींच्या प्रभावाने वा परिस्थितीनुसार होत असतात म्हणूनच अशा विधानावर विसंगत मत बनविणे बरोबर नसते. याउलट अशा प्रकारच्या ग्रंथलेखनात आलेली विधाने व प्रसंग, मांडलेले सिद्धांत अनेक संदर्भ तपासून त्यातील सत्यता पडताळून प्रगल्भ विचारांच्या परिसावर आपले अनुभव घासून, त्यानंतर केलेली असतात आणि म्हणूनच असे वैचारिक वाचन मेंदू निरोगी ठेवण्यास आणि माणसाला विचार करायला लावण्यास उद्युक्त करते. रोजच्या जीवनात खाणे, पिणे, आराम करणे हे चालू असतेच पण या व्यतिरिक्त निरोगी आयुष्य जगण्यासाठी, रोजच्या दिनक्रमात व्यायाम, वाचन आणि योग्य आहार याची अनिच्छेने का होईना सवय लावून घ्यावी लागते. वाचन प्रकारात कथा, कादंबऱ्यांबरोबर वैज्ञानिक,वैचारिक, चरित्रात्मक पुस्तकांचाही समावेश असणे आवश्यक असते. रोजच्या वर्तमानपत्रातल्या खून, मारामाऱ्या, दरोडे इत्यादी प्रक्षोभक बातम्यांबरोबरच आपल्या मेंदूच्या योग्य वाढीसाठी टॉनिक म्हणून अशा प्रकारच्या वैचारिक उपदेशक वाचनाची जरुरी असते. ही जरुरी पूर्ण करण्याच्या उद्दिष्टांत एक अल्पसा सहभाग म्हणून हे पुस्तक लिहिले आहे.

सर्व रसिक वाचकांनी या ग्रंथास शुभाशीर्वाद द्यावेत हीच अपेक्षा.

**डॉ. मंगला आपटे**

७७३/१अ. १०२, 'मधुरा', कमला नेहरू पार्कमागे, प्रभात रस्ता, गल्ली नं १०,
एरंडवणे, पुणे ४११००४. दूरध्वनी क्रमांक – (०२०) (२५६५७८९८)

# माझ्या आदरभावना

''गुनि–गुरू'' या माझ्या दोन महागुरुंचे एकत्र चरित्र लिहिण्याची संकल्पना जेव्हा मी आकारात आणण्यास सुरुवात केली तेव्हा माझ्या अनेक हितचिंतकांनी, गुरुजनांनी अनेक संस्थांनी मदतीचा हात पुढे केला.

जी. एन. पुराणिक यांनी पं. जगन्नाथबुवांचे षष्ट्यब्दीपूर्ती समारोहाचे व मृत्यूनंतरचे लेख उपलब्ध करून दिले. सौ. लीलाताई करंबेळकर यांनी बुवांच्या काही अप्रसिद्ध आठवणींचा खजिना मला दिला. श्रीकांत डिग्रजकर, कार्यवाह देवल क्लब यांनी देवल क्लबच्या संग्राहातून पं.जगन्नाथबुवा आणि पं.काणेबुवा यांचेवरील लेख, फोटो व कॅसेटस् मिळवून दिल्या. बुवांचे कोल्हापुरातील प्रथम शिष्य बाळ राजाज्ञे यांनी वयाची ८० उलटल्यानंतरही अतिशय ताजेपणाने जगन्नाथबुवांची आठवण उद्धृत केली.

पं. काणेबुवांचे चिरंजीव पं.चंद्रकांत काणे यांनी आणि त्यांचे कुटुंबिय यांनी अतिशय आपुलकीने बुवांचे दुर्मिळ फोटो पाठवून दिले आणि आठवणी सांगितल्या. या सर्व मान्यवरांची मी आभारी आहे. तसेच या ग्रंथास आशीर्वाद आणि अभिप्राय देणारे गुरुजन पं. माधवराव इंगळे, प्रा. माधवराव दीक्षित, पं. वि. रा. आठवले व श्री. विंदा करंदीकर यांची मी अत्यंत ऋणी आहे.

केशव साठ्ये व त्यांचे सहकारी यांचेही आभार मानणे आवश्यक आहे. त्यांनी पुस्तकातील प्रकरणांचे सांधे जुळविण्याचे, संकलन करण्याच्या कामास मदत केली. या पुस्तकपूर्तीसाठी माझे पती सुधीर आपटे यांचे अमूल्य सहकार्य लाभले.

सुमारे महिनाभर वेळ उरला असताना या ग्रंथाच्या प्रकाशनाचे जबाबदारीचे काम अनुबंध प्रकाशनचे श्री. अनिल कुलकर्णी यांनी आनंदाने अंगावर घेतले व तडकाफडकीने तडीला नेले. चित्रकार रविमुकुल यांनी उत्तम मुखपृष्ठ काढले व अक्षरजुळणीचे काम समर्थ ग्राफिक्सच्या राखी शिलम यांनी अल्पवेळात केले या बद्दल त्या सर्वांची मी आभारी आहे.

**– सौ. मंगला आपटे**

# जेष्ठांचे आशीर्वाद

□ **डॉ. माधवराव दीक्षित** – श्रीसाईभक्त व प्राध्यापक

संगीतप्रवीण मंगला आपटे यांनी लिहिलेला शास्त्रीय संगीत आणि गुरूपरंपरा या विषयाशी संबंधित असणारा 'गुनि–गुरू' हा ग्रंथ म्हणजे गुरूकृपेला वाहिलेली आदरांजली आहे. कोणत्याही कलेच्या उपासनेत, गुरूंचा सहवास, त्यांचे मार्गदर्शन आणि मंगल आशीर्वाद मिळणे, हा साधनेला मिळालेला दैवी शुभशकुन असतो.

भाग्यवान अनुगृहीत शिष्यालाच गुरूची कृपा लाभते. गुरूशिष्य परंपरेतून संगीताच्या उपासकाला गुरुमुखातून अभिजात संगीताचे विद्यादान केले जाते. जिज्ञासेने आणि निष्ठेने शिष्य; गुरुकडून मिळालेले विद्येचे धन आपल्या हृदयात साठवतो व त्यात भर घालतो. स्वतःची स्वतंत्र बुद्धी आणि कल्पनाशक्ती वापरून गुरुंच्या मार्गदर्शनाप्रमाणे सतत रियाझ करून गुरुंनी दिलेल्या संगीतविद्येचे जतन व विकास करतो. आपण दिलेली विद्या समृद्ध करण्याचे शिष्याचे प्रयत्न पाहून गुरूला संतोष होतो व तो प्रसन्न होतो. ही प्रसन्नता कला विकासात शिष्याचे मोठे सामर्थ्य असते. त्यामुळे गानविद्येच्या सौंदर्याबद्दलची शिष्याची जाण वाढते व नजर परिपक्व बनते. ही गुरूकृपेची देणगी असते.

एक निष्ठावंत शिष्या म्हणून या सगळ्याची अनुभूती मंगला आपटे यांना त्यांच्या गानतपस्येत आलेली आहे. संगीताच्या क्षेत्रात आपल्या गुरूंचे (प्रभाकरबुवा शेंडे, पं. द. वि. काणे, पं. वि. रा. आठवले, आणि पं. माधव इंगळे, बालगंधर्वांना ऑर्गनची साथ केलेले नाना घोटणकर) आणि त्यांच्या गान परंपरेचे म्हणजेच घराण्याचे पाईकपण त्यांनी स्वीकारले. त्यामुळे त्यांच्या कलाविष्कारात घरंदाजपणा आलेला आहे. त्यांच्या गुरूंनी त्यांच्या गाण्यावर केलेले संस्कार त्यांच्या गायनशैलीत विशेषत्वाने दिसतात. तरीही गुरूचे औदार्य त्यांच्या विद्यार्थिनीच्या स्वतंत्र कल्पनाशक्तीला एकाच गुरूपरंपरेत (घराण्यात) बांधून

ठेवत नाहीत. म्हणून त्या ख्याल, ठुमरी, नाट्यगीते, भजने सारख्याच तयारीने व त्यांच्या स्वतःच्या शैलीने गाऊ शकतात. कलेच्या विकासात हेच घडायला हवे. नवनिर्माणाला उत्तेजन मिळायला हवे. त्यामुळे संगीताच्या सर्जनशीलतेत भर पडते व ते अधिक समृद्ध बनते.

सिद्धहस्त गायक कुमार गंधर्वांनी हेच विचार व्यक्त केले आहेत. ते म्हणतात, 'ज्योत तेवत ठेवली पाहिजे. पणतीत सतत तेलाची भर पडली पाहिजे. गुरुकडून जे मिळाले त्यावर अल्पसंतुष्ट राहता कामा नये. कलेवर प्रभुत्व मिळविल्यानंतर केवळ गुरुच्या अनुकरणात समाधान मानले जाऊ नये. कलाविष्काराच्या घोड्यावर स्वार झाल्यावर कलाकाराला त्याला आपल्या इच्छेप्रमाणे वळविता आले पाहिजे. नाहीतर आपण घोड्यावरून पडून जाऊ,' या विचारांचे मर्म हे आहे की मर्यादांना न जुमानता सातत्याने केलेला व्यासंग, रियाझ आणि स्वतंत्र कल्पनाशक्तीचा विकास यामुळे खानदानी कला समृद्ध होते. अशा समृद्ध कलेचा वारसा, मंगला आपटे यांना त्यांच्या गुरूंच्या आशीर्वादाने मिळाला. त्याचे मंगलाताईंनी, वयाच्या साठाव्या वर्षापर्यंत अखंड परिश्रम करून चीज केले. गुरूने संगीताचे संस्कार केल्यानंतर साधनेत सातत्य ठेवल्याशिवाय संगीत क्षेत्रातील यश व कीर्ती साध्य होत नाही. स्वरसाधना केल्यामुळे मंगलाताईंचा सूर साठीच्या वयातही अत्यंत निकोप, सुरेल व वजनदार आहे. त्यामुळे त्यांच्या गायनाला देशविदेशात झालेल्या विविध महत्त्वाच्या कार्यक्रमात रसिकांची व बुजुर्गांची दाद मिळाली. त्यांच्या गानशैलीचा (गायकीचा) घरंदाजपणा व निराळेपणा, रसिकांच्या हृदयाला भिडला.

संगीत ही कृतीप्रधान कला (Performing Art) आहे. अस्सल घरंदाज गायकीला कलाकार कितीही जरी प्रसिद्धीपराङ्मुख असला तरी मानाचे स्थान मिळतेच व हे स्थान रियाझाची तपस्या करून टिकवावे लागते. पं. भीमसेन जोशी यांच्याकडे मार्गदर्शनासाठी आलेल्या शागीर्द इंजिनियरला भीमसेनजी म्हणाले, ''तुम्ही इंजिनियरिंगच्या परिक्षेला एकदाच बसून पदवी मिळवलीत. नंतर तुम्हाला त्याच पदवीसाठी परीक्षा द्यावी लागली नाही. परंतु यश व कीर्ती मिळविलेल्या सिद्ध गायकाला प्रत्येक मैफल ही परीक्षा असते. रियाझाशिवाय गाणे जमणारच नाही. रियाझ केला नाही तर आपली प्रतिष्ठा टिकवून ठेवता येणार नाही.''

अशी गानविद्या टिकवून ठेवण्यासाठी लागणारी शिस्त, संसारातील जबाबदाऱ्या पार पाडत असताना, मंगला आपटे यांनी पाळली व आपल्या गाण्याचा दर्जा उंच ठेवला. एवढेच नव्हे तर संगीत विद्येवर संशोधनपर लिखाण करून प्रबंध लिहून, संगीत विषयातील डॉक्टरेट मिळवली. हे अपूर्व आहे. कारण गुरुकृपा लाभलेल्या आणि श्रेष्ठ गायक म्हणून रसिक मान्यता व कीर्ती मिळविलेल्या गायकांनाही, आपल्या गुरुबद्दलच्या भावना व संगीत विषयक विचार सुसंगतपणे व नेमकेपणाने मांडता येत नाहीत. ही उणीव भरून काढण्याचे कौशल्य मंगलाताईंनी संशोधनपर लिखाण करून दाखवून दिले आहे. संशोधनात्मक व ललित्यपूर्ण भाषेत लिहिलेला हा ग्रंथ त्यांचे संगीत लेखनावरील प्रभुत्व दर्शवितात. या प्रभुत्वामुळेच अनेक विद्यापीठात मंगलाताईंची संगीत परीक्षक म्हणून नेमणूक झाली. एवढे कर्तृत्व असूनही मंगलाताई नम्र आहेत. नम्रता हा ईश्वराला आवडणारा सर्वात मोठा गुण आहे. ह्या नम्रपणामुळे मंगलाताई नेहमी प्रसन्न असतात.

या तपश्चर्येला साजेसे व पूरक असे लक्ष्मी आणि सरस्वतीचे वैभव मंगलाताईंच्या संसाराला आहे. त्यांचे कौटुंबिक वातावरण त्यांच्या कलासाधनेला पोषक असेच आहे. प्रत्येक कर्तृत्ववान पुरुषाच्या पाठीमागे स्त्री शक्तीचे पाठबळ असते त्यात थोडा फरक करून असे म्हणता येईल की मंगलाताईंच्या कर्तृत्वामागे त्यांचे रसिक पती सुधीरदा आपटे यांचे सहकार्य व पाठबळ आहे. सुधीर आपटे यांच्या व्यक्तिमत्त्वात आध्यात्मिक अंग असल्याने तपश्चर्येस लागणाऱ्या पवित्र शक्तीचे बळ ते आपल्या पत्नीला देत आले आहेत. ही श्रद्धेची श्रीमंती आहे. ती त्यांच्या घरातल्या प्रत्येक वस्तूच्या मांडणीत दिसते. श्रीसाईनाथांच्या देवघराप्रमाणेच संगीत साधनेसाठी लागणाऱ्या तबला, पेटी, तानपुरे या साधनांची देखभाल व मांडणी अतिशय निगुतीने केलेली दिसते. संगीत मैफलीचे वैभवपूर्ण वातावरण, अगत्याने संपन्न झालेले आहे. गवय्येगिरीला व खवय्येगिरीला काही कमी पडत नाही.

मंगलाताईंच्या संगीत तपश्चर्येला, त्यांचे आध्यात्मिक श्रद्धास्थान असलेले थोर साईभक्त श्रद्धेय चंद्रभानू सत्पथीजी यांचा आशीर्वाद मिळाला आहे. त्यांच्या कुटुंबातील सर्व वातावरण साईभक्तीमय आहे. सत्पथीजी गुरुजींनी स्थापन केलेल्या साईभक्ती केंद्राना आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा मिळाली

आहे. मंगलाताईंना ते साईभक्ती संगीत गाण्यासाठी अगत्याने दिल्लीस बोलावून घेतात व मार्गदर्शन करतात.

मंगलाताईंचे सर्वच कुटुंब बाबांच्या भक्तीप्रेमाचा वारसा टिकवून आहेत. त्यांची एक मुलगी धनश्री भरतनाट्यम् नृत्यशैलीत व संगीतात पारंगत आहे तर दुसरी मुलगी आरती नाट्य व वक्तृत्वकलेत आघाडीवर आहे. त्यांचे जावई महेश व रवींद्र यशस्वी उद्योजक आहेत. त्यांचा मुलगा भूषण व सून बकुल अमेरिकेत स्थित असून साईभक्तीचा वारसा चालवत आहेत. अमेरिकेत योजलेल्या मंगलाताईंच्या साईभक्ती संगीत सेवेत त्यांच्याच मुलाने तबल्याची समझदार साथ केली होती.

हे सर्व वैभव, मंगलाताईंच्या साईभक्तीचे त्यांना सद्गुरुंकडून मिळालेल्या आशीर्वादाचे व कुटुंबियांच्या सहकार्याचे, उत्तेजनाचे आहे. या वैभवात या ग्रंथाची भर पडली आहे. त्याबद्दल मंगलाताईंचे व त्यांच्या कुटुंबियांचे अभिनंदन करून हे आशीर्वादपर चार शब्द संपवितो.शुभं भवतु ।।

❀

☐ **पं. वि. रा. आठवले** – पं. काणेबुवा यांचे गुरुबंधू आणि सहध्यायी स्नेही

स्व. पं.जगन्नाथबुवा पुरोहित अर्थात गुनीदास हे संगीत क्षेत्रातील फार जबरदस्त व्यक्तिमत्त्व होते. जुन्या बंदिशींचा प्रचंड संग्रह नवरागनिर्माता, उत्तम विद्या गुरू, प्रेमळ स्नेही अशा अनेक पैलूंनी त्यांचे व्यक्तिमत्त्व संपन्न होते. पं. राम मराठे, पं. सी. आर. व्यास, पं. यशवंत जोशी, पं. प्रभुदेश सरदार, पं. जितेंद्र अभिषेकी, श्रीमती माणिक वर्मा यांच्यासराखे गायक गायिका त्यांच्याकडे तालीम घेत असत, एवढे सांगितले तरी त्यांचे श्रेष्ठत्व लक्षात येईल. त्यांनी निर्माण केलेले राग जोगकंस व स्वानंदी हे तर त्यांच्या प्रतिभेचे उत्कृष्ट उदाहरण आहे. साधारण वीस वर्षे त्यांचे वास्तव्य मुंबईला झाले. त्या कालखंडात अनेकजणांनी त्यांचे मार्गदर्शन घेतले. व्यावसायिक व हौशी अशा दोन्ही प्रकारच्या शिष्यांचा त्यात समावेश होता. मलाही त्यांच्या मार्गदर्शनाचा थोडा लाभ झाला होता. असा हा श्रेष्ठ गायक, विद्यागुरू त्या मानाने संगीत क्षेत्रात थोड्या प्रमाणात उपेक्षित राहिला, असे म्हणता येईल.

माझी एक शिष्या, किंवा विद्यार्थीनी म्हणा, मंगला आपटे हिने गांधर्व महाविद्यालय मंडळाच्या 'संगीताचार्य' परिक्षेसाठी पं. जगन्नाथबुवा पुरोहित

व्यक्ती आणि कार्य त्यांचे संगीत क्षेत्रातील योगदान या विषयावर प्रबंध लिहून ही पदवी प्राप्त केली. आता तो प्रबंध ती पुस्तकरूपाने प्रसिद्ध करत आहे. तिच्या परिक्षेसाठी मीच तिला हा विषय सुचवला असल्यामुळे साहजिकच या पुस्तकाला प्रस्तावना लिहिण्याची तिने मला विनंती केली. पं. जगन्नाथबुवा हे माझे गुरुबंधु व अगदी जवळचे स्नेही असल्यामुळे तसेच स्व. पं. जगन्नाथबुवांच्या चरित्राबरोबरच मंगलाचे गानगुरू पं. द. वि. काणेबुवा यांचेही ललित चरित्र लेखनाचा मानस तिने माझ्याजवळ व्यक्त केला आणि तो मला स्तुत्य वाटला. उत्तम आवाजाची आणि बद्धिमत्तेची देणगी लाभलेले पं. काणेबुवा हे माझे सहाध्यायी गुरुबंधू आणि जवळचे स्नेही होते.

प्रसिद्धी पराङ्मुख असलेल्या या दोन्ही गवयांच्या कार्याचा गौरव या पुस्तकाच्यामुळे होत आहे. ही आनंदाची गोष्ट आहे. म्हणूनच हे काम करण्याचे मी आनंदाने मान्य केले कारण त्याला स्नेह आणि कर्तव्यभावना या दोन्ही गोष्टी कारणीभूत आहेत.

मंगला आपटे यांनी खूप परिश्रम घेऊन,अनेकांच्या मुलाखती घेऊन, पं. जगन्नाथबुवा व पं.काणेबुवांच्या एकंदर व्यक्तिमत्त्वाचा व कार्याचा परामर्श घेऊन अतिशय समर्थपणे दोघांचे श्रेष्ठत्व संगीतक्षेत्रातील जिज्ञासू व संबंधित व्यक्तींपुढे मांडले आहे. पुस्तकरूपाने या दोन गुरुंचे चरित्र प्रकाशित होत असल्यामुळे आता ते वाचकांपुढे येत आहे. संगीताच्या दृष्टीने हे फार मोठे कार्य तिने केले आहे. माझे तिला आशीर्वाद आहेत. तसेच तिचे मी या निमित्ताने अभिनंदनही करत आहे. मंगला ही संगीतात रमलेली, व्यासंगी अशी गायिका आहे. संगीताची सेवा तिच्याकडून अशीच उत्तरोत्तर घडत राहावी, अशी इच्छा व्यक्त करतो.

❀

☐ **श्री. विंदा करंदीकर** – ज्ञानपीठ विजेते

तुम्ही हाती घेतलेले ललित चरित्र पुस्तकाचे काम अतिशय स्तुत्ये आहे. या तुमच्या पुस्तक लेखनासाठी माझ्या लाख लाख शुभेच्छा!

❀

# अनुक्रमाणिका


**पं. जगन्नाथबुवा पुरोहित**

जडणघडण ।२७

कलापुरातील मुसाफिरी ।३१

मुंबईतला ऐश्वर्यकाल । ४०

व्यक्तिमत्त्व दर्शन । ४६

सर्जनशील कलावंत । ५२

गुरूशिष्य एकरूपता । ६७

आदर्श महागुरू । ७१

काही प्रवाद काही आठवणी ।८५

अखेरचे दिवस । १००

संगीत दुनियेचा साई। १०५

काही नोटेशन ।१११

ठळक घटनांची सनावळी ।११५

**पं. द.वि. काणे बुवा**

जडणघडण ।१२३

गंडाबंधन । १३३

मुंबईतील वाटचाल । १३९

इचलकरंजीतील दिमाखदार कारकीर्द /१५१


ठळक घटनांची सनावळी ।१७५

धृपद । १७६


लेखिका परिचय ।१८०



# पं.जगन्नाथबुवा पुरोहित



पु.ल.देशपांडेंच्या
समवेत
पं. जगन्नाथबुवा



पं.जगन्नाथबुवांच्या
समवेत
जी.एन.जोशी



पं.जगन्नाथबुवांना
तबल्यावर साथ
देताना भाई गायतोंडे




पं.सी.आर.व्यास, पं. जगन्नाथबुवा यांच्या समवेत पं. काणेबुवा



**बसलेले डावीकडे.डा .:–** हुल्याळकर, मोहितेबुवा, पं.जगन्नाथबुवा, जी.एल.रानडे, लीलाताई पुराणिक
**उभे डावीकडे. :–** पं.जितेंद्र अभिषेकी, जिनेंद्र ढणाल, केशवराव धर्माधिकारी, गणा पुराणिक



उभे : अजमत हुसेन, विलायत हुसेन खाँ, तिरखवाँ, लालजी गोखले,
पं. काणेबुवा यांच्या समवेत पं. जगन्नाथबुवा



कोल्हापूर शहर रेशन हद्द.

वैयक्तिक रेशन कार्ड.

DECLARED वॉर्ड

No 148686 घर नं.

पो. नं.

पूर्ण नांव

वय

कुटुंब प्रमुख

पत्ता

Issued by तारीख

wo.989c150000kgp6,48

हुकुमावरून,
डी. जी.
कंट्रोलर ऑफ रेशनिंग,
कोल्हापूर स्टेट.

१

# जडणघडण

दि.१२ मार्च १९०४ रोजी एका गरीब ब्राह्मण कुटुंबात पं. जगन्नाथबुवांचा जन्म झाला. त्यांचे वडील जनार्दनपंत पुरोहित भिक्षुकी करीत. आई लहानपणीच वारल्यामुळे बुवांना ती कशी होती, आठवतही नव्हते. मातेच्या मृत्यूनंतर बुवांचे कसेबसे एक-दोन इयत्ता शिक्षण झाले. त्या काळात निजामाच्या दरबारात पाच-पंचवीस बडे गवई होते. जुम्म्यानंतर दुपारी तीन वाजल्यापासून रात्री दहा वाजेपर्यंत मुसलमान गवयांच्या बैठकी होत. त्याशिवाय गावात ठिकठिकाणी भजने, किर्तने चालूच असत. जगन्नाथबुवांचे वडील जनार्दनपंत त्यांना बोटाला धरून गाणे ऐकायला नेत असत. एकूण गाण्याबजावण्याने तेथील वातावरण गजबजलेले असे. त्यामुळे छोट्या जगन्नाथाला शास्त्रीय गाण्याची विलक्षण गोडी वाटू लागली.

वयाच्या दहाव्या-अकराव्या वर्षी वडील वारल्याने त्यांचा प्रतिपाळ थोरल्या चुलत्यांनी केला. जगन्नाथाने शाळेला कायमचा रामराम ठोकून, मित्रमंडळींच्यासमवेत गाण्याबजावण्यात स्वतःला अक्षरशः झोकून दिले.

इतिहास, भूगोलाऐवजी चिजा लवकर पाठ होतात, हे त्यांच्या लक्षात आले. गणिताची कोष्टके जमली नाहीत, पण त्रिताल, एकतालाचा हिशेब मात्र चुटकीसारखा जमला म्हणून इतिहासातील लढायांच्या रक्तात न्हाऊन निघालेल्या गझनीचा महंमद वगैरेंचा नाद सोडून स्वरांचे मंगलस्नान घालणाऱ्या महम्मद अली खाँ वगैरेंशी नाते जोडले असे पु. ल. देशपांडे त्यांच्याविषयी मोठ्या गंमतीने म्हणत.

मैफली, भजने, नित्यनेमाने ऐकता-ऐकता जगन्नाथ हळूहळू गायलाही लागला. पण हे सर्व ऐकीव होते. १९२१ साली दिल्लीजवळच्या सिकंदऱ्याचे महंमद अली खाँ, जे निजामाच्या दरबारात होते, त्यांची एक जमलेली मैफल जगन्नाथाने ऐकली आणि गाणे शिकण्याच्या विलक्षण तळमळीने जगन्नाथने महंमद अली खाँ यांना गाणे शिकविण्याची विनंती केली. त्यांनी ती तत्काळ मान्य केली, आणि तालीमही सुरू केली.

सुरुवातीला-अडल्या नडल्या कामाला हा पोरगा बरा आहे, म्हणून धूर्त खाँसाहेबांनी एखादी अर्धी चीज शिकवून जगन्नाथाला अडकवून ठेवले. पण त्यांची प्रेयसी

घरंदाज व सरळ स्वभावाची होती. गुरुपत्नी म्हणून जगन्नाथ तिची सर्व कामे करीत असे. तिच्या कानावर ही खाँसाहेबांची टाळाटाळ घालावी म्हणून ते गेले. आजारपणामुळे बाई कण्हत पडल्या होत्या. अस्वच्छ कपडे व उष्टी खरकटी यांचा पसारा जिकडे-तिकडे पडला होता. जगन्नाथातील शिष्याचा आत्मा जागा झाला. बाईंच्या नकळत त्याने ती सर्व खरकटी घेतली आणि नदीची वाट धरली. या सेवेने बाईंनी प्रसन्न होऊन जगन्नाथाच्या शिक्षणाची व्यवस्था केली आणि आश्चर्याची गोष्ट अशी की दुसऱ्या दिवसापासून खाँसाहेब जगन्नाथाला मनापासून शिकवू लागले. पुढे पाच-सहा वर्षे जगन्नाथने त्यांच्याकडून तालीम घेतली.

दरम्यान जगन्नाथाच्या अयुष्यात जे अनेक अप्रिय प्रसंग आले, त्यापैकी एक घडला महंमद अली खाँची तालीम घेत असताना. जगन्नाथाच्या जात्याच सौंदर्य दृष्टीला शब्बूखाँच्या गायकीचे आकर्षण वाटू लागले. ह्यात गैर काहीच नव्हते. एकाच गायकाला संगीतकला सर्वांगीण नटवता येत नसते. गायकीची अनेक अंगे आहेत. पण पुष्कळदा सार्थ अभिमान आणि अहंकार यांची गल्लत होते. गायकीपेक्षा गायक मोठा व्हायला लागतो. दुर्दैवाने तसे काहीसे झाले आणि महंमद अली खाँसाहेब व शब्बू खाँसाहेब या दोघांचीही मर्जी खफा झाली. जगन्नाथाची अवस्था कठीण झाली. पण इथे त्याच्या निष्ठेने त्याला तारले. त्या दोन्ही गुरुजींना उपरती झाली आणि बद्रुज्जमाखाँसाहेबांनी मध्यस्थी केल्यामुळे उलट त्याला दोन्ही उस्तादांची तालीम सुरू झाली. जगन्नाथाच्या एकूण यशस्वी जीवनाच्या वाटचालीत अथक सेवा व निष्ठा या गुणद्वयांचा अनन्यसाधारण असा वाटा आहे.

वयाच्या अकराव्या-बाराव्या वर्षापासून अखेरपर्यंत जगन्नाथाला एकापेक्षा एक महान उस्ताद भेटले. सिकंदरा घराण्यातले महम्मद अली खाँसाहेब, तानरसखाँचे पुत्र उमराव खाँसाहेब व त्यांचे पुत्र सरदार खाँ व भांजे शब्बू खाँसाहेब, गुड्याना घराण्यातले बशीरखाँ (संगीत आणि तबला) तसेच तलवंडी घराण्यातील गुलाम महम्मद खाँसाहेब आणि अखेर आग्रेवाले विलायत हुसेन खाँसाहेब इत्यादी. उस्तादांची ही यादीच कोणाही गायकाचे डोळे दिपवणारी आहे. या सर्वांना सेवेच्या सामर्थ्यावर संतुष्ट ठेवून या वेगवेगळ्या नामवंत घरंदाज गवयांची वर्षानुवर्षे तालीम घेऊन त्यातील प्रत्येकाच्या गायकीची वैशिष्ट्ये तर बुवांनी आत्मसात केलीच, शिवाय सर्वांकडून खूबसूरत चिजांचा बहुमोल खजिना संपादन केला.

हैद्राबादेत असताना, संगीत शिक्षणाबरोबरच जगन्नाथला बशीरखाँ यांचेकडून तबल्याचेही शिक्षण मिळत होते. कारण बशीरखाँ हे उत्तम तबलजीही होते. याच बशीरखाँचे आणखीन एक शिष्य म्हणजे, सुश्री शोभा गुर्टूचे गुरू घम्मनखाँ हे प्रथम उत्तम तबलजी होते.

हैद्राबादेत असताना पं. जगन्नाथबुवांच्या कोल्हापूर-बेळगावापर्यंत गाण्याच्या

निमित्ताने फेऱ्या चालू होत्या. त्या वेळी मेहबूबखाँ करवीर वाचन मंदिर समोरील राजाराम हायस्कूलजवळ असलेल्या मारवाड्याच्या बोळात एका खोलीत राहात होते. बुवा कोल्हापूरला आले की त्यांच्याकडेच राहात असत. त्याकाळात मेहबूबखाँ यांनी त्यांना आपल्या जवळची तबल्याची सर्व विद्या दिली होती. मेहबूबखाँ १९३० च्या सुमारास पुण्यात स्थायिक झाल्यावर जगन्नाथचे तबल्याचे शिक्षण तिरखवाँ यांचेकडे सुरू झाले आणि १९३३ साली सांगलीच्या सरदारभाई कारदगेकर यांच्या माडीवर तिरखवाँ यांचा गंडा बांधला.

मुसलमान कलाकारांच्या सान्निध्यात बराच जीवनकाळ व्यतीत केल्यामुळे त्यांना जगन्नाथखाँ किंवा जगन खाँ असे संबोधत. सर्व खूष झालेल्या हैद्राबादी खाँमंडळींनी त्याला 'तू खरा गुणांचा दास, गुनिदास आहेस,' अशी पदवी दिली व पुढे जगन्नाथाने परिपक्व बुवा होऊन चिजा बांधताना ते नाव त्यात गुंफून अजरामर केले.

जगन्नाथाची हैद्राबादेत रथी महारथी गवयांची अशीच अव्याहत निष्ठेने सेवा चालू असताना १९२४ साली काँग्रेसचे अधिवेशन बेळगावला झाले. त्याला जोडून गाण्याबजावण्याचे कार्यक्रमही होते. जगन्नाथ बेळगावला गेला, ते स्वातंत्र्यलढ्याच्या ओढीने नव्हे तर त्याच्या जन्मजात संगीताच्या ओढीने. इथंच पं. विलायत हुसेन खाँ यांच गाणं जगन्नाथानं प्रथम ऐकलं. आणि पहिल्या दृष्टीभेटीत प्रेम बसावं त्याप्रमाणे त्याचं विलायत हुसेन खाँ यांच्या गायकीवर प्रेम बसलं. त्यांचं गाणं ऐकताच त्याला वाटलं, या गायकीत काहीतरी विशेष आहे. ही गायकी मिळविली पाहिजे. जगन्नाथ बेळगांवहून परत गेला तो विलायत हुसेन खाँच्या गाण्याने भारावलेल्या अवस्थेतच. आणि गुरुपुष्ययोगासारख्या एका दिव्य गुरु–शिष्य संबंधाची बीजे रूजली गेली.

जगन्नाथाचे दैव बलवत्तर म्हणूनच बद्रुज्ञमा खाँ देवासारखे आयुष्यात भेटले. त्यांनी महम्मद अलीखाँ आणि शब्बू खाँ या गुरुंसाठी जगन्नाथाला मदत तर केलीच शिवाय त्यांच्यावर मर्जी बसल्यामुळे त्यांची आपले साडू विलायत हुसेन खाँसाहेबांचीही गाठ घालून दिली. खाँसाहेब बेळगावला इंदिरा वाडकर आणि बापट गल्लीतील आकुबाई व बाळीबाई या बहिणींना तालीम देण्यासाठी येत असत. १९३० साली जगन्नाथाने खाँसाहेबांचा गंडा बांधला आणि गुरुशिष्यसंबंधाच्या एका महापर्वाला प्रारंभ झाला.

जगन्नाथाने गंडा बांधला खरा, पण तालमीसाठी खाँसाहेबांबरोबर आवश्यक तो सहवास लाभेना. म. विलायत हुसेन खाँसाहेबांनासुद्धा चरितार्थासाठी आपल्या आयुष्याची तीस वर्षे शिकवण्यांचाच आश्रय घ्यावा लागला. १९३४ मध्ये ते म्हैसूरच्या

युवराजांकडे होते. तेथून ते १९३८ साली मुंबईला आले व तेथे स्थायिक झाले. प्रापंचिक गरजापोटी हैद्राबाद, बेळगाव, म्हैसूर, मुंबई अशी खाँसाहेबांची भ्रमंती चालू असताना, जगन्नाथाने ते जिथे असतील तिथे जाऊन तालीम घेण्याचा परिपाठ ठेवला. भक्तीपूर्वक त्यांची सेवा करून त्यांना संतुष्ट केले खाँसाहेबांनीदेखील त्याला प्रेमाने आपला मानले. हा गुरुशिष्य संबंध पुढे वाढत जाऊन अधिकाधिक गाढा व गहिरा बनला.

आता शिकवण्या करण्याइतपत त्याची गाण्याची आणि तबल्याची तयारी झाली होती. तेव्हा चरितार्थासाठी हैद्राबादपेक्षा कोल्हापूर त्याला अनेक दृष्टीने सोयीस्कर व आकर्षक वाटले. कोल्हापूरला येण्यापूर्वी १९३९ साली गोविंदराव टेंब्यांमुळे म्हैसूरच्या युवराजांबरोबर युरोप यात्रा त्याला घडली. परतताना कराचीला ते उतरले, तेव्हा त्यांना सारंगीवाले पंजाब घराण्याचे आशकअली यांचा बराच सहवास लाभला. भ्रमरवृत्तीने, मिळेल ते आत्मसात करायचे, या वृत्तीमुळे जगन्नाथांची गायकी सर्वांगांनी फुलत होती.

या दौऱ्यानंतर १९४० च्या सुमारास हैद्राबादचा कायमचा निरोप घेऊन त्याने कोल्हापूर येथे स्थायिक होण्याचा निर्णय घेतला.

❖❖❖

२

# कलापुरातील मुसाफिरी

कोल्हापूर हे साक्षात कलापूर होते. चित्रकला, संगीत, सिनेमा, नाट्यादी- कलांचे केंद्र म्हणून ख्याती पावले होते. कोल्हापूरला येण्यापूर्वी जगन्नाथ तयार तबलजी होता. वास्तविक जगन्नाथाचे पहिले प्रेम तबला हेच होते.

कोल्हापुरात आल्यानंतर काही वर्षांनी पुण्यात पं. जगन्नाथबुवा गेले असताना मेहबूब खाँकडे भेटायला गेले, तेव्हा उ. मेहबूब खाँ म्हणाले होते, 'तबला हमसे सीखा और गंडा उ. तिरखवाँका बांधा? अब मेरे यहाँ मत आओ।'

अर्थातच ही गोष्ट सहृदय आणि कोमल अंतःकरण असलेल्या बुवांना लागली आणि १९५२ साली त्यांनी कोल्हापूरला सर्व शिष्यांना बोलावून बाबूराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या थाटात उ. मेहबूबखाँसाहेबांचा गंडा बांधला.

त्यामुळे तबल्यातील त्यांचे पहिले गुरु उ. मेहबूब खाँ आणि दुसरे गुरू उ. अहमदजान तिरखवाँ.

उस्ताद मेहबूबखाँचा जन्म १८९८ साली पुण्यात झाला. त्यांच्या वडिलांचे नाव अमिनाखाँ, पूर्वजांपासून चालत आलेल्या जमिनींची देखभाल ते मिरजेला करीत होते. लहानपणापासून मेहबूबखाँना तबला शिकण्याची ओढ होती. या ओढीपायी त्यांनी घरदार सोडले आणि दहा वर्षे उस्ताद नन्हेखाँचे शिष्य उ. जगनखाँ यांच्याकडून तालीम घेतली. त्यांचे दुसरे गुरू इंदौरवाले उ. जहाँगीरखाँसाहेब यांच्याकडूनही बारा वर्षे तालीम मिळवली. तिसरे गुरू, नाना पानसेंचे शिष्य बलवंतराव वाटवे यांच्याकडून त्यांनी पाच-सहा वर्षे शिक्षण घेतले. त्यानंतर काही विद्या उ. अहमदजान तिरखवाँ व उ. अल्लादियाखाँ (अमरावतीवाले) यांच्याकडूनही घेतली. अशा रितीने सर्व घराण्यांचा अप्रतिम संग्रह त्यांच्याजवळ होता. विद्यादानातील त्यांचे औदार्य तर सर्वश्रुत होते.

उस्ताद अहमदजानजीं तिरखवाँ यांचा जन्म मुरादाबादमध्ये १८९१ साली झाला. त्यांनी पहिले गुरू उ. मुनीरखाँ यांच्याकडे बाराव्या वर्षापासून तबला शिकायला सुरुवात केली. ही तालीम जवळजवळ चाळीस वर्षे चालू होती. याशिवाय त्यांचे मामा उ. फैयाजखाँ आणि बस्वाखाँ यांच्याकडेही त्यांनी शिक्षण घेतले. तबल्याच्या थिरकत्या

बाजामुळेच त्यांना थिरकवाँ म्हटले जाऊ लागले. बालगंधर्व नाटक कंपनीत त्यांचे चमत्कृतीपूर्ण वादन सर्वश्रुत होते. त्यांच्या वादनात गोडवा आणि गांभीर्य यांचे अद्भुत मिश्रण होते. त्यांच्या वादनाचे कार्यक्रम अनेक संमेलनातून आणि रेडिओवर होत असत. त्यांच्या सोलो वादनाच्या काही रेकॉर्डसही उपलब्ध आहेत. रामपूरच्या दरबारात त्यांना राजाश्रय मिळाला होता. लखनौच्या भातखंडे संगीत विश्वविद्यालयात ते प्राध्यापक होते.

वास्तविक जगन्नाथबुवांच्या पहिल्या गुरुंनी, उ. मेहबूबखाँनी, थिरकवाँ यांच्याकडे काही धडे घेतले होते. पण थिरकवाँ म्हणत, 'तबल्यावर अंगठ्याचा वापर कसा करायचा ते मी मेहबूबखांकडून शिकलो.'

याच थिरकवांनी जगन्नाथबुवांकडे त्यांच्या हातातली पुष्कराजची अंगठी मागितली, आणि बुवांनी ती तांबडतोब काढून दिली.

असे जबरदस्त गुरू तबल्यातही लाभल्यामुळे तबला आणि गाणे यात उत्कृष्ट शिष्य निर्मिती जगन्नाथबुवा करू शकले.

जगन्नाथबुवा प्रथम कोल्हापूरला आल्यावर, कलाकाराचं माहेर असलेल्या देवल क्लबचे देणगीदार श्रीमंत अप्पासाहेब घोसरवाडकर यांच्याकडे राहिले. त्यांचे नाव आता कोल्हापूरात नुसते पुरोहित असे रूढ झाले. पुरोहित तबल्याबरोबर उत्तम स्वयंपाकही करीत. श्रीमंत घोसरवाडकरांना हार्मोनियमचा नाद होता. म्हणून त्यांना तबल्याची साथ आणि आपल्या दोन्ही वेळच्या जेवणाची सोय असे दोन्ही बुवांनी साधले. पुरोहित कोल्हापूरात आल्यापासून तेथील सांगीतिक जीवनात एक चैतन्य आल्यासारखे झाले. देवल क्लबचे नशीब उजळले. घडी बसेपर्यंत देवल क्लबच्या कोपऱ्यावरील दत्त कॅफेमध्ये कपबशा विसळण्याचे कामसुद्धा पुरोहितांनी केले.

पुढे गायन-वादनाच्या शिकवण्या मिळू लागल्या. केशवराव धर्माधिकारी पुरोहितांकडे तबला शिकू लागले. पुरोहितांनी कोल्हापूरमध्येच कलंदर हा तबल्यामध्ये तयार शिष्य बनवला, पण त्याचे १९४४ साली अकाली निधन झाले.

कलंदरच्या निधनाचा बुवांना जबरदस्त धक्का बसला. त्यानंतर त्यांनी तबल्याला हात लावला नाही. १९५१ साली भाई गायतोंडे त्यांचेकडे तबला शिकू लागले पण बुवा त्यांना इशाऱ्यांनीच शिकवत असत. केशवराव धर्माधिकारी लहरा धरत असत. भाईंकडून जगन्नाथबुवांनी तीन वर्षे अक्षरी रियाज करून घेतला. कायदे रेले, गती सर्व त्यांनी भाईंना दिले आणि आपल्या जवळचे सर्व लिखाण फाडून टाकले. त्यानंतर भाईंना म्हणाले, 'लागले तर तुझ्याकडून घेईन.' पं. सुरेश (भाई) गायतोंडे

बुवांचे लाडके तयार शिष्य होत. त्यांच्यावर बुवांनी अतोनात प्रेम केले.

बुवा शिकविताना म्हणत असत मैफलीत हौशी व व्यावसायिक हे भाग नसावेत. 'घरी बोलवा,' 'वा' म्हणू पण मैफलीत नाही. मैफल करणारा हा व्यावसायिकच असतो.

या शिष्याचा तबला जेव्हा पु. ल. देशपांडे यांनी मैफलीत ऐकला तेव्हा म्हणाले, 'गाणे ऐकून डोळ्यात पाणी येते पण आज प्रथमच तबला ऐकून डोळ्यात पाणी आले.' बुवांच्या आठवणी प्रेमाने सांगत असताना भाई म्हणाले होते, 'बुवा भेटले नसते तर ताल व सुराबरोबरचे भाव हे तिसरे Dimension कळलेच नसते.'

आपल्या कोल्हापूरच्या वास्तव्यात जगन्नाथबुवा सिनेमाक्षेत्रातही शिरले त्यावेळी कोल्हापुरात सिनेक्षेत्र बहरात होते. गोविंदराव टेंबेंच्या ओळखीने त्या आधी यशवंत कंपनीत नट म्हणून ते काम करत. मा. विनायकांच्या ब्रह्मचारी या चित्रपटातील 'सत्राणे उड्डाणे' ही प्रख्यात आरती बुवांच्या आवाजातली आहे. सिनेमा क्षेत्रात असताना निरनिराळ्या संगीत दिग्दर्शकांच्या हाताखाली काम करताना पुरोहित खूप अनुभवसंपन्न बनले.

यशवंत कंपनीत असताना पटवर्धन नाटकात बुवांनी 'कोष्ट्याची' भूमिका केली होती. तसेच 'ब्रँडीची बाटली' या चित्रपटातही बुवांनी काम केले होते.

त्यावेळी बुवा भोजनासाठी रामभाऊ मुंबईकरांच्या अन्नपूर्णा खानावळीत जात. ज्ञानपीठ विजेते साहित्यिक विंदा करंदीकर त्याचवेळी त्या खानावळीत वार लावून एक दिवस जेवणास येत. ते रेशनचे दिवस असल्यामुळे वारकऱ्यांना जेवणात भाकरी असे. व इतर मेंबर्सना पोळी मिळे. एकदा बुवांची आणि विंदांची वेळ एकच आली. जगन्नाथबुवांनी जेव्हा विंदांच्या पानात भाकरी व आपल्या पानात पोळी हा प्रकार बघितला तेव्हा बुवा म्हणाले तुम्हाला पोळी आवडत नाही कां? तेव्हा विंदा म्हणाले, '१० रु. देऊन जेवणाऱ्याला पोळी आणि वार लावून जेवणारास भाकरी खावी लागते' हे ऐकल्यावर बुवांनी आपली पोळी विंदांना देऊन त्यांची भाकरी आपण घेतली तेव्हापासून विंदांचा जेवणाचा दिवस आणि वेळ लक्षात ठेवून जगन्नाथबुवा त्याच सुमारास जेवणास येत असत व अशी वाटणी करत असत. ही कॉलेज जीवनातील आठवण न विसरणारी आहे–असे विंदांनी त्यांच्या मुलाखतीत भारावून सांगितले आहे.

कोल्हापूरात त्यावेळी शाम सिनेटोनमध्ये गुंडोपंत वालावलकर, शालिनी सिनेटोन मध्ये गोविंदराव टेंबे होते. शालिनी सिनेटोनशी स्पर्धा करण्याकरता कोल्हापुरात छत्रपती सिनेटोन नावाची फिल्म कंपनी निघाली होती. त्यात सांगलीचे

अण्णासाहेब माईणकर संगीत दिग्दर्शक म्हणून होते. त्यांच्या ऑर्केस्ट्रामध्ये गुलाम महंमद नावाचे एक सारंगिये होते. ते जहांबाज नशापटू चेहरा बावळा व वेश गबाळा असे होते. ते एरवी देवल क्लबमध्ये येवून बसायचे, पण त्यांच्याकडे कुणाचे विशेष लक्ष नसे.

एके दिवशी संध्याकाळी पुरोहित देवल क्लबमध्ये 'पूरिया' गात होते. तोच पुरोहितांना गुलाम महंमद म्हणाले, 'अबे जरा ठीक गाओ।' पुरोहितांनी उलट त्यांनाच सारंगिया म्हणून हिणवले. त्यासरशी गुलाम महंमदांनी तंबोरा हिसकावून घेतला, व तंबोऱ्याचे स्वर जुळवून गायला प्रारंभ केला. केवढं दर्जेदार गाणं होतं ते. पुरोहितांना थिजल्यासारखं झालं. त्यांना आपली निषाद लावण्यातली चूक उमगली. गुलाम महंमदांचे पाय धरून माफी मागितली पाहिजे व काही मिळाल्यास घेतले पाहिजे. अशा विचारात पुरोहित असताना गुलाम महंमदांनी गाणे संपविले, तंबोरा पुरोहितांच्या अंगावरच फेकल्यासारखे केले व ते तरातरा निघूनसुद्धा गेले. पुढे कित्येक दिवस त्यांची गाठभेट झाली नाही.

पुढे चौकशी केल्यानंतर कळले की गुलाम महंमद हे पंजाबमधील तलवंडी गावच्या मशहूर धृपदी घराण्यातील एक गाजलेले कलावंत होते. एका गायिकेची साथ करता करता ते तिच्या प्रेमात पडले त्यांचा प्रेमभंग झाला. त्यानंतर ते पुन्हा गाण्याकडे वळले नाहीत. जगाची पर्वा न करता सारंगिये बनले व आपले निराश जीवन चंडोल, गांजा, भांग, दारू यात बुडवित, पोटासाठी भटकत राहिले.

पुरोहितांना मनस्वी वाईट वाटले. एवढ्या मोठ्या अवलियाची आपण अवहेलना केली, याची चुटपूट त्यांना लागून राहिली. पुढे गुलाम महंमद एका अपघातात सापडले. त्यावेळी निरोप आल्यामुळे पुरोहित तातडीने गेले. त्यांची त्यांनी सर्वप्रकारे मनःपूर्वक सेवाशुश्रुषा केली. त्यांची व्यसने पुरवून त्यांना संतुष्ट केले आणि अखेर ***'पटदीपक'*** रागातील एक सुंदर धृपद मिळवले.

एक–एक चीज मिळविण्याकरता पुरोहितांना अपार कष्ट पडले. पुढे ते धृपद ऐकून विलायत हुसेनखाँ व फैयाजखाँ चकित झाले. विलायत हुसेन खाँनी पुढे पुरोहितांना उद्देशून ***'साची गुनन की सेवा'*** असे तोंड असलेली एक चीज बांधली, ती या धृपदाच्या चालीवरची होती.

सिनेमा क्षेत्रात निरनिराळ्या सिनेटोनच्या संगीत दिग्दर्शकांच्या हाताखाली काम करताना पुरोहित खूप अनुभवसंपन्न बनले. चाली बसवून घ्यायच्या, ऑर्केस्ट्राची तालीम घ्यायची, सर्व वेळेवर हजर राहतील हे पहायचे, त्यामुळे अनेक लोकांशी संपर्क येऊन त्यांचा लोकसंग्रह वाढला. गोविंदराव टेंब्यांसारख्या गायन क्षेत्रातील अधिकारी

व्यक्तीशी परिचय झाला. गोविंदराव टेंबे यांनी पुरोहितांकडून अनेक सुंदर चिजा वेळोवेळी ऐकून आत्मसात केल्या.

पुरोहित कोल्हापूरला अखंड धडपडीत व कामात व्यग्र असत. पाध्येबुवा व बाबूराव जोशी यांच्याकडे ते अधूनमधून तबल्याच्या साथीला जात. ते असताना देवल क्लबचा एक दिवसही सुरांविना सुना गेला नाही. फावल्या वेळात राग चिजा बांधण्याचे चिंतन चालूच असे. त्यांचा सर्वात गाजलेला राग *जोगकंस* हा प्रारंभी *कौशि* म्हणून कोल्हापूरातच जन्माला आला.

पुरोहितांनी कोल्हापुरात निरनिराळ्या कलावंतांचे कार्यक्रम देवल क्लबमध्ये घडवून आणले. त्याकरता हत्यारे वाहून नेण्यापासून सर्व धडपड करण्यात त्यांनी कमीपणा मानला नाही. ऐन उमेदीची असल्यामुळे कोल्हापूरला आपले मानून त्यांनी अपार कष्ट उपसले व शिष्याची एक पठडीच तयार केली.

बुवा शिष्यांसाठी अपार कष्ट घेत. एखाद्या शिष्याला फी ची अडचण असली तर एक सेकंदाचा सुद्धा विचार न करता म्हणत असत, 'माझ्याकडे येऊ दे. मरेपर्यंत फीचा विषय काढणार नाही व दुसऱ्याकडेही उल्लेख करणार नाही.' बुवांचे कोल्हापूरातील एक शिष्य जिनेंद्र ढणाल यांची परिस्थिती फी देण्याची नव्हती. एका गुरुवारी सव्वा रु. व पेढ्याचा पुडा देऊन जिनेंद्र ढणाल जगन्नाथबुवांचे गंडाबद्ध शिष्य बनले. अशी माहिती बुवांबद्दल बोलताना कोल्हापूर येथील बुवांच्या चाहत्याने दिली.

बुवांचे कोल्हापूरचे आणखी एक शिष्य बाळ राजाझे यांनी बुवांच्या शिष्यप्रेमाविषयी अशीच आठवण सांगितली. ४ जाने १९२९ साली जन्मलेले बाळ राजाझे आज वयाच्या ८१ व्या वर्षीसुद्धा जणू काही आताच जगन्नाथबुवांचा क्लास करून आलो आहोत. अशा थाटात बोलत होते. त्या आठवणी आजतागायत अतिशय ताज्या आणि टवटवीत आहेत. प्राथमिक संगीताचे धडे घेण्यासाठी त्यावेळी ते ग्वाल्हेर घराण्याचे निळकंठबुवा चिखलीकर यांचेकडे जात होते. त्यामुळे त्यांचा ग्वाल्हेरचा बेस तयार झाला होता. तसेच ते ज्या ठिकाणी राहात होते त्या घरासमोरच वांगी बोळात उत्तम हार्मोनियम वादक बाबूराव जमदग्नी राहात होते. त्यांच्या घरी बालगंधर्व उतरत असत. जमदग्नी पेटी वाजवणार व बालगंधर्व गाणार मग अखंड गाण्याचा ओघ जमदग्नींच्या घरात नसेल तरच नवल. त्यामुळे राजाझेंच्यावर गंधर्व गायकीचादेखील प्रभाव होता. आवाज उत्तम आणि संगीतातील जागा उचलण्याच्या बाबतीत टीपकागद.

पं.जगन्नाथबुवा कोल्हापूरात स्थायिक होऊन चार-पाच वर्षे झाली होती. राजाझेंची संगीतातील प्रगती बघून त्यांनी जगन्नाथबुवांकडे शिकायला जावे असे जमदग्नींना खूप वाटे. जमदग्नी पेटीची साथ करत असल्यामुळे जगन्नाथबुवांशी त्यांचा चांगला परिचय होता. त्यामुळे प्रथम गाणे शिकविण्यास नकार दिलेल्या जगन्नाथबुवांनी जमदग्नींच्या मध्यस्थीने राजाझेंना गाणे शिकवण्यास मान्यता दिली. पंधरा रु.फी देऊन देवल क्लबमध्ये बाळ राजाझेंची स्वतंत्र शिकवणी सुरु झाली. शिकवताना बुवा पहिल्यांदा रागांच्या सुरावटी पक्क्या करून घेत मग बंदीश सुरू करत. राजाझेंनी हा राग कोणता म्हणून विचारल्यावर,'तुला सांगतो तेवढे कर' असे म्हणत. तेव्हापासून राग कोणता हा प्रश्न दूरच पण 'मी गाऊ का' म्हणून विचारायचं नाही आणि बुवांनी गा म्हटल्यावर नाही म्हणायचे नाही असे त्यांनी ठरविले. खरं तर जगन्नाथबुवांसमोर बोलायची हिंमत कुणीच शिष्य करीत नसत. त्यामागे बुवांबद्दल वाटणारी आदरयुक्त भीती होती. त्यावेळच्या काळाला अनुसरून शिकवणीच्या बाबतीत जगन्नाथबुवांनीही वेळेचं बंधन ठेवले नव्हते. त्यामुळे 'उठ' म्हणेपर्यंत उठायचे नाही एवढेच शिष्याला माहीत असायचे. शिकविताना आकारात मोकळ्या आवाजांनी स्वर लावण्यास सांगत. एकदा राजाझेना बुवांनी टप्प्याची बंदिश शिकवली. मम्मुलाल सांगावकर तबल्याला होते आणि बुवांनी राजाझेंना ती बंदिश घटविण्यास सांगितली. त्यात अवरोही तानेनी अंतऱ्यातून अस्ताईवर येण्याची जागा अवघड पण सुंदर होती. राजाझे अनेक वेळा टप्पा गावून इतके कळवळले की शेवटी त्यांना चक्कर येऊ लागली आणि राजाझेंनी तंबोरा खाली ठेवला आणि बुवांना नमस्कार करत म्हणाले, आता खरच म्हणवत नाही. ह्या त्यांच्या काकुळतीच्या सांगण्यावर बुवा फक्त हसले आणि म्हणाले 'रियाजानी आवाज घटवला पाहिजे, ताकद वाढविली पाहिजे, म्हणून असे म्हणायला हवे.' काही असो पण मुलाच्या प्रेमानी ते त्यांना शिकवित असत. कोणाशी ओळख करून देताना देखील शिष्य म्हणून नाही तर मुलगा म्हणून सांगत असत. राजाझे आपण सांगितलेल्या गोष्टी ताबडतोब उचलतो आहे त्याची बुद्धिमत्ता कुशाग्र आहे हे बुवांना कळले होते. त्यामुळे कोल्हापूर किंवा आसपास बुवांचा कार्यक्रम असला की त्यांना राजाझेच तंबोऱ्याच्या साथीला लागत.

एकदा जगन्नाथबूवांची मैफल होती. स्टेज पडदा व त्यामागे वाद्ये ठीक करून प्रॅक्टीस करण्यासाठी बुवा आणि राजाझे बसले होते. बाहेर श्रोते गाणे ऐकत होते. श्रोत्यात अनेक दिग्गज कलाकारही होते. काही वेळानंतर गाणे थांबवून बुवा

पडद्याच्या बाहेर आले तो श्रोत्यांतून सगळे 'बुवा फारच छान' असे एकदम म्हणाले. तेव्हा बुवा म्हणाले 'ते मी गात नव्हतो तर बाळ राजाज्ञे गात होते!' श्रोत्यांचा विश्वास बसेना. इतके साम्य जगन्नाथबुवा आणि राजाज्ञे यांच्या गायकीत होते. त्यामुळे राजाज्ञे जगन्नाथबुवांचे कोल्हापुरातले अत्यंत लाडके आणि पट्टशिष्य होते. स्वतःच्या प्रत्येक गोष्टीत बुवा राजाज्ञेंना सामावून घेत. या गुरुशिष्यांचे उत्तम मनोमिलन झाले होते. पुढे नोकरीनिमित्ताने राजाज्ञे धारवाडला गेले. त्यावेळी बुवांनी 'गाणे सोडू नको. मी चिठ्ठी देतो, मल्लिकार्जुनकडे शिकायला जा.' असा प्रेमळ सल्लाही दिला होता. पुढे बऱ्याच वर्षांनी मुंबईत साजऱ्या झालेल्या बुवांच्या षष्ठलब्दी सोहळ्याला राजाज्ञे आजारपणामुळे जाऊ शकले नव्हते. ही गोष्ट लक्षात ठेवून समारंभानंतर बुवा कोल्हापूरात मुद्दाम बाळ राजाज्ञेंना भेटायला त्यांचे घरी आले होते. शिष्यांच्याबद्दल अखंड कळकळ, प्रेम, जिव्हाळा आणि काळजी बुवांना वाटत असे. व्यवहार आणि संगीत त्यांच्या जीवनात हातात हात घालून जात होते. आज वयाच्या ८१ व्या वर्षी सुद्धा ताजेपणानी या आठवणी सांगत असताना राजाज्ञे केव्हाच त्यांच्या त्या काळात पोचले होते. भानावर आल्यावर त्यांना बुवांच्या आठवणीने अश्रू आवरत नव्हते.

अनेक क्षेत्रातील मंडळी त्यांचे शिष्य होते. ही सर्व मंडळी आपापले व्यवसाय सांभाळून गाणे शिकत होती व आकाशवाणीवर कार्यक्रम करीत होती. या शिष्यांत त्यांची मानसकन्या लीलाताई करंबेळकर, गुलाबबाई अकोलकर, सुमन शेवडे, सुशीला नंजुंदिया, उषा पारखी अशा गायिका होत्या, तर पुरुष शिष्यात कॉन्ट्रॅक्टर बाळ राजाज्ञे, प्रोफेसर जिनेंद्र ढणाळ, हार्मोनियमवादक बबनराव मांजरेकर आदी होते. खास गायकी शिकण्यासाठी येणारेही अनेक जण होते. त्यात मुंबईचे मनोहर मोडक, व्हायोलिनवादक माधव डोंगरे, भावगीत गायक जे. एल. रानडे इत्यादींबरोबर गोरेंसारखे हौशी कलाकारही खूप होते.

आता पुरोहितांचा शिष्यवर्ग वाढला. मित्रमंडळ, लोकसंग्रह विस्तारला. त्यांच्या चिजांचा बोलबाला झाला. त्यांच्या शिकविण्याच्या पद्धतीला पसंतीची पावती मिळाली. आदरसत्कार होवून मान्यताप्राप्त प्रतिष्ठितात त्यांची गणना होऊ लागली. या स्थित्यंतराचा प्रारंभ त्यांनी सर्वांना दिलेल्या एका गोड धक्क्याने झाला.

आबासाहेब मुजुमदार यांचा एकसष्टी समारंभ इ. स. १९४४ साली पुणे येथे फार मोठ्या प्रमाणावर साजरा झाला होता. सर्व कलाकार मंडळी छाया लॉज

मध्ये उतरली होती. सात दिवस हा सोहळा लिमये नाट्य चित्र मंदिर (विजय टॉकीज) इथे चालला होता. या सोहळ्यात पं. कुमारजींनी आपल्या गुरुबद्दलची सांगितलेली (गोष्ट?) अतिशय महत्त्वाची व मार्मिक आहे.

''अंजली मालपेकरांनी मला स्वराकडे बघण्याची नजर दिली तर बुवांनी मला बंदिशीकडे बघण्याची नजर दिली पंडितजी बुवा कसे बोलत, कसे गात हे त्यांच्या टोनमध्ये नक्कल करून सांगत.'' 'बंदिशीचे अवसान बघा. उठावण बघा आणि मग त्याप्रमाणे गा.' एकसष्टी समारंभात शेवटी पं. कुमार गंधर्व गायले होते. पं. जगन्नाथबुवा त्यांना म्हणत होते, 'काहीतरी नवीन ऐकवा' तेव्हा कुमारजी त्यांना म्हणाले होते, 'तुम्हीच सुचवा काहीतरी' त्यावेळी पं. जगन्नाथबुवांनी त्यांना **कौशिराग** गाण्यास सांगितले. त्यांना सांगितलेल्या **कौशिमध्ये 'गंधार' जोग** च्या अंगाने नव्हता आणि **चंद्रकंस** मध्ये विवादी स्वरूपात येणाऱ्या रिषभाची जागा देखील मद्रातल्या निषादाबरोबर त्यांनी सांगितली होती. नंतर मुंबईला बी. आर देवधरांनी (कुमारांचे गुरू) हा राग ऐकला तेव्हा 'त्यात *जोग*चा भास होतोय तर *जोग* सारखाही षडजावरून गंधार घेतला तरी छान वाटतोय' असे सांगितले. त्यांच्या सांगण्यावरून त्या रागाचे नाव **जोगकंस** झाले. अशी बऱ्याच जाणकारांची समजूत आहे. आणि या नावामुळे हा जोडराग आहे. अशीही समजूत बऱ्याच जणांची झाली आहे. पण आग्रेवाल्यांची पूर्वीची **'ए बेगी आवन कर प्यारे'** या **'संपूर्ण चंद्रकंस'** मधील चीजेनी पं. जगन्नाथबुवा अतोनात प्रभावित झाले होते व त्यातूनच योगायोगानी बनलेला राग म्हणून या रागाला ते योगकंस म्हणत असत. योगकंसाचेच अपभृंश होऊन **जोगकंस** झाला ही वस्तुस्थिती आहे. **जोगकंसा**तील विलंबित चीज **'ओ सुघर भर पाया.'** त्यांचे गुरू म. विलायत हुसेनखाँ मालकंसमध्ये गात असत. त्या शब्दांना जसेच्या तसे विलंबितमध्ये घेतले व स्वरसाज **जोगकंस**चा चढवला. या रागाची **पीर पराई** जोड मात्र शब्द स्वरांसह बुवांनी बांधली.

आज सर्वतोमुखी झालेल्या **जोगकंस**मधील **सुघर भर पाया** आणि **पीर पारई** या चिजा कुमारांच्या दिव्य करामतीतून रसिकांपुढे प्रथम साकार झाल्या. हा नवीन राग व त्यातील या दोन्ही चीजा यांनी रसिकांच्या बुद्धीचा आणि भावनेचा पूर्ण ताबा घेतला. या रागाचे नाव काय व या चिजा कोणाच्या? ही एकच चर्चा जिकडे तिकडे सुरू होती. चौकशी करता समजले की, या रागाचे आणि द्रुत व

विलंबित दोन्ही चिजांचे जनक कोल्हापूरचे पं. जगन्नाथबुवा पुरोहित हे आहेत. या माहितीमुळे जगन्नाथबुवा हे रसिकांच्या दृष्टीने एकदम विलक्षण आदराचा औत्सुक्याचा विषय झाले.

म. विलायत हुसेनखाँ १९३९ ला मुंबईत स्थायिक झाल्यापासून जगन्नाथबुवांच्या मुंबईला नियमित वाऱ्या होत. बुवा जेव्हा–जेव्हा मुंबईला जात तेव्हा तेव्हा त्यांचा मुक्काम, बी. आर. देवधर यांचेकडे असे. सततच्या सहवासातून, दोघांमध्ये चांगलीच जवळिक निर्माण झाली होती. त्यामुळेच सुरुवातीच्या वेशापासून ते नंतरच्या नवराग निर्मितीपर्यंत वेळोवेळी बी. आर. देवधरांनी जगन्नाथबुवांना मार्गदर्शन केले. विलायत हुसेन खाँ असामान्य शिक्षक होते. त्यांच्याजवळ चिजांचे अमाप भांडार होते. शिवाय ते स्वतः सुरेख बंदिशी बांधत असत व सतत त्यावरच्या चिंतन मननात मग्न असत. जगन्नाथबुवा जसे अधिकाधिक खाँसाहेबांच्या सहवासात आले, तसतसे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या अनेक पैलूंनी भारावून गेले.

खाँसाहेबांकडून त्यांना राग व चिजा तर मिळतच, शिवाय बंदिशी बांधण्याबाबत मोलाचे मार्गदर्शन मिळे व स्फूर्ती मिळे. यामुळे जगन्नाथबुवांना मुंबईची ओढ लागली. तसेच संगीत क्षेत्रातील कार्याला तिथे अधिक वाव असल्याचे जाणवू लागले. त्याच सुमारास पुण्यालाही आकाशवाणी केंद्र होण्याची चर्चा होती. अशा सर्व कारणास्तव कोल्हापूरच्या मर्यादित क्षेत्रातून मुंबईला गेल्यास विलायत हुसेनखाँचा सहवास प्रामुख्याने अखंड लाभेल व इतरही गोष्टी साधतील, हा विचार जगन्नाथबुवांच्या मनात प्रबळ होत गेला.

मुंबईला राहण्यास आलात तर विलायत हुसेनखाँ यांचा अधिक सहवास लाभेल व इतरही अनेक गोष्टी साधतील अशी सूचना त्यावेळी मुंबईत असलेले त्यांचे गुरुबंधू पं. द. वि. काणेबुवांनीही केली.

अखेर १९५२ च्या सुमारास जगन्नाथबुवा मुंबईला रवाना झाले.

❖❖❖

३

# मुंबईतला ऐश्वर्यकाल

१९३९ साली म. विलायत हुसेनखाँ मुंबईला स्थायिक झाल्यापासून जगन्नाथबुवांच्या कोल्हापूर, मुंबई नित्य फेऱ्या होत असत. त्यावेळी ते देवधरांच्या सँडहर्स्ट रोडवरील विद्यालयात उतरत. मुंबईत जाण्यापूर्वी त्यांच्या ओळखीपाळखी, मित्रवर्ग बराच झाला होता. तसेच शिष्य परिवारामुळे तिथल्या जीवनात ते अगोदरच चांगले रुळले होते. त्यामुळे तेथे कायम वास्तव्यासाठी गेल्यानंतर त्यांची घडी बसायला वेळ लागला नाही. मुंबईला गेल्यानंतर पं. काणेबुवा यांच्या मध्यस्थीने दादासाहेब आपटे यांचेकडे त्यांची राहण्याची सोय झाली. काणेबुवा यांच्या सांगण्यावरून दादासाहेब आपटे यांनी पं. जगन्नाथबुवांना आपल्या घरी सन्मानानी आणले. अशा रितीने 'सरस्वती सदन' हे दादासाहेब आपटे यांचे घर 'संगीत सदन' बनले.

पुढे जेव्हा शिष्यपरिवार, मित्रांच्या गाठीभेटी असा पसारा वाढू लागला, तेव्हा राहण्यासाठी स्वतंत्र जागेची आवश्यकता भासू लागली. मुंबईत जागा मिळणे महादुष्कर. कर्मधर्म संयोगाने हिज मास्टर्स व्हॉईसचे जी. एन. जोशी यांच्याशी बुवांची ओळख झाली व त्याचे रूपांतर पुढे दाट स्नेहबंधनात झाले. त्यांच्या खटपटीमुळेच रागेश्री या त्यांच्या घराशेजारीच शशिकला आळंदकर यांनी पागडी न घेता, साध्या पण स्वच्छ चाळीत आटोपशीर, टापटीप असलेल्या दोन खोल्या दिल्या. सरस्वती सदनातून नवीन घरात जाताना दादासाहेब आपटे यांनी बुवांना श्रीगजाननाची मूर्ती देव्हाऱ्यात पूजण्यासाठी भेट म्हणून दिली. इथेच पुढची चौदा-पंधरा वर्षे अनेकांनी बुवांकडून अमाप गानविद्या लुटली. बुवांच्याकडून अनेक चिजांची निर्मिती इथेच झाली.

राम मराठे, जितेंद्र अभिषेकी, सी. आर. व्यास, यशवंत जोशी, प्रभुदेव सरदार, वसंतराव कुलकर्णी, माणिक वर्मा,भाई गायतोंडे, सुरेश नाना मुळे, हळदणकर, मालती पांडे अशा उत्तमोत्तम शिष्यांची वर्दळ वाढली.

इथेच कधी बडे गुलाम अलीखाँ दिसत, तर कधी कुमारगंधर्व, सिद्धेश्वरीबाई तर कधी बनारसच्या निर्मलादेवी, दिल्लीच्या विनयचंद्रांपासून बनारसच्या

बृहस्पतींपर्यंत कोणी ना कोणी बडा पाहुणा बुवांकडे असायचाच. बुवांचे ते आटोपशीर, प्रसन्न निवासस्थान संगीत क्षेत्रातील कित्येक छोट्या मोठ्या गवयांचे व रसिकांचे भक्तीभावाने वारी करण्याचे पवित्र तीर्थक्षेत्र बनले.

कलाक्षेत्रातील मंडळी ही लहरी व व्यसनी असायचीच, या परंपरागत कल्पनांना पं. जगन्नाथबुवांनी आपली वाणी, विचार व वर्तन यांनी धक्का देवून, एका नव्या, मोकळ्या, शुचिर्भूत वातावरणनिर्मितीचा शुभारंभ केला. ते एक निष्ठावान तपस्वी व प्रतिज्ञाबद्ध साधक होते. जीवनातील ध्येय व दिशा निश्चित असल्यामुळे त्यांचे सर्वसाधारण जीवनच नव्हे, तर रोजचा दिनक्रमदेखील चाकोरीबद्ध व वक्तशीर होता. बुवा मोठे धार्मिक होते, पण धर्मवेडे नव्हते. रोजचे देवदर्शन, पूजाअर्चा, नित्यपाठ जसा चुकला नाही, तसेच इतर देवांच्याबरोबर देव्हाऱ्यातील देवतुल्य विलायत हुसेन खाँ यांच्या प्रतिमेचे पूजनही ते विसरले नाहीत.

बुवांच्या निवासस्थानी बाहेरच्या खोलीत बुवांच्या शिकवण्या चालत, बुवांची शिकवणी पाहणं आणि ऐकणं, हा एक फार मोठा आनंद होता. शिष्यानं यायचं, भिंतीला टांगलेला तंबोरा काढून विनम्रपणे बुवांच्यापुढे बसायचं, इतक्यात कुणीतरी फळीवरील तबला डग्गा काढायचा व शिकवणी सुरू व्हायची. क्षणात शिष्याची हजेरी, तर क्षणात साथीदाराची, मध्येच कोणी आलं तर त्यांची आस्थेवाईकपणे चौकशी करायची, चहा पाणी करायचं, जेवायलाच राहण्याचा आग्रह करायचा. कुठे बाहेर जायचं असेल, तर घड्याळ बघत शर्ट, कोट चढवायचा, तरी शिकवणीकडे लक्ष द्यायचं.

कष्ट हा बुवांच्या जीवनाचा स्थायी भावच होता. शिकविताना जो ख्याल सांगत असतील, त्याची शुद्ध संहिता शिष्याच्या तोंडी बसली पाहिजे. चिजेचा शब्दार्थ व भावार्थ यांकडे शिष्याचे पूर्ण लक्ष राहील, याची ते कटाक्षाने काळजी घेत. शिष्याच्या गळ्यातून एक विशिष्ट तान, उपज, हरकत बिनचूक निघेपर्यंत त्यावर लक्ष केंद्रित करीत, चूक दाखवित आणि तो कंटाळू नये म्हणून चुचकारत पुनःपुन्हा तीच जागा घोटून घेत. अशा पद्धतीने अखेर ती जागा मनासारखी निघाली की, समाधानाने 'हाँ ऽ ऽ ये है' अशी शाबासकी शिष्याला देत. आळस व कुचराई हे शब्दच त्यांच्या शब्दकोशात नव्हते. शिकविताना वेळेचं भान नसे. शारीरिक दौर्बल्य जाणवत नसे, की शिष्याची ती विद्या पेलण्याची कुवत आड येत नसे.

पण बुवांच्या शिष्यांत गळा तयार असलेले गवयीच जास्त, त्यामुळे त्यांची संथा म्हणजे ऐकणाऱ्याला संगीताची मेजवानीच वाटे. एखादे दिवशी काही शिष्य

वितंडवाद घालीत, 'हे असेच का ? ह्याला शास्त्रीय आधार काय?' असे विचारून बुवांना अस्वस्थ करण्यात, त्यांना कोंडीत पकडण्यात धन्यता मानीत. ही गोष्ट पूर्वीच्या परंपरागत गुरुशिष्य संबंधात केवळ अशक्य होती. पण मोठ्या मनाच्या बुवांनी याबद्दल कधी विषाद मानला नाही. प्रत्येक गोष्टीला, विशेषतः कलेच्या प्रांतात कारणे देणे कुणालाही शक्य होईलच असे नाही. सौंदर्य शास्त्राचे सिद्धांत तर रूढ झाल्यानंतरच त्यांची प्रचिती स्वीकार्य ठरते. भौतिक शास्त्रातील सिद्धांताप्रमाणे त्या गोष्टी प्रयोगक्षम नसतात, हे कालांतराने उमगते. पण तोपर्यंत होणारा त्रास सहन केल्याखेरीज उपाय नसतो. पण बुवांचे मोठेपण हे की त्यांनी शिष्याच्या विचारस्वातंत्र्यावर गदा आणण्याचे मनातही आणले नाही.

बुवांचे शिक्षण सही करायला येण्यापुरते असे ते स्वतःच सांगत. एक–दोन इयत्तांचे शिक्षण म्हणजे प्रयत्न करून अक्षरे लिहिता–वाचता येण्यापुरते. मग चिजा स्फुरल्या की लगेच सावकाश त्या मोठ्या अक्षरांत एखाद्या कागदाच्या कपट्यावर लिहून काढण्यापुरती त्यांची विद्या पुरी पडे. पण बुवांचा रोजचा पत्रव्यवहारही बराच होता. तो या पद्धतीने उरकणे केवळ अशक्य होते. बुवा पत्र शिष्यांकडूनच लिहून घेत, वाचून घेत आणि मग स्वतः पोस्टात टाकत असत.

पं. जगन्नाथबुवा जीवनाच्या अनेक क्षेत्रात रस घेत. राजकारण, समाजकारण, धर्मविज्ञान यांबरोबरच नाटक, सिनेमा, कुस्त्या, भाषणे, किर्तने, भजने यांपैकी कुठलाही विषय त्यांना वर्ज्य नव्हता. त्यात भर म्हणून फिरणे व गप्पा मारणे या गोष्टींचाही त्यांना मनस्वी आनंद होई. रात्री मात्र बुवा एकटेच आपल्या घरी उशिरा लाहोर वगैरे सारखे रेडिओकेंद्र लावून ऐकत बसत. सतत सौंदर्याचा वेध आणि शोध घेणाऱ्या त्यांच्या जिज्ञासू वृत्तीमुळे रेडिओवरील एखादी धून किंवा एखादी हरकत फळ म्हणून पदरात पडे, आणि मग त्या दिवसाची सांगता होई.

पावसा अभावी शुष्क होत चाललेल्या शेतातील पिकावर, अचानक सरींवर सरी कोसळल्यावर ती पिके जशी तरारतात, तद्वत मुंबईच्या मरगळलेल्या संगीत क्षेत्रात नाविन्याची बरसात करत पं. जगन्नाथबुवांनी नवचैतन्य ओतले. त्यातच त्यांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वामुळे 'ते आले त्यांनी पाहिले आणि मुंबई जिंकली' असा चमत्कार घडला. या ना त्या कारणाने गुरुच्या शोधात असलेली मुंबईची युवापिढी बुवांच्याकडे तत्काळ आकर्षिली गेली. मित्रमंडळी जमली, लोकसंग्रह वाढला, बुवांच्या नावाचा जिकडे तिकडे बोलबाला झाला. थोडक्यात बुवा लोकप्रिय झाले. वैभवाच्या कालखंडाला प्रारंभ झाला.

बुवांनी आपल्या वाणी, विद्या, विचार व वर्तनाने सर्वांची हृदये जिंकली. ते जातील तिथे जिव्हाळ्याची नवी नाती निर्माण झाली. अतीव कष्टांनी जन्मभर कणाकणाने साठवलेली विद्या बुवांनी कर्णाच्या औदार्याने सर्वांना मुक्त हस्ते वाटली. नवनवीन राग व चिजा बांधल्या. शिष्यांसाठी अपार कष्ट उपसून अफाट शिष्यसंप्रदाय तयार केला व मुंबईच्या सांगीतिक क्षेत्राचा चेहरामोहराच बुवांनी पार पालटून टाकला.

पं. जगन्नाथबुवांचा लोकसंग्रह जसजसा वाढत गेला, तसतसे त्यांचे दैनंदिन जीवन अधिकाधिक धावपळीचे बनत गेले. भिडस्त स्वभावामुळे अनेक व्यक्तींची व संस्थांची आमंत्रणे बुवा स्वीकारीत. इतकेच नव्हे, तर कितीही त्रास झाला तरी ती कसोशीने पाळत. परंपरागत गवयीपेशात अभावाने आढळणारा हा आणखी एक नवीन पैलू. ठराविक मित्रांना ठराविक वेळी भेटण्यासाठी, तब्येत बरी नसली तरी ते जात. कुणाकडे मंगलकार्य निघाल्यास बुवांच्या उत्साहाला उधाण येत असे. संस्थांनी आहेर घेऊन बुवा हजर होतील, आणि घरचेच कार्य म्हणून राबतील. गुरुपौर्णिमा व पुढे १९६२ साली विलायतहुसेनखाँचे निधन झाल्यानंतर गुरुंची पुण्यतिथी जवळ आली की दोन सोहळे होऊन जाईपर्यंत बुवा अस्वस्थ असायचे.

पं. जगन्नाथबुवांचे परमदैवत विलायत हुसेनखाँ यांच्याबद्दलची गुरुभक्ती इतकी अफाट होती, की गुरुशिष्यप्रेमाचा एक उच्चादर्श म्हणून संगीत क्षेत्रात त्याला तोड सापडणे कठीण. बुवांच्या शिष्यांनी या आदर्शाचा कित्ता गिरविला. त्यांच्या शिष्यांना गुरुबद्दल मनस्वी प्रेम, आदर व जिव्हाळा वाटे. याची फलश्रुती म्हणजे त्यांच्या शिष्यांनी आणि अगणित स्नेही परिवाराने अखंड दोन दिवस दैवदुर्लभ असा साजरा केलेला बुवांचा षष्ट्यब्दपूर्ती समारंभ. या सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे होते, महाराष्ट्राचे त्याकाळातले गृहमंत्री बाळासाहेब देसाई व अध्यक्ष होते रसिकाग्रणी न्यायमूर्ती चंद्रचूड.

बुवांच्या सत्काराच्या कमिटीमध्ये बुवांच्या शिष्यांव्यतिरिक्त होते, कॉन्ट्रॅक्टर दादासाहेब आपटे, केशवराव चाफेकर, भाऊसाहेब काकतकर आणि बुवांचे कोल्हापूरपासूनचे स्नेही कमिटीचे अध्यक्ष वा. वा. गोखले, मनोहर वागळे, शरद साठे, अनंतराव बेडेकर, पु. ल. देशपांडे, शरद तळवलकर, अमर वर्मा, डॉ. फळणीकर, पं. के. जी. गिंडे, सुलभा काकतकर, ना. सी. फडके.

सत्कार यशस्वी करण्यात या कमिटीचा प्रमुख वाटा होता. इतका उत्स्फूर्त. इतक्या विनीत भावाने व इतक्या थाटात एका गायनगुरुचा सत्कार समारंभ मुंबईत यापूर्वी कधी झाला नव्हता व पुन्हा होणार नाही. समारंभासाठी दूरवरून आलेल्या

मंडळीत पुण्याहून प्रा. मंगरुळकर, डॉ. मारूलकर, वाराणशीहून, प्रा. देवधर, देवासहून कुमार गंधर्व, तर कलकत्त्याला जलशाला गेलेले पं. भीमसेन जोशी बडोद्याची मैफल आटोपून धावत पळत आले होते. पं. रामनारायण, कोल्हापूरहून बाबूराव जोशी आदी मंडळी अगत्याने आली होती.

प्रत्येकाने एखादा सुंदर बांधेसूद ख्याल मांडावा तशी वेधक भाषणे केली. समितीचे अध्यक्ष म्हणाले, 'सत्काराच्या आर्थिक बाजूची चिंता वाटत होती, पण मदतीचा लोंढा एवढा मोठा आला, की तो कसा आवरावा याचा प्रश्न पडला.'

बाबूराव जोशी म्हणाले, 'माझ्या डोळ्यांचं पारणं फिटलं, हा भव्य सत्कार पाहून आम्ही कोल्हापूरकर मंडळी धन्य झालो.' वामनराव देशपांडेंनी 'बुवांच्या गायकीची वैशिष्ट्ये वेचक शब्दांत मांडली.' प्रा. मंगरुळकरांनी बुवांना लाभलेल्या शिष्योत्तमांबद्दल आद्य शंकराचार्यांच्या भाग्याशी त्यांची तुलना केली. रातंजनकरांनी गुरू म्हणून बुवांची महती वर्णन केली. बुवांची नातशिष्या योगिनी जोगळेकरांनी बुवांच्या घरेलू हृद्य आठवणी सांगितल्या. पण जेव्हा प्रमुख पाहुणे बाळासाहेब देसाई नम्रतेनं म्हणाले, 'या तपस्व्याला मानाचा मुजरा करण्यासाठी आलो आहे,' तेव्हा तर सर्व सभा भारावून गेली. शेवटी प्रमुख पाहुण्यांनी पं. जगन्नाथबुवांना मासिक चारशे रुपयाचे मानधन जाहीर केले व जनतेने जमविलेली एकतीस हजारांची थैली मोठ्या आदराने बुवांना अर्पण करून त्यांचा सत्कार केला. सत्काराने बुवा इतके भारावून गेले की ते बोलू शकले नाहीत. वा. वा. गोखल्यांनी त्यांचे सत्काराचे उत्तर वाचून दाखविले, हा सत्कार आपला नसून आपल्या गुरुंनी दिलेल्या विद्येचा सत्कार आहे, असे त्या उत्तरात होते.

रविवारी रात्रीच्या सांगता सभेत शेवटी माणिकबाईंचा रंगतदार *जोगकंस* व अब्दुल हलीम जाफरखाँच्या शैलीदार सतार वादनानंतर मैफलीचा शेवट पं. जगन्नाथबुवांच्या गाण्याने झाला. भारावलेल्या मनःस्थितीत आपल्या सर्व संप्रदायासमोर राग **सुंदरकली** (हे **रामकली** व **परज** यांचे मिश्रण आहे.) **भैरवभटियार** व **मारुवसंत** हे राग त्यांनी सादर केले. हा समारंभ म्हणजे बुवांच्या जीवनातील वैभवाचा सुवर्णकळसच समजला पाहिजे.

निरनिराळ्या खाँसाहेबांकडे नको नको ती कामे करून, अतीव कष्टांनी व सेवाभावाने त्यांनी एक-एक चीज मिळवली होती आणि ती सर्व गानसंपदा एका चोपडीत लिहून ठेवली होती. परंतु १९६७ साली नागपूर येथे 'स्वरसाधना' संस्थेतर्फे झालेल्या त्यांच्या सत्कारसमारंभाहून परतताना त्यांच्या सामानाची चोरी झाली.

त्यातच ती चोपडी होती. या घटनेमुळे बुवांना मोठा धक्का बसला. मिळवलेल्या सर्व चिजांची चोपडी चोवीस तास बुवांचे जवळ असे. अंगठ्यांबरोबर त्यांची ही दुर्मिळ आणि अनमोल चोपडीही चोरांच्या हाती गेली. आयुष्याची सर्व कमाई असलेली चोपडी जाताच बुवांचे हातपायच गळाले. आपलं सारं काही आता संपलं, म्हणून त्यांनी कपाळाला हात लावला. परंतु आपले सर्वस्व नष्ट झाल्यावरही बुवा पुन्हा एकदा जिद्दीने उभे राहिले. रात्रीच्या रात्री बसून आयुष्यभर ऐकलेल्यांची याद केली, आणि आपली चोपडी पुन्हा बांधली.

❖❖❖

४

# व्यक्तित्व दर्शन

उणीपुरी उंची, आखाडेबाज अंगलट व ऐट, किंचित गव्हाळी गौरवर्ण, धारदार सरळ नासिका, बोलके तेजस्वी डोळे, भव्य भालप्रदेश, वयपरत्वे विरळ झालेले रुपेरी केस, अतिगंभीर चेहरा अशी भारदस्त व पाहताच छाप पाडणारी बुवांची मूर्ती मोठी मनोहर होती. त्यात सुंदर, स्वच्छ व नीटनेटक्या पोषाखामुळे बुवा अधिकच आकर्षक वाटत. तुरळक झालेल्या पांढऱ्या केसांवर एक काळी कलती टोपी, तलम पिवळसर चायना सिल्कचा हातघोळ शर्ट, त्यावर काळे जाकीट, निळ्या सर्जचा कोट, नीळ घातलेले तलम, शुभ्र धोतर व पायात चकचकीत बूट अथवा कधी कानपुरी चढाव किंवा कोल्हापुरी कापशी बनावटीची चप्पल, आणि 'मजमा' या त्यांच्या आवडत्या अत्तराचा मंद सुगंधाची दरवळ, यांमुळे बुवांचे दर्शन नेहमीच प्रसन्न व ताजे टवटवीत वाटे. त्यांच्याभोवती सात्त्विक सोज्वळतेचे व पावित्र्याचे दिव्य वलय असल्याचा भास होई. या बाह्य भासाला अर्थातच अंतर्यामीच्या सद्‌गुण संपत्तीचे सुंदर असे आधारभूत अस्तर होते. हालचालीत नबाबी थाट व बोलण्यातील कानडी झाक लपत नसे. आवाज काहीसा घोगरा, जाड व जड पण कमालीचा कमावलेला होता. आवाजाची निसर्गदत्त देणगी नसतानाही त्यांनी असे नेत्रदीपक यश संगीतात मिळविले, यातच बुवांचे असमान्यत्व सामावलेले आहे.

एखाद्या व्यक्तिच्या प्रकृतीपिंडाचा परिपोष परिस्थितीनुसार होतो. अवतीभोवतीच्या वातावरणाचा परिणाम पीकपाण्याप्रमाणेच मानवावर झाल्याखेरीज राहात नाही. लहानपणी तर मन अतिशय संस्कारक्षम असताना त्यावर झालेले संस्कार जन्मभर टिकतात. हैद्राबादमधील गाण्याबजावण्याने गजबजलेल्या वातावरणात कोवळ्या जगन्नाथाच्या हृदयात शास्त्रीय संगीताची आवड निर्माण झाली. घरच्या दारिद्र्याने त्याला कष्ट करण्यास शिकविले. संगीत विद्या संपादनं करायची तर त्याला लागणाऱ्या संपत्तीच्या अभावी त्यांनी सेवेच्या मार्गाचा अवलंब केला.

महंमदअलींच्याकडून विद्या मिळविण्यात सेवेच्या सामर्थ्याचा यशस्वी अनुभव आल्यानंतर त्या वृत्तीला खतपाणी मिळून सेवावृत्ती हा जगन्नाथाच्या

जीवनाचा स्थायीभाव ठरला आणि Nothing succeeds like success या उक्तीनुसार जगन्नाथाने संयमाने व्यसनापासून अलिप्त राहून त्या सामर्थ्याचा उपयोग करून एकामागून एक उस्तादांच्या लहरी व मर्जीची शिखरे सर करून अमोल विद्याधनाचा संचय केला. अधिकाधिक विद्या संपादन करण्यासाठी न कंटाळता वाटेल ती मानहानी सोसून कष्ट करण्याची जिद्द जगन्नाथाच्या अंगात मुरली. हैद्राबादमधील अनेक उस्तादांच्या विविध गानशैली जिज्ञासूपणे जाणून घेताना सौंदर्यदृष्टिने त्यातील निवड करण्याची त्यांची चोखंदळ वृत्ती उपयोगी पडली असल्यास नवल नाही. म्हणून तर महंमद अलींकडून शब्बूखाँकडे जाण्याचा विचार त्यांच्या मनात आला.

हळूहळू अनुभवांतून त्यांचे व्यक्तिमत्त्व उमलू फुलू लागले. जीवनानुभवासारखी शाळा नाही, व त्यात मिळणाऱ्या शिक्षणाइतके रसरशीत व जिवंत शिक्षण दुसरे नाही. दारिद्र्यातून येणाऱ्या अडीअडचणींवर जिद्दीची इच्छाशक्ती मार्ग काढते. त्यातून यश मिळाले की अधिकच हुरूप, हिंमत येते. कष्ट अंगवळणी पडतात.

जगातल्या थोर–थोर पुरुषांच्या चरित्राचे परिशीलन केल्यास त्यांतील बहुतांश महात्मे दारिद्र्यात जन्माला आले आहेत. (Great men are born in the cradle of adversity and poverty) पं. जगन्नाथबुवा याला अपवाद नव्हते. टाकीचे घाव सोसूनच देवसदृश मोठेपण त्यांना प्राप्त झाले होते. सप्तरंगांनी साकार केलेल्या इंद्रधनुष्याप्रमाणे पं. जगन्नाथबुवांचे आकर्षक व्यक्तिमत्त्व सेवा, सहनशीलता, निष्ठा, जिज्ञासूवृत्ती, सौंदर्यदृष्टी, जिद्द आणि भावुकता या सप्तसद्गुणांनी नटलेले होते. म्हणून त्यांना सप्तसुरांच्या संगीताची साधना साध्य झाली. या सद्गुणांच्या पायावरच बुवांच्या विकसित व्यक्तिमत्त्वाची इमारत उभारली गेली.

वाढत्या वयाबरोबर बदलणाऱ्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्ये यांमुळे स्वभावाला नवनवे पैलू पडतात. पण ते मूळच्या पायाभूत प्रकृतीशी सुसंगत असतात. बुवांच्या मूळच्या स्वाभावाचं स्वरूप नितांत सात्त्विक होते. संतांनी दिलेली माणुसकीची शिकवण केवळ आकाशाला गवसणी घालणारी आहे. *सर्वेऽपि सुखिनः सन्तु।* यापेक्षा अधिक उदात्त, उत्तुंग असे परमेश्वराकडे मागणे माणसाला मागताच येणार नाही. पं. जगन्नाथबुवा ते मागणे निव्वळ मागून थांबले नाहीत, तर सर्वांना सुखी व संतुष्ट करण्यासाठी त्यांनी जन्मभर जिवाचा आटापिटा केला. सर्वांच्याबद्दल आंतरिक कळकळीची सद्भावना, दुसऱ्याच्या दुःखाने हेलावणारे

हळवे मन. त्यांच्या मूळच्या सात्त्विक सद्भावनेचा परिपाक असल्याचे सहज लक्षात येते.

पं. जगन्नाथबुवांच्या स्वभावाचा त्यांचे शिष्यप्रेम हा अतिशय वेगळा पैलू होता. बुवा वडिलधाऱ्याप्रमाणे विद्यार्थ्यांशी वागत. 'अर्धी चीज झाली तरी घरी उशीर होतोय, तुम्ही जा,' असे म्हणत. त्यांना जास्त प्रश्न आवडत नसत. वेळेबद्दल ते अतिशय काटेकोर. दोन मिनिटे उशीर झाला तरी ते संतापायचे. एकदा लग्नाच्या आमंत्रणाला जोडपं आलं होतं, तर, 'दोन मिनिटांत जाऊन येतो' म्हणून खण, नारळ घेऊन आले. माणिकताईंना चहा करायला सांगून आलेल्या बाईंची ओटीही भरायला लावली. बुवांनी गाण्याबरोबर व्यवहारही शिकविला.

बुवा म्हणत, ''तुम्ही पैसे फेकता व शिकता. उन्हात उभे राहून आम्ही चिजा घेतल्या आहेत.''

नॉनव्हेजचं फोलपट जरी दिसलं तरी ते जेवत नसत. पण खाँसाहेबांना काय किंवा तिरखाँवा आले की, माणिकबाईंना घरी बोलावून सांगत, 'तुमचा बेत करा.' गुरुवरील भक्ती म्हणून ते हे सर्व सहन करीत. सर्वांना घरीच उतरवून घेत. बुवा म्हणत 'गुरुची व संगीताची ही सेवा वाया जात नाही. आशीर्वाद मिळतो.'

खाँसाहेब गेल्यावर बुवा दरमहा दोनशे पन्नास रुपयांची मनीऑर्डर गुरुपत्नीला पाठवत होते. त्यामुळे गुरुमातेचा आशीर्वाद मिळाला. तिरखाँ कडून भाई गायतोंडे यांना काही मिळावे, यासाठी बुवांनी तिरखाँवाची मनधरणी केली, व त्यांना सांगितले,'जरा इस बच्चेको दो बोल दिजिए.' आपल्या शिष्यासाठी एवढे करणारे गुरू अद्वितीयच म्हटले पाहिजेत.

क्लासला विद्यार्थी आला नाही, की त्याच्या घरी जात. आईवडिलांपेक्षा जास्त माया त्यांनी विद्यार्थ्यांवर केली. तापट स्वभावामुळे जवळ जायला कुणी धजत नसत. पण एकदा शिकवायला बसले की, त्याच्या स्वरात शिकवायला सुरुवात. मग स्वतःचा आवाज जाईल हा विचार त्यांना कधी शिवला देखील नाही. माणिकताईंना मात्र ते सांगत, 'शिकवण्या करू नका. आवाज खराब होतो. आमचं उदाहरण डोळ्यासमोर ठेवा.' एकूण काय, शिष्याच्या पदरात जास्तीत जास्त विद्या पडून तो तयार होवून आपल्यापेक्षा सवाई व्हावा, हीच एक त्यांची आंतरिक तळमळ असे. वारंवार सांगूनही एखादी गोष्ट आली नाही, की ओरडत, पण मातेच्या ममतेने.

गायक म्हणून बुवांनी खाँसाहेबांचे जितके ऋण फेडले असतील, त्याच्या शतपटीने ते ऋण, बुवांनी उत्तम शिक्षक होवून फेडले.

बुवा संस्था, मित्र यांची निमंत्रणे घेत, पण वेळेवर हजर राहण्याचा त्यांचा कटाक्ष असे. बुवा सौंदर्योपासक होते. सत्य, शिव आणि सुंदर यांबद्दल बुवा आग्रही असत.

बुवांचा सेवाभाव लोकांच्या कल्याणासाठी असे, म्हणून जे जे चांगले, विधायक, शुभ व शिव याबद्दल बुवांना विलक्षण प्रेम व जिव्हाळा वाटे. अर्थात त्यामुळे स्वार्थ, खोटेपणा, आळस, कृतघ्नपणा, टवाळी, अहंकार, मत्सर, द्वेष असल्या हीन दुर्गुणांना त्यांच्या आयुष्यात जरासुद्धा थारा नव्हता. ते उभ्या आयुष्यात कोणाबद्दलही वाईट बोलले नाहीत.

स्वैरबेतालपणाच नव्हे, पण वाटेल ते गैर खपवून न घेण्याइतके ते मनस्वी होते आणि स्वतःचा विचारच करायची सवय नसलेल्या बुवांचा प्रसिद्धीपराङ्मुखता हा गुण वेगळा सांगण्याची जरुरीच नाही.

बुवा लौकिकार्थाने संसारी नव्हते पण त्यांची घरातील शिस्त व स्वयंपाकघराची मांडणी, सुगरण स्त्रीयांनाही लाजवेल अशी होती. एकदा पं. काणेबुवांच्या बरोबर माहिमला बॅ. गुप्ते मार्गावरील (आताचा पं. गुनीदास पथ) यांच्या छोटेखानी दोन खोल्यांच्या घरी जाण्याचा योग मला आला होता. त्यावेळी अतिशय अगत्याने त्यांनी आमचे स्वागत केले होते. घराचा प्रत्येक कानाकोपरा आमच्यासमोर शिस्तीत उभा होता. स्वयंपाकघर व्यवस्थित आवरलेले होते. मांडणीवरील प्रत्येक डब्यावर त्यात काय ठेवलेले आहे हे सांगणाऱ्या पट्ट्या लावलेल्या होत्या. बुवांच्या घरात प्रत्येक वस्तूंच्या जागा ठरलेल्या असत व ठरलेल्या जागेतच, त्या वस्तू ठेवल्या गेल्या पाहिजेत, असा त्यांचा कटाक्ष असे. हे घर पं. जी. एन. जोशी यांच्या ओळखीने त्यांना मिळाले होते. त्या घराजवळच पं. जी. एन. जोशी याचे घर होते आणि दोन्ही घरांचे संबंध अतिशय जिव्हाळ्याचे व घरोब्याचे होते.

बुवा पण सर्वार्थाने संस्कारी पुरुष होते. संगीत हाच बुवांचा संसार आणि सतत चिंतनाचा विषय होता. पण संगीताची संजीवनी विद्या प्राप्त करून घेण्यासाठी या आधुनिक कचाने अवतीभोवती व्यसनी, मोहमयी वातावरण असूनसुद्धा आपले शील, सत्त्व व चारित्र्य जिवापलीकडे जपले. म्हणून बुवांचे ज्ञानभांडार, अध्यापनकौशल्य यांबरोबरच त्यांचे उज्वल शील व चारित्र्य याबद्दल शिष्य परिवारातील स्त्रीपुरुषांना त्यांच्याबद्दल अत्यादर व परमावधीचे प्रेम वाटत होते. म्हणूनच या सात्त्विक, सद्गुणी व शुचिर्भूत व्यक्तिच्या भोवती पावित्र्याचे दिव्य वलय निर्माण झाल्याचा भास होई.

पं. जगन्नाथबुवांना जीवनात जे यश मिळाले, ते प्राधान्याने त्यांच्या संगीत

क्षेत्रातील भरीव कार्यामुळे. या त्यांच्या कर्तृत्वाला उठाव मिळाला तो त्यांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वामुळे, हे निर्विवाद सत्य आहे. मग बुवा हे व्यक्ति म्हणून श्रेष्ठ ? की गायक म्हणून श्रेष्ठ ? हा वाद सुरू होतो. अर्थात गायक हा बुवांच्या व्यक्तिमत्त्वाचाच एक घटक असला, तरी व्यक्तित्त्व या संकल्पनेची व्याप्ती सर्वसाधारण व्यवहारात वावरणारी मूर्ती इतक्या मर्यादित अर्थाने घेतली जाते. श्रेष्ठत्व ठरविताना बहुसंख्य मतांचा विचार केला जातो. साहजिकच बुवांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव त्यांच्या सहवासात येणाऱ्या बहुसंख्य सर्वसामान्यांवर जितका पडे तितका त्यांच्या गायकीचा प्रभाव पडणे शक्य नव्हते, कारण बुवांची गायकी समजण्यास अवघड, लयदार, आलापीयुक्त होती. सर्वसामान्यांना भुरळ पाडणारी तानक्रिया त्यात जवळजवळ नगण्य होती. कंठमाधुर्यापेक्षा कमावलेला आवाज होता, म्हणून लोकमताचा कौल व्यक्तिमत्त्वाच्या बाजूने लागला असल्यास त्यात आश्चर्य नाही. पण गायक म्हणून विचार करताना बुवांचे संगीत क्षेत्रातील सर्वांगीण कार्य विचारात घेणे आवश्यक आहे. कारण बुवांना यश मिळाले, त्यात त्यांचे गायन हा एकच घटक अभिप्रेत नव्हता. त्यांची गायकी विद्वानांना चकित करणारी होती, तर व्यक्तिमत्त्व विद्वानांपासून सामान्यांपर्यंत सर्वांना आकर्षित करणारे होते. यावरून एक गोष्ट आठवते, ती इंग्लंडच्या डॉ. जॉन्सन नावाच्या लेखकाची. पोषाख गबाळा, अंगविक्षेप चमत्कारिक, पण मूर्ती भव्य. ते स्वतः अतिशय हजरजबाबी, संभाषणचतुर, विद्वान वाकपटू होता. त्यांच्या मित्रमंडळात 'स्वयमेव मृगेंद्रता' या न्यायाने तो सर्वांवर छाप पाडी. त्यांनी विपुल लेखनही केले. त्यांच्या वादविवादांच्या निर्विवाद चातुर्याच्या कथा, सावलीसारखं त्याच्या सतत सोबत असणाऱ्या बॉस्केल नावाच्या त्यांच्या मित्राने डॉ. जॉन्सनचे सुंदर चरित्र लिहून जगाला ज्ञात करून दिल्या आणि मग रिकामटेकड्या समीक्षकांना विषय मिळाला की डॉ. जॉन्सन व्यक्ती म्हणून श्रेष्ठ की लेखक म्हणून श्रेष्ठ. असल्या वादात अनेक घटक गुंतागुंत करतात. निर्णयाचा लंबक काही काळ इकडे तर काही काळ तिकडे होवून काळ पुढे सरकता सरकता तो वाद विस्मृतीच्या गर्तेत केव्हा गाडला जातो समजतच नाही.

जगन्नाथबुवांचा स्वभाव सेवा, भक्ती व दान करून माणसे जोडण्याचा. जिथे ते जातील तिथे घरोब्याची खूण ठेवूनच बाहेर पडतील. असंख्य शिष्य व मित्र नुसते जमविलेले नाहीत, तर वर्षानुवर्षे टिकवून वाढवीतच गेले. ही किमया त्या व्यक्तीच्या ठिकाणी संभाषणचातुर्य, बहुश्रुतपणा, शिष्टाचार, लाघवी प्रेमळ स्वभाव, विद्वत्ता यांसारखे असामान्यत्व असल्याखेरीज कशी शक्य आहे ? पण व्यक्तिमत्त्वाच्या

प्रभावाला आयुष्याच्या मर्यादा पडतात. नंतर त्याचा भर ओसरतो. बुवांनी संपूर्ण भारतभर गाजविलेले ***जोगकंस, स्वानंदी*** यासारखे राग आणि त्यांनी बांधलेल्या बंदिशी दीर्घकाळ आनंद देत राहतील. ही अमूल्य दौलत हे एक शाश्वत सत्य आहे, आणि त्यातील सौंदर्याच्या सामर्थ्यामुळे अमरत्वावर हक्क सांगण्याइतकी त्यांच्यात अंगभूत ताकदही आहे. म्हणूनच वाद झालाच तर या मुद्यावर व्यक्तीपेक्षा बुवा संगीतकार म्हणून श्रेष्ठ ठरवून त्या वादावर पडदा पाडलेला बरा. पण त्यांच्यामधील अपरंपार लोकसंग्रह करण्याच्या कलेमुळे त्यांचे आकर्षक व्यक्तिमत्त्व ही एक चालती बोलती नव्हे तर दबाव आणणारी, त्यांची गायक म्हणूनही जमेची बाजू होती. गायक म्हणून बुवांच्या यशात त्या व्यक्तिमत्त्वाने त्यांच्या गायनापेक्षा कांकणभर अधिक वाटा उचललाही असेल, हेही तितकेच खरे. कलाकाराची कला आणि व्यक्तित्त्व दोन्ही माणसाचे मन जिंकणारे असतील तर तो कलाकार पूर्ण यशस्वी म्हटले, तर वावगे ठरणार नाही.

❖❖❖

५

# सर्जनशील कलावंत

वास्तविक संगीत क्षेत्रात अलौकिक कर्तृत्व गाजविण्यास पं. जगन्नाथबुवांची परिस्थिती सर्वस्वी प्रतिकूल होती. बुवांच्यात संगीतातला वंशपरंपरागत खानदानी मोठेपणा नव्हता. बड्या संगीत मार्तंडांचे पाठबळ नव्हते. घरातील कुणाचे भावबळ पाठीशी नव्हते. एखाद्या घराण्याचे सहजसुलभ तयार व्यासपीठ नव्हते, की आर्थिक परिस्थितीच्या अनुकूलतेने होणारा मित्रपरिवार नव्हता. यांपैकी प्रत्येक गोष्ट त्यांना प्रतिकूल होती. मुंबईत असताना घशाचे ऑपरेशन झाल्यानं नैसर्गिक आवाजही प्रतिकूल बनला होता.

इतक्या सर्व प्रतिकूल परिस्थितीच्या दुर्भाग्यात भाग्याची एकमेव गोष्ट बुवांच्या ज़ीवनात प्रारंभी घडली, ती म्हणजे त्यांना लहानपणापासून मिळालेला अनेक ख्यातनाम उस्तादांचा सहवास. बुवांनी आपल्या निष्ठापूर्ण सेवेने या सहवासाच्या संधीचे सोने केले. सन १९२१ मध्ये सिकंदऱ्याच्या महंमद अलीखाँ या पहिल्या गुरुंपासून बुवांच्या सेवापर्वाला सुरुवात झाली. त्याची अखेर १९६२ साली त्यांचे शेवटचे गुरू आग्रेवाले विलायत हुसेनखाँ यांच्या निधनाने झाली. या प्रदीर्घ कालखंडात बुवांनी आपली गायकी असंख्य प्रकारे समृद्ध केली. इतक्या वेगवेगळ्या व नामवंत घरंदाज गवयांच्या तालमी आणि त्याही इतकी वर्षे सातत्याने मिळण्याचे भाग्य एखाद्यालाच मिळते. कुणाजवळ त्यांनी स्वरसाधना केली, कुणाजवळ आलापी शिकली, कुणाची बोल उपज घेतली, कुणाकडून खेंचतानी घेतली, अडीदिडीचे चलन आत्मसात केले आणि वेगवेगळ्या बनावटीच्या चिजा तर सर्वांकडून घेतल्या. आश्चर्याची गोष्ट अशी की, हे सर्व धन खिशात दीडकीसुद्धा नसताना मिळविले, ते स्वतःच्या सेवेच्या सामर्थ्यावर...

उस्तादांकडून मिळालेल्या चिजांचे पठण, मनन, चिंतन वर्षानुवर्षे करताना त्यातून स्वतःच्या प्रचलित रागातील चिजा स्फुरल्या.

पं.जगन्नाथबुवांचे संगीत शिक्षण अनौपचारीकरित्या लहानपणापासून चालू होते. पण त्याला पहिले गुरुमुख लाभले ते सिकंदऱ्याच्या महंमदअली खाँच्या

स्वरूपात. १९२१ साली त्यांनी गुनीदासांना दिलेल्या चिजांपैकी एक अशी–

राग शहाणा कानडा, (धीमा त्रिताल)

**आछी निकी बनो को लुभाना । बनरा बनरीको देख लुभाना ।**

**अचपल बनरा सुन्दर बनरी । रंगसे रंग मिलाना ।**

महंमद अलीखाँ हे गयेजवळील त्रिधोर येथील असून तानसेन यांच्या घराण्यातील अकरावे पुरुष होत. त्यांचा आवाज गोठा, जोरकस व गायकी चित्ताकर्षक होती. १९२७ साली त्यांचे निधन झाले. अशा या महंमद अलीखाँकडे शिक्षण घेत असताना बुवांना तानरसखाँ यांचे सुपुत्र उमरावखाँ यांचे भांजे शब्बूखाँ यांच्या गायकीबद्दल आकर्षण वाटू लागले आणि बद्रुज्ञमाखाँ यांच्या मध्यस्थीने त्यांचे शिक्षण दोन्हीकडे चालू राहिले. इथेच बुवांच्या चोखंदळ सौंदर्यदृष्टीने निवड करण्याचा पाया घातला गेला. शब्बूखाँकडून मिळालेल्या चिजांपैकी एक चीज–

राग मुलतानी, झपताल (मध्य लय)

**पीर निजामुद्दीन गौस सकल धीर । करम करतार अब आन बंधाओ धीर ।**

**जोही जोही घ्यावे सोही फल पावे। 'तानरस' खाँ की मुराद बढाइ ।।**

पं. जगन्नाथबुवांचे तिसरे गुरू कोल्हापूरच्या वास्तव्यात भेटलेले तलवंडीवाले गुलाम महंमदखाँ यांच्याबद्दलची हकीकत आपण मागे पाहिली. त्यांनी पटदीपक रागातील एक खुबसूरत धृपद बुवांना दिले होते, पण त्याच चालीवर येणारी विलायत हुसेनखाँची चाल पुढे येणार आहे, म्हणून गुलाम महंमदखांनी दिलेल्या दुसऱ्या चिजांपैकी एक चीज नमुना म्हणून दिलेली बरी –

राग पटमंजरी, (धीमा त्रिताल)

**अब ना रहूँ चलूँ शिव के संग री । शिव के संग भोलानाथ के संग री ।**

**पैर पदम, माथे शीश चन्द्रमा । गले बिच नाग, जटोमें गंगरी ।।**

अर्थात भेटतील त्या प्रत्येक उस्तादाकडून बुवांनी भ्रमरवृत्तीने चिजांचा व त्यातील सौंदर्य वैशिष्ट्यांचा मध लुटला. सेवाभावाने गुडियान (उनियार) घराण्यातल्या बशीरखाँकडून त्यांच्या घराण्याची वैशिष्ट्ये, शब्दांतील भाव, त्यांचा अर्थ, त्याप्रमाणे त्यांची फेक हे सर्व उचलले. बशीरखाँनी दिलेली चीज –

राग आडाणा, त्रिताल (मध्यलय)

**एंडी एंडी फिरत गुजरीया। गडवाले गाँवकी मदमाती आयी ।**

**फसले बहार आयी सब बन फुले । 'सोखरंग' निकी नवेली इठलावत आयी।**

युरोप दौऱ्यातून परतताना पंजाब घराण्याच्या आशक अलींचा खूप सहवास त्यांना लाभला. आशक अलींनी दिलेली चीज –

राग पटमंजरी (धिमा त्रिताल)

**ए मदमाते होआ होरी के खेल ला मोरे द्वारे ।**
**छोडो बय्या मोरी चुरियाँ करक गयी मैं न सुनुंगी तोरी बात**
**सगरे लोगनवा चर्चा करत है और सुनेंगी मोरी साँस ।।**

गुलामअली वगैरे गातात त्या बाजाचे गाणे त्यांनी आपल्यात आणले. हरकतींना आवाज साथ देत नसे. पण पेटी उत्तम वाजवित. आणि संस्कारित हरकती त्यातून काढून दाखवित. अशा तऱ्हेने सुरुवातीचे त्यांचे संस्कार पूर्ण वेगळे होते. नंतर ते आग्रेवाल्यांकडे आले. बुवांना प्रत्यक्ष तालीम दिलेले शेवटचे, व सर्वात महत्त्वाचे गुरू विलायत हुसेन खाँसाहेबांकडून मिळालेल्या चिजा, विद्या, मार्गदर्शन याला अंत नाही. त्यांच्याकडून मिळालेल्या चिजांपैकी एक –

राग बिहारी नट, (धीमा त्रिताल)

**जाओ जी तुम जाओ लंगरवा । काहे रोकत मोरी गैल ।।**
**हू जो कहत मोरी मानत नाही । भये अनोखे छैल ।।**

☐ **बुवांनी स्वत: बांधलेल्या जुन्या व अप्रचलित रागातील नवीन बंदिशी** : बुवांना मिळालेल्या चिजांचे सतत पठण, मनन, चिंतन, अभ्यास यांखेरीज दुसरा निजीध्यास नव्हता आणि या सगळ्याचा उपयोग करायची आणखी एक विद्या त्यांच्या ठिकाणी होती. ती म्हणजे सृजनशीलता. बंदिशी बांधणे हा एक परमेश्वरी प्रसाद आहे. दिव्यत्वाच्या स्पर्शाशिवाय ते काम किती कठीण आहे, ते जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे. त्या दैवी देणगीला व्यवहारी भाषेत 'प्रतिभा' अशी संज्ञा आहे आणि ती ज्यांच्याजवळ आहे त्यांना देखील तिचे गौडबंगाल अखेरपर्यंत उलगडत नाही. नवनवीन बंदीशी तयार करावयाला बसून होत नसतात. त्या आपोआप स्फुराव्या लागतात. त्या का व कशा स्फुरतात त्याची चर्चा करण्याचे हे स्थळ नव्हे. पण अशा नवीन कृतींपैकी बऱ्याचशा चिजा अपूर्ण अवस्थेत राहतात. कारण त्या कशा पूर्ण कराव्यात हे उमगत नाही. काहींच्या नुसत्या अस्तायाच बांधून झालेल्या असतात, तर अंतरे वर्षानुवर्षेही सुचत नाहीत. काहींची नुसती समेची तोंडेच सुचलेली असतात. व बाकीचा भाग काही केल्या जमत नाही. एकूण तात्पर्य काय, की पूर्णावस्थेला पोहोचलेल्या बंदिशींचे प्रमाण आधी

एकूण कमीच, शिवाय नवीन होणारी चीज सुबक पाहिजे. तिचा चेहरा सुंदर पाहिजे. तिचे चालणे म्हणजे चलन आकर्षक पाहिजे. पदन्यास लयबद्ध हवेत आणि तिचे विभ्रम वेड लावणारे पाहिजेत. एकूण ती साक्षात स्वरूप सुंदरी आणि मोहमयीच असावयास हवी. इतक्या सर्व परिक्षांतून ती उतरली तरच ती गायकांना हवीहवीशी वाटणार, नाहीतर ती तशीच कोठेतरी सांदी कोपऱ्यात पडून राहणार. उत्तम चेहऱ्याची व गोंडस बांध्याची चीज दुर्मिळच. इतक्या अनेक कसोट्यांतून पास झालेल्या बुवांच्या सर्व कन्यका (बंदिशी) एकापेक्षा एक वरचढ रूपवती तर आहेतच, पण त्या सर्व शीलवतीही आहेत. घरंदाज आहेत. या सर्व चिजांना गायकांकडून म्हणूनच लोकप्रियता मिळाली, हे बुवांचे सुद्धा असाधारण असे यश समजले पाहिजे.

पंडित जगन्नाथबुवां जवळ सृजनशीलता होती. हे निर्विवाद. पण त्या जोडीला लागणारा गाढा व्यासंग चिंतनही आवश्यक असते. त्यांचे ब्रज भाषेवर अलोट प्रेम होते. असंख्य शेर, दोहे, कविता वगैरे बुवांना मुखोद्गत असत. त्याचा उपयोग व्यवहारात ते मोठ्या मार्मिकपणे करीत. त्यांना स्वभावतः कोणाबद्दल वाईट बोलणे आवडत नसे. पण एखाद्याचे गाणे वाईट झाल्यास मत न देता हळूच एखादा दोहा तोंडावर फेकीत असत. 'केलनके पेडनमें बेलनको कहा काम चुपका रहो चंदन यहाँ तो करेलनकी बंनरे' (केळीच्या बागेत वेलींना काय स्थान अरे चंदना तू गप्प राहा. इथे तर कार्ल्यांची बाग आहे.) अशा मार्मिकपणे ते टीका करत. त्यांच्या व्यक्तिमत्त्वालाही गहिरा रंग चढे. त्याचप्रमाणे बंदिशींमधील त्या भाषेतील शब्दांच्या उपयोगांमुळे आगळा ढंग येई. त्यांच्या शिक्षणाच्या मानाने इतक्या मान्यता पावलेल्या दर्जेदार चिजा (आणि त्यासुद्धा थोड्याथोडक्या नव्हेत तर कमीत कमी एकशेएक) त्यांच्या हातून संगीत क्षेत्राला मिळाल्या. बुवांच्या या यशामागे त्यांची खडतर तपश्चर्याच उभी होती. बंदिशी बनविण्यापूर्वी त्याला लागणारी पूर्वतयारी परिपूर्ण झाली होती. अनेक उस्तादांचा डोळससंग त्यामुळे अनेक लकबी व वैशिष्ट्ये आत्मसात, असंख्य बंदिशींचा व्यासंग, ब्रजभाषेवरचे अलोट प्रेम, विलायत हुसेनखाँ साहेबांचे बंदिश बांधण्याबाबत मोलाचे मार्गदर्शन व प्रात्यक्षिक शिक्षण, तिरखवाँकडून विपुल शिक्षण मिळालेल्या तबल्यामुळे लयीत आलेला परिपूर्ण पक्केपणा, सौंदर्यदृष्टीतून आलेली चोखंदळ निवड, रचनेचे चातुर्य, कोणत्याही प्रसंगाला लगेच प्रतिसाद देणारा भावनोत्कट स्वभाव, काहीतरी निर्मिती करण्याची मुसलमानी उस्तादांकडून घेतलेली विलक्षण जिद्द, ओढ आणि अलोट गुरुभक्ती या सर्वांची जोड त्यांच्या नैसर्गिक सृजनशीलतेला मिळाल्यानंतर करुण, गंभीर, आनंदी अशा भावभावनांच्या उत्कट अनुभूती प्रसंगी त्या मनोज्ञ मिश्रण

मिलाफातून खूबसुरत बंदिशी स्फुरल्या नाहीत तरच नवल. चंद्रकांत मणी पाझरतो तो काय कृत्रिम उपायांनी ?

पं. जगन्नाथबुवांच्या छंदांपैकी सर्वात मोठा छंद म्हणजे बंदिशी बांधणे. एखाद्या बंदिशीची बांधणी चालू असताना ते नेहमी त्या संबंधीच्या विचारात तासनतास मग्न असत. त्यांना मग इतर काही सुचत नसे आणि अखेर मोठ्या प्रयासाने मनाजोगी बंदिश पूर्ण झाली की त्यांना लक्षावधी रुपये मिळाल्याचा आनंद होई ती कधी एकदा आपल्या शिष्याला दाखवू असे त्यांना होई. जवळ कोणी शिष्य त्यावेळी नसल्यास वाहन करून ते त्यांच्या घरी जात, व वाचून दाखवीत. मग तो दिवस असो, अथवा रात्र असो. असा बालसदृश निरागस स्वभाव होता त्यांचा. बंदिश पूर्ण झाल्यानंतर ती विलायत हुसेनखाँना दाखवीत, त्यांच्याशी चर्चा करीत. विचारांची देवाणघेवाण होई. खाँसाहेबांच्या निधनानंतर बुवा त्या बंदिशी आपल्या शिष्यांना दाखवीत. त्यांच्याशी मोकळेपणाने तासन्‌तास चर्चा करीत. वाद होई. एखाद्या अस्ताईला बांधलेला अंतरा नापसंत वाटला तर अनेक अंतरे बांधीत व त्यावर शिष्यां बरोबर चर्चा करून एखाद्या अंतऱ्यावर शिक्कामोर्तब करीत. इतके करूनही ते थांबत नसत. ती चीज स्वतः मैफलीत गाऊन स्वतःची खात्री आणि समाधान झाल्याखेरीज पक्की करीत नसत किंवा शिष्यांनाही शिकवत नसत.

बुवांची बंदिश स्वरअंग, तालअंग व काव्यकल्पना या दृष्टीने पूर्वीच्या सदारंग–अदारंग यांच्या अथवा जुन्या उस्तादी रचनेच्या तोडीची होई. असे एकेका चिजेकरता केलेले मनस्वी परिश्रम पाहिले की पूर्वायुष्यात एकेका चिजा मिळविण्या करिता त्यांनी केलेल्या खडतर कष्टांची याद यावी. नवनिर्मितीला पोषक व आवश्यक असणाऱ्या बहुतेक सर्व सद्गुणसंपत्तीला परिश्रमांची जोड मिळताच अजोड, अप्रतिम बंदिशी बुवांनी बांधल्या व ते सिद्धहस्त रचनाकार म्हणून सर्वत्र ख्यात झाले. पारंपरिक रचना, रागाची पुरेपूर कल्पना लक्षात यावी या दृष्टीने, रचल्या गेल्या. बंदिशीचा उठावदारपणा एवढा लक्षात घेतला नाही, म्हणूनच बुवांनी विचार करून आपल्या बंदिशींची रचना आकर्षक, अर्थयुक्त , लययुक्त , भावनांनी भरलेली अशी केली, त्यामुळे त्यांच्या प्रचलित रागांतील बंदिशी आगळा आनंद देतात.

त्याचप्रमाणे अप्रचलित रागांपैकी **अहिर भैरव, शिवमत भैरव, गुणकली, रामकली, भटियार** हे सकाळचे राग, **मुलतानी, मधुवंती, गौरी, पूर्वी, धनाश्री, मारवा** वगैरे संध्याकाळचे राग, तसेच **यमन, बिहागडा, बिहाग, चंद्रकंस, मारूबिहाग, कानड्याचे** प्रकार वगैरे रात्रीचे राग यांपैकी काही रागातील बंदिशी केवळ

अवर्णनीय म्हणाव्या लागतील. चावून चावून चोथा झालेल्या त्याच त्याच चिजा ऐकून कंटाळलेले श्रोते बुवांच्या नवनवीन खूबसूरत बंदिशी ऐकून बेहोश होत असत.

पं. जगन्नाथबुवांनी जुन्या रागातील प्रचलित वा अप्रचलित रागांपैकी पहिली चीज बांधण्यासाठी रागाची निवड केली ती सुद्धा मोठ्या चतुराईने, आपली नवी बंदिश स्वीकार्य ठरावी यासाठी त्याला गरजेची जोड दिली. म्हणजे असं की, मारुबिहाग रागात द्रुत एकतालातील चीज मुळातच नव्हती. म्हणून बुवांनी अटकळ बांधली की आपल्या चिजेने ही उणीव भरून काढली तर ती चीज लगेच उचलून धरली जाईल आणि त्यांचा हा होरा बरोबर ठरला. १९४२ मध्ये **मारु बिहाग** रागातील द्रुत एकतालातील **गाऊ गुनन कैसे तुमरो** अशा प्रारंभाची पहिली बंदिश बांधून आपल्या जीवनातील एका ऐश्वर्यशाली दालनाचे उद्घाटन केले. ती पुढील प्रमाणे –

ताल – द्रुत एकताल (राग मारुबिहाग)

**गाऊ गुनन कैसे तुमरो । गुन नाही मोमे ।।धृ।।**

**गुनीदास गुनदान माँगत है प्राणपिया । तुम गुनसागर हो गुनसमुद्र गुणवंत पिया।।**

द्रुत एकताल त्यांचा लाडका असला तरी इतरही तालांची सुरेख जोड त्यांनी आपल्या बंदिशींना दिली. त्यातील ललतचा झपतालातील सवाल आणि एकतालातील जवाब यांच्या आयुष्यातला वेगळाच रंग दाखवितो. कुठेतरी हृदयात खोलवर रुतलेली नाजूक चोट (जखम) या चिजांतून त्यांनी मोकळी करण्याचा प्रयत्न केला असावा असे वाटते. शेवटी कलाकाराची रचना ही त्याच्या व्यक्तीत्त्वाचे आणि मनाचे स्वच्छ प्रतिबिंब असते.

राग ललत, झपताल (मध्यालय)

**साची कहत हूँ मैं, नहीं गयो दूजो धाम, का मोसों इतरावत, ए बिरहन बावरी।**

**गुनिदास अपने धाम रटत है रमा नाम। नाहीं कोऊ दुजो भावत, तोरे बिन ए बावरी ।।**

या बंदिशीतील सवालाला दिलेला जबाब

राग ललत (द्रुत एकतालात)

**जा जा रे जा रे बलमवा, झूठे वचन झूठी प्रीत निठुर निडर तोरी ।।**

**कहो गुनीदास अब पैया परत का मोरे,**

**रमा संग कीनो कपट सौतन संग जागे सगरी रैन रस पागे ।।**

विलायत हुसेनखाँची म्हणजे त्यांच्या गुरुचीच खासियत होती, की अनेक जणांकडून एखादा राग ऐकून मग ते त्याचे चलन निश्चित करीत असत. तद्वतच

विविध बनावटीच्या अनंत चिजांचा संग्रह, अभ्यास, रियाज यांतून अनेक घराण्यांची वैशिष्ट्ये लक्षात घेऊन बुवांच्या मनात चीज म्हणजे काय त्याच्या चिंतनातून हळूहळू एक आकृतीबंध तयार होऊ लागे. ही प्रक्रिया प्रदीर्घ होती. १९२१ साली महंमद अलीखाँकडे संगीताची तालीम घेण्यास प्रारंभ केल्यापासून ते १९४२ साली आपली पहिली वहिली चीज बांधेपर्यंत जवळजवळ २०-२१ वर्षे त्यावर मनन झाले होते. आणि जसजसा आपल्या प्रतिभा सामर्थ्याचा प्रत्यय त्यांना येऊ लागला तसतसा त्यांचा आत्मविश्वास वाढून स्वतः बांधलेल्या चिजांचे दालन त्यांनी समृद्ध केले.

बी. आर. देवधर यांनी बांधलेला राग **चंद्रकंस** व त्या रागातील बुवांनी बांधलेला बडा ख्याल आणि जोड बंदिश याची निर्मिती कथा अशीच मनोरंजक आहे. पं. व्ही. डी. पलुसकर यांनी त्यांचे शिष्य बी. आर. देवधर यांना प्रसिद्ध पियानो वादक जिओव्हानी स्क्रीन्झी यांच्याकडे पाश्चात्य संगीत शिकण्यासाठी पाठवले होते. त्यावेळी पियानोवर **मालकंस** वाजवताना चुकून शुद्ध निषाद वाजविला गेला. बी. आर. देवधर यांना तो निषाद अतिशय गोड लागतोय असे वाटल्यामुळे बी. आर देवधर यांनी **मालकंसमधून 'चंद्रकंस'**ची निर्मिती केली आणि **भैरव बहार** मधील **जो बनारे** ही चीज **'चंद्रकंस'** मध्ये बांधली. पं. जगन्नाथबुवांनी बी. आर. देवधर यांचा **'चंद्रकंस'** ऐकला. त्यांच्या भावुक, सृजनशील मनाला तो भावला. म्हणून त्यांनी त्या रागात एक स्वराचा विवादी स्वरूपात सुंदर स्पर्श देऊन **'ये दुखवा मोरा'** हा बडा ख्याल आणि **धन धन मंगल गावो** ही जोड चीज बांधली. या बंदिशीमध्ये मंद्रातील व मध्यातील शुद्ध निषादाबरोबर शुद्ध रिषभाचा उपयोग करून रागाचे माधुर्य अधिक वाढवले आहे. या चिजा पुढे खूपच लोकप्रिय झाल्या, विलंबित एकताल ख्याल –

**ये दुःखवा मोरा, कासे कहूँ री। मन भावन नाही आयोरे मंदिरवा ।**
**प्रानपियाकी बाँट तकत हूँ। दासगुनी पछतायो ।**

जोड चीज (ताल त्रिताल)
**धन धन मंगल गाऊँ आज मैं।**
**धन धन मंगल गाऊँ। आज गुनदाता घर आये आज मैं ।।**
**दास गुनी अब प्रानपियाको। देख मुरत मुसकात आज मै ।।**

शास्त्र म्हणजे तार्किक विश्लेषणात्मक बौद्धिक मांडामांड आहे. तर कला म्हणजे ये हृदयीचे ते हृदयी घातले अशी ओंकाराधिष्ठित बैठक आहे, साधना आहे,

तपश्चर्या आहे. येथे शॉर्टकट नाही. व्यक्तिचे व्यक्तित्त्व जसे वेगवेगळ्या पेहेरेवानी खुलते तद्वतच रागाचे व्यक्तिमत्त्व निरनिराळ्या चिजांच्या पेहराव्यांनी वेगवेगळे रूप घेत समोर उभे राहते. एकदा १९६३ च्या मार्च महिन्यात त्यांचा सत्कार करण्याचे कोल्हापूरकर मंडळींनी ठरविले. पण एकशेएक चिजा हातून बांधून झाल्याखेरीज सत्कार करून घेणार नाही, असे मोठ्या जिद्दीचे उद्गार बुवांनी काढले.

जुन्या प्रचलित, अप्रचलित रागांमधील बंदिशीची बांधणी हाताळून झाल्यावर बुवा संपूर्णपणे नवीन राग निर्मितीकडे वळले. नवीन राग निर्मितीपूर्वी त्यांनी राग संकल्पनेचा विचार केलेला दिसतो. निरनिराळ्या रागरागिण्यांचा अभ्यास करताना प्रत्येक रागाला स्वतःचा रंग, रूप, रस, गंध असतो, या सत्याची प्रचिति त्यांना आली असली पाहिजे. एकच स्वर निरनिराळ्या रागांमध्ये असला तरी प्रत्येक रागात त्याचा लगाव व स्वरूप त्यातील आशयानुसार भिन्न असते. हे ज्ञान रागाचे नुसते आरोह अवरोह पाठ करून येत नाही. त्याला खास गुरुकडून तालीम मिळायला पाहिजे.

याबाबत उदाहरण देताना पु. ल. देशपांडे 'गुनिदास जगन्नाथबुवा' या आपल्या लेखात म्हणतात, ''रागाचा साक्षात्कार व्हावा लागतो. प्रत्येक रागाला निरनिराळा भावगंध आहे. केवळ हा स्वर वर्ज्य आणि हा स्वर वादी एवढ्यावरून राग समजला असता तर रेल्वेचे टाइमटेबल वाचून तीर्थयात्रा घडल्याचा आनंद मिळवता आला असता. नुसता कोमल गंधार म्हणून भागत नाही, तोच कोमल गंधार **मालकंसात** एक रूप घेतो आणि **बागेश्रीत** निराळे रूप घेतो, दरबारीत त्याचा थाट आणखी वेगळा आणि **धानीत** त्याहून निराळा. आता आंधळेपणाने आरोह अवरोह पलटे पाठ करायला लावण्याने हे गूढ कसे उमजायचे? अशा वेळी समोर बसून शिष्याला ही रहस्ये सांगणाऱ्या बुवांचे मोठेपण समजते.''

पं. जगन्नाथबुवांनी जुन्या रागात नव्या चिजा बांधल्या तेव्हा काय किंवा पुढे नवराग निर्मिती त्यांनी केली तेव्हा काय, त्यामागे एकच दृष्टी होती ती म्हणजे त्यांच्या जीवनाचा स्थायीभाव ठरलेली सौंदर्यलोलुपता. वस्तुस्थिती जी आहे, ती अधिक सुंदर कशी होईल, व त्यासाठी काय करायला पाहिजे याचे अखंड चिंतन, हाच त्यांचा छंद व ध्यास होता. चिजा बांधताना या आपल्या दृष्टी कोनाचा वापर करून जुन्या रागांत नवीन चिजा बांधल्या व त्या मान्यवरांना तसेच सामान्यांना बेहोष करण्या इतक्या प्रभावी व यशस्वी ठरल्या.

आता बुवांची यानंतरची अद्वितीय कामगिरी म्हणजे, रागांवर खोल चिंतन करून, अधिकाधिक आकर्षक रागांची निर्मिती.

घराणे काय किंवा राग काय, त्यात सुधारणेसाठी बदल करायचा, तर त्याची मूळची चौकट क़ायम ठेवून करणे आवश्यक ठरते. आरोह–अवरोहांची व–वादी संवादीची चौकटच बदलल्यास रागच बदलतो. प्रत्येक रागाला स्वतःचे एक व्यक्तिमत्त्व असते. त्यात काही भावभावना, संकल्पना गुंफलेल्या असतात, असे मानले जाते. त्यावरून तो राग काही विशिष्ट करुण, हर्ष, शोक इत्यादी भावनांचा परिपोष करतो असे समजले जाते. त्याचा गावयाचा कालही ठरविला जातो. इतक्या सगळ्या घटकांनी त्याला एक रेखीव व्यक्तिमत्त्व प्राप्त होते. त्यामुळे त्या रागात सुधारणा करण्याचा म्हणजे त्यापेक्षा अधिक आकर्षक सुरावट करण्याचा मार्ग म्हणजे घटकाचे व्यक्तिमत्त्व कायम ठेवून एकापेक्षा अधिक रागांचे मिश्रण करणे. आंब्याची जात बदलण्यासाठी व दर्जा सुधारण्यासाठी त्याचे दुसऱ्या निवडलेल्या आंब्याच्या रोपाशी कलम केल्याने एक सुधारित आंबा हाती लागतो. संकरित पद्धतीमुळे प्रत सुधारते हा नित्यानुभव आहे. पण हे सुद्धा एक शास्त्र आहे व त्यात अनेक घटकांचा विचार आवश्यक ठरतो. शेती सारख्या भौतिक शास्त्रात हा प्रयोग सोपा ठरतो, कारण त्यातील घटकांचे गुणधर्म निश्चित आणि निर्धारित असतात. ही प्रक्रिया प्रयोगक्षम असते. त्यातील बदल मूर्त स्वरूपात असल्याने अपेक्षित बदल आणि प्रत्यक्ष झालेला बदल अनुभवता येतो. प्रयोगाचे यशापयश वस्तुनिष्ठ पद्धतीने ठरविता येते, सिद्ध करता येते.

पण सौंदर्यशास्त्रासारख्या अमूर्त भाववाचक कल्पित आणि अभौतिक प्रांतात निष्कर्षाचे खेळ हे सर्व काल्पनिक असल्यामुळे त्यांचे स्वरूप हे मूलतः व्यक्तिनिष्ठ असते. म्हणून मतभेदांना वाव मिळतो. या क्षेत्रात मांडलेली प्रमेये, काढलेले निष्कर्ष हे स्वीकार्य किंवा रूढ होण्यास बराच कालावधी लागतो व त्याला अशा प्रमाणभूत कसोट्याही देता येत नाहीत. भावभावनेचे खेळ भावतात, पण सांगता येत नाहीत व सिद्ध करता येत नाहीत म्हणून मिश्र राग बनविण्यापूर्वी काळजीपूर्वक अनेक पथ्ये सांभाळूनही तो प्रयोग यशस्वी होईलच असे ठामपणे सांगता येत नाही. कारण त्या मिश्र रागात गुंफलेले राग व रागिण्या, त्यांची व्यक्तिमत्त्वे, स्वभाव वैशिष्ट्ये ही एकत्र आल्यानंतर त्यांचा एकमेकांवर पडणारा असर, त्यापासून निर्माण होणारी भावस्थिती वगैरे अनेकसूक्ष्म घटकांचा विचार अनुभवावा लागतो. त्यातील घटक रागांचा परिपूर्ण

अभ्यास असावा लागतो, त्यातील स्वर, लय, लगाव या सगळ्यांच्या संकलित परिणामांचा अंदाज घ्यावा लागतो. पुन्हा पुन्हा प्रयोग अनुभूती घ्यावी लागते. हे सर्व अतिपरिश्रमाचे व प्रयोग कर्त्यांच्या सहनशक्तीचा अंत पाहणारे असते.

पं. जगन्नाथबुवांनी बांधलेले सर्व राग मिश्र आहेत, व ते इतके यशस्वी ठरले आहेत, की मान्यवर गायकांच्या मैफली रंगविण्यात ते हुकमी एक्के बनले आहेत. सर्वसामान्य श्रोत्यांना तर वेड लावले आहे. हे सर्व अभूतपूर्व यश मिळविण्यामागे बुवांची केवढी तपश्चर्या उभी असेल, याची कल्पना येते. नवराग निर्मिती हे अशा पद्धतीने बुवांचे सर्वश्रेष्ठ योगदान ठरते.

पं. जगन्नाथबुवांचे नवीन राग कौशी (जोगकंस), स्वानंदी, जौनभैरव, मारुवसंत, मनरंजनी, सुंदरकली या क्रमाने जन्माला आले. कौशि या रागाची निर्मिती ते कोल्हापूर येथे असतानाच झाली होती. पण पुण्यामुंबईकडे त्यांचा स्वानंदी राग प्रथम प्रचलित झाला. त्यासंबंधी वा. वा. गोखले म्हणतात, 'वस्तुतः **जोगकंस** या रागाची निर्मिती **स्वानंदी**च्या पुष्कळ आधीची, कोल्हापूर येथे असतानाची, त्यावेळी तो राग कौशी या नावाने ओळखला जात असे. बुवांनी माणिक वर्मा व कुमार गंधर्व यांना **कौशी** म्हणूनच तो शिकविला. कुमार गंधर्वांनी तो पुण्यास आबासाहेब मुजुमदार यांच्या षष्ठ्यब्दीपूर्ती समारंभाचे प्रसंगी गायला.

जोगकंस हा पं. जगन्नाथबुवांच्या नवराग निर्मितीचा सुवर्ण कळस ठरावा, इतका तो सर्वगुणसंपन्न आहे. या निर्मितीतून त्यांच्या सृजनशीलतेची आणि कल्पकतेची खूण मनोमन पटल्याखेरीज राहात नाही. त्यातली **सुघर** ही चीज विलायत हुसेन खाँ यापूर्वी **मालकंस** मध्ये गात असत. तीच बुवांनी **जोगकंस** मध्ये घेतली आणि **पीर पराई** ही जोड बांधली. या चिजेबद्दल पु. ल. देशपांडे म्हणतात, ही तर एक अजोड कलाकृती आहे. मोठ्या प्रेमाने त्यांनी ही चीज कुमार गंधर्वांसारख्या प्रतिभावान गायकाला शिकवली. सत्पात्री दान म्हणतात ते हे.... जुन्या नायकाच्या परंपरेत बुवांना मानाचे स्थान द्यायला ही एक रचना समर्थ आहे असे मला वाटते. ही चीज म्हणजे लय सुरांचे एक मनोहर इंद्रधनुष्य आहे. **सुघर भर पाया** ही नुसती चीज जरी योग्य दमसास ठेवून म्हटली तरी बैठकीत हमखास रंग भरतो. भारदस्तपणा व मोहक लालित्य यांचा इथे सुरेख संगम झाला आहे.

**जोगकंस** या बुवांच्या सर्वश्रेष्ठ निर्मितीबद्दल वा. वा. गोखले म्हणतात, नव्या स्वरूपात, नव्या दिमाखात जोगकंस म्हणजे **यमन**, **बागेश्री**, **मालकंस** अशा प्रतिहित

रागांच्या मांडीला मांडी लावून बसण्याच्या योग्यतेचा, बुवांच्या रचना कौशल्याचा मेरुमणी शोभणारा, सर्वांगाने स्वरांचे सौंदर्य खुलविणारा, निमिषांत श्रोत्यांना स्तिमित करून टाकणारा, जोगकंस म्हणजे संगीत सृष्टीतील अलौकिक रत्न. बुवांवर चोहोबाजूंनी अभिनंदनाचा वर्षाव होऊ लागला. बुवा अखिल भारतीय कीर्तिचे गायक नायक ठरले. आज बुवांच्या **जोगकंसचे** बोट धरूनच मोठमोठ्या गायक वादकांना आपल्या मैफली रंगवाव्या लागतात. ह्यातच बुवांच्या असामान्य कौशल्याला जाणकारांची दाद आहे. बुवांच्या श्रेष्ठत्वाची पावती आहे.

**जोगकंस** या अद्वितीय रागाचा निर्माता जर अन्य देशात जन्माला आला असता तर त्याचं उदंड कौतुक झालं असतं. खरंच, बुवांनी मैफली गाजविल्या नसत्या, चिजांचा अफाट खजिना जमविला नसता, एकापेक्षा एक वरचढ असे अपरंपार शिष्य तयार केले नसते, आणि फक्त एक जोगकंस ची निर्मिती केली असती, तरी भारतीय संगीताच्या इतिहासात त्यांचे स्थान अढळ राहिले असते. असे अलौकिक अनन्य साधारण महत्त्व बुवांच्या निर्मिती मधल्या कोहिनूर समजला जाणाऱ्या **जोगकंस** ला आहे.

सगळेच राग सगळे गायक सारख्याच तोलामोलाने गात नाहीत. त्याला कारणे अनेक आहेत. काही रागांची खूप तालीम मिळते, तर काहींचा पुरेसा रियाज झालेला नसतो. पण सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे गायकाचे व्यक्तिमत्त्व आणि रागाचे व्यक्तिमत्त्व यांच्या तारा जुळाव्या लागतात. त्यांच्या प्रकृतीपिंडाची पत्रिका जमावी लागते. गायकाच्या आवाजाची जात, दमसास, स्वभाव वगैरे अन्य घटकही याला अंशतः कारणीभूत ठरतात. एखाद्या गायकाला एखादा राग मनापासून का आवडतो याची कारणे देता येतीलच असे नाही. बालगंधर्वांना **भीमपलासच** का आवडला होता ते कोण व कसे सांगणार? बुवांनी निर्मिलेले रागही याला अपवाद नाहीत. **जोगकंस** कोणीही म्हटला तरी तो गोड लागतो. हे निर्विवाद. परंतु कुमार गंधर्व किंवा माणिकताईंच्या गळ्यातून त्याला काही आगळी लज्जत येते. तेव्हा उत्कट रागनिर्मितीसाठी गायक व राग यांची कुंडली तंतोतंत जमावी लागते असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

राग जोगकंस (धीमा त्रिताल)

**सुघर बर पाया नीके बनीके । इन भागन के आगे ।।**

**औलीया अंबिया गौस कुतुब सब । इन नबीजीके सिर छत्र धरो ।।**

राग जोगकंस त्रिताल (मध्य लय)

**पीर पराई जाने नही बालमुवा ।।**

**प्रानपिया तुम ऐसे निठुर भये । गुनिदास की सारी आस गमाई ।।**

पं. जगन्नाथबुवांनी जुन्या रागातील नवीन चिजा व नवा राग ***'कौशी'*** म्हणून प्रथम शिकविला गेल्यानंतर बुवांची ***'स्वानंदी'*** जन्माला आला. सर्वथैव स्वतंत्र राग, शास्त्राच्या भट्टीत तावून सुलाखून निघालेला स्वर, ताल, लयीच्या मोजमापात जराही उणा न पडणारा.

नवनिर्मिती ही निर्मितीपूर्वी झालेल्या अनेक सुंदर-सुंदर संस्कारांची परिणीती असते. या **स्वानंदी** बाबतीतही असेच म्हणता येईल. तर पं. रत्नाकर पै यांनी गायलेला **'गोधनी'** बुवांनी ऐकला आणि **स्वानंदी**ची निर्मिती झाली. आता **जोगकंस** काय किंवा **स्वानंदी**च्या नंतर आलेला **'जौन भैरव'** (याला बुवा प्रथम **आसा भैरव** म्हणत) काय किंवा **'मारु वसंत'** काय, त्या रागांच्या नावावरूनच त्यातील घटक रागांची कल्पना येते. **स्वानंदी** हे नाव ठेवताना त्यातील घटक रागांच्या नावापासून तयार करण्याऐवजी तिच्या जनकाने भावनात्मक बैठक घेतल्यामुळे स्वानंदीमध्ये असणाऱ्या **हिंडोली, भटियार** व **बिहाग** या घटक रागांचा सर्व सामान्यांना सांगितल्याशिवाय पत्ता लागत नाही. हाही राग असाच ख्यातनाम झाला आहे. आणि **जोगकंस** याचा प्रकृतीधर्म जसा कुमार गंधर्वांशी जुळला, त्याप्रमाणे या रागाच्या प्रकृतीचे नाते बुवांचे आणखी एक विख्यात आवडते शिष्य पं. सी. आर. व्यास यांच्या प्रकृतीशी जुळल्यामुळे त्यांनी तो राग उत्कृष्टपणे गाऊन गाजविला. त्या रागातील अतिशय लोकप्रिय झालेली चीज अशी -

(राग स्वानंदी, धीमा त्रिताल)

**जियरा मानत नाही, तुम बिन मोरे मनको भावना ।**

**प्रानपिया तुम दासगुनि को बेग बुलाओ तुम अपने ढिंगखा ।।**

पं. जगन्नाथबुवांचा आणखी एक गाजलेला राग म्हणजे **जौन भैरव.** हा मिश्रराग बुवांचे पुत्रवत शिष्य राम मराठे यांनी रंगविला. त्यांचा तो राग हातखंडा होता.

राग जौन भैरव (झपताल)

**अब मेरी सुनो तुम गुनके सागर। गुनवंता हो बलवंता ।**

**प्रानपिया तुम महागुरु ज्ञानी। कीजे कृपा गुनीदास पे गुननकी ।।**

बुवांच्या मानसकन्या लीलाताई आपल्या लग्नानंतर सासरी जाताना नमस्कार करायला आल्या तेव्हा 'तुला काय देऊ?' असे म्हणून 'लाडली री' ही **जौन भैरवची** जोड त्यांना आशीर्वाद देण्यासाठी बांधली. या गहिवरलेल्या प्रसंगातील भावना या चिजेमध्ये आणि तिच्या सुरावटीमध्ये उतरलेल्या दिसतात. ती चीज पुढे आदर्श महागुरू या प्रकरणात दिली आहे.

हे सर्व नवनिर्मित राग बुवांनी शिष्यांना शिकविले. त्यांच्याबद्दल चर्चा केली आणि ते राग लोकप्रिय केले.

☐ **दानी गुरु :** चिजा पिढ्यानपिढ्या एका ठराविक मर्यादित क्षेत्रातच माहीत होत्या. बुवांनी त्यांचा संग्रह केल्यानंतर प्रथम जर कोणती गोष्ट केली असेल तर त्या चिजांचे मुक्त हस्ते प्रथम शिष्यांनाच नव्हे तर जो मागेल त्याला दान केले. दान म्हणण्यापेक्षा उधळण म्हणणे अधिक शोभेल, याचे कारण त्यांनी दान करताना सत्पात्र अपात्र असा भेद केला नाही. बुवांच्या ठिकाणी ही चिकित्सक दृष्टी नव्हती म्हणा, किंवा तिचा त्यांनी उपयोग केला नाही म्हणा, ठराविक मर्यादित क्षेत्रात कुचंबत पिढ्यानपिढ्या पडलेल्या चिजा सर्वांना मुक्तद्वार झाल्या. बुवांच्या ह्या योगदानाची किंमत फक्त जाणकारांनाच कळावी.

कुठल्याही कलेची अभिवृद्धी त्या काळच्या सामाजिक परिस्थितीशी निगडित असते. त्यामुळे आपल्या संगीत क्षेत्राचे महत्‌भाग्य म्हणावे लागेल, की प्रत्येक पिढीत कोणीतरी महापुरुष जन्माला येऊन त्याने तन-मन-धनाने आपल्या समाजाला, त्याच्या संस्कृतीला आणि कलेला सावरले. सांगितीक विचार, रागांचे दुर्मिळ, घराणेदार चित्रण यांचे सहज आदान-प्रदान होत नव्हते. एकंदरच कलेचा विकास आणि प्रसार होत नव्हता. प. जगन्नाथबुवांच्या काळात कोल्हापूर, मुंबईमध्ये घराण्याच्या भिंतींनी संगीत कला बंदिस्त झाली होती. त्यात कडक सोवळेपणा निर्माण झाला होता. अशा या वातावरणात पं. जगन्नाथबुवांनी निखळ, नितळ आणि स्वच्छ वातावरण निर्मितीच्या कार्याची सुरुवात केली. या संगीत दुनियेच्या साई (साऱ्यांचा ईश्वर) ला कोणतेच संगीत वर्ज्य नव्हते. प्रत्येक गायकीतील गुणांचे सुवर्णकण आत्मसात करून स्वतःची गायकी तयार करावी हे त्यांच्या शिकवणीचे ब्रीद वाक्य होते. अशा या अवलियाने आपल्या जवळचे ज्ञान शिष्यांना फक्त मागितल्यावरच दिले असे नाही, तर न मागताही व कधी कधी सक्तीने बुवांनी दान केले.

असे हे अनोखे दातृत्व पूर्वी संगीत क्षेत्रात त्यांच्या गुरुंचा अपवाद सोडल्यास फार क्वचित प्रत्ययाला येत असे. दान करताना सुद्धा बुवा जिव्हाळ्यान घेणाऱ्याच्या

जास्तीत जास्त पदरात पडावे म्हणून उतावीळ असत. अशी दुसऱ्याच्या कल्याणाची पोट तिडीक लाखमोलाची ठरावी, अशी दुर्मिळ आहे. या त्यांच्या सात्त्विक स्वभावाने संगीत क्षेत्रातील मोठमोठ्या महंतांना देखील त्यांच्याकडून विद्या घेण्यास मुळीसुद्धा अवघडल्या सारखे होत नसे. त्यामुळे गोविंदराव टेंबे, वामनराव देशपांडे, कुमार गंधर्व, निवृत्तीबुवा सरनाईक यांच्या सारख्या रथीमहारथींनीही त्यांच्याकडून मुक्तपणे चिजा घतेल्या. त्यामुळे शेकडो चिजांचा मोकळ्या वातावरणात उत्तम प्रसार झाला. या सामाजिक अभिसरणाचे मूल्य देखील विचारांतीच कळून येते व मग समजते, की बुवांचे हे योगदानही काही लहानसहान नव्हे. संगीत क्षेत्रात चिजांच्या विविधतेला, रंजकतेला, सौंदर्याला, दर्जेदारपणाला बुवांनी अप्रत्यक्षपणे फार मोठा हातभार लावला. पण या सर्वांपेक्षा त्यातील योगदानाचे महत्त्व म्हणजे घराण्या–घराण्यामध्ये असलेले संकुचित गूढ हेवेदावे यांच्या भिंती पाडून एक नवे उदार दृष्टीचे मोकळे खेळीमेळीचे वातावरण निर्माण करण्यात बुवांच्या कृतीने मोठा वाटा उचलला. या दानी गुरुने निर्माण केलेल्या शिष्यांची यादी डोळे दिपवणारी आहे.

मम्मूलाल गणपतराव डवरी, केशवराव धर्माधिकारी, भानुदास गुरव तसेच कलंदर नाना मुळे, पं. सुरेश तथा भाई गायतोंडे यांचे हे तबल्यातील गुरू होते. बुवांच्या संगीतातील शिष्यांची यादीसुद्धा अशीच अफाट आहे. राम मराठे, जितेंद्र अभिषेकी, माणिक वर्मा, सी. आर. व्यास, सुरेश हळदणकर, यशवंतबुवा जोशी, प्रभुदेव सरदार, वसंतराव कुलकर्णी, जी. एन. जोशी, बाळकराम, जे. एल. रानडे, डॉ. फळणीकर, गुंडूबुवा अल्याळकर, मदन बोंगाळे, मनोहर मोडक, बबनराव मांजरेकर (प्रसिद्ध हार्मोनियम वादक) बाबूराव जोशी, राजेश्वर बोबडे, बाळ राजाज्ञे (कॉन्ट्रॅक्टर), जिनेंद्र ढणाल (प्रोफेसर), माधव डोंगरे (व्हायोलिन वादक), प्रफुल्ला जोशी (डहाणूकर), मालती पांडे (बर्वे), मंदाकिनी पांडे, निर्मला गोगटे, पूर्णिमा तळवलकर, सिंधू शिरोडकर, विमल वाकडे, लीला करंबेळकर (मानसकन्या), सुलोचना सांगावकर, गुलाब शहा, गुलाब अकोलकर, मनोरमा वागळे, सुमन माटे, कुंदा वेलिंग, चारुमाला गुर्जर इत्यादी. याशिवाय सिनेमा क्षेत्रातील अग्रेसर गायक महेंद्रकपूर, मन्ना डे व सी. एच. आत्मा यांनीही बुवांकडून तालीम घेतलेली होती.

या यादीमध्ये त्यावेळी ४० वर्षाखालील बहुतेक सर्व आघाडीचे प्रथितयश कलाकार अंतर्भूत आहेत. त्यांच्या शिष्यवृंदात पट्टीचे मैफलबाज होते, रंगभूमी गाजवणारे गायक नट होते. चित्रपटसृष्टीतील आघाडीचे संगीतकार होते. संगीत

विद्यालय चालवणारे चालक जसे होते तसे भावगीत गायकही होते. त्याचप्रमाणे नवोदित गायक मंडळीही होती. वादक मंडळीही होती. संगीत क्षेत्रातील असा एकही स्तर नव्हता की ज्याचा कोणी ना कोणी प्रतिनिधी बुवांकडे शिकत नव्हता. असा व्यापक, विस्तृत विद्यार्थीवृंद बुवांकडे वर्षानुवर्षे मोठ्या खुषीत जात असे. हा एक त्यावेळी अपूर्व कुतूहलाचा विषय ठरला होता. बुवांनीही एवढा मोठा शिष्यवर्ग वाढवला. इतकेच नव्हे तर विद्वत्ता, शिक्षणकौशल्य, प्रेम, आपुलकी, तळमळ, चिकाटी अशा आपल्या अंगभूत दुर्मिळ सद्गुणांनी टिकवून त्याला एका जिव्हाळ्याच्या कुटुंबाचे स्वरूप दिले होते. शिष्य मोठ्या आपुलकीने आमचे बुवा असे म्हणत असत. असे गोड घरगुती स्वरूप त्यांनी या शिक्षण प्रदान कार्याला दिले होते.

या असंख्य कलाकारांखेरीज सुप्रसिद्ध धन्वंतरी, कायदेपंडित, तंत्रविशारद असा समाजातील सुप्रतिष्ठित वर्ग बुवांच्याकडे शिक्षण घेण्यात धन्यता मानीत असे. त्यात हौस म्हणून किंवा बुवांच्या सहवासाची संधी म्हणून किंवा खरोखरीच संगीत आत्मसात करणारे म्हणून असे विविध प्रकारचे प्रौढ शिष्य होते. त्याशिवाय संगीताच्या जिवंत जाहिराती असलेला बुवांचा मित्र परिवार वगैरे स्थानिक व कोल्हापूर, पुणे आदी अन्य ठिकाणी विखुरेलेले शिष्य व मित्रमंडळी लक्षात घेतली म्हणजे बुवांच्या लोकसंग्रहाचा केवढा भव्य पसारा होता याची कल्पना यावी. या सर्व विस्तृत पसाऱ्याचे केंद्रबिंदू होते, बुवांचे प्रसन्न आणि प्रभावी व्यक्तिमत्त्व. त्यामुळे इतक्या मंडळींच्या संपर्काने समाजामध्ये संगीताचे अभिसरण होऊन संगीत क्षेत्र त्यावेळी चैतन्याने उजळून निघाले होते.

अलीकडच्या शोधानुसार संगीताच्या प्रभावामुळे वनस्पतींची वाढ चांगली होते, गाई, गुरे अधिक दूध देतात. रोग्यांना आराम पडतो, अशा चटकन विश्वास न बसणाऱ्या शोधांच्या पार्श्वभूमीवर थोडा अतिशयोक्तीचा दोष पत्करुनही बुवा व त्यांच्या असंख्यात शिष्यांनी त्याकाळी मुंबईमध्ये जिकडे तिकडे संगीताने भारलेले प्रसन्न मोकळे वातावरण निर्माण करून, जणूकाही संगीताचे एक स्वतंत्र विद्यापीठच स्थापन करून तेथील अशांत, घाईगर्दीचे व धावपळीचे जीवन जगणाऱ्यांच्या समाज स्वास्थ्य संवर्धनाला मनःशांती देऊन बेहोश करणाऱ्या मधुर संगीताच्या साहाय्याने भरीव हातभार लावला असला पाहिजे असे म्हणावेसे वाटते.

❖❖❖

६

# गुरुशिष्य एकरुपता

गुरू या संकल्पनेला भारतीय संस्कृतीत देवादिकांपेक्षा श्रेष्ठ असे सर्वोच्च स्थान आहे. गुरू म्हणजे आतापर्यंतच्या सर्व ज्ञानाची मूर्ती म्हणून गुरुभक्ती म्हणजे ज्ञानभक्ती. ज्ञानाची पूजा, उपासना म्हणजे गुरुभक्तीच होय. ध्येयभूत ज्ञानाशी गुरु शिष्यास एकरूप करून टाकतो आणि असा ज्ञानाशी तन्मय झालेला गुरू शिष्याचीही समाधी लावतो व ज्ञान क्षेत्रात गुरू व शिष्य अशा रितीने एकात्म एकरूप होतात. गुरू व शिष्य म्हणजे ज्ञानदाता व ज्ञानकांक्षी यामध्ये अद्वैत निर्माण होते. ही अमूर्त कल्पना व्यक्तीच्या बाबतीत विचार करताना तितकी सोपी वाटत नाही.

राधाकृष्ण ही अद्वैत भक्तीची आदर्श जोडी समजली जाते. जिवाशिवाची तादात्म्यता पूर्णावस्थेत लिंग, जात, वर्णादी कल्पनांच्या अतीत असते. या व्यावहारिक कल्पना त्या अमूर्त पूर्णावस्थेला स्पर्श करू शकत नाहीत. या पार्श्वभूमीवर, विलायत हुसेनखाँ व जगन्नाथबुवा या गुरुशिष्यांमधील भक्ती राधाकृष्णाप्रमाणे होती. याचा अर्थ इतकाच की दोन व्यक्ती भावना, विचार, आचार व उच्चार याबाबतीत तंतोतंत एकरूप पावल्या होत्या. इतके त्या दोघांमध्ये पूर्ण सामरस्य निर्माण झाले होते. ही अवस्था अपवादभूत असते. म्हणूनच खाँसाहेब व बुवा यांच्यामधील भक्ती किंवा प्रेम हे सांगितीक इतिहासात एखाद्या मधुर खंडकाव्याचा विषय ठरावे, इतके उदात्त व लोकविलक्षण आहे.

विलायत हुसेनखाँच्या शिष्यप्रेमाला आणि बुवांच्या गुरुनिष्ठेला तोड सापडणे फार कठीण. प्रकृती आणि पुरुष, हृदय आणि बुद्धी, विकार आणि विचार, सौंदर्य आणि सामर्थ्य, कला व शास्त्र या मानवी जीवनातील पूर्णत्वाच्या जोड्या म्हणजे राधाकृष्णाच्याच जोड्या. आदीकालापासून या सनातन द्वैतातून अद्वैत हे पूर्ण सत्य किंवा वास्तव निर्माण होत आहे. राधाकृष्ण प्रेम यावर सर्व सामान्य माणूस व्यावहारिक दृष्टिकोनातून प्रेयसी किंवा प्रियकर असा अर्थ काढणे स्वाभाविक आहे. पण तो संबंध इतका साधा–सोपा नाही. म्हणून खाँसाहेब व बुवा यांच्या संबंधाला प्रियकर व प्रेयसी अशी बोळवण करणे तसे थोडे उथळ व

विसंगत वाटते. अध्यात्माच्या खोलात न शिरता पूर्वी म्हटल्या प्रमाणे ते दोघे सर्व दृष्टिंनी एकात्म पावले होते. जणू त्या दोघांच्या शरीरात एकच मन होते. एवढे आपण गृहीत धरले, तर कोणती अडचण उरत नाही.

१९३० साली बेळगाव मुक्कामी पं. जगन्नाथबुवांनी उ. विलायत हुसेन खाँसाहेबांचा गंडा बांधल्यापासून खाँसाहेबांचे १९६२ साली निधन होईपर्यंत हा गुरुशिष्यामधील प्रेमाचा संबंध शुक्लेंदुवत वाढतच गेला. खाँसाहेब शिकवण्या करण्यासाठी भ्रमंती करीत व पोटा पाण्याच्या प्रश्नामुळे बुवांनाही त्यांचे पाठोपाठ ते असतील तिथे जाणे अशक्य होई. म्हणून प्रारंभीच्या काळात अखंड सहवास फार थोडा लाभे. तरी बुवा अधूनमधून खाँसाहेब जिथे असतील तिथे जात व एरवी सहवासाची तहान पत्रव्यवहाराच्या ताकावर भागवून घेत. विलायत हुसेन खाँकडून बुवांना हरतऱ्हेने मार्गदर्शन मिळे. त्यामुळे बुवा त्यांच्या भेटीसाठी उत्सुक असत. सहवासाच्या अभावी विरहाची भावना दाटून येई व काव्य स्फुरे. या काव्यरूपी बंदिशींचे बुवांचे नेहमीचे विषय – शृंगार, त्यातून निर्माण होणारा विरह, भक्ती, करुणा असे असत. बऱ्याचशा चिजांत ते खाँसाहेबांशी बोलताहेत, कधी आनंदाने, कधी रागाने, कधी हसत खेळत, कधी रुसूनफुगून, लहान मुली भातुकलीचा खेळ खेळताना त्यांचा कल्पना विलास मोठ्या मौजेचा असतो. सहवासाची ओढ लागलेल्या बुवांचा जवळपास तसाच कल्पनांचा खेळ चाले. अतिप्रेमापोटी खाँसाहेबांच्या प्रकृती विषयी तीव्र चिंता वाटे. आग्र्याला खाँसाहेब आजारी आहेत असे कळल्यानंतर विचारायला नको, इतके बुवा अस्वस्थ झाले. व अतिशय काळजीपोटी ते देवाची भक्तीभावाने स्वररूप प्रार्थना करतात –

(राग अहिरभैरव, ताल वि. एकताल)

**तेरो जिया सुख पावे । निसदिन मेरे गुनवंता ।।धृ।।**

**बिनती प्रभूसे दासगुनीकी । जुग जुग जियो मेरे प्रान ।।धृ।।**

दुसऱ्या क्षणी खाँसाहेबांना आता बरे वाटू लागले आहे, अशी बुवा स्वतःच कल्पना व खाँसाहेबांना प्रार्थना करत, की आता तुम्ही बरे झाला आहात, तर लवकर दर्शन द्या –

(राग अहिर भैरव, ताल द्रुत एकताल)

**बेग बेग आओ मंदिर बहुत दिनन बीते। सूझत कछु नाहीं मोहे ।**

**निसदिन अब घडी पल । गुनीदास को दरस दीजे अब प्रानप्रिया ।।**

अशा बंदिशीरूपी पुष्पांचा बुवा खाँसाहेबांच्यावर वर्षाव करीत आणि त्यातून मेरे प्राण, गुन सागर, गुनसमुद्र अशा विशेषणांची त्यांच्यावर उधळण करीत. खाँसाहेब जात्या भिडस्त व सात्त्विक वृत्तीचे असल्यामुळे त्यांना या अतिशयोक्त वर्णनाने अवघडल्या सारखे होई. म्हणून त्याबद्दल बुवांच्याकडे नापसंती व्यक्त करीत. पण बुवांच्या उत्कट भक्तीपुढे त्यांना हार खावी लागे. खाँसाहेबांनाही बुवांबद्दल मनस्वी आपुलकी, जिव्हाळा वाटे. म्हणून मग तेही बुवांच्यावर बंदिशी बांधून प्रतिसाद देत. बुवांनी गुलाम महंमद तलवंडीवाले यांच्याकडून मिळवलेले धृपद खाँसाहेबांना खूप आवडले होते. त्याच चालीवर खाँसाहेबांनी बुवांच्यावर बंदिश बांधली ती अशी –

(राग पटदीपक, ताल – एकताल (मध्य लय)

**सांच गुरुन की सेवा । करत वोही पावे समाधान ।।**

**प्रेमभक्त प्रान कहत । सुन हो गुनीदास ।**

**या दोऊ जग में प्रभू । तो हे देत बडो नाम ।।**

गुरुशिष्यात अशी एकमेकांवर बंदिशी बांधून उधळण करण्याची जुगलबंदी चाले. विलायत हुसेनखाँ हयात असेपर्यंत जगन्नाथबुवांनी विविध विषयांवर ६० बंदिशी बांधल्या होत्या व त्या सर्व खाँसाहेबांना दाखवल्या होत्या. खाँसाहेबांकडे सुमारे २५ ते ३० वर्षे बुवांचे शिक्षण झाले व ते अत्यंत फलप्रद ठरले. खाँसाहेबांबद्दल बुवांना इतका पराकोटीचा आदर वाटे की एखाद वेळेस ते जर बुवांकडे आले, तर बुवांना पंढरीचा विठोबा आल्यासारखा आनंद होई आणि त्यांची खाँसाहेबांना संतुष्ट करण्यासाठी जीवापाड धडपड चाले. त्यांची सरबराई करण्यात ते रात्र न् दिवस निमग्न असत. दुसरे त्यांना काही सुचत नसे. माणिकताई सांगतात, की गुरुसाठी मांसाहार देखील बनवायला सांगत. स्वतः उपाशी राहात, पण गुरुंचं मन राखण्यासाठी मनापासून या गोष्टी करायला लावत. त्यांना गुरुंना कुठे ठेवू आणि कुठे नको असे होऊन जाई.

एकदा खाँसाहेब असेच आजारी असता, त्यांना आराम पडो अशी प्रार्थना करणारी चीज रेडिओवर गायले आणि खाँसाहेबांनी ते गाणे ऐकले. पुढे बुवा त्यांना भेटायला गेले, आजारपणात उठूही न शकणारे खाँसाहेब एकदम उठून उभे राहिले. कडकडून एकमेकांना मिठी मारली. दोघांचेही डोळे भरून आले. आणि कुणाच्याही तोंडावाटे शब्द फुटेना. शेवटी खाँसाहेबांनी न राहवून 'बुवा तुम्ही जे माझ्यासाठी केले ते कुणीही, माझ्या मुलांनीही केले नाही,' असे म्हणून त्यांनी

पुन्हा अश्रूंना वाट करून दिली. पुढे खाँसाहेब वारले, तेव्हा बुवा एखाद्या लहान मुलाप्रमाणे ओक्साबोक्शी रडले. खाँसाहेबांचा संबंध जसा बुवांना फलदायी ठरला तसा तो संगीत क्षेत्रालाही उपकारक ठरला. कारण त्यामुळेच बुवा रचनाकार झाले व १०१ बंदिशींच्या नजराण्याने गायन विश्वाला अधिक श्रीमंत केले. खाँसाहेब व बुवा या दिव्य गुरुशिष्यांमुळे संगीत क्षेत्राला भरीव योगदान लाभले, ते फक्त बंदिशींमुळेच नाही, तर गुरू व शिष्य या दोन संकल्पनांचे उच्चादर्श उगवत्या पिढी पुढे ठेवले. सेवा, भक्ती, पावित्र्य, प्रेम, निष्ठा अशा सात्त्विक सद्गुणांवर बरोबर एकमेकांशी वागण्यातील आदब, गोडवा, सौजन्य, सहानुभूती यांच्या वाढीस लागणारे संस्कार समाज जीवनात रुजविले.

❖❖❖

७

# आदर्श महागुरु

विलायत हुसेन खाँसाहेबांचे विशेष म्हणजे कुठलाही राग तासभर गायलाच पाहिजे असा त्यांचा हट्ट नसे. रागाच्या प्रकृतीप्रमाणे त्याचा विस्तार करीत व आपल्या ताकदीप्रमाणे जेवढा होईल तेवढ्यातच तो गायचा. फैय्याज खाँची तान म्हणजे कुरुक्षेत्रावरील युद्धाचा भास व्हावा, पण म. विलायत हुसेन खाँनी तानेला दुसरी शैली आणली. त्यात तानेचे सट्टे कमी, लहान लहान सुरावटींची सुंदर गुंफण लयीभोवती गुंफलेली असे. त्यामुळे धुमश्चक्री नसली, तरी डौल होता. तो त्यांच्या शिष्यांत रुजलेला दिसतो. विलंबितापेक्षा द्रुत लयीने लयकारीबरोबर सरगम चा प्रयोग म. विलायत हुसेन खाँ करीत. पुनरावृत्ती होऊ न देणे – कमळाचे फूल सुंदर आहे म्हणून त्याचा हार किंवा गजरा करीत नाहीत. ते कुठे वापरायचे ते कळलं पाहिजे. तद्वत राग पुष्कळ आहेत पण कठले कुठे व किती गायचे हा विचार त्यांच्या गायकीत दिसतो. प्रचलित पन्नास, शंभर राग, त्या प्रत्येक रागात ध्रुपद, धमार, झंपा, तेवरा, सवारी हे सर्व प्रकार येत असत. खाँसाहेब म्हणत, 'लय एक हवा है, किसी को घमंड नहीं करना चाहिए कि यह मेरे काबूमें है' अवघड तालही ते सहज गात असत, याचे कारण प्रथम दहा–बारा वर्षे आजोबांकडे गुलाम अब्बास (आईचे वडील) ध्रुपद धमाराचे शिक्षण घेतले. वयाच्या पाचव्या वर्षी वडील गेले. दिल्ली आकाशवाणीवर काम करत असताना ॲटॅक आला व ते गेले.

खाँसाहेबांचे शिष्य म्हणून बुवांनी आपली भूमिका जितक्या उत्कृष्टपणे पार पाडली, त्यापेक्षा कांकणभर सरसच पुढे गुरू म्हणून आपली भूमिका वठविली. विलायत हुसेन खाँच्या निधनानंतर संगीत क्षेत्रात एक प्रचंड पोकळी निर्माण झाली. ती अंशतः का होईना, भरून काढण्याची जबाबदारी सर्व दृष्टिने खाँसाहेबांचे शिष्योत्तम शोभतील अशा जगन्नाथबुवांच्यावर येऊन पडणे स्वाभाविक होते. विलायत हुसेन खाँच्या तोलामोलाच्या उस्तादांची गादी चालविणे तसे अतिशय बिकट कर्म, खाँसाहेबांची तपश्चर्या दांडगी, कोठीवाल्यांचे

कोठीवाले शोभावेत, असे बंदिशांचे जडजवाहिर जवळ बाळगणारे दर्जेदार रचनांकार, अद्वितीय दाता इत्यादी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे चमकदार पैलू लक्षात घेतल्यास त्यांची जागा भरून काढण्याच्या कार्याची महान कठिणता सहज लक्षात येईल.

म. विलायत हुसेन खाँसाहेबांच्या हयातीतच बुवा दुहेरी भूमिका बजावत होते. खाँसाहेबांचे शिष्य म्हणून व वाढत्या शिष्यवृंदाचे गुरू म्हणून. त्यामुळे खाँसाहेबांचे निधनसमयी त्यांची जागा घेण्याची तशी थोडी तयारी बुवांची झालेली होती. साहाजिकच पहिला थोडा काळ वगळता बुवांनी हळूहळू स्वतःची एक स्वतंत्र प्रतिमा तयार करण्यात खूपच यश मिळवले.

खाँसाहेबांच्या निधनानंतर बुवांनी पूर्वीपासून गुरुशिष्यसंबंधात जी एक घरगुती जिव्हाळ्याची भर घातली होती, त्यात अधिक मोकळेपणा येवू लागला.

विचारस्वातंत्र्याचे नवे वारे वाहू लागले. गुरुशिष्यांमध्ये विचारांची देवाणघेवाण अधिक मुक्तपणे होऊ लागली. वादविवाद होत, पण अखेर पूर्ववत सर्व शांतपणे शिक्षण मार्गी लागे. जे विविध प्रयोग बुवा करत त्याबाबत वाद होई. वाद होण्याची कारणे दोन. एक म्हणजे बुवांचे कित्येक शिष्य तैयार गवय्ये होते. त्यांच्याजवळ स्वतंत्र धारणा होती व दुसरे कारण म्हणजे सौंदर्यशास्त्रामध्ये अभिनव कल्पना मांडल्यास ती सुंदर आहे, हे मांडणाऱ्याला सिद्ध करण्यासाठी उपायांचा व उपकरणांचा सर्वस्वी अभाव. पण इतके असूनही बुवा वादात भाग घेत, बाजू मांडत. पण त्या लोकोत्तम पुरुषाचे वैशिष्ट्य असे की, शिस्तीचा बडगा उगारून आपल्या शिष्यांचे विचारस्वातंत्र्य दडपून टाकण्याचा विचार त्यांच्या मोठ्या मनाला कधीही शिवला नाही.

बुवांच्या व्यक्तिमत्त्वाचे बंदे नाणे खणखणीत होते. सर्व व्यवहार, विचार आचार पूर्ण प्रामाणिक, मोकळे, स्वार्थशून्य, तळमळीचे, स्वच्छ व संपूर्णपणे शिष्यांच्या कल्याणाचे असत. त्यामुळे शिष्याच्या मनात त्यांच्याबद्दल अनादर उत्पन्न होणे लांबच, पण त्यांची ती शिष्यांसाठी मनापासूनची धडपड पाहून शिष्यांचा आदर दुणावे. हे जे काही मनोहर व मंगल स्वरूप गुरु–शिष्य संबंधाला बुवांनी दिले ती बुवांची स्वतःची अशी खासियत होती.

बुवा शिष्यांसाठी अपार कष्ट घेत. त्यांना उदाहरणे शिकविताना वेळ, मेहनत, प्रकृती कशाचेही भान राहात नसे. हवी ती गोष्ट शिष्याच्या गळी उतरविल्याशिवाय ते थांबत नसत. शिष्याच्या घरगुती अडचणीही सोडवीत. त्यांना

हरतऱ्हेने, प्रसंगी पदरमोड करून साहाय्य करीत. त्यांच्या घरच्या लग्नकार्यात संस्थानी आहेर करून व घरचेच कार्य असल्याप्रमाणे वावरत. जी. एन. जोशींसारख्या शिष्यांना कार्यबाहुल्यामुळे नियमित शिकणे न झाल्यास त्यांना फुरसद असेल त्यावेळी सक्तीने हाताला धरून बसवून शिक्षण देत. संगीत हा बुवांचा जीवनातील ध्यास होता, पण शिष्यकल्याण हे एकमेव ध्येय होते. तन–मन–धनाने ते शिष्यांसाठी अक्षरशः झिजत. त्यांना प्रेमाने मार्गदर्शन करीत. त्या सर्वांमध्ये त्यांनी एक जिव्हाळ्याचे, आपुलकीचे, घरगुती, कौटुंबिक वातावरण प्रयत्नपूर्वक तयार केले होते व ते स्वतः त्या विशाल कुटुंबाचे प्रमुख होते. योगिनी जोगळेकर त्यांच्याबद्दल म्हणतात –

**भोगी म्हणू तर नाही याला दारा ना घरदार**
**जोगी म्हणू तर थाटियलेला सुरांचाच संसार ॥**

मग अशा या पितृतुल्य, प्रेमळ, कष्टाळू, शिष्यांच्या हितासाठी अहिर्निश निस्वार्थपणे झटणाऱ्या, नव्हे, झिजणाऱ्या गुरुबद्दल कोणत्या शिष्याला प्रेम, आपुलकी, जिव्हाळा व अत्यादर वाटणार नाही ? बुवा म्हणजे त्या शिष्यांचे परमदैवत होते. म्हणूनच गुरुशिष्यामधील अशा उत्कट संबंधातून बुवांसारख्या सृजनशील उस्तादाकडून काव्यनिर्मिती न झाल्यास जसे नवल ठरावे तसे बुवांवर अतीव निष्ठा व प्रेम असलेल्या त्यांच्या तयार व कर्तबगार शिष्यांकडून बुवांचे बाबतीत अनुकरण न झाल्यासही नवलच ठरावे. म्हणूनच म. विलायत हुसेन खाँ व बुवा हे गुरुशिष्य जसे एकमेकांवर स्तुतीपर बंदिशींचा वर्षाव करीत, तीच सृजनात्मक परंपरा पुढच्या पिढीतील बुवा व त्यांचे शिष्य यांच्यामध्येही अनुकरणाने चालू राहिली.

व्यवहारात सी. आर. व्यास हे नाव आहे, पण बंदिशीत जगन्नाथबुवांनी सांगितल्यामुळे गुनीजान हे नाव धारण केलेला त्यांचा शिष्य म्हणतो,

(राग मालव, ताल द्रुत एकताल)

**तूही रंगीला मेरा । करत जो हूँ रंग ।**
**गुनीदास तुमही सो पाया ॥ गान में रसप्राण को तुमही अपनाया ।**
**सो दिया जानगुनी को बरनीन जाय । अनमोल तिहारी माया ॥**

आता बुवांच्या प्रिय शिष्याला म्हणजे गुनीजानला त्यांनी केलेला आशीर्वादरूप खालील विजेत उपदेश पाहा. त्यामध्ये बुवा किती निर्मत्सर, निरागस वृत्तीचे होते, त्याचे प्रतिबिंब पडले आहे. परगायकाबद्दल असा आदरभाव फार विरळा

(राग जोग, ताल रूपक)

**मोरा लाडला । नाहि गुनन मो में । काहे करत मोसे नेहा ।।धृ।।**

**कहत 'गुनीदास' सुन हो 'गुनीजान' ।**

**जाओ जहाँ विद्याधन पायो पुत्र समान।**

**तेरो साचो गुरु 'राजाराम' ।।धृ।।**

**भावार्थ :** माझ्या प्रिय शिष्या, माझ्यामध्ये काही गुण नसताना तू माझ्यावर इतके प्रेम का करतोस ? मी गुनीदास तुला, गुनीजानला सांगतो की ज्याच्याजवळ तुला विद्याधन इतकी वर्षे मिळाले, तेच राजाराम (म्हणजे राजारामबुवा पराडकर, त्यांच्याजवळ व्यास आधी बरीच वर्षे शिकले होते) तुझे ते खरे गुरू आहेत.

पं. जगन्नाथबुवांच्या रूपाने एक अत्यंत निर्मळ मन, प्रेमळ स्वभाव व पितृतुल्य हृदय सर्व शिष्यांना लाभले, ही महत् भाग्याची गोष्ट समजली पाहिजे.

बुवांच्या मानसकन्येचे लग्न झाल्यावर बुवांचा निरोप घेताना तिला गलबलून आले. तेव्हा बुवांच्या हळव्या मनानी तिला पुढे दिलेल्या आशीर्वाद दिले. पितृतुल्य आशीर्वाद दिले.

(राग जौन भैरव)

**हो लाडिली री मोरी करोना दुःखवा।**

**जुग जुग जिये तू निसदिन पावे सुखवा ।।**

**तेरो गुनीदास करत बिनती प्रभुसे आज ।**

**तेरे घरमें आनंद होवे अब मंगलवा ।।**

बुवांकडे तरुण गायक वर्ग आकृष्ट का झाला ? याचे उत्तर सी. आर. व्यासांनी काव्यात दिले आहे. ललत रागातील चिजेत ते म्हणतात.

राग लालात तीनलाल (मध्य लय)

**सुरनमें रस तुम हो तालनमें लय ।**

**गुनीदास गीतनका भाव तुम हो**

**जानगुनी तनमें मन तुम, प्रकट किये सो विचार तुम ।**

**बरनी न जाय मोसे गुन तुम्हारो ।।**

सी. आर. व्यासांनी सर्व शिष्यांचेच हृद्गत येथे सांगितले आहे असे वाटते. लयीचा झोल साधणं आणि मैफलीत रंग भरणं बुवांनीच शिष्यांच्यात उतरवले.

बुवांना आपल्या शिष्यांचा निरातिशय अभिमान असे. राम मराठे यांची लयकारी असो, किंवा अभिषेकींचा रागविस्तार असो, सुरेश तथा भाई गायतोंडेंचा तबला असो किंवा सी. आर. व्यासांच्या चिजा असोत, त्यांची मुक्तकंठाने स्तुती करताना ते आतून फुलून येत. या प्रत्येकाचा स्वतःचा असा सुगंध आहे, त्याचा ते मनमुराद आस्वाद घेत. आनंद लुटत.

हैद्राबाद येथे सुरू झालेल्या गुरुशिष्यसंबंधावर बुवांनी सुवर्णकळस चढविला. बुवा स्वतःकडची सर्व विद्या तर देतच, पण दुसऱ्याकडच्या चांगल्या गोष्टी शिकून शिष्यांना शिकवित. पुण्यात आलेल्या एका सरदारजींकडे तबल्याचे काही खास बोल तुकडे आहेत, असे समजल्यावर खूप खटपट करून लगेच त्या सरदारजींकडून ते बोल शिकून घेतले. बुवा आता त्याचे काय करणार ? असे विचारताच बुवांनी दिलेले उत्तर हृदय हेलावून टाकणारे आहे. 'माझ्या भाईला कित्येक वर्षात काही दिले नाही. माझ्याजवळ होते, ते सर्व दिले आता या सरदारजीकडून घेतलेले भाईला केव्हा देईन असे झाले आहे.' भाई म्हणजेच भाई गायतोंडे.

लीलाताईंना (मानसकन्या व शिष्या) मल्हारचे प्रकार हवे होते. माझ्यापेक्षा यशवंत चांगला शिकवेल, असे बेधडक सांगत. जाता जाता शिष्यांना त्यांच्या सूचना असत. भाईंना तबल्याचा रियाज तबल्यावर टॉवेल टाकून करायला सांगत. लोकांना त्रास नाही आणि हात वजनदार व्हावा. कोल्हापुरात असताना लीलाताईंना सुघराई रागातील चीज खाँसाहेबांनी शिकविली होती.

त्या मुंबईला आलेल्या असताना रामभाऊ मराठेंना बुवा म्हणाले, 'खाँसाहेबांनी लीलाला चीज दिलीय, तिच्याकडूनच शीक.' याचा अर्थ बुवा शिकवू शकले नसते, असे नाही. पण मनाचा मोठेपणा आत्यंतिक होता.

भाईंचा तबला ऐकून बरेच लोक शिकायला आले. पण कुणालाही शिकवले नाही. अरविंद मुळगावकरांना बुवा म्हणाले, 'भाईंनी जी ज़ानमारी केली, ती तुमच्या हातून होणार नाही.' भाईंच्या पत्नी उषाताईंना बुवा नेहमी सांगत, 'रियाज करताना आणि कार्यक्रमांना जाताना आपलं वाद्य बरोबर नेतोय ना, एवढं लक्ष ठेव.'

ब्राह्मण साहाय्यक संघात झालेल्या गुरुपौर्णिमेला शरद साठेंना गायचे होते. पहाटे साडेतीनपर्यंत नंबर आला नाही. तेव्हा साठे न सांगताच घरी गेले. तेव्हा बुवा घरी जाऊन त्यांना प्रोग्रॅमला घेऊन आले. असे छोटे छोटे रोचक

किस्से बुवांच्या जीवनात अनेक घडलेले आहेत. बुवांच्या आत्यंतिक गुरुनिष्ठेचे उदाहरण अनुसरून त्यांच्या शिष्यांनीही अत्यंत विनीत भावनेने व नम्रतेने जो गोडवा जीवनात आणला, त्याचा मंद सुगंध दाही दिशांत दरवळून वातावरण प्रसन्न झाल्याशिवाय कसे राहील? संगीताचे अंगचे अंतर्भूत सामर्थ्य व संगीत ज्यांच्याजवळ आहे ते गुरू व त्यांचे असंख्य शिष्य यांनी आपल्या सात्त्विक आणि सोज्वळ वर्तनाने आदर्श निर्माण केले. त्यांचा हळवा, हळूवार असर सर्व समाजात पसरला. आणि एक निरामय वातावरण निर्माण झाले. बुवांचे व्यक्तिमत्त्व या सगळ्यांचा मूलाधार होता.

☐ **आग्रा गायकी** : या घराण्याचा प्रारंभ तानसेनचे जावई हाजी सुजान खाँ यांच्यापासून झाला असे मानण्यात येते. पुढे त्यात खुदाबक्ष झाले व त्यांनी ग्वाल्हेर घराण्याचे नत्थन पीरबक्ष यांचेकडून ख्याल गायकीचे शिक्षण घेतले होते. या घराण्यातच पुढे फैयाज खाँ विलायत हुसेन खाँ, शराफत हुसेन खाँ, खादीम हुसेन खाँ, लताफत खाँ अशी बडी बडी नावे येतात. या घराण्याची गायकी सुस्पष्ट निश्चित असते. थोड्या सुरावटीत रागाचे स्वरूप उभारले व शिकविले जाते. बंदिशीही ठोस असतात त्यातील प्रत्येक अक्षरांच्या जागा तालाच्या मात्रांवर ठरलेल्या असतात. संगीताचा आधारस्वर 'सा' (षडज) अतिशय भरदारपणे लावला जातो. त्यामुळे भावोत्कटतेस मदत होते. आवाज कमावलेला असतो. रागविस्तार आकाराने न करता आलापात बोल घेऊन होतो व अनेक अंगांनी हे बोल फिरवल्यामुळे लयकारी करीत असताना ही गायकी उठून दिसते. प्रथम एकदा पकडलेले वजन 'सम' गाठेपर्यंत कायम राहते. स्थाईच्या अंगाने गात असताना बंदिशीच्या सुरावटीशी सुसंगतच त्याचा बोलविस्तार हा अलिखित नियम, लयतालावर प्रभुत्व असते, त्यामुळे तालाशी खेळत चाललेली लयकारी ऐकण्यासाठी आग्रेवाल्यांचे जलसे होत. तानक्रियेत सरळ व अवरोही तानांवर (ग्वाल्हेर गायकीप्रमाणे) विशेष भर याशिवाय आलापीमध्ये नोम तोम प्रयोग, ध्रुपद धमारमधील प्राविण्य, कधी कधी तिहाई, तानेत गळ्याबरोबर जबड्याचा उपयोग, मध्यालयीत विशेष करुन गाण्याची प्रथा, गाणे सजविण्याकडे कल व ठुमरीबद्दल विशेष आवड नसणे ही सर्व आग्रा घराण्याची सर्वसाधारण वैशिष्ट्ये. फैय्याज खाँ आपल्या चतुरस्त्र गायकीत ठुमरी दादरा गात असत, पण ताना ख्यालाच्या वाटत. ते स्वतःला 'रंगीले' घराण्याचे समजत.

एकूण ध्रुपदांनी संस्कारित झालेले ख्याल गायन, म्हणजे आग्रा घराणे राग की तबियत पहचानो, हा त्या गायकीचा कानमंत्र असतो. 'बंदिशको निहारो, राग तुम्हारे सामने आ जाएगा' ही शिकवण. गायकीची अठराही अंगे खास शिष्यालाच शिकवली जात. (मींड, मुर्की, गमक, लहक, धुनक, डगर...) त्यामुळे वेगवेगळे राग मांडताना तोच–तोचपणा टाळण्यासाठी हलक्या फुलक्या प्रकारचा आश्रय घ्यावा लागत नाही. स्थाई हेच सर्वस्व, बोजदारपणाला (भारदस्त) ही गायकी जपते. स्वरांची आर्तता म्हणजेच लागडाँट, फैय्याजखांनी या पैलूचा वापर केला. खर्ज साधनेला महत्त्व. मंद्रातून स्वरांची खेच घेतलेली असते. हे पूर्वी फैय्याज खाँ व अलीकडे लताफत हुसेन खाँच्यात दिसते. धृपदाचे वळण या गायकीत असल्यामुळे धृपदात ती खेच असतेच. आवाजातला गाज घुमल्यामुळे ही गायकी मंद्र मध्यात प्रभावी ठरते. थेट ठेका, ठेक्याची लय अविष्कारात प्रतिबिंबित करण्याकडे कटाक्ष असतो. त्यामुळे ठेका धरून वाजविण्याची जरुरी नसते. यालाच थेट ठेका म्हणतात. सवय नसेल तर वाजविणे कठीण जाते. एकूण तालाची आकृतिमयता स्पष्ट ठेवली जाते. ज्या वजनात बोलाची उपज त्याच वजनाला चिजेचा मुखडा येईपर्यंत कायम ठेवले जाते आणि त्याच वजनात चिजेचा मुखडा घेऊन सम गाठतात आणि यावेळी चिजेचे बोल क्रमाने पुरे करण्याकडे कल असतो. *आम्द* म्हणजे सम कशी घेणार याची कल्पना श्रोत्यांना आधीच येते.

☐ **बुवांची गायकी** : पं. जगन्नाथबुवा सौंदर्याचा शोध घेणारे होते.घराण्याच्या संकुचित भिंतींपलीकडे जाऊन उदार दृष्टिकोनातून प्रत्येक घराण्यात जे जे सुंदर दिसेल त्याचा त्यांनी मोठ्या उत्सुकतेने व आदराने स्वीकार केला. त्यामुळे त्यांची गायकी विविध अंगांनी नटलेली व शृंगारलेली होती. शिवाय त्यांचा स्वभाव भावनाप्रधान व व्यक्तित्व आकर्षक, गंभीर व भारदस्त होते. बुवांची गायकी त्या सर्वांचे प्रतिबिंब होते, असे म्हटल्यास वावगे होणार नाही.

☐ **बुवांची गायकी :** पं. जगन्नाथबुवा हे विलायत हुसेन खाँकडे संगीत शिक्षण घेत असतानाच ते अनेक शिष्योत्तमांना संगीत शिक्षण देतही होते. याचा फायदा म्हणजे रागरागिण्यांच्या शुद्धाशुद्धतेचा अगदी बारकाईने त्यांनी विचार केलेला होता. प्रत्येक अस्ताई अंतऱ्याची खास बंदिश हे त्यांच्या गायकीचे महत्त्वाचे अंग असे. त्याचबरोबर प्रत्येक स्वर मींड, घसीट खेचून लावण्याची त्यांची एक विशिष्ट पद्धत हे त्यांच्या गायकीचे अधिकच प्रभावी अंग असे. गळ्याचा आणि प्रकृतिचा गुणधर्म ओळखून ते स्वतःच्या गायकीतील प्रत्येक करामत करीत असल्याने

परिणाम व रसवत्ता या दोन्हीही दृष्टिनी त्यांची मैफल हमखास रंगत असे व श्रोत्यांवर दीर्घकाळ परिणाम करीत असे. या गुणवत्तेमुळे त्यांच्या गायकीत कलात्मकता व जरुर तो सहजपणा प्रतीत होत असे. तिरखवाँकडून तबला घेऊन स्वतः तयार तबलजीच नव्हे, तर उत्तम उस्ताद बनल्यामुळे ते तालाचे अतिशय सच्चे व पक्के होते, हे सांगायलाच नको. पण असे असूनसुद्धा सर्वच गायकीत तालाचा व लयीचा वापर गणित म्हणून न करता गायकीच्या सौंदर्यवर्धनासाठी ते करीत असत. त्यामुळे त्यांच्या गाण्यात रग आणि रंग दोन्हीही होते. त्यांचे आणखी एक लोकप्रिय वैशिष्ट्य म्हणजे चिजेचे तोंड घेऊन समेवर येण्यापूर्वी अनाघात उच्चारणाने तरकिबीने येणे हे बुवांचेच असे खास तंत्र होते. त्यांच्या शैलीचे यथाशक्ती अनुकरण फक्त त्यांच्या शिष्यांकडूनच नव्हे तर इतर मातब्बर गायकांकडूनही होऊ लागले होते. बोल अंगाची विशिष्ट गायकी हे बुवांचे आणखी एक कालात्मक वैशिष्ट्य होते. भावनेत भिजलेल्या शब्दांचे कलात्मक उच्चारण व त्यातील सार्थ भावस्पर्शीत्व यांमुळे त्यांचे बोलअंग हे एक अतिसुंदर अशा काव्याचा साक्षात्कार घडवित असल्याचा भास होत असे. बुवा तानबाजीकडे फारसे वळत नसत. आवाजाच्या गुणधर्म प्रकृतीप्रमाणे त्यांनी आपली गायकी बसविली. हे मागे म्हटलेच आहे. त्यांचा आवाज जड व जाड होता. पण आवश्यक चापल्याच्या अभावी तानबाजीशिवाय ते आपली गायकी अशी काही रंगवित की तानबाजीच्या अभावाचा दोष मुद्दाम सांगितल्याशिवाय लक्षातही येत नसे. त्यांच्या एकूण गायकीचा स्थायीभाव रसोत्कर्ष हाच असे. सौंदर्याच्या आविष्कारातून रस व रंग यांची निष्पत्ती व त्यातून रंजन हे सूत्र त्यांच्या गायकीचा गाभा होय.

गाण्यात मुख्य शास्त्रीयता हवी, मग रंग आला तर त्याला आमची हरकत नाही. हे आमच्याकडील एका गानपंडिताचे बोधवाक्य आहे. असे मारुलकर लिहितात. पण संगीत मुख्यतः कला आहे आणि कलेला प्रथम जरुरी आहे रंगाची, संगीत कला वेळप्रसंगी अडलीच तर शास्त्राचे वर्चस्व झुगारून देऊनही मुख्यतः तिचे रक्षण करण्याचे तत्त्व बुवांसारखे कलासक्त गायकच निश्चितपणे अनुसरतील.

कलेची साधना महत्त्वाची, शास्त्रीय विवेचन नाही. हे जगन्नाथबुवांचे सूत्र होते. प्रसंगी शास्त्रातील रूक्ष अपेक्षांना वळसा घालून सौंदर्याचा वेध घेतला. बुवांनी संगीत शास्त्राचे रक्षण तर जरुर केले आहेच, पण कालात्मक अलंकारांनी ते अधिक सुंदर केले आहे. **आकाशातं पतितं तोयं यथा गच्छति सागरम्** या

न्यायाने संगीतातील कोणत्याही कामगतींच्या स्वरधारा अखेरपक्षी सौंदर्यसागरालाच मिळाल्या पाहिजेत, हा त्रिकालाबाधित सिद्धांत आहे. कलेचा सामान्य हेतू आनंद आहे, तर त्याचा उच्चतम हेतू मोक्षप्राप्ती हा आहे. सौंदर्याचे अभिजात उपासक असलेल्या जगन्नाथबुवांनी या सौंदर्यदृष्टीतून स्वतःच्या भावनाकुल व वैशिष्ट्यपूर्ण अशा आगळ्या गायकीला जन्म दिला. स्वतंत्र विचाराने, वेगळ्या वाटेने आपल्या गायकीला इतके वेगळे वळण दिले, की काहींना बुवांचे घराणे कोणते, असा प्रश्न पडावा.

आग्रा गायकीची वैशिष्ट्ये आणि खाँसाहेबांची गायकी तर मागे दिली आहे. ती बुवांच्या गाण्यात दिसत होतीच. शिवाय बंदिशीची अर्थ लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी 'हो अब, तुम' वगैरे बंदिशीच्या व्यतिरिक्त शब्द लयींच्या सौंदर्यात भर घालण्यासाठी ते मुद्दाम आवर्जून वापरीत. हे वेगळेपण जाणवण्यासारखे होते. चिजेच्या शब्दफेकीत यतिभंग सहसा टाळीत. मांडणी शक्यतो पूर्ण अर्थवाही होण्यासाठी त्यांच्या शब्दसुरांतून बांधलेले लयीचे आडाखे आकर्षक असत. तान फिरणारे बोल तानेकडे जातात पण त्यांनी आपल्या आवाजाला अनुकूल म्हणून बोल आलापाची सुंदर करामत पेश केली. बंदिशीच्या अंगाने राग मांडणी हे त्यांचे महत्त्वाचे तंत्र होते. गायकीत एक ठोसपणा होता. हैद्राबादी झाकही होतीच. बोल अंग ही आग्रा घराण्याची देणगी त्यांनी अतिशय ताकदीने पेश केली. स्वतः तबला उत्तम वाजवीत. त्यामुळे त्यांच्या गायकीला हुकमीपणा दिसत होता. भावुक स्वभावामुळे आकर्षक शब्दफेकीने आपल्या गायकीला रंजक बनवित. ठुमरीतील लयकारीचे अंग बोल आलापीनेच भरत. पंजाबी खटके मुर्क्यांचा असर दिसेलच, शिवाय बनारसी पूरब अंगही जास्त प्रभावी (बेगम अख्तर) ठुमरी दादरा अंग आग्रेवाल्यांपासून वेगळेपण जतन केलेला बुवांचा ठेवा होता. लाइट म्युझिकही उत्तम गात. बोलांच्या उच्चारांमुळे बुवांचे गाणे काळजाला भिडत असे. संगीताची सिद्धता व उद्देश त्यांच्या गायकीतून सफल होत होता.

**गुणग्राहक गुरू स्वयंवर, मानापमान, सौभद्र** यांसारखी संगीत नाटके ते पाहात व त्यातील संगीताचा मनमुराद आस्वाद घेत. या जुन्या नाटकांबरोबर **मंदारमाला, मत्सगंधा, पंडितराज जगन्नाथ** अशा त्या काळातल्या नव्या नाटकांचे त्यांनी प्रयोग पाहिले होते व त्यातील पद्य विभागाचे मनापासून कौतुक केले होते.

जुन्या नाट्यसंगीताची सर नव्या नाटकातील नाट्यसंगीताला नाही, अशा सरसकट विधानावर ते म्हणत असत, पद्याचा प्रसंग, शब्दार्थ, बांधणी, रस, लय या साऱ्या गोष्टी अनुरूप असल्या की रसोत्पत्ती होते. आणि गाणं आठवणीत राहतं. ह्यात नव्या जुन्याचा प्रश्न नाही.

कोल्हापूर येथे असताना शालिनी सिनेटोन, कोल्हापूर सिनेटोन अशा सिनेमा कंपन्यांत काम करण्याचा योग त्यांना आला, त्यावेळी सिनेमा संगीतातले बारकावे टिपण्यास ते विसरले नाहीत. चित्रपटसंगीताने लोकांची अभिरुची बिघडवली, असा ठोकळेबाज आरोप बुवा करीत नसत. त्या क्षेत्रातील संगीत निर्मात्याचं त्यांना कौतुक वाटत असे. रागदारीवर आधारित असलेल्या चित्रपटातील चाली अर्थात त्यांना अधिक आवडत असत. **'धीरे से आ जा रे निंदिया'** हे सी. रामचंद्र यांचे अंगाई गीत, नौशाद यांची **रतन**मधली गाणी, जनम जनम के फेरे मधील भजन आणि **भैरवी** त्यांना फार आवडल्याचं ते सांगत. एखाद्या दुकानात लागलेली ध्वनिमुद्रिका रस्त्यानं जाता जाता त्यांनी ऐकली आणि एखादी जागा विशेष वाटली, तर ते दुकानात जाऊन, चारआणे देऊन ती ध्वनीमुद्रिका पुन्हा मुद्दाम ऐकल्याशिवाय राहणार नाहीत. लता, आशा, मधुबाला जव्हेरी या त्यांच्या आवडत्या गायिका होत्या.

पाश्चात्य देशातील लोकांना भारतीय संगीताची ओळख करून देण्याच्या हेतून १९३९ मध्ये म्हैसूरच्या युवराजांनी इंग्लंड युरोपची यात्रा करण्याचं ठरवलं. त्यांनी गोंविदराव टेंब्यांना बरोबर घ्यायचे ठरवून त्यांनाच अन्य गायक, वादकांची निवड करण्याचे सर्वाधिकार बहाल केले. त्यात पं. जगन्नाथबुवांची निवड झाली. दौऱ्यात रोम येथे वास्तव्य असताना एका संगीतिकेच्या प्रयोगात एका वेळी एक हजार वाद्यांचा ऑर्केस्ट्रा त्यांना ऐकायला मिळाला. ते ऐकून ते स्तिमित तर झालेच, पण त्यांच्या मनात अनेक प्रश्नांचे काहूर उठले. हार्मनीच्या तत्त्वाचा वापर पराकोटीला नेऊन पाश्चात्यांनी संगीतात केवढी भव्यता निर्माण केली आहे या कौशल्याचा वापर भारतीय संगीतात त्याच्या गाभ्याला धक्का न लावता केला पाहिजे, त्यातील पथ्य, अडचणी वगैरे गोष्टींवर बुवांचे चिंतन सुरू झाले. तो विषय तसा अवघडच. कारण मेलडी ही भारतीय शास्त्रीय संगीताचा आत्मा आहे. त्याची सांगड हार्मनीशी घालणे तसे सोपे नव्हे. पण बुवा त्या रोममधील ऑर्केस्ट्राने कमालीचे प्रभावित झाले होते. हार्मनीची शक्ती त्यांनी ओळखली. परंतु त्यामागेदेखील फार मोठे परिश्रम आहेत. केवळ चूष किंवा गंमत

म्हणून करावयाच्या त्या गोष्टी नव्हेत. याची त्यांना जाणीव होती.

काही वर्षापूर्वी संगीतातील नवमतवाद गाजला, तेव्हा कलाकारांत व जाणकारांत दोन तट पडले. नवमतवादी म्हणत, भारतीय संगीत स्वरनिष्ठ आहे व त्यातही आनंद देण्याचे सामर्थ्य आहे, हे खरे. पण शब्द त्याचा अर्थ व त्यातील भावना यांनाही फार महत्त्व आहे. गायक जेव्हा शब्दांचे साहाय्य घेतो, तेव्हा अर्थाच्या व भावनेच्या सौंदर्याचा आनंद त्याने स्वतः घेतला पाहिजे व श्रोत्यांपर्यंत तो पोचविला पाहिजे.

भारतीय संगीतातील मेलडी बरोबरच पाश्चात्य संगीतातील हार्मनीचा कौशल्यपूर्ण उपयोग केल्यास भारतीय संगीत अधिक रंजक होईल. भारतीय संगीत केवळ व्यक्तिनिष्ठ होऊन बसलं आहे. त्यात समूहनिष्ठा यावी यासाठी, व बदलत्या काळाच्या गरजा भागविण्यासाठी भारतीय संगीतकारांनी हार्मनीचा स्वीकार केला पाहिजे. निदान याबाबतीत नवे प्रयोग झाले पाहिजेत.

या नवमतवादाला सनातनी मंडळींनी कडाडून विरोध केला. त्यात गोविंदराव टेंबेसारख्या काही व्यक्ती अशा होत्या की ज्यांच्याविषयी पं. जगन्नाथबुवांच्या मनात पराकोटीचा आदर होता. परंतु या आदरामुळे बुवांनी स्वतःत आंधळेपणा येऊ दिला नाही. सत्याविषयीच्या निष्ठेला सगळ्यात अग्रस्थान द्यावे लागते, हा विवेक त्यांनी सांभाळला. नवमतवाद्यांच्या प्रतिपादनातला ग्राह्य भाग त्यांना पटला आणि त्या मताचा पुरस्कार व्याप्ती आपल्या उक्तीने व कृतीने मोठ्या हिरीरिने केला. शिक्षणाच्या मानाने बुवांनी या विषयाबाबत दाखविलेले प्रतिपादन कौशल्य, आवेशयुक्त भाषा, वादविवाद पटुत्व हे सर्व स्तिमित करणारे व त्यांच्याविषयीचा आदर दुणावणारे होते.

पं. जगन्नाथबुवा व त्यांचे शिष्य यांच्यात नेहमीच निरनिराळ्या विषयांवर वादविवाद होत. पण मुख्यतः संगीत व त्यासंबंधीत विषय असला, म्हणजे बुवा खुलत. जुन्या गवय्यांच्या गोष्टी, त्यांचे पराक्रम बुवांचेकडून ऐकावेत. अलिया फत्तू, गोमाबाई कालेखाँ, मेहेरबान यांच्याविषयीच्या आख्यायिका बुवा अगदी तल्लीन होऊन सांगत असत. असाच एक प्रसंग त्यांच्या एका शिष्याने लिहिला होता. तो शिष्य म्हणतो, 'आम्ही बुवांचे शिष्य व बुवा दोन पिढ्यांचे प्रतिनिधी. पूर्वीची गायकी, गायक व गायनशिक्षण याबाबतीत आमची त्यांची पुष्कळ वेळा चर्चा व वादही होतात. एकदा असेच मी व बुवा जेवून क्लबवर येत होतो. मी एका बाजूला गुरुवर्य व कृष्णराव बावडेकर दुसऱ्या बाजूला, असे जुन्या काळच्या

गायकांवर बराच काळ बोलत बसलो होतो. आज संगीताच्या प्रसाराबरोबरच संगीताचा दर्जाही वाढला आहे. हा माझा पूर्वपक्ष आणि त्याच्यावर बुवा व बावडेकर तुटून पडले होते. रात्री जेवून येताना बुवा हळूच म्हणाले, तुमचं ते इंग्रजी क्वालिटी व क्वान्टिटी असं काहीतरी शब्द आहेत ना ? मी म्हणालो 'हो' तर 'मग हे बघा आज गाण्याची क्वान्टिटी वाढली आहे, परंतु क्वालिटी कमी झाली आहे. तुम्ही गाता, परंतु स्वरांचा व लयीचा सच्चेपणा तुम्हा लोकांत कमी आहे. पण असे असूनही आजच्या तुमच्या पिढीने संगीत क्षेत्रात जे काही केले आहे, तेही काही कमी नाही.'

बुवांची कालच्या व आजच्या पिढीकडे पाहण्याची दृष्टीही सनातनी नव्हती. नवनवीन विचारांकडे बुवा तरुण मनाने पाहात. एकदा रेडिओवर 'आपकी नजरोंने समझा, प्यारके काबील मुझे' हे लताबाईंचं गाणं लागलं होतं. बुवा मला म्हणाले, 'काय तोंड बांधलय पाहिलंत? असं काहीतरी ऐकलं की देहभान विसरून जातो.' बुवा व मी ज्या घरातून हे गाणं ऐकायला येत होतं, त्या घरासमोर कितीतरी वेळ उभे होतो. बुवा मला म्हणाले, 'सगळं जग कसं सूर आणि ताल यांच्या प्रेमानं बांधलेलं आहे. यापैकी एखाद्या गोष्टीनं आपलं स्थान सोडलं तरी विनाश ओढवेल.' अहोरात्र बुवांना संगीत आणि संगीताचाच ध्यास होता.

पं. जगन्नाथबुवा संगीतातील उत्तम जागा ऐकूनच थांबत नसत, तर रेडिओवर लता, आशा यांच्या गळ्यातून गेलेल्या अतिखूबसूरत हरकती किंवा निर्मला अरुणची एखादी दर्दभरी ठुमरी आपल्या जाड्या आवाजातून काढण्याचा कसोशीने प्रयत्न करीत व इतरांनाही तसे करायला सांगत. अशी जिद्द, निष्ठा व एखाद्या कार्याला वाहून घेण्याची ही वृत्ती ही बुवांच्या व्यावहारिक यशाची गुरुकिल्ली समजायला पाहिजे.

भारतीय हलकंफुलकं संगीतच नव्हे, तर पाश्चात्य हार्मनीबद्दल जसे त्यांना कुतूहल वाटे, तसेच पाश्चात्य संगीतातील सुरांबद्दलही ते स्वर केवळ परकीय आहेत, म्हणून बहिष्कार घालावा, असे त्यांना वाटत नसे. पण हा प्रयोग नेहमीच जमतो असे नाही. सुगम संगीतात अशी कलमबाजी करण्यास विशेष वाव आहे, असे त्यांना वाटे. बडे गुलाम अली आणि नजाकत अली यांनी इजिप्तशियन संगीत आपल्या संगीतात आणण्याचा जो प्रयोग केला आहे, तो त्यांना यशस्वी वाटायचा. ते आवर्जून सांगत की खाँसाहेब बडे गुलाम अली यांची 'शिंदडी लूटी' ही मुलतानी काफीतील रेकॉर्ड अवश्य ऐका. नजाकत अलींनी **पहाडी** आणि

भैरवीमध्ये अशीच गंमत केली आहे, तीही ऐका'

जगन्नाथबुवा जितके उदारमतवादी, विशाल दृष्टीचे तितकेच मनस्वी व काटेकोर होते. नाही त्या ठिकाणी त्यांना तडजोड व स्वातंत्र्य मान्य नव्हते. चिजेची अक्षरे त्यांना वेदमंत्राइतकी पवित्र वाटत. प्रतिभाशालित्वाच्या नावाखाली बोकाळलेल्या स्वैराचार किंवा टूमवाद त्यांना मान्य नव्हता. रचना करताना किंवा गाताना भारतीय संगीताची मूलतत्त्वे त्यांनी काटेकोरपणे सांभाळली. 'निरंकुशः गायकः' हे त्यांना मान्य नव्हते. तालात अत्यंत पक्के असलेले बुवा संगीतक्षेत्रातील कोणताही बेतालपणा सहन करणारे नव्हते. भाई म्हणत, 'गाण्यात एकवेळ कॉम्प्रमाईज करतील, पण तबल्यात नो कॉम्प्रमाईज.' तबल्यात ते चूषी होते. बुवा म्हणत, 'बंदिशीच्या अर्थाबरोबर त्यातून राग सांगायचाय. तबल्याच्या बंदिशीतून आम्ही अर्थ काढतो, मग तिथे तर शब्द असतात.' संगीत आणि तबला दोन्हीवर सारखेच प्रेम करून प्रभुत्व मिळवणारे आणि दोन्हींमध्ये उत्तम शिष्य तयार करणारे बुवा एकमेवच म्हटले पाहिजेत.

त्यांना वही आणलेली आवडत नसे. शिकवताना नेहमी म्हणत, वही बाजूला ठेवा. डोकं जाग्यावर पाहिजे. चटकन तुकडा गेला पाहिजे. संतापले म्हणजे वाटेल ते बोलत, पण 'फणसाअंगी काटे अंतरी अमृताचे साठे' तसे बुवांचे होते. व्यवहारी नव्हते पण प्रत्येक गोष्ट जेव्हाची तेव्हा झाली पाहिजे. जास्त प्रश्न आवडत नसत. वेळेबद्दल अत्यंत काटेकोर.

एकदा ते **मारवा** गात असताना पं. मोहन कर्वे त्यांच्याकडे आले व 'तबल्याला बसू का' म्हणाले. बुवा म्हणाले, 'कंटाळणार नाही ना?' बुवांनी आडाचौतालाचे वजन सांगितले आणि त्यांना अपेक्षित असलेले ठेक्याचे बोल असे होते – **आडा चौताल**

**धीं धीं धागे तिरकिट तू ना कत् त्ता धी धी ना धी धी ना**

त्यावेळी अखंड एकालयीत पं. मोहन कर्वेनी दिलेल्या (दोन अडीच तास नुसता मारवा गात असताना) ठेक्यावर बुवा खुश झाले होते. पेशवाई गाणे नको, गाण्यात क्रिएटिव्हीटी पाहिजे, सर्वांगसुंदर गाणं असावं, असे ते म्हणत.

त्यांनी विद्यार्थ्यांना डोळस केलं. रियाजाने पहिल्यांदा स्वर कमी येईल, पण नंतर पट्टी वाढते. नवीन शिष्यांच्या शिकवणीला मुद्दाम जाणकारांना बोलावीत. मैफलीत गायला लावत. कवी काय सांगतो ? अस्ताईत एक सांगतो, मग अंतरा काय? याची उत्सुकता लागली पाहिजे. गाण्यात विविधता हवी. अनवट राग दहा

मिनिटेच गावा. त्यांच्या शब्दात ते म्हणत, 'उगाच ओकाऱ्या काढत बसू नये.'

वरच्या स्वरावर सम असलेली चीज निवडावी. प्रत्येक गवई आपल्या मगदुराप्रमाणे गातो, त्याला नावे ठेवू नका, असे ते म्हणत. मोठ मोठ्या गवयांना आणून शिष्यांना त्यांच्या ओळखी करून देऊन त्यांचे गाणे ते ऐकवित.

गाण्यातल्या बेसूर, बेतालपणा पाहिला की ते कमालीचे अस्वस्थ होत. पु. ल. देशपांडे म्हणतात, 'एका मैफलीत आम्ही श्रोते म्हणून बसलो होतो. एक गायिका **शामकल्याण** गात होती. रागाचे स्वरूप ठायी ठायी बिघडत होते. **शामकल्याण** म्हणजे केवळ गंधार लावलेला शुद्ध सारंग नव्हे, हे त्या गायिकेला ठाऊक नव्हते. बुवा बसल्या जागी अस्वस्थ होत होते. त्यांना आवरावे लागले. मी त्यांना म्हटले, 'बुवा त्या बाईंचा काय दोष ? तिला तालीम नसेल मिळाली ?'

'अरे मग गाते कशाला शामकल्याण ?' इति बुवा. बुवांना रागाची ती मोडतोड अमंगळ वाटत होती. एखाद्या गोष्टीची निष्ठेने जोपासना करणाऱ्यांनाच ही अस्वस्थता कळू शकेल.

❖❖❖

८

# काही प्रवाद काही आठवणी

हैद्राबाद येथील संगीतमय वातावरणाने भारून बुवांनी शाळा सोडून संगीत हाच आपला जीवनाचा ध्यास व ध्येय ठरविले. ऐकून ऐकून थोडे गायलाही लागले. पुढे महंमद अली खाँ, शब्बू खाँ गुलाम महंमद तलवंडीवाले, आशकअली विलायत हुसेन खाँ वगैरे उस्तादांकडे २५ ते ३० वर्षे कोल्हापूर मुंबई वगैरे ठिकाणी प्रत्यक्ष तालीम घतेली. पण बुवांनी तेवढाच एक उद्योग केला असता, तर प्रवाद त्यांच्याबद्दल निर्माण झालाही नसता.

पण कोल्हापूरला बुवा आले आणि अनेक उद्योगात मग्न झाले. कोल्हापूरचे मो. श. हुजुरबाजार म्हणत, 'कोल्हापूरला जगन्नाथबुवा हा छत्तीशितील तरुण फार तडफेचा व धडपड्या इतपतच प्रख्यात. आमचे विष्णु दिगंबर पंथीय पाध्येबुवा त्यांना तबलजी म्हणून कधीकधी साथीला बोलावीत.'

अशी कोणाची तरी साथ कर, गोविंदराव टेंब्यांच्याबद्दल मनस्वी आदर असल्यामुळे ते सांगतील ती कामे कर, देवलक्लबमध्ये कार्यक्रम ठरवून तो पार पाड त्यासाठी आलेल्या पाहुण्या गवयांची सेवा, सरबराई कर, मैफलीसाठी लागणारे तबला, तंबोरा वगैरे साहित्य स्वतः वाहून ने, शालिनी, कोल्हापूर सिनेटोन वगैरेमध्ये ऑर्केस्ट्राची जुळवाजुळव करून त्यांची रोज तालीम घे, येतील-जातील त्या जिज्ञासूंना बंदिशी सांगून खूश कर, कोल्हापूरात अल्लादिया खाँसारख्या जयपूरवाल्यांच्या जबरदस्त गायकीचा प्रभाव असतानाही स्वतःच्या गायकीचा प्रभाव पाडून आपली स्वतःच्या शिष्यशिष्यीणींची पठडी तयार कर. गायतोंडे बंधू, कलंदरसारख्यांना तबला शिकव, असे एक ना दोन हजार उद्योग ते करीत.

बुवांना माणसांचा भारी लोभ व त्यांना संतुष्ट करायची विलक्षण आंतरिक तळमळ तेव्हा आपण गोष्टी शिकवायच्या, त्यांचा संग्रह करायचा, तो कशासाठी तर त्या विषयात प्रगती करावी, मोठे व्हावे म्हणून नव्हे, तर ते ज्ञान दुसऱ्यांना देऊन त्यांना खूष करण्यासाठी. दुसऱ्यांच्या चेहऱ्यावरच्या समाधानासारखे पारितोषिक नाही, अशी त्यांची भावना असे. ही व्यक्ती जणू दुसऱ्यासाठीच

जन्माला आली होती. मी पणा आणि स्वार्थ यांचा विचार चुकूनही त्यांच्या मनात येत नसे. त्यामुळे इतके उद्योग करताना फुरसदही नसेच पण यदाकदाचित मिळालीच, तर दुसऱ्यांसाठी आपणाला आणखी काय करता येईल या विचारातच तो फुरसदीचा वेळ खर्च होई. साहजिकच त्यांनी स्वतःची गायकी समृद्ध करण्याकडे दुर्लक्ष केले, नव्हे स्वभावानुसार त्यांचे अक्षम्य दुर्लक्ष झाले. पण म्हणून ते गायक नव्हते असे म्हणता येणार नाही.

हळूहळू बुवा शिक्षक म्हणून सर्वमान्य झाले. मानमरातब मिळू लागला. पोटाची विवंचना राहिली नाही. शिष्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद पाहून त्यांना धन्यता वाटे आणि इथे त्यांच्या जीवनरथाने मार्ग बदलला. बुवा गायक होते, नायक होते, शिक्षक होते पुढे रचनाकारही झाले. एकापेक्षा एक समर्थ असे पर्याय एखाद्याच्या जीवनात उपलब्ध झाल्यावर जे घडते तेच झाले. आपल्या आवडीनुसार प्रकृतीपिंडाला अनुसरुन त्याला एखाददुसरा पर्याय बाकीच्यापेक्षा आवडू लागतो. अशा गोष्टी खूपजणांच्या जीवनात घडतात. बुवांचा प्रकृतीधर्म, दुसऱ्यांना देऊन खूष करण्याचा होता. साहजिकच त्यांच्या अंगच्या शिकविण्याच्या सामर्थ्याचा जसजसा त्यांना साक्षात्कार झाला तसतसे ते त्यात अधिकाधिक गुंतत जाऊन प्रथम शिक्षक म्हणून ज्ञात झाले आणि ख्यात पावले. तो व्यवसाय त्यांच्या प्रकृतीला मानवणारा, मनाला भावणारा आणि स्वभावाला इतका आवडणारा होता, की ते शिकवताना देहभान विसरत. मनस्वी कष्ट करून वारंवार प्रयत्न करून समोर बसलेल्या विद्यार्थ्याची गानमूर्ती घडविणे याखेरीज अन्य विचार त्यांना सूचत नसे. आणि अभ्यासाने, अनुभवाने त्यातील खुब्या, बारकावे जसजसे त्यांना कळू लागले, तसेतसे शिकवण्यातील त्यांचा आनंद व ज्ञान वाढतच गेले. ते शिकवण्यात अगदी रंगून जात. शिकवणीच्या वेळी, स्वतःची प्रकृती, विद्यार्थ्यांची कुवत वगैरे अन्य घटक सगळे बासनात बांधून ठेवले जात. शिष्यही त्यांच्याकरता जीव टाकत.

मुंबईला गेल्यानंतर तर विचारायलाच नको. शिष्यसंख्या अशी शेकड्यांनी वाढली की त्यांनाच वेळ पुरेना. मग स्वतःचे गाणे, स्वतःचा रियाज, स्वतःच्या बैठकी असल्या गोष्टींना त्यांच्या जीवनात एका कोपऱ्यात पडून राहण्याची जागा मिळाली. लोकमान्य टिळकांचे अंगी अनेकविध गुणवत्ता होती. ते एकदा म्हणाले होते, मी जर राजकारणात पडलो नसतो, तर गणिताचा प्राध्यापक झालो असतो. तसंच बुवांच्या बाबतीत म्हणण्यासारखं आहे.

माणिकताई म्हणायच्या, त्यांना कितीही वेळा सांगितलं तरी ते आपला हट्ट सोडतच नसत. प्रत्येकाच्या पट्टीत ते शिकवत असत. मग स्त्री असो वा पुरुष असो आणि बायकांच्या काळी चार, पाच मध्ये शिकवून आवाजावर ताण येई, पण त्याची त्यांना पर्वा नसे. शिष्य तयार झाला पाहिजे, हीच इच्छा. त्यातच त्यांच्या व्होकल कॉर्डचेही ऑपरेशन झाले होते. पण या सगळ्यांवर मात करून मातब्बर लोकांच्यात मैफल मारण्याची त्यांच्यात धमक होती. त्यांची कला असामान्य होती. म्हणूनच ती असमान्य विद्वानांच्यात रुजली. सामान्यांना त्यांची गायकी पेलणारी नव्हती.

ह. रा. महाजनी म्हणत, 'महाराष्ट्राला पं. जगन्नाथबुवांची व्हावी तशी ओळख झाली नाही. आजच्या युगाचा व्यापार हा युगधर्म आहे. कला व्यापारालाही या युगधर्माची बाधा झाली आहे. माल उत्तम असला तरी बाजारपेठेत तो मांडावा लागतो तरच तो खपतो. ही मांडणी साधी असून भागत नाही. तिला आकर्षक सजावट असावी लागते. केवळ आकर्षक शोरुम असून भागत नाही. त्या मालाचे गुणवर्णन करणारा विक्रेता असावा लागतो. काही तयार गिऱ्हाइकेही ठेवावी लागतात. शेवटी त्या मालाची भव्य जाहिरातही करावी लागते. आजकाल संगीताच्या बाजारपेठेत ज्या बैठकी गाजतात, त्या बैठकीत हे व्यापारविशेष प्रकर्षाने आढळून येतात. पं. जगन्नाथबुवा या गर्दीच्या तंत्रात थिटे पडत.'

ते म्हणतात, 'हे थिटेपण हे त्यांचे मोठेपण होते. **'स्वात्मार्थे पृथ्वी त्यजेत'** इतका आत्यंतिक त्याग करतो, त्यालाच आत्मा सापडतो. लोकेषणा, वित्तेषणा यांच्या आहारी न जाता जो आत्मेषणाची प्रेरणा मानतो, तोच श्रेष्ठ ज्ञानी. तो अधिकारी कलावंत. राजा मोठा, पण राजा बनविणारा त्यापेक्षा मोठा.'

बुवा गायक म्हणून केवढ्या श्रेष्ठ दर्जाचे होते, त्याची प्रत्यक्ष घडलेली काही उदाहरणे.

अधिकारी समीक्षक व प्रसिद्ध गायक वामनराव देशपांडे एक प्रसंग सांगतात, 'माझी व त्यांची (बुवांची) ओळख वीस एक वर्षांपूर्वी एका संध्याकाळी कै. गोविंदराव टेंबे यांच्या घरी कोल्हापूरला स्वतः गोविंदराव टेंब्यांनीच करून दिली. त्यावेळी मी *जैतश्री* बरा गायलो होतो आणि मला स्वतःच्या गायकीचा आणि केलेल्या मेहनतीचा अभिमानही वाटत होता. त्यातून मी सुशिक्षित, स्वतः पदवीधर वगैरे होतोच आणि मनातून मला असेही वाटत होते की, यानंतर आता

बुवा काय गाणार. पण माझ्यानंतर बुवाच गायला बसले आणि **मारुबिहागातल्या** पहिल्या आवर्तनातच त्यांनी मला गार केले...

प्रा. फडके म्हणतात, '१९४४ साली कोल्हापूरच्या देवल क्लबचा हिरक महोत्सव मोठ्या थाटामाटात झाला. तेव्हा एकदा जगन्नाथबुवा देवल क्लबात गायला बसले होते. फैय्याज खाँ साहेब, अजमत हुसेन खाँ, भुर्जी खा, गोविंदराव टेंबे, बापूराव शाळीग्राम, बापूराव गिडे अशी मंडळी समोर बसली होती. (मीही होतो) त्यावेळी बुवांनी गायलेला **शिवमत भैरव** अजूनही माझ्या कानात घुमतो.'

त्याशिवाय प्रा. फडके बुवांच्या रंगलेल्या गाण्यांच्या इतर आठवणी सांगतात. बाबूराव जोशी वकील यांच्या घरी रंगलेल्या मैफलीत एके दिवशी सकाळी त्यांनी गायलेला ललत मधला **रैन का सपना** हा ख्याल १९५३ च्या पलुस्कर वार्षिक पुण्यतिथीच्या उत्सवात **पूर्वी** रागातला **दिलीयानगरमे** हा बुवांनी जमविलेला ख्याल प्राध्यापकांना दीर्घकाळ याद राहीला.

अशीच एक आठवण गोपाळकृष्ण रामकृष्ण भोबे हे दर्दी समीक्षक सांगतात. '१९६५ साली बुवांचा न भूतो न भविष्यती असा भव्य सत्कार झाला. त्यावेळी बुवा शेवटच्या रात्री शेवटी गायला बसले. त्यासंबंधी ते म्हणतात, भारावलेल्या मनःस्थितीत आपल्या सर्व शिष्य संप्रदायांसमोर राग **सुंदरकली** (राम कली व परज यांचे हे मिश्रण वाटले.) भैरव (भटियार) व मारुवसंत ही एक नवी निर्मिती त्यांनी सादर केली. आदरयुक्त विस्मयाने मी नुसताच ऐकत राहिलो. आणि ६० वर्षाच्या तपश्चर्येची ती फलश्रुती ऐकताना गुंग होऊन गेलो. जे ऐकलं ते गोळीबंद आणि वजनदार. जलसा संपला.मी एकट्यानंच घरची वाट धरली. पण माझे कान अजूनही तेथील स्वरांनी भरून राहिले होते,

राम मराठे म्हणतात, '१९४९ साल असेल मी बुवांकडे गाणे शिकावयास जात होतो. बुवा प्रथम चिजाच देत. मी त्यांना म्हणालो, 'तुमची गायकी मला सांगा' त्यानंतर आम्ही '*नंद*' राग सुरू केला. तीन–साडेतीन महिने सकाळ संध्याकाळ राग एकच *नंद*. हळूहळू बुवांचे रागविस्तार करण्याचे सर्व पैलू माझ्या गळ्यावर चढू लागले. एके दिवशी शिकत असता मी आणि बुवा एकाच तऱ्हेने एकदम समेवर आलो. ते ऐकून बुवांना मनस्वी आनंद झाला. त्यांनी त्याचवेळी तबलजींचा हात धरून थांबविले आणि म्हणाले, 'राम तुला आता सर्व आले.' हा अनुग्रहच झाला. राम मराठे यांच्यासारख्या अनेक उस्तादांकडून तालीम घेऊन तयार झालेल्यांना, आपल्या मैफलींनी फड रंगविणाऱ्याला तीन साडेतीन महिने रात्रंदिवस एक रागविस्तार शिकविणे आणि त्यांनी

बुवांना 'तुमची गायकी शिकवा' असे म्हणणे या गोष्टी कशाच्या द्योतक आहेत. बुवांचे गुरुबंधू आणि माझे गुरू पंडित द. वि. काणेबुवा म्हणतात, बुवांच्या गायकीतले तालअंग आणि बोलअंग कुणाकडे सापडणार नाही. **ललत, शिवमत भैरव, मारुबिहाग, सोहनी, श्यामकल्याण** हे पारंपरिक व स्वरचित नवराग ते अतिशय जमवून गात. गजाननबुवा जोशी भूर्जीखाँकडे शिकत. त्यांच्या घरी झालेल्या मैफलीतील जगन्नाथबुवांचा **श्यामकल्याण**, मिरजेचे भानूदासबुवा गुरव (तबलजी) यांच्या घराच्या वास्तुशांतीच्यावेळी त्यांनी गायलेला **ललत**, देवधर स्कूलमध्ये पलुस्कर पुण्यतिथीस त्यांनी गायलेला **शिवमत भैरव** अशा एकापेक्षा एक प्रत्यक्ष मैफिली ज्यांनी ऐकल्या त्यांच्या तोंडून तरी ते गवई नव्हते असे म्हणणे कदापि शक्य नाही. त्यांचे गाणे आवडले म्हणूनच लोक त्यांच्याकडे गेले. या सर्व उदाहरणावरून बुवा गायक नव्हते हे बरेच भोंगळ म्हणून मूर्तीभंजक विधान ठरते.

जीवनकाल मुसलमानात गेल्यामुळे त्यांना जगन्नाखाँ किंवा जगन्नाथ खाँ असे म्हणत. गायकी उस्तादी ढंगाची आवाज सुरेल, पैलूदार, भरदार, पेचदार, तनयीत खर्ज भरण्याची ख्याल बढतीची खासियत, स्वरलगाव गमक, मिंढ, बोल आलाप, बोल तान, बोल उपज, लयीचे विविध अडीदिडीचे आडाखे यांची समजून मांडणी, कल्पक, रंजक, आणि आत्मविश्वासाने फुलत जाणारे गायन एकूण सोपी सहज समजणारी गायकी बुवांकडे नव्हती. यामुळे सर्वसामान्यांना ते अज्ञात राहिले. बुवांचे गुरू विलायत हुसेन खाँ साहेबही सर्वसामान्यांचे गवई नव्हते. बुवांनी याहीबाबतीत त्यांचा कित्ता गिरवला. संगीत क्षेत्रातील सर्व जाणकार, दर्दी, रसिक, आणि कलाकार पंडित जगन्नाथबुवांना एक रसिला गायक, विद्वान चिकित्सक • सौंदर्यवादी शिल्पकार म्हणून ओळखत. इतकेच नव्हे तर वचकून असत. असा उस्ताद मुसलमान जगन खाँ किंवा जगन्नाथ खाँ यांचा गायक म्हणून थोर अधिकार होता. हे निर्विवाद सत्य आहे.

बुवांनी विलायत हुसेन खाँकडून २५ वर्षे तालीम घेऊन आग्रा गायकी आत्मसात केली व त्याच्या मूळ गाभ्याला धक्का न लागेल अशा बेताने आपल्या सौंदर्यदृष्टीतून त्यावर इतर कलामतींचे कलम केले. आणि स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रतिबिंब असलेले भावनांनी ओथंबलेल्या ओल्या शब्दसुरांचा साज चढविलेली ती त्यांची लोभस वाणी नवी गायकी जाणकारांच्या काळजाचा ठाव घेऊन गेली. यामुळे सर्वसामान्यांना ही गायकी कोणती हा संभ्रम पडला. इतकेच नव्हे तर

लोकसत्ताकारांसारखे प्रतिष्ठितही आदराने बुवा स्वतःच व स्वतःच्या घराण्याची गायकी गातात असे म्हणू लागले. पण विलायत हुसेन खाँच्यामते आग्रा घराण्याचा वारसा चालविण्याचे काम बुवांनीच केले.

बुवांनी आपली निर्भेळ गायकी सही न सही गाणारे त्यांचे एक बालकराम नावाचे शिष्य तयार केले होते. पण दुर्दैवाने ते अकाली निधन पावले. आता त्यांच्या शिष्यांपैकी कोणी त्यांची शंभर टक्के गायकी गात नाही पण शिष्य नसलेले आणि त्यांच्या सहवासात दीर्घकाळ असलेले, पं. निळकंठबुवा अभ्यंकर बरीचशी बुवांची गायकी गात होते. त्यामुळे बुवांनी स्वतःचेच घराणे निर्माण केले इतके बोलून थांबणे इष्ट होईल.

**पं. जगन्नाथबुवा पुरोहित गुरुशिष्य प्रेमाचे आणखीन काही चटकदार मनोवेधक पुढील काही किस्से शिष्यांनीच सांगितेलले आहेत.**

☐ **जी एन्. जोशी :** मराठी भावगीताचे जनक जी.एन. जोशी यांना 'गुनिदास' यांच्याकडे शास्त्रीय संगीत शिकण्याची संधी मिळाली. केवळ दहा वर्ष त्यांचा सहवास मिळाला याबद्दल त्यांनी आपल्या आत्मचरित्रात खंत व्यक्त केली आहे.

आपल्या गुरुबद्दल प्रत्येक मनोवेधक आठवणी त्यांनी सांगितल्या आहेत. पहिल्यांदा गुरुजींची भेट माणिक वर्मांकडं पुण्याला झाल्याचं त्यांना स्मरल. यशवंत जोशी,जितेंद्र अभिषेकी, सी.आर. व्यास. सुरेश हळदणकर असे एकापेक्षा एक शिष्योत्तम गुरुजींना लाभले.

आपल्याजवळचं सर्व ज्ञान मुक्त हस्ते विद्यार्थ्यांना देण्यात त्यांना धन्यता वाटे. 'घेशील क्किती तू दो कराने' अशी शिष्यांची अवस्था होण्याइतपत प्रचंड सांगितिक खजिना त्यांच्याकडे होता.

मुंबईमध्ये गुरुजींच्या रहाण्याची व्यवस्था मला करता आली आणि या एकांड, संसाराच्या पाशातून मुक्त असलेल्या गुरुंकडं शास्त्रीय संगीताचे काही धडे गिरवता आले. त्याबद्दल मी किती नशिबवान आहे अशी भावनाही जी.एन.जोशी यांनी व्यक्त केली आहे.

शिष्यांचा सतत गराडा त्यांच्याभोवती असायचा. पहाटे पाच पासून ते रात्री अकरा पर्यंत ते सतत या संगीत साधनेत रममाण असायचे.

शास्त्रीय संगीताचे गाढे उपासक असूनही उपशास्त्रीय संगीत, गझल यामध्येही त्यांना रुची होती. 'मी रेडिओवर नजाकत अलींची ठुमरी ऐकली', 'मेहंदी हसनची प्रणयत्म्य गझल ऐकली' असे ते आवर्जून सांगायचे. एक रसिक मन

त्यांच्यामध्ये सतत जागृत होतं... आपल्या शिष्यांचा रेडिओवर कार्यक्रम असला की त्यांचीच घालमेल अधिक व्हायची. तो कार्यक्रम सुविहितपणे प्रक्षेपित होईपर्यंत त्यांच्या जीवात जीव नसायचा. शिष्याची उत्तम तयारी करून घेण्यात ते अग्रभागी होते.

आरोह, अवरोह, वादी, संवादी नीट समजावून दिल्यानंतर ते शिष्यांना पकड आणि चलन शिकवायचे असं शास्त्रशुद्ध शिकवल्यानंतर शिष्य स्वतंत्रपणे राग सादर करू शकत असे. प्रत्येकानी आपल्या शैलीनुसार गावं यावर त्यांचा भर होता. त्यामुळे त्यांचे प्रत्येक शिष्य आपापला ठसा श्रोतृवर्गावर स्वतंत्रपणे उमटवण्यात यशस्वी झाले.

☐ **डॉ. नं. र. मारुलकर :** पं. जगन्नाथबुवा पुरोहित हे सौंदर्याचे अभिजात उपासक आहेत. त्यांच्या याच सौंदर्योपासनेतून त्यांनी स्वतःच्या वैशिष्ट्यपूर्ण गायकीला जन्म दिला. बुवांचे विचार सुंदर, आचार सुंदर, उत्तम कपडे, उंची अत्तरे वापरण्याचा त्यांचा शौक, सात्त्विक आहाराची मनापासून आवड, वृत्ती अतिशय धार्मिक... त्यांचे खरे व्यसन एकच ते म्हणजे, संगीत विद्येचा आणि चांगल्या माणसांचा लोभ. आपल्याभोवती चांगली माणसे असावीत, आपण त्यांची मनोभावे सेवा करावी, त्यांचे आतिथ्य अतिशय आदराने करावे, या व्यसनामुळे त्यांच्यावर अकृत्रिम प्रेम करणारा फार मोठा वर्ग तयार झाला.

बुवांनी एखाद्या ऋषिमुनीप्रमाणेच आपले जीवन घालविले. त्यांनी लौकिक प्रपंच केला नाही. प्रपंच केला तो फक्त संगीताचा. धन्य धन्य जाहले जीवन असे बुवांनी सतत म्हणावे अशीच सर्व परिस्थिती आहे. सर्वांगीण यशस्वी जीवनाची निशाणी ती आणखी कोणती असू शकणार ?

☐ **राम मराठे :** पं. जगन्नाथबुवांसारखा प्रेमळ गुरू मिळणे महाभाग्याची गोष्ट आहे. बुवा विद्यादानाचे वेडे होते. आपणास येणारी विद्या दुसऱ्यास द्यावी. अशी तळमळ त्यांच्यात फार होती. एकदा एक चीज नवीन स्फुरली आणि जवळ कोणी शिष्य नव्हता. टॅक्सीतून घरी येऊन त्यांनी मला चीज दिली. बुवा संगीत संसार जगले. नात्याचे कोणी नाही. काय नात्यागोत्याची मंडळी असतील ती आम्ही शिष्य मंडळी आणि जोडलेली मित्रमंडळी. पण ही सर्व अगदी जिवाभावाची होती. आपल्यापासून दुसऱ्याला यत्किंचितही त्रास होऊ न देण्याची बुवा खबरदारी घेत. पिकदाणी धुण्याचा त्रास लीलाबाईला नको, म्हणून बुवांनी शेवटच्या मुक्कामी त्यांच्या घरी पानदेखील खाल्ले नाही. सर्व शिष्यांवर त्यांचे अपार प्रेम होते. माझ्या प्रत्येक बैठकीत ते हजर असत. त्यांची उपस्थिती मला एक प्रकारची प्रेरणा देई आणि बुवांनी शिकवलेले

त्यांनाच अर्पण करण्यासाठी माझ्या गळ्याचा कण न् कण अभावितपणे सिद्ध होई.

☐ **पंडित सी. आर. व्यास :** पं. काणेबुवांचे लाडके शिष्य रघु काळे यांच्या लग्नाच्या निमित्ताने मुंबईला रघु काळे यांचे घरी पं. सी. आर. व्यासांचे गाणे होते. मुंबईतील अनेक कलाकार मंडळी, या कार्यक्रमास हजर होती. त्यात व्यासबुवांचे दोन गुरू श्रोत्यांत बसले होते. पं. पराडकरबुवा व पं. जगन्नाथबुवा. व्यासबुवांनी आपल्या मैफलीची सुरुवात पं. जगन्नाथबुवांनी बांधलेल्या **स्वानंदी** रागाने केली. हा नवीन राग व्यासांनी अतिशय अप्रतिम मांडला. ते ऐकून व्यासांचे पहिले गुरू पारडकरबुवा खुश झाले आणि म्हणाले, 'बुवा, ह्याला चांगले पैलू पाडले आहेत तुम्ही.' त्यावर पंडित जगन्नाथबुवा म्हणाले, 'या हिऱ्याचा पाया तुम्ही भक्कम केला आहे.' या दोन महान गुरुंचा हा विलोभनीय संवाद, त्यावेळच्या संगीत क्षेत्रातील पारदर्शिकत्वाचे प्रतीक म्हणावे लागेल. स्वतः समर्थ असलेले हे दोन गुरू एकमेकांचे मोठेपण इतक्या लिलया जाहीरपणे कबुल करतात ही गोष्ट आजकालच्या कुपमंडुक वृत्तीला पेलणारी नाही हेच खरे. अशा निर्मल निर्लोभ वातावरणामुळेच, त्यावेळी चांगले शिष्य तयार होऊ शकले.

पं. सी. आर. व्यास प्रथम ग्वाल्हेर घराण्यात शिकले. पण गाण्यात नेमकेपणा बुवांकडे आल्यावर आला. मैफलीत बंदिश कशी टाकायची, लोक तुमच्याबरोबर आले पाहिजेत, लयीचे आवर्तन कसे ठेवले पाहिजे की श्रोते आपोआप चीज गुणगुणतील हे बुवांनी त्यांना शिकवले. व्यास सांगत बुवांचे placement फार छान होते. त्यामुळे खाँसाहेब व शिष्य मंडळीच त्यांना जवळची वाटायची. ते गुणग्राहक होते. दुसऱ्या कलाकाराचा ते नेहमी सन्मान करीत. एकदा व्यासांनी **बागेश्री**तील त्यांनी बांधलेली चीज बुवांना म्हणून दाखविली बुवांना ती खूप आवडली 'कोणाची बंदिश ?' असे विचारल्यावर व्यास म्हणाले, 'माझी.' बुवा म्हणाले, 'खोटे बोलतोस. उद्या कोणीही ही बंदिश आपल्या नावावर खपवेल.' तेव्हा व्यास म्हणाले, 'तुमच्याशी मी खोटे कशाला बोलू ?' तेव्हा बुवा म्हणाले, या पुढे तुम्ही बांधलेल्या बंदिशीत तुमचे नाव घातले पाहिजे. आणि जगन्नाथबुवांनी गुणीजान हे नाव व्यासांना बंदिशीत घालायला सांगितले. आपल्या शिष्यावर असलेले अलोट प्रेमच यातून अनुभवायला मिळते. बुवांना आपल्या शिष्यांबद्दल खूप विश्वास व अभिमान असे. एकदा अशाच एका संध्याकाळी बुवा व्यासांच्या घरी आले,

'व्यास आहेत का घरी.'

सौ. म्हणाल्या, 'बसा आता येतील ऑफिसमधून.'

व्यास घरी आल्याबरोबर बुवा त्यांना म्हणाले, 'चला आवरा आपल्याला गायला जायचंय.'

व्यास म्हणाले, 'कुठं?'

बुवा म्हणाले, 'वाटेत सांगतो. आधी चला.'

शिष्यही व्यासांच्या शब्दाबाहेर नव्हते. व्यास आवरून बुवांबरोबर बाहेर पडले. बुवा म्हणाले, 'खाँ साहेबांचेकडे जायचे आहे. माझा नवा राग **स्वानंदी** तुला तेथे गायचा आहे.

व्यासांना क्षणभर काही सुचेना. ऑफिसमधून आल्याआल्या काही विचारही केलेला नसताना राग मांडायचा पण बुवांच्या आज्ञेपुढे कुणाचचे काही चालायचे नाही. बुवा द्रष्टे होते. कोण काय म्हणू शकेल कोणाला काय सागायचे हे त्यांना नेमके माहीत असायचे. ही ते उत्तम करीत म्हणूनच आपल्या शिष्यांना अचानक केव्हाही काहीही सांगितले तरी ते मैदान मारणार हे खाँसाहेबांना त्यांना दाखवायचे होते. बुवांचा आत्मविश्वास त्यावेळी व्यासांनी खरा करून दाखविला.

एकदा संगीतातील चर्चा चालू असताना काही मतभेदामुळे बुवा सी. आर. व्यासांवर रागावले होते आणि त्यांनी त्यांच्याशी अबोला धरला होता. शिकवणीही बंद झाली होती. तरीही सी. आर. व्यास तेथे शिकवणीच्या वेळी जाऊन बसत असत. सी. आर. व्यासांना हा अबोला असह्य झाला. त्यामुळेच एका मैफलीत बुवांनी **कौशिकरंजनी** या रागात स्वतःच बांधलेली बुवांची आर्ज करणारी खालील चीज गायली –

**का हो मोसे रूठ रहे, मेरो गुणवंता...**
**... जान गुनीदास निर्मल मन को ।**

हे ऐकल्याबरोबर गाणे सुर असतानाच बुवा ताडकन उठले. माईक ओढून हातात घेतला आणि म्हणाले, व्यास सगळे खोटे सांगत आहेत मी त्यांच्यावर रागावलो नाही.

☐ **लीलाताई करंबेळकर :** पं.जगन्नाथबुवांकडे तयार मंडळी जशी संगीत आत्मसात करायला आली होती तशीच नवशिकाऊ मंडळीही होती. त्यांना देखील बुवांनी तितक्याच प्रेमानी आणि तन्मयतेने शिकवले. आपल्या शिकवण्यावर बुवांचा पूर्ण विश्वास होता. प्रत्येकाची कुवत बघून, त्या त्या प्रमाणे बुवांनी शिष्यांच्या गळ्यावर संगीत चढवले. आपण शिकू ते शिष्याने मांडलेच पाहिजे हा त्यांचा अट्टाहास असे.

लहानपणी देवल क्लबमध्ये संगीत स्पर्धेत नंबर आला नाही म्हणून मी हिरमुसले होत. तेव्हा बुवा तेथेच होते. काय झाले म्हणून विचारताच नंबर आला नाही म्हणून सांगितले, बुवा म्हणाले, 'पुढच्या वर्षी परत भाग घे. मी बघतो.' त्यावेळी मी, माझे वडील पुराणिक यांचेकडे शिकत होते. माझे वडील पाध्येबुवांचे शिष्य. पण माझ्या वडिलांनीसुद्धा मला आपल्या गुरुंकडे न पाठविता जगन्नाथबुवांकडे पाठविले. १९५६ साली वास्तविक जगन्नाथबुवा कोल्हापूर सोडून मुंबईत गेले होते. पण तरीसुद्धा त्यांनी शिकविण्याचे मान्य केले. 'ही एवढी लहान, हिला काय येणार' हा विचारसुद्धा त्यांच्या मनाला शिवला नाही. त्यांनी मला भरभरून दिले. तसेच आपल्याजवळ आहे ते कसे मांडायचे हे शिकवले. हा विचार दिला अर्थात पुढच्या स्पर्धेत माझा नंबर आला हे सांगण्याची जरुरी नाही.

पुढे लग्नानंतर मी डोंबिवलीला रहाण्यास आले. १९६६ साली माझ्या घरी पं. जगन्नाथबुवांची गुरुपौर्णिमा अतिशय सुरेख झाली. ती गुरुपौर्णिमा खूप गाजली. जगन्नाथबुवांचे एकापेक्षा एक दिग्गज शिष्य जसे हजेरी लावणार होते तसे नवशिकाऊही गाणार होते. जगन्नाथबुवांना श्रोते म्हणाले, सगळ्यांना कशाला गायला बसवता. तेव्हा बुवा म्हणाले, 'नवीन लोकही काय करत आहेत काय शिकत आहेत हे लोकांना कळले पाहिजे. आपण जे शिकलो ते कसं मांडायचे हे सभेत गायल्याशिवाय कळणार नाही.' त्यामुळे 'आपल्या कुवतीप्रमाणे आपले गाणे लोकांसमोर मांडलेच पाहिजे.' असे बुवा म्हणत. जगन्नाथबुवांचा स्वतःच्या शिकवण्यावर किती जबरदस्त विश्वास होता याची साक्ष त्या गुरुपौर्णिमेस आली. त्या मैफलीत होते, राजेश्वर बोबडे, लीलाताई, पूर्णिमा तळवळकर, यांच्याचबरोबर प्रभूदेव सरदार, जी. एन. जोशी, राम मराठे, माणिक वर्मा, जितेंद्र अभिषेकी, सी. आर. व्यास गायले. भाईचा तबलाही झाला. तसेच जगन्नाथबुवांची गुरुपौणिमा म्हणून यशवंत देवही गायले. यावेळी व्यासबुवांनी **कौशिक रंजनी** सादर केला तर अभिषेकींनी **भूपाल तोडी.** माणिकताईंनी **ललत** तर रामभाऊंनी जगन्नाथबुवांचा नवीन राग **जौन भैरव** सादर केला. त्या रागाचा व गाण्याचा प्रभाव श्रोत्यांवर इतका जबरदस्त पडला की मध्येच उठून व्यासबुवा म्हणाले, 'रामभाऊ, क्या कर रहे हो, ध्यान में ही नही आता है।' प्रत्यक्ष बुवासुद्धा ते गाणे ऐकून अस्वस्थ झाले होते. अक्षरशः समेसमेवर लोक उठत होते. आता याच्यानंतर जगन्नाथबुवा काय करणार असे सगळ्यांनाच वाटत होते. त्याचवेळी विजार–कुरता–जाकीट अशा आपल्या नेहमीच्या वेशात बुवा दोन तंबोऱ्यामध्ये बसले

व सगळेच थोड्या साशंकतेने स्तब्ध झाले. सुरेल तंबोऱ्याच्या स्वरांनी वातावरणात एक लहर उठली आणि जगन्नाथबुवांनी **भैरव भटियार** गायला सुरुवात केली. षडजानंतर **भटियार**चा आर्त **धैवत** अशी काही जादू करून गेला की मागची सर्व गाणी पुसली गेली. प्रत्येकात एकच चर्चा 'असे गाणे पाहिजे हे आपल्याला आले पाहिजे.' त्या नादब्रह्माच्या सागरात सर्व श्रोते आकंठ बुडाले होते. तो एक साक्षात्कारी अनुभव जो मी अनुभवला तो खरच शब्दापलीकडचा होता. रात्री नऊपासून दुसरे दिवशी सकाळी नऊ पर्यंत मैफल चालली होती. एकही माणूस जागचा हलला नव्हता. घरी जाण्याची तर कोणालाच घाई नव्हती. अशी गुरुपौर्णिमा पुन्हा कधी पाहिली नाही व ऐकलीही नाही.

☐ **तबलावस्ताद नाना मुळे :** जगन्नाथबुवांकडे शिकणाऱ्या शिष्यांच्या मनात आजही त्यांच्या सहवासातील अनेक आठवणी ताज्या टवटवीत आहेत आपल्या तबल्याच्या शिक्षणाबद्दल असेच हरवून नाना मुळे सांगतात

प्रमोद नाईकांचेकडे शोभा गुर्टूच्या गाण्याला मी तबल्याच्या साथीला होतो. समोर श्रोत्यात जगन्नाथबुवा होते. मी पंजाबी **दीपचंदी** अंगानी वाजवला आणि घम्मन खाँ साहेबांच्या लग्या लावल्या. गाणे झाल्यावर बुवा मागे आले आणि विचारले, 'कुणाकडे शिकता ?' मी सांगितले, 'पंढरीनाथ नागेशकर.' बुवा म्हणाले, 'पंढरीचा तबला असा नाही. राहतोस कुठे तू ?' मी म्हणालो, 'माटुंग्याला.' बुवा म्हणाले 'मी जी. एन. जोशींच्या बाजूला राहतो. उद्या दुपारी तीन वाजता खोलीवर ये, मी अडीच वाजता बुवांकडे पोचलो, दाराची कडी वाजवली' तेव्हा थोड्या रागातच ओरडले, एवढ्या लवकर कसा काय आलास? पण 'नंतर बरं ठीक आहे' म्हणून त्यांनी आत बोलावले बुवांची खोली रस्त्यालगतच होती. त्यामुळे चप्पल हरवण्याच्या भीतीने मी चप्पल आत काढू लागताच बुवा गरजले 'चपला बाहेर काढ मग आता ये.' मी थोडा धास्तावलो. हे प्रकरण कठीण दिसतय असा विचार डोक्यात आला. तेवढ्यात 'चहा करता येतो का?' असा बुवांचा प्रश्न आला. आल्यापासून घडत असलेल्या प्रसंगामुळे नाही म्हणण्याची हिंमतच नव्हती. तडक आत जाऊन एक कपापुरते दूध असलेल्या दुधाचाच कप चहा केला. बुवा म्हणाले, 'थोडे आत जाऊन चहात दूध घालून आण.' मी म्हणालो 'सर्व चहा दुधाचाच केला आहे. आता दूध शिल्लक नाही.' शेवटी आम्ही दोघेही तसाच चहा प्यालो. त्यानंतर बुवा म्हणाले आता यानंतर काहीही प्यायचे नाही. आणि मग बुवा आहो जाहो वर उतरले काय हो तुम्ही ठुमरी वाजविली ते काय वाजवले ते कळले का ? दुगुन केली ती अशी वाजवतात का ? ते पेशकऱ्याच्या

अंगाने हवी होती ठेक्यात गांभीर्य नव्हते ठेके पोरकट लागत होते. हातात वजन नाही 'ताकद नाही' आता घ्या तबला आणि करा चालू मी सांगतो तसे. मी तबल्याची गादी सोडू लागलो. तर गादी सोडायची नाही. तसाच तबला वाजवायचा असे गरजले. तक् टिटतक्, तक्, तक् तक् तिरकट् असे बोल वाजवायला सांगितले. दुपारी साडेतीन वाजल्यापासून ही सुरुवात झाली. मधूनच बुवा म्हणायचे 'त कुठाय ? क कुठाय ? र कुठाय ? डबल कर पोकळ वाजतय अशी शेरेबाजी चालली होती. मी मध्येच थोडे 'उठू का' म्हणालो, बुवा म्हणाले, 'पाणी प्यायचे नाही.' तालीम रात्री साडेनऊ पर्यंत चालली. रामभाऊ आपल्या नाटकाचा प्रयोग संपवून आल्यामुळे माझी सुटका झाली. दुसऱ्या दिवशी हात उचलत नव्हता. जेवायला येत नव्हते. दुसऱ्या दिवशी बुवा शोधत शोधत आमच्या चाळीत आले. धोतर व गंजीफ्रॉक या वेशात बुवांना दारात पाहून मी आश्चर्यचकीत झालो. बुवा उपरोधाने बोलत होते. काय झाले का तयार ? मस्ती आली का ? जेवण झाले का ?

मी म्हणालो, 'नाही.'

'मग जेऊ नको. उठ चल प्रॅक्टिसला.' बुवा ओरडले. आणि आदले दिवशी सारखीच पुन्हा शिकवणी सुरू झाली. बुवा बोलत होते. ठेक्यात गांभीर्य पाहिजे, पोक्तपणा पाहिजे तो झोल आला पाहिजे. ठेका लावायचा नसतो तर बांधायचा असतो दोन-तीन प्रयोगानंतर एकट्या लग्गीतच सर्व लग्ग्या बुवांनी मला दिल्या. लड्या करत कसे जायचे ते सांगितले. दोन वर्ष तक तिरकिट तक धिर धिर हे बोल तबल्यावर सरावासाठी दिले होते.

सगळ्यांना शिकवण्याची बुवांची पद्धत एकच होती. पण त्यांचे सामर्थ्यच इतके मोठे होते की शिकणाऱ्याला त्यांचे विविध पैलू दिसले शिष्यात इच्छे पराजय अशी बुवांची मांदियाळी होती. सगळे शिष्य आपापल्या परिने दिग्गज होते. बुवांनी या दिग्गजांना शिकवले ही गोष्ट सोपी नााही ब्रह्मज्ञान नव्हे लेकुऱ्यांचा खेळ बुवांच्यात ती ताकद होती. ते सामर्थ्य होते. शिष्य आपल्यापेक्षा मोठा व्हावा ही मनापासूनची इच्छा होती. माझे गुरुबंधू पुराणिक म्हणायचे, बुवा अशिक्षित असूनसुद्धा त्यांचा शुद्धलेखनावर दांडगा जोर होता. धिर मधला धी ऱ्हस्व की दीर्घ, किटतक मध्ये कोणत्या अक्षरावर जोर आला पाहिजे अशा बारीक सारीक गोष्टीसुद्धा बुवांच्या नजरेतून सुटायच्या नाहीत.

☐ **श्री. गणा पुराणिक** : बुवांच्या शिष्यांमध्ये अभिषेकीची शिकवणी अतिशय लोभस असायची. एकदा शिकवणीला बसल्यावर पहिली १० मिनिटे बौद्धिक

असायचे. तू असाच आहस, तसाच आहेस, तुला हे वागता येत नाही, तुला हे करता येत नाही, असे बोलावे कसे बोलू नये हे समजत नाही वगैरे बुवा बोलत असत आणि मग १० मिनिटांनी बुवा अभिषेकींना विचारत ऐकतोस काय ? अभिषेकी म्हणत मला काही विचारलत ? असा प्रश्न टाकून अभिषेकींची शिकवणी म्हणजे पर्वणी असे.

बुवांनी गुरू म्हणून नुसताच तबला किंवा गाणे शिकवले नाही तर व्यवहारही शिकवला. भाई म्हणतात, व्यवसायातदेखील उत्कर्षासाठी मार्गदर्शन बुवांनी केले. तसेच भाईंची बायको कशी असावी हे बुवांनीच ठरवले. आपला शिष्य दक्ष संस्कारी, सुसंस्कृत व्हावा म्हणून वडिलांपेक्षा जास्त चौकशी इतर बाबतीतही बुवा करत. त्यामुळे शिष्यांचे ते नुसतेच गुरू नाहीत तर पालकही होते. सर्वांचे सर्वतोपरी चांगले व्हावे हेच बुवा मनोमन चिंतीत असत व त्या प्रमाणे ते शिष्यांबरोबर वागत असत. ते रागवत असत पण तो एक त्यांचा बुरखा होता. प्रत्येकाला लाईन्स घालून दिलेल्या होत्या. याच्या पुढे तू नाही . प्रत्येक शिष्याच्या जवळीकीत फरक होता. पण स्वतःच्या शिष्यांबरोबर नातशिष्यांचीही त्यांना काळजी होती.

☐ **योगिनी जोगळेकर :** योगिनी जोगळेकर या रामभाऊ मराठेंच्या शिष्या व जगन्नाथबुवांच्या नातशिष्या होत. मुंबईत रामभाऊ, योगिनीताईची शिकवणी, बुवांकडेच घेत असत. एकदा रामभाऊंना यायला उशीर झाला योगिनीताई मात्र आपल्या वेळेत येऊन बसल्या होत्या. लगेच बुवा गरजले, 'अरे ती पुण्याहून येते तुला समजत नाही का ?' वफादारी, इंतजारी बहोत बुरी. नातशिष्यांना सुद्धा बुवांच्याबद्दल कमालीचा आदर होता. म्हणूनच बुवांची पत्रे म्हणजे योगिनीताईंना ज्ञानेश्वरांची पाने वाटत असत. एकदा योगिनीताईंचा हात भाजला तेव्हा काळजीपोटी बुवांनी ताईंना पत्र लिहिले होते ते योगिनीताईंनी ज्ञानेश्वरीत जपून ठेवले होते.

बुवांनी लिहिले होते

'आपला हात भाजला असे मला माणिककडून कळले. मी आपला कोणी नाही ? आपण मला कसे कळवणार ? आपला हात लवकर बरा होऊ दे कारण आपला तो तंबोऱ्याचा हात आहे तसेच तो लेखणीचा हात आहे.'

पुढे एकदा बरेच दिवस त्या मुंबईत गेल्या नाहीत तेव्हा रामभाऊकरवी बुवांनी निरोप पाठविला 'बुवांचा निरोप आहे मी अजून जिवंत आहे. लतिफ हाऊसमध्ये नको ठाण्याला नको माझ्याकडेच शिकवणी करा.'

बुवा शिष्यांची वाट पाहात दारासमोरच्या बैठकीवर आपल्या खोलीत बसायचे त्याचे वर्णन करताना योगिनीताई म्हणाल्या.

**चकोर भेटेना, चंद्रमा वाळला । जीवीचा जिव्हाळा, तोचि जाणे**

**वहाळ भेटेना, सागर आटला । अंतरीचा उमाळा, तोचि जाणे ।।**

**शिष्य भेटेना, सदगुरु वाळला । अंतरीचा कळवळा, तोचि जाणे ।।**

बुवांच्या नेमकेपणाबद्दल बोलताना योगिनीताई म्हणाल्या 'काय बोलावे यापेक्षा काय बोलू नये' हे ज्याला कळले तो वक्ता काय लिहावे, यापेक्षा काय लिहू नये, हे ज्याला कळले तो लेखक तसेच काय गावे यापेक्षा काय गाऊ नये हे ज्याला कळले तो गायक.

बुवांनी जसा **अहिरभैरव** लोकप्रिय केला त्याचप्रमाणे **मुलतानी**चे सौंदर्य लोकात रुजविले. दादर, माटुंगा सेंटरला एकदा त्यांचे गाणे झाले. त्यात त्यांनी **मुलतानी** गायला. त्यातल्या रिषभाचे सौंदर्य अनुभवून श्रोते अवाक झाले. मनोहर जोशींनी डोंबिवलीत एका समारंभात जाहीरपणे सांगितले की बुवांचा **मुलतानी** मी ऐकला आणि मी **मुलतानी**च्या प्रेमातच पडलो. **मुलतानी** बद्दलचे मळभ बुवांनी पालटून टाकले. प्रत्येक रागाची त्यांची एक खासियत होती. ***जौनभैरव*** गाताना प्रसंग समोर उभा राहिला पाहिजे असे ते म्हणत. बुवांच्या गाण्यातला जो एक पुकार होता तो सर्वांना आकर्षित करत असे

पं. भाई गायतोंडे कोल्हापूर सोडून मुंबईत आल्यावर बुवांनी एक संगीताचे केंद्रच निर्माण केले. बुवा मुंबईत येण्यापूर्वी मोठे कार्यक्रम व्हायचे, पण जास्त करून लक्ष्मीछाया देवधर स्कूल सेंटर, असे गिरगावात होत असत. पण बुवा आल्यावर गिरगावाऐवजी दादर संगीताचे केंद्र बनले. मोठे मोठे कलाकार बुवांच्या शब्दाखातर आपली गानसेवा तेथे आनंदाने रुजू करत असत. दादस संगीताच्या सळसळत्या वातावरणांनी व्यापून गेले होते. तिथल्या उडपी हॉटेलाचा मालकही संगीताने भारावून गेला होता. बुवा गेल्यावर हॉटेल मालकांनी काही दिवस हॉटेल बंद ठेवले होते.

मुसलमानी राजवटीतील चिज़ा शृंगारिक होत्या. पण बुवांनी बंदिशीला वेगवेगळे विषय दिले.

☐ **श्री. प्रकाश पुरोहित – कोल्हापूर** : जगन्नाथबुवांचा स्वभाव अगत्य व आदरातिथ्य करणारा होता. मग लहान मोठा, गरीब श्रीमंत कलाकार–अकलाकार कोणीही असो, घरी आलेल्या प्रत्येकाचे स्वागत ते सारख्याच तन्मयतेने करत. कोल्हापूरात औषधाच्या दुकानाचे मालक प्रकाश पुरोहित जगन्नाथबुवांबद्दल आठवणी सांगताना म्हणाले, 'बुवांना मळीची वांगी फार आवडत असत,' बुवा कोल्हापूरात असताना ते नेहमी पुरोहितांच्या घरी येत तेव्हा जेवणाच्या बेतात वांग्याची भाजी ठरलेली असे. त्यानंतर मुंबईत बुवा स्थायिक झाले. पण जेव्हा

जेव्हा प्रकाश पुरोहित औषध खरेदीसाठी मुंबईस जात तेव्हा तेव्हा आठवणीने ते बुवांबसाठी वांगी घेऊन जात असत. बुवांचे घरी गेले की त्यांच्याकडे स्वैपाकाला असलेल्या मुलाला झकास आमटी करण्याचे फर्मान बुवा सोडीत. काही वेळाने स्वत:च स्वैपाकघरात जात आणि त्या मुलाकडून स्वैपाक व्यवस्थित नाही झाला तर, या भीतीने स्वत:च आमटी बनवत. आपल्या घरी आलेला माणूस खूष होऊनच बाहेर पडला पाहिजे, ही प्रेमळ इच्छा त्यामागे असे. काही वेळा कोणी यायचे म्हटले की ते सरळ बाहेर ऑर्डर देऊन जेवण मागवित. येणाऱ्या पाहुण्याच्या स्वागतात काही कमी पडू नये हा उद्देश या मागे असे. येणारा प्रत्येक पाहुणाही बुवांच्यावर जीव टाकत असे. एकदा प्रकाश पुरोहितांना मुंबईला दवा बाजार येथे औषधांच्या खरेदीला थेट जावे लागणार होते नेमके त्याचवेळी दादरला त्यांच्याच गाडीतून माणिक वर्मा उतरताना त्यांना दिसल्या. जवळची वांगी बुवांचे पर्यंत जाईपर्यंत थोडीसुद्धा शिळी व्हायला नकोत म्हणून माणिकताईंना ती वांगी बुवांच्यापर्यंत पोचविण्याची विनंती पुरोहितांना केली आणि माणिकताईंनी देखील अत्यंत आनंदानी ती मान्य केली. या वरुन बुवांच्यावर सर्व थरातील लोकांचा किती लोभ होता, याचे प्रत्यंतर येते.

❖❖❖

## १

# अखेरचे दिवस

लहानपणापासून कमालीचे खडतर काबाडकष्ट उपसण्यात बुवांचा जन्म गेला. स्वतःचा संसार मांडला नाही, वार्धक्य आले, आता आपले कसे होणार, असे बुवांना वाटू लागले. पण तरीसुद्धा भरभरून विद्याधन ज्यांना दिले, ते शिष्य, जिव्हाळ्याने जोडलेली स्नेही मंडळी आपल्याला नक्की सांभाळतील असा विश्वास त्यांना होता. वार्धक्यात आपल्या पैशाचाच आधार कुणालाही वाटत असतो. दृष्ट लागण्यासारख्या षष्टब्दपूर्ती समारंभाने बुवांना या दोन्ही बाबतीत सार्थ दिलासा दिला. लोकांनी व शासनाने केलेल्या आपुलकीच्या वर्षावाने व स्वास्थ्य देणाऱ्या कृतज्ञतापूर्ण अर्थ साहाय्याने ते हेलावून गेले.

जन्मभर केलेल्या अविश्रांत परिश्रमांचा परिणाम बुवांना पुसटसा जाणवू लागला होता. तसं म्हटलं तर त्यांचं वय काही फार नव्हतं, असावं चौसष्ट–पासष्टच्या आसपास. ते वरून दिसायला तब्येतीने उत्तम होते. परंतु आतून मात्र शरीर कुठल्यातरी व्याधीने पोखरले गेले होते. आपलं इथलं कार्य आता संपलं आहे, सगळ्यांचा निरोप घ्यायचा, अशा पद्धतीने ते वागत होते.

त्यांच्या मानसकन्या लीलाताई करंबेळकर (कोल्हापूरचे वकील नारायणराव पुराणिक यांच्या कन्या) यांनी बुवांविषयी सांगितल ' बुवा दिवाळीत कधी मुंबईत असले की आम्ही सर्वांनी त्यांच्याच घरी दिवाळीसाठी आलं पाहिजे,असा त्यांचा हट्टच असे, आणि आम्ही त्या हट्टाचा मान आनंदाने राखीत असू'.

बऱ्याच वेळा त्या बुवांना दिवाळीला आपल्या घरी येण्याबद्दल आग्रह धरीत असत, तेव्हा प्रत्येक वेळी ते एकच उत्तर त्यांना देत, 'तू आत्ता मला मुळीच आग्रह करू नको, मी माझ्या मरणाच्या वेळी तुझ्याकडेच येणार आहे.' हे त्यांचे उत्तर त्यांच्या काही निकटवर्तीयांनाही माहीत होतं. तेव्हा हे उत्तर कुणीच गंभीरपणे घेतलं नव्हतं.

१९६८ च्या सप्टेंबरमध्ये त्यांना फ्ल्यू झाला. त्यांचे चालणेबोलणे, नित्य व्यवहार चालूच होते. फ्ल्यूच्या निमित्ताने इतर तक्रारी वाढू लागल्या. अशक्तपणा जाणवू लागला, म्हणून १९६८ च्या ऑक्टोबरच्या तिसऱ्या आठवड्यात मुंबईबाहेर

विश्रांतीसाठी जावे, असे वाटू लागले. म्हणून डॉ. फळणीकर व डॉ. तुळपुळेंनी डोंबिवलीस लीलाताई करंबळेकरांकडे राहण्याची त्यांना परवानगी दिली. लीलाताई स्वतः बुवांना घरी घेऊन आल्या.

दोन दिवस गप्पागोष्टीत मजेत गेले. सौ. लीलाताईंनी आपल्या मुलीला दिवाळीचे फटाके वगैरे आणले नाहीत, हे कळल्यावर ते स्वतःच मुलीला घेऊन फटाके आणण्यासाठी बाहेर पडले, पण लगेच परत आले, आणि 'मला जाववत नाही' असे म्हणाले. ताबडतोब करंबळेकर त्यांच्या फॅमिली डॉक्टर मालती प्रधान यांच्याकडे गेले. तो रविवारचा दिवस होता. त्यामुळे दवाखाना बंद होता. कदाचित तेव्हा त्यांना खूप त्रास होत होता, पण त्यांनी तो जाणवू दिला नाही. त्यांचा आवडता ट्रान्झिस्टरही नीट चालेना, म्हणून तो बंद केला आणि म्हणाले, 'मी आता जरा वेळ पडतो. डॉक्टर आल्यावरच मला उठवा. नाहीतरी उद्या लवकर उठायचेच आहे. मला जेवायचे नाहीच आहे. तुम्ही जेवण करून लवकर झोपा.'

त्यांना झोप लागलेली पाहून ती मंडळी जेवायला आत गेली. धनत्रयोदशीचा दिवस होता तो. साधारण रात्री ९ च्या सुमारास डॉक्टरीणबाई आल्या. ते भिंतीकडे तोंड करून झोपले होते. त्या आल्या म्हणूनच केवळ करंबळेकर कुटुंबियांनी बुवांना उठविण्यासाठी दोन-तीन हाका मारल्या, पण काहीच उत्तर आले नाही. डॉक्टरीणबाईंनी स्वतःच त्यांना कुशीवरून सरळ केले, तर त्यांनी एक मोठा श्वास घेतला. नाडी पाहण्यासाटी डॉक्टरीणबाईंनी हात हातात घेतला. पण तो मोठा श्वासच त्यांचा शेवटचा श्वास ठरला होता. २० ऑक्टोबर १९६८ ला त्यांनी आपली इहलोकीची यात्रा संपविली. सर्वजण शोकसागरात बुडाले. एका प्रेषिताचे अवतारकार्य आटोपले. जन्मभर सर्वांची सेवा शुश्रुषा करून सर्वांना संतुष्ट करणारा हा अफलातून शागीर्द दुसरे लोक आपली सेवा करतील, या भीतीने कुणाच्या हातचे एक पळीभर पाणीही न पिता अचानक आपल्या परलोकीच्या प्रवासाला निघून गेला. 'गुनीदास गये गुनीदास मिलनको.....'

खडतर संगीत साधनेचा एक अलौकिक उच्चादर्श कायमचा काळाच्या पडद्याआड गेला. १९६२ मध्ये विलायत हुसेन खाँच्या निधनानंतर पं. जगन्नाथबुवा म्हणाले होते, ''आज **मारुबिहाग** पोरका झाला.'' त्याप्रमाणे आता गुनिदास गेले आणि त्यांच्याप्रमाणेच सर्वांचा लाडका **जोगकंस** पोरका झाला. इतकेच नव्हे, तर त्यांचा आवडता अफाट शिष्यपरिवारही मातृवत मायेच्या छत्राला मुकून दिशाहीन झाला.

गुनिदासांच्या निधनाची वार्ता समजताच मुंबई, ठाणे, पुणे इत्यादी ठिकाणाहून त्यांचे शिष्य व चाहते तात्काळ बुवांच्या अंत्यदर्शनसाठी डोंबिविलीला तातडीने आले. तेथे एक भव्य शोकसभा आयोजित करून सर्वांनी बुवांना आपली आदरांजली अर्पण केली. त्यावेळी असलेल्या जवळजवळ सर्व वर्तमानपत्रातून बुवांना श्रद्धांजली वाहणारे लेख प्रसिद्ध झाले.

बुवांचे निवासस्थान ज्या मार्गावर होते, त्या बॅरिस्टर गुप्ते मार्गाचे नामकरण 'गुनीदास मार्ग' असे करून शासनाने त्यांचा गौरव केला आहे. त्यांच्या मानसकन्या व शिष्या सौ. लीलाताई करंबेळकर, बुवांचा स्मृतिदिन आजही अतिशय श्रद्धेने व जिव्हाळ्याने साजरा करतात आणि त्या उत्सवात अनेक कलाकार अतिशय प्रेमाने हजेरी लावतात.

असामान्य सात्त्विक सद्गुणसंपत्तीच्या सामर्थ्यावर लहानपणच्या दारिद्र्याच्या दशावतारापासून मोठेपणी दौलतीकडे बुवांनी घेतेलेली झेप स्तिमित करणारी असली, तरी जन्मभर त्यांनी उपसलेल्या अपार कष्टांची ती पर्यायाने एक परिणती होती, हेही पटते. **गायक, नायक, शिक्षक, रचनाकार अशा सर्वांगनी ते** व्यक्तिमत्त्व सर्वसामान्यांच्या कुवतीपलीकडचे होते. त्यात प्रसिद्धिपराङ्मुखतेची भर, यामुळे सर्वसामान्य महाराष्ट्राला त्यांची व्हावी तशी ओळख झाली नाही. तपस्वी तपश्चर्येचे मोल मानतात. कीर्तीचे नव्हे. आधी–भौतिक सद्गुणांच्या दृष्टिकोनातून बुवांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाशझोत टाकून निष्कर्ष काय हाती येतो, ते पाहू. मुक्ती हे जीवनाचे अंतिम ध्येय गाठण्याचे अनेक मार्ग आहेत. त्यापैकी ज्याने षडरिपु जिंकले तो मुक्तात्मा होय असे मानतात. काम, क्रोध, लोभ, मद, मोह,मत्सर या सहा कसोट्या बुवांच्या जीवनास लावणे मोठे उद्बोधक ठरेल.

**काम** – अविवाहित बुवांचे धवल चारित्र निष्कलंक व पवित्र होते. हे त्यांचे शत्रूसुद्धा (कोणी असल्यास) कबुल करतील.

**क्रोध** – वैद्यक शास्त्रात विषसुद्धा प्रमाणात औषध म्हणून रोगी बरा करण्यास वापरतात. त्याप्रमाणे बुवांचा क्रोध हा शिष्यांच्या व मित्रांच्या कल्याणासाठी असे, स्वतःच्या फायद्यासाठी नव्हे.

**लोभ** – बुवांना लोभ असता, तर कर्णाच्या औदार्याने आपल्याजवळच्या विद्येची, जडजवाहिऱ्यांची त्यांनी येईल त्याच्यावर उधळण केली नसती.

**मद** – बुवा अत्यंत निरगस, नम्र होते. शिष्यांच्या बरोबरसुद्धा बरोबरीने वाद घालीत. मग मद कुठला ?

**मोह** – संगीतासारख्या मोहमयी व व्यसनी वातावरणात धुतल्या तांदळासारखे स्वच्छ राहिले. उस्तादांची व्यसने पुरवित, पण स्वतः अलिप्त राहात.

म्हैसूरच्या महाराजांबरोबर विलायतेला गेले असतानासुद्धा मद्य आणि आखाद्यापासून तें चार हात लांब राहिले. विलायतेच्या गारठ्यातही त्यांनी गार पाण्याची आंघोळ चुकवली नाही. मुंबईच्या दादासाहेब आपट्यांनी या त्यांच्या वैरागी, धार्मिक, निर्मोही स्वभावामुळेच आपल्याकडचा गणपती त्यांना बहाल केला, ज्याची बुवांनी मनोभावे आराधना केली व आपल्या आयुष्याच्या शेवटी तो गणपती वसंतराव कुलकर्णींना सुपूर्त करून दादासाहेब आपटेंनी टाकलेल्या विश्वासाचा आदर केला.

**मत्सर** – जुन्या काळच्या गायकांतील मत्सरी हेव्यादाव्यापासून ते अलिप्त राहिले. इतकेच नव्हे, तर ते जीवनात कोणाबद्दलही वाईट बोलत नसत. विरोधकांसह सर्वांच्याबद्दल अपार प्रेम, सहानुभूती व साहाय्य करण्याची उत्सुकता ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची नजरेत भरणारी विशेषता होती.

'माणसात दोष असायचेच. आपण त्यांच्या गुणांकडे पाहावे' असे बुवा नेहमी म्हणत. त्यांच्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव संगीत क्षेत्रात स्वयंभू होता. कोल्हापूरला असताना जयपूर घराण्याच्या अल्लादिया खाँचा जबरदस्त प्रभाव असताना बुवांनी स्वतःचे स्वतंत्र स्थान निर्माण करून शिष्यांची एक पठडी तयार केली. मुंबईलाही विलायत हुसेन खाँसारखे अव्वल गायक, असामान्य शिक्षक, चतुर रचनाकार असे चतुरस्त्र गुरू होते. शेती शास्त्रानुसार मोठ्या वृक्षाच्या छायेत लहान रोपटी नीट उगवत नाहीत, असे म्हणतात पण विलायत हुसेन खाँसारख्या महान वटवृक्षाशेजारी असतानाही बुवांनी आपली अगणित शिष्य परंपरा निर्माण करून स्वतःचे स्वतंत्र पीठ उभारले. हे कार्य असामान्य व्यक्तिमत्त्वाचे आणि कर्तृत्वाचे द्योतक नव्हे काय? त्यांच्या आयुष्याकडे पाहता, बुवा षडरिपुंवर विजय मिळवणारे आदर्श जीवन जगले, असे ठामपणे म्हणता येईल.

विख्यात समीक्षक व गायक वामनराव देशपांडे यांचे पं. जगन्नाथबुवांच्या मूल्यमापनाबद्दलचे सविस्तर मत देणारा हा खूपच उतारा बोलका आहे. आपल्या लेखात वामनराव देशपांडे म्हणतात, 'प्रत्येक कालखंडामध्ये असा एक तरी पुरुष व्हावा लागतो की ज्याच्याकडे त्या त्या काळच्या सर्व मैफली गाजविणाऱ्या कलावंतांनीही तो व्यक्तिशः त्यांचा गुरू नसला, तरी गुरुच्याच आदराने पाहावे. सर्व मोठ्या मोठ्या बँकांना सल्ला देणारी व त्यांच्या अडचणी निवारणारी अशी रिझर्व्ह बँक असते, तेच स्थान या गुरुला मिळून सर्व समकालीन गायक,

गायिकांना तो मार्गदर्शक होतो. त्याला त्याकरिता कलावत्तेच्या दृष्टिने मैफलीचा समृद्ध अनुभव, तसेच अनेक चिजांचा संग्रह आणि रागरूपांची चिकित्सा करणारी निर्णायक बुद्धी वगैरे अनेक गुण असावे लागतात. तरच ते स्थान कदाचित लाभते, व लाभले तरीसुद्धा ते वयाची साठ–पासष्ठ वर्षे उलटल्यानंतरच. माझ्या पाहण्यात असे समस्त गायकवर्गाचे गुरुत्व पं. अल्लादिया खाँसाहेब यांनी भूषविले. त्यांच्यानंतर तो मान फैय्याजसाहेबांना मिळाला व त्याच्यानंतर ते पद विलायत हुसेन खाँसाहेबांनी मोठ्या सन्मानपूर्वक चालविले. बुवाही ही वाटचाल करीत आहेत. कारण त्या मानाला पात्र अशीच त्यांची विद्वत्ता, कलावत्ता व चिकित्सा आहे. तेव्हा आयुष्याच्या सायंकाळी हा मान बुवांना आता त्वरित मिळो,' ही इच्छा त्यांनी व्यक्त केली.

कोणीही जाणकार वामनरावांच्या शुभेच्छेशी सहमत होईल. या चरित्राचे स्पष्ट निष्कर्ष दोन काढता येतील. अध्यात्मिक व अधिभौतिक कोणत्याही दृष्टिकोनातून बुवा ही व्यक्ती म्हणून संगीत क्षेत्राला दैवी देणगी होती हा पहिला निष्कर्ष आणि दुसरा म्हणजे त्यांच्या सर्वांगीण अपूर्व योगदानामुळे संगीत क्षेत्रातील सर्वोच्च स्थानाकडे त्यांची वाटचाल चालू होती.

पण वामनरावांनी प्रकट केलेली शुभेच्छा परमेश्वरापर्यंत पोचली नाही असे दिसते. कारण पै.अल्लादियाखाँसाहेब, पै. फैय्याजखाँसाहेब व पै. विलायत हुसेन खाँसाहेब अशांसारख्या महान दिग्गजांची परमश्रेष्ठ परंपरा, आयुष्याच्या अखेरीस साठी–पासष्ठीनंतर चालविण्याच्या उंबरठ्यावर असताना

पं. जगन्नाथबुवा, तुम्हा आम्हा सर्वांच्या व संगीत दुनियेच्या दुर्दैवाने इहलोकातून अचानक निघून गेले. 'दैवं अन्यत्र चिंतयेत' हेच खरे.

पं. जगन्नाथबुवांच्यावर अतोनात प्रेम करणारे दीर्घकाळ त्यांच्या सहवासात असणारे पं. नीळकंठबुवा अभ्यंकर हे जगन्नाथबुवांची गायकी हुबेहुब मांडत. 'निर्गुणी' या उपनावाने त्यांनी अनेक चिजा बांधल्या आहेत. त्यापैकी बुवांच्या आवडत्या रागात आणि आवडत्या तालात, जगन्नाथबुवांच्यावरच बांधलेली प्रत्येकाच्या मनाचा ठाव घेणाऱ्या ह्या चीजेने या गुनिदासांच्या चरित्राचा समारोप करूया.

राग शिवमत भैरव (ताल द्रूत एकताल)

**काहे रुठ गये हो, मोरे 'गुनिदास' तुम मोरे 'गुनिदास' अब नेहा लगाये तुम,**
**चले गये 'प्राणपिया' के पास 'निर्गुणी' को अब नाही चैन ।।**

❖❖❖

# संगीत दुनियेचा साई

स्व. पं. जगन्नाथबुवा पुरोहित यांच्या चरित्राचा अभ्यास हा माझा संगीताचार्य या परिक्षेच्या शोधप्रबंधासाठी घेतलेला विषय होता. त्यांच्या चरित्राचा अभ्यास करीत असताना पं. जगन्नाथबुवांचा जन्म, त्यांचे आचार, त्यांचे विचार आणि त्यांच्या संकल्पना यांचा मी जसजसा वेध घेऊ लागले तसतसे मला पं. जगन्नाथबुवांच्या संगीत दुनियेतील जीवनपटांशी माझे उपास्य दैवत शिर्डीचे श्रीसद्‌गुरू साईनाथ महाराज यांच्या चरित्राशी कमालीचे साम्य आढळले. म्हणूनच या लेखाचा प्रपंच.

झाड किती मोठे ? ते कुठून आले ? कोणी आणले ? त्यावर फळे किती ? याचे मोजमाप आपण कधीच करत नाही. ती मधुर फळे आपल्याला कशी मिळतील एवढेच आपण पाहतो. मात्र साधुसंताच्या बाबतीत त्यांची जात, धर्म कूळ पाहण्याचा, पडताळण्याचा मोह आपण टाळू शकत नाही. वास्तविक ऋषीचे कूळ आणि नदीचे मूळ विचारू नये, असे म्हणतात. परंतु चरित्राच्या अभ्यासकाला चिकित्सकपणे हा शोध घ्यावाच लागतो. हा शोध घेण्याचा प्रयत्न जेव्हा मी केला तेव्हा लक्षात आले श्री साईनाथ आणि पं. जगन्नाथबुवा यांचा जन्म आणि बालपण याबद्दल निश्चित माहिती मिळत नाही. दोघांनीही त्याबद्दल मौनच पाळले आहे. पण आतापर्यंत मिळालेल्या माहितीनुसार दोघांचेही जन्मस्थान निजामप्रांतातच होते. त्यामुळे निजामी संस्कार दोघांच्याही पेहरावातून जाणवत होते आणि दोघांच्याही बोलण्यात एक ठसका होता. दोघांचीही प्रकृती प्रखर त्यामुळे फाजील सलगी करण्याची कोणाचीच हिंमत होत नसे.

कुठल्याही कलेची अथवा धर्माची अभिवृद्धी ही त्या देशातील, राज्यातील समाजातील स्थैर्य, शांती आणि समृद्धी यावर अवलंबून असते त्यामुळे आपल्या महाराष्ट्राचे महतभाग्यच म्हणावे लागेल. की प्रत्येक पिढीत कोणीतरी महान पुरुष जन्माला येऊन त्याने तन-मन-धनाने आपल्या समाजाला, संस्कृतीला धर्माला आणि कलेला जपले आणि सावरले.

श्रीसाई म्हणजे साऱ्यांचा ईश्वर. पूर्वी जेव्हा महाराष्ट्रातील नगर जिल्ह्यात दुष्काळाचे सावट पडले होते. याच परिस्थितीचा फायदा घेऊन ख्रिस्ती मिशनरी आपल्या धर्माची दीक्षा देऊन गरीब जनतेला धर्मांतर करण्यास भाग पाडत होते. त्यामुळे सामाजिक आणि धार्मिक अस्थिरता निर्माण झाली होती. तसेच काही धर्मांध वृत्तीमुळे हिंदू-मुस्लीम दुही निर्माण झाली होती. तर कोल्हापूर मुंबईमध्ये घराण्यांच्या भिंतीमुळे संगीतकला बंदिस्त झाली होती. त्यात कडक सोवळेपणा निर्माण झाला होता. या संमिश्र वातावरणातच दोन साईंनी आपल्या अवतार कार्याची सुरुवात केली.

एक होते नगर जिल्ह्यातील श्री क्षेत्र शैलधी (शिर्डी) येथील आधुनिक संत चुडामणी श्रीसच्चिदानंद समर्थ सद्गुरू साईबाबा. ज्यांनी सर्व धर्म समभाव लोकांच्यात रुजविला आणि सद्गुरू कोण, सतशिष्य कोण, सद्गुरू-सेवा-भक्ती कशी असते, याचे धडे, आधी केले मग सांगितले, या तत्त्वाप्रमाणे स्वतः गिरवून लोकांना दाखविले. तर दुसरे संगीत दुनियेचे साई गुनिदास पंडित जगन्नाथबुवा पुरोहित. ज्यांना संगीत विश्वातील कोणतेच क्षेत्र वर्ज्य नव्हते. प्रत्येक गायकीतील गुणांचे सुवर्णकण आत्मसात करून आपली स्वतःची सर्वांगसुंदर गानमूर्ती तयार करावी, हे त्यांच्या शिकवणुकीचे ब्रीदवाक्य होते.

आपल्या आर्यावर्तात, सद्गुरू कृपेवाचून मोक्ष नाही, अशी दृढ भावना आहे. समजूत आहे आणि हा सिद्धांत आजकालचा नाही तर फार पुरातन आहे. या सिद्धांताचा साक्षात्कार सद्गुरू साईबाबा आणि गुरू पं. जगन्नाथबुवा या दोनही व्यक्तिमत्त्वात अनुभवायला मिळतो.

ध्येयप्राप्तीसाठी साधकाचे प्रयत्न हवेतच पण नुसत्या प्रयत्नाने यश येत नाही तर त्या प्रयत्नांना यश येण्यासाठी गुरू कृपेचेही साहाय्य लागते. परमार्थ साधकांचीही हीच गोष्ट आहे. त्यांच्या प्रयत्नांना यश येण्यासाठी गुरुकृपाही हवीच. गुरुकृपा आणि गुरुकृपेबरोबरच ईशकृपा असेल तरच परमार्थात काय किंवा व्यवहारात काय आपल्याला योग्य स्थान गाठता येते. साधक किंवा मुमुक्षू कोणीही असो आपल्या गुरुवर नितांत प्रेम करून स्वतंत्र बुद्धिने विचार अभ्यास केल्यास ज्याच्या त्याच्या योग्यतेप्रमाणे गुरुकृपा होईलच. असा दृढविश्वास या दोघा सतपुरुषांच्या अंतःकरणात होता. म्हणूनच दोघांनीही आपल्या गुरुवर नितांत प्रेम केले. गुरुची मर्जी राखण्यासाठी तसेच विद्यासंपादनासाठी त्यांची अविश्रांत सेवा केली. बाबा म्हणत-

**होता पहा माझा गुरु । मोठा अवलिया कृपा सागरु ।**
**थकलो त्याची सेवा करकरू । कान मंत्रास देईना ।।**
**माझ्याही मनी प्रबळ आस, कधी न सोडावी तयाची कास ।**
**तया मुखेच घ्यावे मंत्रास, दीर्घ सायास करुनी ।।**

खरोखरच गुरुकृपेच्या प्राप्तीसाठी दोघांनी केलेल्या दीर्घ सायासांना जगात तोड नाही. आपल्या ध्येयपूर्तीसाठी कुठल्याही प्रकारची गुरुसेवा करण्यात दोघांनीही मागे पुढे पाहिले नाही.

**गुरु मुखातुनी बाहेर आले, योग्यायोग्य नाही पहाले ।**
**वचन वरचेवरी झेलीले, पाणीही वाहिली गुरुगृही ।।**

(श्रीसाई सच्चरित्र, अध्याय ४, पा न. १२७)

आपले इप्सित साध्य होण्यासाठी ती कामे दोघांनीही गुरुगृही केली. दोघांचीही गुरुच्या सहवासाची तीव्र तळमळ तर होतीच

**तन–मन–धन सवे भावे सद्गुरु पायी समर्पावे ।**
**अखंड आयुष्य वेचावे, गुरू सेवे लागुनी ।।**

(श्रीसाई सच्चरित्र, अध्याय पहिला)

गुरुदर्शनाचा योग बराच काळ आला नाही तेव्हा चंद्रकंसमध्ये पं. जगन्नाथबुवांनी बांधलेली ही स्वररुप आळवणी,

**ये दुःखवा मोरा कासे कहूँ री । मनभावन नही आयो रे मंदिर वा ।**
**प्राणपिया की बॉट तकत हूँ । दासगुनी पछतायो ।।**

तसेच आपले गुरू आग्र्याला आजारी असल्याचे कळल्यावर बुवांनी केलेलीही स्वरमय प्रार्थना पाहा

(राग अहिरभैरव)

**ते रो जिया सुख पावे । निसदीन मेरे गुणवन्ता ।**
**बिनती प्रभू से दासगुनी की । जुगजुग जियो मेरे प्राण ।।**

गुरुला आराम पडल्याचे कळल्यावर बांधलेली ही जोड

**बेग बेग आवो मंदिर । बहुत दीन न बीते ।**
**सूझत कछु नाही मोहे । निस दिन घडी पल छीन**
**गुनीदास को वरस । दी पै अब प्राणप्रिय ।।**

बुवा अशा बंदिशरूपी पुष्पांचा आपले गुरू खाँसाहेबावर वर्षाव करीत असत. तर बाबा आपल्या गुरुची भक्ती व प्रेम, भावना पुढील ओव्यामधून व्यक्त करतात.

**माझा गुरु पूर्ण काम, दोन पैशाचे काय काम ।**
**कैसे म्हणावे त्या निष्काम, शिष्यासी दाम मागे जो ।**
**ऐसी न शंका येवो मना । व्यावहारिक पैशाची न त्या कामना ।**
**ही तो नाही तयाची कल्पना कर्तव्य कांचना काय त्या ।।**
**निष्ठा आणि सबुरी, दोन हेच ते पैसे नव्हते आन ।**
**म्या ते तेंव्हाच टाकिले देओन, तेणे मज प्रसन्न गुरुमाय ।।**

अशी ही सेवेबरोबरच स्वररुपानी आणि भावरुपानी गुरुकृपा ओथंबत होती म्हणूनच सतशिष्यांच्या कसोटीत दोघेही पुरेपूर उतरलेले दिसतात.

बाबांनी शिष्यांचे पुढील तीन प्रकार सांगितले आहेत.

**न सांगता अभिष्ट जाणणे जाणणाऱ्या सेवा करू लागणे ।**
**प्रत्येक आज्ञेलागी न खोळंबणे जाणए उत्तम शिष्य तो ।**
**गुरुने आज्ञापिता मानणे अक्षरे अक्षर प्रतिपाळणे ।**
**कार्यातरी न विलंबणे जाणे मध्यम शिष्य तो ।।**
**प्रतिपदी प्रमाद करणे जाणा अधम शिष्य तो ।।**

श्रीसाईबाबा आणि पं. जगन्नाथबुवा या दोघांचाही गौरव उत्तम शिष्य म्हणून सर्वांनीच एकमुखाने केला आहे.

श्रीसाईंना परमार्थाची आवड तर बुवांना संगीताची, असे हे दोनही सतशिष्य उत्तम गुरू बनले. आणखीन एक गंमतीची गोष्ट म्हणजे बाबांना संगीताचे चांगले ज्ञान होते आणि बुवांना भक्तीची ओढ होती. हुमणाबाद येथील दत्तावतारी माणिक प्रभू यांचे बुवा उपासक होते.

दोघेही संसारी नव्हते. पण श्रीसाई जन्मसिद्ध पुरुष होते तर बुवा सर्वार्थानी संस्कारी कष्टसिद्ध पुरुष होते. वास्तविक बुवा पारमार्थिक क्षेत्रात जन्मले असते तर साईनाथ झाले असते. संगीत क्षेत्रात जन्मले म्हणून जगन्नाथबुवा झाले. संगीत हाच बुवांचा संसार होता. तर समाजोद्धार हा साईंचा संस्कार धर्म होता. दोघांनीही षडरिपूंवर मात केली होती. आपापल्या क्षेत्रातील संजीवनी विद्या प्राप्त करून घेत असताना, या दोन्ही आधुनिक कचांनी अवतीभवती व्यसनी, मोहमयी वातावरण असूनसुद्धा आपले शील, सत्व, चारित्र्य जीवापलीकडे जपले होते म्हणूनच बुवांचे अफाट ज्ञानभांडार, अध्यापन कौशल्य व चारित्र्यसंपन्न जीवन याबद्दल शिष्य परंपरेतील स्त्री–पुरुषांना त्यांच्याबद्दल अत्यादर आणि परमावधीचे प्रेम वाटत असे. हीच गोष्ट बाबांच्याही

बाबतीत सांगता येते. अशा या सात्त्विक सद्‌गुणी आणि शुचिर्भूत व्यक्तींच्या भोवती पावित्र्याचे दिव्य वलय निर्माण झाले होते.

दोघांच्या आयुष्यातील प्रत्येक गोष्ट अतिव कष्टसाध्य ठरली होती त्यामुळेच की काय, चमत्काराशिवाय नमस्कार नाही, याची पुरेपूर जाणीव या प्रसिद्धी पराङ्मुख दोन्ही अवलियांना होती. बाबांना वाण्याने तेल द्यायचे नाकारले तेव्हा न रागावता शांतपणे मशिदीत पणत्यात पाणी ओतून त्यांनी काकडे प्रज्वलित केले व दिवाळी साजरी केली. त्यावेळी लोकांना आश्चर्यातीत आनंद झाला आणि त्यानंतर हळूहळू महाराजांच्या महत्तेची, असामान्य तत्त्वाची जाणीव लोकांना होऊ लागली. तेच जगन्नाथबुवांच्या बाबतीतही झाले, असे म्हणता येईल. पुण्यातल्या मैफलीत पं. कुमार गंधर्वांनी बुवांचा जोगकंस प्रथमच प्रस्तुत केला आणि गाजविला. त्यामुळे बुवांच्या प्रतिभेची, ज्ञानाची आणि मोठेपणाची जाणीव लोकांना झाली आणि हळूहळू ते प्रकाश झोतात आले.

**□ सद्‌गुरु :**

**सदगुरु कोण हे सांगत असताना बाबा म्हणतात,**

**असोनी संपूर्ण शब्द ज्ञानी, पूर्णानुभवी अपरोक्ष दानी ।**

**त्याचाची अधिकार शिष्य प्रबोधिनी,**

**म्हणावे त्या लागोनी सदगुरू ।**

**शिष्यांपासून घ्यावी सेवा, स्वप्नीही न धरी ऐसिया भावा ।**

**उलट शिष्टार्थ निजदेह लागावा, इच्छी तो जाजा सदगुरु ।।**

बाबा सद्‌गुरू होते याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे त्यांच्या शिष्याने, दासगणुनी लिहिलेले श्रीसाईचरित्र, यात बाबांच्या व्यक्तिमत्त्वाचे सर्व पैलू उजळून निघाले आहेत. त्या चरित्र ग्रंथातून बाबांचा अफाट भक्तगण, ज्यांत लहान, थोर, गरीब–श्रीमंत–उच्चनीच सर्वांचा समावेश आहे जो एका आगळ्या तन्मयतेने एकरूप झालेला दिसतो. तसेच प्रत्येकाच्या मनातील बाबांच्याबद्दलची आदरयुक्त भक्ती आणि प्रेम याची जाणीव या ग्रंथातून पदोपदी होते.

पं. जगन्नाथबुवांचे आत्यंतिक गुरुनिष्ठेचे उदाहरण अनुसरून त्यांच्या अफाट शिष्यांनीही अत्यंत विनीत भावनेने व नम्रतेने जो गोडवा जीवनात आणला त्याचा मंद सुगंध दाही दिशात दरवळून, वातावरण प्रसन्न झाल्याखेरीज कसे राहील? गुरुबद्दलची भावना व्यक्त करणारी त्यांच्याच शिष्यांनी लिहिलेली

पुढील एक बंदिश उदाहरण म्हणून पुरेशी होईल

(राग ललत)

**हो सुरन में रस तुम हो । तालन में लय,**

**गुनिदास गीतन को भाव तुम हो ।।**

**जानगुनी तन में मन तुम**

**प्रकट किये सो विचार तुम**

**बरनीन जाय, मोसे गुन तुम्हारे ।।**

पं. सी. आर. व्यासांनी या बंदिशीतून जणू सर्व शिष्यांचे हृद्गत सांगितले आहे.

**जो नो मज भजे, जैशा जैशा भावे ।**

**तैसा तैसा पावे, मीही त्यासी ।।**


महाराजांकडे येणाऱ्यांमध्ये सकाम भक्तांचेच प्रमाण अधिक होते. पण महाराज त्यांची कामना पुरवून त्यांचे मन आत्यंतिक हिताकडे बेमालूमपणे वळवित असत. पं. जगन्नाथबुवांकडेही येणारे शिष्य अनेक उद्देश घेऊन येत. सर्वच शिष्य जबरदस्त तयारीचे आणि बुद्धीवान होते. पण या लोकोत्तर पुरुषाचे वैशिष्ट्य असे की शिस्तीचा बडगा उगारून आपल्या शिष्याचे विचार स्वातंत्र्य दडपून टाकण्याचा विचार त्यांच्या मोठ्या मनाला कधीही स्पर्शून गेला नाही.

बुवांच्या व्यक्तिमत्त्वाचे बंदे नाणे खणखणीत होते. बुवांचे काय किंवा बाबांचे काय सर्व व्यवहार विचार, आचार, पूर्ण प्रामाणिक मोकळे स्वार्थशून्य, तळमळीचे, स्वच्छ व संपूर्णपणे निरालस होते.

अशा या सत्पुरुषांचे चरित्र 'मरावे परी कीर्तीरूपे उरावे' या उक्तीप्रमाणे दीपस्तंभावत नव्या पिढीला सतत मार्गदर्शक आणि प्रेरक ठरेल यात शंका नाही.

❖❖❖

**पं. काणेबुवांच्या हस्ताक्षरातील जगन्नाथ बुवांनी बांधलेल्या स्वानंदीरागातील पं. सी. आर व्यासांनी बांधलेली जोडी चीज त्याचे नोटेशन**



| | |
|---|---|
| राग : जोगकंस | स्थायी : पीर पराई जानी नही बालमवा |
| ताल : त्रिताल | अंतरा : प्रानपिया तुम ऐसे निठुर भये, |
| (मध्य लय) | गुनिदास की सारी आस गमाई ।। |

## स्थायी

| | म नि | नि ध प – म |
| | पी | ऽ र ऽ प |

| प म – – – | रे गग – मप ग मम | ग – सा निसा | गसा नि ध – नि |
| रा ऽ ऽ ऽ | ऽऽ ऽ ऽऽ ऽऽ | ऽ ऽ इ, जाऽ | ऽऽ नी ऽ न |

| ग म ध नि सा ग म ध | नि सां नि ध ध | प म ध; |
| ही ऽ ऽ ऽ | ऽ बा ल म | वा हो ऽ; |

## अंतरा

| म ग | म नि ध – नि |
| प्रा | ऽ न ऽ पि |

| सा – – – | नि ध – नि – | सां – –, नि ध | नि सां गं मंपंमं |
| या ऽ ऽ ऽ | ऽ ऽ तु ऽ | म ऽ ऽ, ऐ | ऽ से ऽ निऽऽ |

| गं – सां – | सां नि सां निसां गंसां | नि ध – –, म ग | म नि ध – नि |
| ठु ऽ र ऽ | ऽ ऽ भऽ ऽऽ | ये ऽ ऽ, गु | नि दा ऽ स |

| सां – नि गं सां | नि ध – प म | प म म ध; नि ध | – प – म |
| की ऽ सा री | आ ऽ स ग | मा ई हो; पी | ऽ र ऽ प |
| + | २ | ० | ३ |

| | |
|---|---|
| राग : जौनभैरव<br>ताल : झपताल<br>(विलंबित) | स्थायी : अब मेरी सुनो तुम गुन के सागर। गुनवंता हो बलवंता ।।<br>अंतरा : प्रानपिया तुम महागुरू ग्यानी,<br>कीजे कृपा गुनिदास पे गुनन की ।। |

## स्थायी

| पग मग मप |
|---|
| अ ऽ बऽ |

| | | | |
|---|---|---|---|
| निध निध | प धम गमपम | गरे – | गरे – सा |
| मे ऽ | री ऽऽ सुऽऽऽ | नो ऽ | तु ऽ म |
| निध निध | निसां –, म | गमपध निसांरेंसां | निसां – निसां, रें सां |
| गुं नं | के ऽ, सा | गऽऽऽ ऽऽऽऽ | र ऽ गु, न ऽ |
| सांनि निध | धप –, पध नि,नि | नि ध | प, पग म |
| वं ऽ | ता ऽ, होऽ ऽ,ब | ल वं | ता, अ ब |
| + | २ | ० | ३ |

## अंतरा

| | | | |
|---|---|---|---|
| मग म | निध निध नि | सां – | निसां – सां |
| प्रा ऽ | न ऽ पि | या ऽ | तु ऽ म |
| निध निध | सां रेंसां सांरेंगं | रेंसां रेंनि | सां,रेंसां निध प |
| म हा | गु ऽऽ रुऽऽ | ग्याऽ ऽऽ | ऽ,ऽऽ नी ऽ |
| धप पगं | रें सां सांरें | सांनि सां | निध – प |
| की ऽ | जे ऽ कृ | पा ऽ | गु ऽ नि |
| + | २ | ० | ३ |
| मग म | पधनिसां रेंसांनिसां –, निधप | गम पम | गरेसा, मग म |
| दा ऽ | सऽऽऽ ऽऽऽऽ ऽ, पेऽ | ऽऽ गुन | नकी, अ ब |
| * | २ | ० | ३ |

| राग : जोगकंस | स्थायी : सुधर बर पाया नीके बनीके। इन भागनके आगे ।। |
|---|---|
| ताल : त्रिताल | अंतरा : औलिया अंबीया गौस कुतुब सब |
| (मध्यलय) | इन नबीजीके सिर छत्र धरो ।। |

## स्थायी

म रे म प गग
| प – धनि निध धप पम पपमग ग गमप,म | म –ऽऽ
| होऽऽऽ सुऽ धऽ रऽ ऽऽऽऽ ऽ बऽऽ,र | पाऽऽऽ
+

ग नि सा
| –मपमम गसा गसा गसा ध–, नि सा गम–,गम |
| ऽऽऽऽऽ ऽऽ ऽया, नीऽ केऽ,ब नी ऽकेऽ,इन |

नि सां नि प रे ग
| धनिसां––निसां गंसां ध–पमप– म– गग, मपमम गसा |
| भाऽऽऽ ऽऽऽ गन केऽऽऽऽऽ ऽऽ ऽऽ, आऽऽऽऽऽ |
+

सा म रे म
| ग सा, प–,धनि निध धप पम पपगम ग गमप,म |
| ऽ गे, होऽ,ऽऽ सुऽ धऽ रऽ, ऽऽऽऽ ऽ बऽऽ,र |

## अंतरा

म नि नि
| गम ध–, नि | सांनिसांसां–, धनि सांगं–मं पंमं गंसां गंसां
| औलि याऽ,अं | बीऽऽ याऽ, गौऽ सऽऽऽ कुऽ तुऽ ऽब
+

नि सां नि म नि नि
| ग गसांनि सांगंसां धम,गम धनिसांनिसां निसां,गंसां ध
| सऽऽऽ ऽऽऽ बऽ,इन नबीऽ जिकेऽऽ,सिऽ रऽ,
+

नि नि रे
| धनि सांगं –मं पंमं गंसा गंसां– ध पमप–म ग–म ग–,
| छऽ त्रऽ ऽऽ धऽ रोऽ ऽऽऽ ऽ ऽऽऽऽऽ ऽऽऽ ऽऽ

म प सा म रे म प
| गमपग मसा गसा; प–,धनि निध धप पम पपमग ग गमप,म |
| ऽऽऽऽ ऽऽ ऽऽ होऽ,ऽऽ सुऽ धऽ रऽ, ऽऽऽऽऽ बऽऽ,र |

## स्व. पं. जगन्नाथबुवा पुरोहित यांच्या जीवनातील ठळक घटनांची अंदाजे सनावळी

| | |
|---|---|
| दक्षिण हैद्राबाद येथे जन्म | १२ मार्च १९०४ |
| ५-६ वर्षांचे असताना मातुःश्रींचे निधन | १९१०-११ |
| ११ वर्षांचे असताना पितृवियोग | १९१५ |
| महंमदअली खाँना गाणे शिकविण्याची विनंती व त्याला महंमद अलींची मान्यता | १९२१ |
| बेळगावी काँग्रेस अधिवेशनासाठी प्रवास, तिथेच खाँसाहेबांचे गाणे ऐकले. | १९२४ |
| बद्रुजमाखाँनी आपले साडू विलायत हुसेनखाँशी ओळख करून दिली. | १९३० |
| तिरखवाँकडे शिक्षणासाठी गेले. | १९३० |
| महंमद अलीखाँचे निधन. | १९३२ |
| सरदार भाई कारदगेकरांचे माडीवर तिरखवाँचा गंडा बांधला. | १९३३ |
| विलायत हुसेन खाँ म्हैसूर युवराजांच्या आश्रयास. | १९३४ |
| गुलाममहंमद तलवंडीवाले यांचेशी कोल्हापुरात प्रथम भेट | १९३६ |
| महंमद अलींच्या निधनानंतर ४-५ वर्षांनी शब्बूखाँचे निधन | १९३६-३७ |
| म्हैसूरच्या युवराजांबरोबर बुवांचे युरोपच्या दौऱ्यावर प्रयाण. | १९३९ |

| | |
|---|---|
| विलायत हुसेन खाँचे मुंबईला कायम वास्तव्यासाठी म्हैसूरहून प्रयाण. | १९३९ |
| म्हैसूरच्या युवराजांचे मुंबईत देहावसन. | १९४० |
| कोल्हापुरात कायम वास्तव्यसाठी बुवांचे आगमन. | १९४० |
| मारुबिहाग रागातील द्रुत एकतालात बुवांनी बांधलेली पहिली चीज. | १९४२ |
| देवल क्लबचा हिरकमहोत्सव | १९४४ |
| कलंदर यांचे निधन | १९४४ |
| श्रीमंत आबासाहेब मुजुमदार षष्ट्यब्दीपूर्ती समारंभात कुमार गंधर्वांनी जोगकंस प्रथम गाजविला व संगीत जगताला ओळख झाली. | १९४४ |
| उ. मेहबूब खाँ मिरजकर यांचा कोल्हापूरात समारंभपूर्वक गंडा बांधला. | १९५२ |
| विलायत हुसेन खाँचे निधन. | १९६२ |
| मुंबईत एकसष्टीनिमित्त अभूतपूर्व सत्कार. | १९६५ |
| नागपूर येथे स्वरसाधनेतर्फे बुवांचा सत्कार | १९६७ |
| बुवांचे डोंबिवली मुक्कामी अकस्मात निधन. | २० ऑक्टोबर १९६८ |

❖❖❖



पं. द. वि. काणेबुवा

# पं .द. वि. काणेबुवांचे गुरू




कै. पं. दत्तुबुवा काळे, इचलकरंजी



पं. विनायकबुवा पटवर्धन, पुणे



पं.यशवंतबुवा मिराशी



पं.विलायत हुसेन खाँ, पं. जगन्नाथबुवा पुरोहित



इचलकरंजीत शास्त्रीय बैठकीवर घडविलेले भजनी मंडळा सोबत पं. काणेबुवा



पं. काणेबुवा षष्ट्यब्दिपूर्ती समारंभ मुंबईत सत्कार करताना सुधीर फडके
समवेत वसंतराव राजोपाध्ये, माणिक वर्मा व शिवानंद पाटील




अ. भा. गांधर्व महाविद्यालयातर्फे सन्मानित करताना प्रमोदचंद्र मौदगलय
सोबत छत्रपती शाहू महाराज



तबला–सोलो तिरखवाँ, पेटीवर काणेबुवा



तबला – बाबूराव गुरव, तंबोरा–शरद जांभेकर, गाताना गजाननराव माणकापुरे, तंबसे करीमसाहेब, नरेंद्र काणेकर, पेटीवर पं. काणेबुवा



इचलकरंजी समारंभ : डा.बा.–गजानन कांबळे, अनंतराव भिडे, वसंतराव देशपांडे, पु.ल.देशपांडे, पं.काणेबुवा, मोहन उत्तुरकर, मधुकर बिडकर, शरद इजारे



एक मैफल : तबला–बाबूराव गुरव, तंबोरा–करीमसाहेब,
गाताना पं. काणेबुवा, पेटीवर बापूसाहेब खारपंदे



डाव्या बाजूने, बापूसाहेब खारपंदे, रघु काळे, वस्ताद नवलगुंदकर, तिरखवाँ
पं. काणेबुवा, नारायण जोशी, बाबूराव गुरव, आयतोडेकर

# जडणघडण

☐ **बुवांचा जन्म** : १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धानंतर ईस्ट इंडिया कंपनीचा हिंदुस्थानातील कारभार संपला होता. शाहू महाराजांकडे अल्लादियाखाँसाहेब तर गगन बावड्यास रजबअल्ली खाँसाहेब दरबार गवई होते. पं. अब्दुलकरीम खाँसाहेब मिरजेत तर भूगंधर्व रहिमत खाँ कुरुंदवाडात वास्तव्य करून होते. कित्येक महान गायक इचलकरंजी व आसपासच्या भागात वास्तव्य करून होते. इचलकरंजी संस्थान अधिपतींनाही दरबार गायकांबद्दल आस्था, आत्मियता व अभिमान होता.



**श्रीमंत नारायणराव बाबासाहेब घोरपडे**
अधिपती – इचलकरंजी जहागीर

त्याच सुमारास पं. काणेबुवा यांचा जन्म २ मार्च १९२१ साली (बुधवार माघ व. अष्टमी शके १८४२) इचलकरंजी येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव विष्णू बळवंत काणे व आईचे नाव काशीताई. बुवांचे वडील उत्तम पेटी वाजवत असत. तसेच त्यांना सतार, दिलरुबा व तबलाही वाजवता येत होता. बुवांचे आजोबा बळवंतराव काणे. इचलकरंजी संस्थानातील दरबारचे कारभारी होते. सरकारने बऱ्याच जमिनी इनाम म्हणून त्यांना दिल्या होत्या. नारायणराव बाबासाहेबांचे दत्तकविधान झाल्यावर त्यांचे सर्व बघण्याचे काम बळवंतराव काणेंच्यावर सोपवले होते.

त्याकाळच्या राजकीय व सामाजिक परिस्थितीचा आढावा घेतला तर असे आढळून येते की, उत्तरेच्या मानाने कलावंतांकडे बघण्याचा महाराष्ट्राचा दृष्टिकोन थोडा तुच्छतेचाच होता.




पं.काणेबुवा व त्यांच्या पत्नी सौ.मालती काणे, मा.डा.: मुलगा गजानन, चंद्रकांत, सौ.प्रतिभा (सून) श्रीमती प्रभावती (मुलगी)




गुरुपौर्णिमा कार्यक्रम : पं.काणेबुवा यांच्या समवेत लेखिका डॉ. सौ. मंगला आपटे

जनमानस युद्धामुळं भडकलेलं होतं आणि ते शांत करण्यासाठी व्हिक्टोरिया राणीनं आपल्या जाहीरनाम्यात काही चांगल्या योजना जनतेसाठी पुढं आणल्या. शांतता आणि स्वास्थ्य निर्माण करण्यासाठी त्यांची चांगली मदत झाली.

मुसलमानी अंमलात राजाश्रय असलेल्या ललित कलांच्या परंपरांना दिल्ली व त्या आसपासच्या संस्थानातून पुन्हा ऊर्जितावस्था येऊ लागली होती. ग्वाल्हेरला संगीताच्या विद्यापीठाचा दर्जा प्राप्त झाला होता. संस्कृतच्या शिक्षणासाठी काशीला जावं आणि संगीत विद्येसाठी ग्वाल्हेरला जावं असा परिपाठ झाला होता. ग्वाल्हेरचा राजदरबार गुणिजनांच्या बाबतीत सर्वात समृद्ध मानला जात होता. महाराष्ट्रात मात्र कलावंतांना जगणे अवघड झाले होते. या पार्श्वभूमीवर गायक व गानकला याचा उद्धार करण्यासाठी गायनमहर्षी पं. बाळकृष्णबुवा यांनी संगीताचे तीर्थक्षेत्र ठरलेल्या ग्वाल्हेर येथील गायकीची गंगोत्री भगीरथ प्रयत्नाने दक्षिणेत आणली. या गायनाचार्याला राजाश्रय देण्याचे तितकेच महान कार्य कै. नारायणराव बाबासाहेब घोरपडे या गुणज्ञ राजाने केले.

पं. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर यांची १९०० साली संस्थानचे दरबार गवई म्हणून केलेली नेमणूक ही एका अर्थाने सुरेल शतकाची पहाट होती.

श्रीमंत बाबासाहेब व बाळकृष्णबुवा म्हणजे 'गुणी गुणं वेति' या उक्तीचा आदर्श मानावा लागेल. श्रीमंतांची शिस्त अगदी कडक असे. पण बुवासाहेबांच्या बाबतीत हा रसिक राजा प्रेमादराने सर्व नियम विसरे. त्यावेळी इचलकरंजी नगरी राजवाड्याच्या दरवाज्यावर असलेल्या दालनातून उमटणाऱ्या सनईच्या सुराने जागी होत असे. संध्याकाळीही सनईचे सूर घुमत असत. नवरात्रात पहाटे राजवाड्यातून व्यंकटेशाची पालखी पंचगंगा नदीवर स्नान करून वाजत गाजत राजवाड्यात येत असे. पुढे शिंगवाला शिंग वाजवीत जाई व त्यामागे मशालजी आणि इतर लवाजमा असे. राजवाड्यांत प्रवेश केल्याबरोबर सर्व उपस्थितांना दालचिनीचा काढा पेय म्हणून दिला जाई. त्या नंतर वेदपठण होत असे. नवरात्रीतील नऊ दिवस संगीताची पर्वणी असे. नामवंत किर्तनकार व गवई आपली कला सादर करत असत. इ. स. १९०० ते इ. स. १९४४ या कालखंडात इचलकरंजी संस्थान हे संगीताचे तीर्थक्षेत्र झाले होते. फलटणकर, काशीकर, पलुसकर, गणेशवाडीकर यासारखे ज्येष्ठ किर्तनकार तर रहिमत खाँ, नत्थन खाँ, फैय्याज खाँ, अब्दुलकरीम खाँ, (अब्दुलकरीम खाँ तर वर्षातून तीन–चार वेळा,) रामकृष्णबुवा वझे, शिवरामबुवा वझे, कृष्णराव पंडित, राजाभैया पूंछवाले, मा. कृष्णराव, मल्लिकार्जुन मन्सूर इत्यादी दिग्गज कलाकार

आपली कला सादर करण्यासाठी धडपडत असत. अशा थोर कलाकारांच्या कलेचा आनंद लुटण्यासाठी इचलकरंजीतील दरबारी मानकरी व इतर रसिक आपापल्या ठरवलेल्या जागी नेमाने हजर राहात असत. अशा मैफलित माझे आजोबा इनामदार– माधव रामचंद्र रानडे यांचे स्थान सरकारांच्या खालोखाल दुसरे असे तर पं. काणेबुवांचे वडील कै. विष्णू बळवंत काणे यांचे स्थान गवयांच्या साथीदारांच्या ओळीत असे. नारायणराव बाबासाहेब वेळेच्या बाबतीत अतिशय काटेकोर होते. सर्व समारंभ वेळेवर सुरू होई आणि ठरविलेल्या कार्यक्रमानुसार थाटात संपन्न होई.संपूर्ण सोहळा देखणा असे. नारायणराव बाबासाहेब माडीवरून दरबारात प्रवेश करताना सर्वजण आदराने उभे राहात. प्रत्येक दिवशी सरकारांचा पोषाख वेगळ्या रंगाचा असे. ज्या रंगाची पगडी त्याच रंगाचे उपरणे आणि त्याच रंगाचा अंगठीतील मोठा खडा लोकांचे लक्ष वेधून घेत असे. एकूण अभिजात संगीत आणि उत्तम नियोजन यांचा वस्तूपाठच यातून मिळत असे.

□ **इचलकरंजीतील बालपण** : बाबासाहेबांसारख्या गुणज्ञ राजामुळे आणि पं. बाळकृष्णबुवा यांच्या पंचवीस वर्षांच्या वास्तव्यामुळे इचलकरंजी नगरीस संगीताचे सुरम्य वातावरण लाभलेले होते. अशा सांगीतिक वातावरणात आणि संगीताचा वारसा लाभलेल्या घरात काणेबुवांचा जन्म झाल्यामुळे बालपणापासूनच संगीताचे बाळकडू बुवांना मिळत गेले.

असे जरी असले तरी बुवांची कौटुंबिक परिस्थिती त्यांच्या जन्माच्या वेळी अनुकूल नव्हती. बुवांचे वडील विष्णुपंत हे जन्मांध होते व बुवांचे जन्मापूर्वीची अनेक अपत्ये जन्मतःच गेल्यामुळे बुवांची आई काशीताई यांची मानसिक अवस्था अस्थिर होती. अशा परिस्थितीत नवससायासाने जन्मलेल्या काणेबुवांचे नाव 'दत्तात्रय' ठेवले गेले. सगळेच लाडानी त्याला 'बाळ' म्हणत. अनेक अपत्यानंतर हा मुलगा झाला म्हणून अर्थातच 'बाळ' काशीताई–विष्णुपंतांचा अतिशय लाडका होता. तळहाताच्या फोडाप्रमाणे ते त्याचा सांभाळ करीत. तो झाला तेव्हा घरात अनेक लोक, कोणी पेटी शिकायला, कोणी दिलरुबा शिकायला, कोणी सतार शिकायला तर कोणी तबला मृदुंगावर प्राथमिक धडे घेण्यासाठी, येतच असत. विष्णुपंत दरबारात किर्तनाबरोबरच पेटीच्या आणि गायनाबरोबरच तबल्याच्या साथीला जात असत. त्याकाळात शास्त्रीय संगीत मैफलीला पेटीची साथ नसे. सारंगी किंवा कधीकधी फक्त दोन तंबोऱ्याच्या साथीवरच रागदारी मैफलीत रंग भरावा लागे. त्या काळात माईकही नव्हते. अशा प्रतिकूल परिस्थितीत गवयाला स्वतःच्या आवाजाच्या फेकीवर मैफल मारावी लागत

असे. त्यामुळे पल्लेदार भारदस्त आवाज हे त्या काळातल्या गायकीचे एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य मानले जाई. शेवटच्या ओळीपर्यंत सुस्पष्ट आणि व्यवस्थित ज्याचे गाणे ऐकायला जाई त्या कलाकाराच्या कार्यक्रमाला गर्दी होई. संगीत क्षेत्रातलं हे एक तत्त्व आजही गायन क्षेत्रात महत्त्वपूर्ण मानलं जातं.

सुरांच्या मंगलस्नानात इचलकरंजी नगरी न्हाऊन निघत होती. विष्णुपंत आपल्या शिकवण्या बाळला मांडीवर घेऊनच करत असत. शिकायला येणाऱ्या अनेक शिष्यांमध्ये, गुलगुंजेबुवा तबला शिकण्यास येत असत. पण काही दिवसांनी विष्णुपंतांनी त्यांना तबला शिकवण्याऐवजी 'गाणे शिकावे,' असा सल्ला दिला. कारण त्यावेळी तबल्याचे एकल वाद्य म्हणून कार्यक्रम होत नसत. तबल्याला त्यावेळी एक साथीचे वाद्य एवढेच दुय्यम स्थान होते. कीर्तनाची गाण्याची साथ केली की तबलजीला चार आणे, आठ आणे मिळत. हा त्यांचा स्वानुभव होता. शिवाय गुलगुंजेबुवांचा आवाज हलका व गोड होता. गायक म्हणून त्यांनी आपले स्थान प्रस्थापित करावे असे त्यांना मनापासून वाटत होते. त्यामुळे विष्णुपंतांच्या सांगण्यावरून गुलगुंजे पं.बाळकृष्णबुवांचे शिष्य बनले. विष्णुपंताकडे शिकायला येणाऱ्यांमध्ये सरकारांच्या नाती, राजदरबारातील दत्तक भगिनी, आक्कासाहेब व ताईसाहेब यांचा समावेश होता. जवळजवळ सहा–सात वर्षे त्यांनी विष्णुपंतांकडे शिक्षण घेतले. त्या नेहमी म्हणत, 'गाण्याचा कान आम्हाला विष्णुपंतांनी दिला.' या सर्व शिकवण्या करता करता वडिलांच्या मांडीवर 'बाळा'ला सुरांचे बाळकडूच मिळत होते. लाडका असल्यामुळे लहानपणी अतिशय व्रात्य पण वडिलांच्या शिकविण्या सुरू असताना शांतपणे तो वडिलांच्या शिकविण्याचा आनंद घेत असे. पुढे मोठे कारखानदार बनलेले रामभाऊ कांबळेही बुवांकडे शिकू लागले होते. विष्णुपंत संगीताचे धडे पेटीवरूनच गाणे शिकणाऱ्यांना देत असत. दरबारात कार्यक्रमाला जाताना देखील बाळला न विसरता बरोबर घेऊन जात.

वयाच्या चौथ्या, पाचव्या वर्षीच सतारीच्या बोलांचे स्वरलिपी लेखन बाळ अस्खलितपणे करू लागला होता. घरी येणारे शिष्यदेखील बाळ असे स्वरलिपी लेखन लगोलग कसा करू शकतो आणि ते सुद्धा इतक्या लहान वयात, म्हणून आश्चर्य करीत असत. माणूस काही गुण आई वडिलांकडून ,काही कौटुंबिक वातावरणातून तर काही गुण समाजशिक्षणाच्या माध्यमातून घेण्याचा प्रयत्न करीत असतो. तसेच काही संस्कार सामाजिक आणि राजकीय वातावरणातून अखंड होत असतात. त्यामुळे सातव्या–आठव्या वर्षी पेटीची साथ करण्याइतपत उत्तम पेटी बाळ वाजवू लागला होता.

बाळची शिकवणी घेताना विष्णुपंतांनी प्रथम अनेक रागांची सरगम गीते त्याच्याकडून घटवून घेतली होती. तसेच सतारीच्या गती ते वाजवत असत. आणि बाळ त्या गती तोंडाने **दा–दिडदा** अशा बोलाने घटवत असे. स्वरलिपी–लेखन तर काय तयारच होते ! पाश्चात्य संगीताची झलक, इंग्लिश बँडची सरगम पेटीवर वाजवून विष्णुपंत दाखवित असत. उदा. **साग, साग, मगरेसा, नी रे नी रे नी रे ग रे सा नी...** दहाव्या–अकराव्या वर्षांपर्यंत बाळ तबला पखवाजही वाजवू लागला होता. तो आळस न करता वडिलांचे बोट धरून राजवाड्यात मैफली, किर्तने ऐकायला जाई व तिथंच झोपे. अर्थात झोपला असला तरी कान आपले काम करीतच असत. पै. अब्दुल करीम खाँचे गाणे वर्षातून दोन–तीन वेळा तरी दरबारात होत असे. राजवाड्यात मांसाहार निषिद्ध होता. त्यामुळे राजवाड्याच्या प्रवेशद्वाराला लागून असलेल्या पागा इमारतीत त्यांची राहण्याची खास व्यवस्था असे. त्यांच्या मैफली बाळ मनापासून ऐके. त्यामुळे त्यांच्या गाण्याचा प्रभाव बाळवर जास्त होता. त्याकाळी स्त्रियांच्या मैफिली होत नसत. गाणे शिकणाऱ्या बायका उत्तम गात पण त्या नायकीणीच असायच्या. बाळकृष्णबुवांचे अनेक शिष्य त्या काळात नुसत्या गाण्यावर उदरनिर्वाह करणारे होते. त्यापैकी जोग बेळगावला स्थायिक झाले तर मुणगेकर मुंबईला गेले. देसाईबुवा, प्रभाकर भिडे, इंगळे हेही इचलकरंजीतून बाहेर पडले होते. तरीदेखील इचलकरंजीत संगीताचे वातावरण जागृत ठेवण्याचे काम विष्णुबुवांचे समकालीन, बाळुबुवा इजारेंनी केले. अशा वातावरणात बाळचे बालपण संगीताच्या सुरांनी आकार घेत होते. बापलेकांची जोडी चांगली जमली होती. सरकारांची मेहुणी ज्यांना दिली होती ते फडणीस उत्तम किर्तने करत पण त्यांचा आवाज बेताचा होता. त्यामुळे बाळचे वडील त्यांच्या साथीला बसायला तयार नसत. पण बाळ मात्र ती उणीव भरून काढत असे. नम्रता, चिकाटी व मोठ्यांचे आशीर्वाद वडिलांमुळे बाळला लहानपणीच लाभले होते.

१९२७ ते २८ चा काळ. नरसोबा कट्ट्यावर कोणा साधू महाराजांचे भजन व प्रवचन होते. आपल्या वडिलांबरोबर बाळही प्रवचनाला गेला. ते वय प्रवचन वगैरे ऐकण्याचं नव्हतं. स्टेजवर मधोमध एक तेजःपुंज व्यक्ती रूपेरी दाढी व जटाधारी भगवी वस्त्रे परिधान करून बसली होती. बाजूला तबला, पेटी, दिलरुबा घेऊन मंडळी सज्ज होती. मागे शिष्यवृंद सुरेल तानपुरे छेडत बसला होता. कार्यक्रम संपल्यावर वडिलांच्या सांगण्यावरून बाळने त्यांना साष्टांग नमस्कार घातला होता. त्या साधूमहाराजांनीही बाळला भरभरून आशीर्वाद दिला होता. ते साधू महाराज म्हणजे दुसरं तिसरं कोणी नसून पं. विष्णू दिगंबर पलुस्कर होते.

□ **पुण्यातील संगीत शिक्षण** : एकदा पं. बाळकृष्णबुवांचे शिष्य भाटेबुवा विष्णुपंताच्या घरी आले होते. ते नाटक कंपनीत कामाला होते. बाळ काणे चांगला गातो, पेटी छान वाजवतो म्हणून त्याने नाटक कंपनीत यावे, अशी इच्छा त्यांनी व्यक्त केली. किर्तनकार फडणीसांनी ही वार्ता सरकारांच्या कानावर घातली व म्हणाले, 'बाळ, आता वडिलांपेक्षा उत्तम साथ करतो. आवाजही चांगला आहे.' कारण किर्तनाच्या पूर्वरंगानंतर उत्तररंग सुरू होण्यापूर्वी बाळ कधी एखादे भजन, कधी एखादे गाणे सुरेल आवाजात पेश करून लोकांची दाद मिळवत असे. तसेच कोणी कधी केव्हाही साथीला बोलावले तर नाही म्हणत नसे. अतिशय सालस व नम्र. त्यांच्या चांगल्या वागणुकीची खबर अधिपतींपर्यंत किर्तनकार फडणीसांनीच पोचवली होती. तेव्हा अधिपतींनी दत्तात्रयाला नाटक कंपनीत पाठविण्यास साफ नकार दिला. प्राथमिक धडे वडिलांकडे पूर्ण झाल्यावर आपल्या मुलाने इंग्रजी शाळेत शिकावे म्हणून विष्णुपंतांनी अधिपतींकडे शब्द टाकला. तेव्हा आपल्याकडे कायम नोकरीत असलेल्या घराण्यातील मुलगा गाणे शिकला आणि उत्तम गवई झाला तर इचलकरंजीचे नाव उज्वल करेल, असा विश्वास श्रीमंतांनी व्यक्त केला व त्यांना गाणे शिकण्यास पाठविण्याचा सल्ला दिला. त्या काळात इचलकरंजीत केशवबुवा इंगळे, बाळुबुवा इजारे, दत्तोपंत काळे आदी मंडळी संगीताचे धडे विद्यार्थ्यांना देत होतीच. बाळच्या वडिलांनी काळेबुवांच्याकडे आपल्या मुलाने संगीताचे धडे घ्यावेत अशी इच्छा व्यक्त केली त्यामुळे दत्तोपंत काळे यांच्याकडे बाळचे शिक्षण सुरू झाले.

दत्तोपंत काळ्यांना बाळकृष्णबुवांची तालीम लाभली होती. बासरीसारखा मधुर आवाज, स्पष्ट सफाईदार तान, दमदारपणा आणि हरकती मुरक्यांनी नटलेला ढंगदारपणा ही त्यांची खास वैशिष्ट्ये होती. तारसप्तकात भपकन अचानक उसळी मारून डौलदारपणे खळाळत खाली येणारी स्वच्छ दाणेदार आकारयुक्त अवरोही तान हे ग्वाल्हेर घराण्याचे वैशिष्ट्य. तो वारसा या नगरीतील नंतरच्या पिढीला प्रामुख्याने पोचविण्याचे काम त्यांचेच. उंचपुरे, देखणे, दत्तोपंत तरुणपणी रंगभूमीवरही गाजले होते. बाळकृष्णबुवांनी आपले चिरंजीव, आण्णाबुवा यांना बालगंधर्वांच्या निमंत्रणाचा स्वीकार करण्यास परवानगी दिली नाही. पण त्यांच्या या स्थानिक रसिक शिष्याने, हौशी नट म्हणून का होईना ग्वाल्हेर गायकीला, बाळकृष्णबुवांचे नातू शिष्य, विनायकबुवा पटवर्धन यांच्या आधीच रंगभूमी दाखवून आणली होती. काळेबुवा **चंद्रिका ही जणु... दे हातां शरणांगता** सारखी अनेक नाट्यगीते बहारदार म्हणत. पण घरची परिस्थिती, दम्यासारख्या व्याधीचा त्रास यामुळे जन्मजात अनुकूलता असूनही

या अतिगुणी गायकाला स्वास्थ्य व उसंत या अभावी म्हणावी तशी प्रसिद्धी लाभली नाही. बाळकृष्णबुवांच्या घरचे व्यवहार हेच अखेरपर्यंत पाहात होते. बुवासाहेबांच्या देहावसनानंतर काही काळ हे इचलकरंजीचे दरबार गवई होते. तर असा हा समर्थ व जबरदस्त गुरू प्रथम शिक्षणातच बाळला लाभला होता. त्यामुळे ग्वाल्हेर गायकीची आक्रमकता, शुद्धता आणि बालगंधर्व नाट्यगीतांचा नखरा बाळच्या गाण्यात उतरू लागला होता. त्याकाळात बाळबरोबर गणेश दांडेकर व पेंडसे हेही विद्यार्थी गाणे शिकत होते. काळेबुवांच्या प्रकृतिअस्वास्थतेमुळे शिकवणीत नियमितपणा राहात नव्हता पण गायकी गळ्यावर चढण्यासाठी कोवळ्या वयात काळेबुवांसारखा गुरू बाळला लाभला हे त्याचे भाग्यच. विष्णुपंतांना संगीतातील चांगले वाईट कोणते याचे उत्तम ज्ञान असल्यामुळे त्यांनी आपल्या मुलाला अशा गुरुकडे पाठवले हेही तितकेच खरे.

□ **पुण्यातल्या गांधर्व महाविद्यालयात** : शिकवणीतील अनियमितपणामुळे बाळला आपला वेळ फुकट चालला आहे असे वाटू लागले. तोपर्यंत बाळच्या गाण्यातील तयारीच्या बातम्या सरकारपर्यंत पोचल्या होत्या. काळेबुवांच्या प्रकृती अस्वास्थ्यामुळे बाळच्या संगीताचे शिक्षण थांबता कामा नये याची जाणीव अधिपतींना होती. म्हणूनच त्यांनी बाळला पुण्यास पाठवण्याचा निर्णय घेतला आणि श्रीमंत नारायणराव घोरपडे सरकारांनी बाळला संगीताच्या पुढील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती जाहीर केली. या शिदोरीमुळे बाळ पुण्याला इ. स. १९३९ मध्ये गांधर्व महाविद्यालयात पं. विनायकराव पटवर्धन यांच्याकडे द. वि. काणे म्हणून दाखल झाला.

त्यावेळी पं. विनायकराव पटवर्धन यांचे नाव पं. विष्णु दिगंबर पलुस्कर यांच्या प्रमुख शिष्यापैकी एक म्हणून गाजत होते. गुरुंकडून विद्या प्राप्त झाल्यावर पं. विनायकबुवांनी संपूर्ण भारतात अनेक मैफली केल्या व त्यानंतर गंधर्व नाटक मंडळीत अनेक वर्षे नायकांच्या यशस्वी भूमिका साकारल्या. त्याचवेळेस त्यांनी पुण्यात गांधर्व महाविद्यालयाची स्थापना केली जे आजही चालू आहे. संपूर्ण भारतातील गांधर्व महाविद्यालयाच्या सर्व शाखा त्या काळात पं. विनायकबुवांच्या मार्गदर्शनाखाली चालत होत्या. परीक्षा पद्धतीच्या दृष्टिने स्वरलिपीबद्ध बंदिशीची रागविज्ञान ही पुस्तके लिहून, संगीत क्षेत्रात येऊ पाहणाऱ्या व संगीताबद्दल आस्था, रुची असणाऱ्या सर्वांनाच सहज ज्ञानाचा मार्ग त्यांनी खुला केला ही संगीत क्षेत्राला, पं. विनायकबुवांनी दिलेली फार मोठी देणगी आहे. अलीकडे पूर्वीची गुरुकुल पद्धती जवळजवळ लयाला जात असताना त्यांच्या या कार्याचे महत्त्व प्रकर्षाने जाणवते.

पं. विनायकरावांकडे द. वि. काणे सोबत एकूण दहाजण, गांधर्व महाविद्यालयातच राहात असत. त्यात गोखले, मोडक, द. वि. उर्फ बापूराव पलुसकर, नारायणराव पटवर्धन (विनायकबुवांचा मोठा मुलगा), नीळकंठ अभ्यंकर, राम मराठे आदी मंडळी विद्यालयात विनायकबुवांकडे संगीताची संथा घेत होती. विद्यालयाचा पसारा दांडगा होता. विनायकबुवांची शिस्तही तितकीच कडक होती. वेळच्यावेळी उठणे, स्वतःचे कपडे स्वतः धुणे, नियमित जेवण, नियमित रियाज असा चाकोरीबद्ध दिनक्रम असे. कपड्यांना इस्त्री वगैरे करण्यात वेळ घालविणे त्यांना पसंत नसे. व्यवस्थित झटकून कपडे वाळविले की आपोआप इस्त्रीसारखे होतात अशी त्यांची धारणा होती. बिडी, काडी, तंबाखु तर सोडाच सुपारीचीसुद्धा सवय त्यांना चालायची नाही. गाण्याबरोबरच चांगले वागावे कसे याचे अतिशय उत्तम मार्गदर्शन ते विद्यार्थ्यांना करत असत. त्यामुळे विनायकबुवांचा शिष्य बाहेर वावगे वागूच शकणार नाही, अशी त्यांची ख्याती होती. विद्यालयात राहाणाऱ्यांना सकाळी विशेष तालीम असे. त्यालाच खास 'तालीम' म्हणत. संध्याकाळी बाहेरून येणाऱ्या इतर विद्यार्थ्यांना जी तालीम दिली जाई त्याला 'आम' तालीम म्हणत. राग विज्ञान मधील अभ्यासक्रमाप्रमाणे विद्यालयात काणेबुवांची तालीम सुरू होती. १९३९ ते १९४४ अशी सलग पाच वर्षे अथक परिश्रमाने काणेबुवांनी ही तालीम घेतली. १९४२ साली त्यांनी संगीत विशारदची परीक्षा दिली व त्यात ते प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाले. काणेबुवांनी श्रीमंत सरकारना ही बातमी तातडीने पत्राने कळवली. श्रीमंतांनी आपला आनंद विष्णुपंतांकडे बोलून दाखवला.

काणेबुवांची प्रगती चांगलीच झाली होती. ते आता खासगी मैफलीही करू लागले होते. दोन द. विं.ची जुगलबंदी तर पुण्यात बऱ्याचवेळा त्या वेळी लोकांना ऐकायला मिळाली आहे. दोन द. वि. म्हणजेच दत्तात्रय विष्णु काणे आणि दत्तात्रय विष्णु पलुस्कर होय. पं. विनायकबुवा जेव्हा मैफलीसाठी दौऱ्यावर जात, तेव्हा पं. राम मराठे आणि काणेबुवा यांच्यावर वर्गाची जबाबदारी असे. मग त्यावेळी या दोघांची विद्यालयात धमालच चालायची. आपल्या ज्युनिअर्सना ही दोघे सर्व कामे करायला लावत. यामध्ये एक नीळकंठबुवा अभ्यंकरही होते. पं. विनायकबुवांचे दौरे, सिंध, सिक्रापूर, कराची असे लांब-लांब असायचे आणि त्यावेळी त्यांच्या मैफिलीत सहभागी होण्यासाठी काणेबुवाही कधी कधी जात असत. विशारद झाल्यानंतर जेव्हा काणेबुवा सरकारना भेटण्यासाठी इचलकरंजीत आले तेव्हा सरकारांच्या इच्छेनुसार बुवांनी पाच वर्षांच्या पुण्यातल्या गानतपश्चर्येची झलक दरबारात सादर केली. त्या

बैठकीत तबलजी, काणेबुवा व श्रीमंत सरकार या व्यतिरिक्त अन्य कोणीही नव्हते. बुवांच्या गाण्यातील प्रगतीवर सवरकारांनी समाधान व्यक्त केले. त्याचवेळी विलिंग्डन कॉलेजमध्ये शिकणारे इचलकरंजीचे अनंतराव भिडे कॉलेजचे कल्चरल सेक्रेटरी होते. त्यांनी बुवांच्या गाण्याचा कार्यक्रम कॉलेजमध्ये ठरविला. कॉलेजमधील मुले त्यावेळी शास्त्रीय संगीताचे कार्यक्रम होऊ देत नसत. तेव्हा अनंतरावांनी आपल्या दोन अंगठ्या बुवांना घालण्यास दिल्या व गायकाचा प्रभाव पडावा म्हणून त्यांचे बंधू प्रभाकर भिडे यांचा वूलनचा कोट बुवांच्या हाफशर्टवर घालण्यास सांगितला. कार्यक्रमात गोंधळ होऊ नये म्हणून त्यावेळचे प्रिन्सिपॉल पंडीत मागच्या रांगेत मुद्दाम बसले होते. बुवांच्या सुरेल आवाजाने, दाणेदार तानांनी मैफिल चांगलीच रंगली.

त्यानंतर १९४३ साली काणेबुवा बडोदा, दिल्ली, लखनौ अशा दौऱ्यावर पं. विनायकबुवांबरोबर गेले होते. दौऱ्यावरून परतल्यावर त्यांना श्रीमंत सरकार कालवश झाल्याची दुःखद बातमी समजली. या पाठोपाठच बुवांचे वडील विष्णुपंत यांना १९४५ साली देवाज्ञा झाली आणि बुवांचे पितृछत्र हरपले. सरकारांच्या निधनानंतर काणेबुवांची शिष्यवृत्तीही बंद करण्यात आली. या दुहेरी आपत्तीमुळे, काणेबुवांना इचलकरंजीस परत जावे लागले.

❖❖❖

२

# गंडाबंधन

अशा बिकट परिस्थितीत त्यावेळी फर्ग्युसन कॉलेजमध्ये असलेले ग. ह. रानडे यांनी बुवांना मदतीचा हात दिला. ग. ह. रानडे हे मूळचे सांगलीचे असल्यामुळे बुवांना चांगले ओळखत होते. बुवांचे संगीत शिक्षण खंडीत होऊ नये म्हणून त्यांनी त्यांचे स्नेही, पुण्याचे डॉ. भडकमकर यांना बुवांना मदत करण्याची विनंती केली. त्या काळात डॉ. भडकमकर संगीत शिक्षणासाठी दोन शिष्यवृत्त्या दोन वर्षासाठी देत असत. त्यातील एक शिष्यवृत्ती ग. ह. रानडे यांच्या सांगण्यावरुन भडकमकर यांनी द. वि. काणेबुवांना घोषित केली. दुसरी शिष्यवृत्ती यशवंतबुवा जोशी यांना दिली होती पुण्याला जाण्यापूर्वी बुवांची पहिली मैफिल इचलकरंजीचे कारखानदार रामभाऊ कांबळे यांनी बिदागी देऊन ठरवली.निमित्त होतं काणेबुवांचे वडील आणि रामभाऊचे गानगुरू विष्णुपंत काणे यांची पहिली पुण्यतिथी. त्यानंतर दुसरी मोठी मैफिल मुसळे यांनी त्यांच्या माडीवर शंभर रु. बिदागी देऊन केली. त्यावेळी शंभर रु. बिदागी घेऊन मैफिल करणारे इचलकरंजी नगरीतील बुवा हे पहिले गवई होते. अशा दोन स्वतंत्र जंगी मैफिली करून, पुन्हा नव्या उत्साहाने डॉ. भडकमकर यांच्या शिष्यवृत्तीवर संगीताचे पुढील शिक्षण पं. यशवंतबुवा मिराशी यांच्याकडे घेण्यासाठी बुवांनी पुण्याला प्रयाण केले.

पं. यशवंतबुवा मिराशी यांना त्याकाळी प्रती बाळकृष्णबुवा म्हणून ओळखत असत. महाराष्ट्राला बाळकृष्णबुवांची ओळख आपल्या मैफिलीतून करून देण्यात पं. यशवंतबुवा सदाशिव मिराशी हे अग्रेसर होते. वास्तविक घरात गायनाची अजिबात परंपरा नसताना आणि स्वतःदेखील गायक होण्याची स्वप्ने बघत नसताना बाळू मिराशी नावाच्या मुलाचा एक अव्वल कलावंत कसा तयार झाला याचे आश्चर्य त्यावेळी सर्वांनाच वाटत असे. पं. मिराशीबुवांना तालीम कशी व कोणत्या परिस्थितीत मिळाली हे ऐकले म्हणजे हे आश्चर्य ओसरत असे. मिराशीबुवांचे घर पंडितांच्या घराच्या शेजारीच होते. पं. बाळकृष्णबुवांच्या घरात अनेक शिष्यांचा राबता असे. लहान बाळू या शिष्यांना वेडावण्यासाठी

त्यांच्यासारखे गाण्याची नक्कल करीत असे. हा मुलगा नक्कल म्हणून का होईना आपल्यासारखे गातो याचे बाळकृष्णुबावांच्या शिष्यांना कौतुक वाटे. या कौतुकापोटीच एक दिवस शिष्यांनी त्याला पकडून बाळकृष्णांसमोर बसविले व गायला लावले. बाळूचे ते गाणे ऐकून बाळकृष्णबुवा म्हणाले, 'योग्य प्रकारे शिकलास तर छानच गाऊ शकशील. आहे तयारी शिकायची ? मोठ्या गायकाची सर्व बीजे तुझ्या गळ्यात आहेत.' बाळू मिराशींनी उत्तरादाखल, आपल्या अडचणी बुवांना सांगितल्या. पं. बाळकृष्णबुवांनी श्रीमंतांना सांगून या अडचणीचे निवारण करण्यासाठी त्यांच्याकडे गळ घातली. श्रीमंतांनी बुवांच्या विनंतीला मान देऊन, मिराशींना सरकार वाड्यावरील नोकरीतून तीन वर्षाची भरपगारी रजा मंजूर करून, बुवासाहेबांच्याकडे शिकायला ठेवले आणि अशा तऱ्हेने मिराशींच्या आयुष्याला कलाटणी मिळाली.

आणखी एका दृष्टिने मिराशीबुवा भाग्यवानच म्हटले पाहिजेत. कारण बुवासाहेबांच्या मुलाबरोबर म्हणजे आण्णाबुवा यांचेबरोबर त्यांना तालीम मिळू लागली. पुत्रप्रेमापोटी आण्णाबुवांना खास खास जे मिळाले ते सर्व मिराशीबुवांच्या पदरात पडले. नंतर श्रीमंतांनीच पत्रे देऊन देऊन इंदूर, बडोदा, नागपूर, पुणे, मुंबई असा दौरा करावयास लावले. सगळीकडूनच त्यांच्या गायनाचे अभिप्राय समाधानकारक मिळाले. त्यानंतर उमेदीची वर्षे श्रीमंतांनी त्यांना नाट्यकला-प्रर्वतक मंडळींत काढू दिली. महाराष्ट्राच्या वाट्याला जे मिराशीबुवा आले ते अनेकदा अनेक ठिकाणी प्रतिबाळकृष्णबुवा म्हणूनच लोकांच्या मनावर ठसले. पंडित मिराशीबुवांनी, पं. बाळकृष्णबुवांनी राग विस्ताराची तालीम जशी दिली तशीच्या तशी नोटेशन पद्धतीने लिहून काढून ख्याल गायकीचे त्यांनी सोने केले. त्यामुळे त्यांच्या शिकविण्यातूनसुद्धा बाळकृष्णबुवांच्या गायकीचे दर्शन होत होते. मिराशीबुवांची तालीम पं. काणेबुवांना दोन वर्षे मिळाली.

पं. मिराशीबुवांकडे त्यांचे शिक्षण चालू असताना, त्याच्याबरोबर यशवंतबुवा जोशी, पवार, पं. बाळकृष्णबुवांचे नातू रामभाऊ चंदूरकर हेही शिकत असत. काणेबुवांचे गुरुबंधू व जुने स्नेही राम मराठे त्या काळात पुण्यातील वास्तव्य सोडून मुंबईत स्थलांतरित झालेले होते. त्यांच्या पुण्यातील जागेत काणेबुवांची सोय, राम मराठेंनी विनामूल्य केली होती. जेवणासाठी काणेबुवांनी बादशाही खानावळीमध्ये व्यवस्था केली होती.

काणेबुवांच्या मते पं. विनायकबुवा पटवर्धन रागविज्ञान मधल्या चिजा

शिकवत असत. त्यांचा जुन्या चिजांवर भर असे आणि परिक्षेच्या अभ्यासक्रमानुसार संगीताच्या शास्त्राच्या बाजूवर प्रकाश टाकीत अभ्यासक्रमाप्रमाणे शिकवत असत. तर मिराशीबुवांचा भर संगीताच्या व्याकरणापेक्षा गुरुमुखी परंपरागत विद्या, पुढच्या पिढीकडे सुपूर्त करण्याकडे होता. त्यामुळे गुरुपरंपरेतील घरंदाज गायकीचे सुवर्णकण मिराशीबुवांकडे काणेबुवांना वेचता आले. सकाळी सहा ते आठ व दुपारी दोन ते चार अशी रोज शिकवणी असे. सकाळी शिकवणी झाली नाही तर रात्री दहा ते बारा शिकायला बसावे लागे. शिकवणीला बसताना, मिराशीबुवा ओली वेताची काठी घेऊनच शिकविण्यास बसत. त्यांना गाण्यातील शिस्त थोडीसुद्धा बिघडलेली चालत नसे. काणेबुवांनाही थोडा प्रसाद मिराशीबुवांकडून याबाबतीत मिळाला होता पण यशवंतबुवा जोशी आपला मार चुकविण्यासाठी मिराशीबुवांचे तंबोऱ्याची ढाल करत. शेवटी रागावून मिराशीबुवा म्हणत, ''माझा तंबोरा फुटेल पण गाण्याची शिस्त व सूर तुमच्या अंगात भिनणार नाही'' त्यावेळी निर्दोष व निकोप संगीत परंपरा पुढे गेली पाहिजे या बाबतीत त्यावेळचे गानगुरू अतिशय काटेकोर असत. रोज ठरलेले ठराविक तास शिक्षण झालेच पाहिजे, असा रिवाज होता. या पद्धतीमुळे गुरुगृही विद्या ग्रहण करून बाहेर पडलेला माणूस उत्तम गवई म्हणूनच बाहेर पडत असे. त्यावेळी घड्याळ लावून पंचेचाळीस मिनिटांचा तास, तसेच आठवड्यातून दोन दिवस, असा अलीकडच्या सारखा संगीत शिक्षणाचा प्रकार नव्हता. त्यावेळची संगीत विद्या मंत्रसिद्ध व गुरुमुखी या गोष्टींवर भर देणारी होती. आजकालची संगीत विद्या तंत्रसिद्ध व रेकॉर्डिंग यावर भर देणारी आहे.

□ **कोल्हापुरातील सांगीतिक वातावरण** : पं. यशवंतबुवा मिराशींच्याकडे गोळीबंद तालीम घेत असताना शिष्यवृत्तीची दोन वर्षे कधी संपली ते कळलेच नाही. मग फी अभावी मिराशीबुवांच्या शिकवणीला रामराम ठोकावा लागला. त्या काळात अखंड संगीताचे वातावरण होते. कोल्हापूर हे तर कलापूरच होते. शिवाजी महाराजांच्या दरबारात जसे अष्टप्रधान होते तशी कोल्हापूरच्या छत्रपतींच्या अखत्यारित आठ संस्थाने होती. कागल, विशालगड, बावडा, जत, कापशी, मलकापूर, कुरुंदवाड आणि इचलकरंजी. मात्र इचलकरंजीचे व्यवहार कापशीमधून चालायचे. सर्व संस्थानातून उत्तमोत्तम दरबार गवई नियुक्त केलेले होते. पण सर्वांवर वर्चस्व गाजविणारे कोल्हापूर संस्थान हे कलेचे माहेरघर होते. अनेक विद्वान पंडित व दर्जेदार कलाकारांचा वावर कोल्हापूरात होता. त्यामुळे १९३८

सालापासूनच पं. काणेबुवांचा कोल्हापूरात वावर असे. गोविंदराव टेंबे, भूर्जीखाँ, १९४० साली देवल क्लबमध्ये येऊन राहिलेले पं. जगन्नाथबुवा पुरोहित, रामकृष्णबुवा वझे, शिवरामबुवा वझे, दरबार गवई अल्लादियाखाँ या बड्या कलाकारांना काणेबुवांनी त्या काळात अगदी जवळून ऐकले. या लोकांचा गाढा सहवासही मिळाला. १९४२ पासून काणेबुवांचे कोल्हापूरला जाणे-येणे वाढले. १९४३ नंतर पं. इंगळेबुवांचे शिष्य, इचलकरंजीचे प्रभाकर भिडे; उच्च शिक्षणासाठी पै. भूर्जीखाँ यांचेकडे राहाण्यास गेले होते. त्यांचे शिक्षण कसे चालले आहे हे पाहायला काणेबुवांना कोल्हापूरला जावे लागे. भूर्जीखाँ तर काणेबुवांच्या गाण्यावर खूप खूष असत. काणेबुवांनी जयपूर घराण्याची गायकी आत्मसात करावी अशी त्यांची इच्छा होती. पण काणेबुवांना मात्र विलायतहुसेन खाँ यांच्याकडे पुढील शिक्षण घेण्याची तीव्र इच्छा होती. कारण १९३६ सालच्या इचलकरंजी संस्थानच्या नवरात्रोत्सवात झालेल्या पं. विलायतहुसेनखाँ यांच्या गाण्याने ते अत्यंत प्रभावित झाले होते. त्या मैफलीत म. विलायतहुसेन खाँ यांना विष्णुपंत काणे यांनी पेटीची साथ केली होती. विलायतहुसेन खाँचे ज्येष्ठ बंधू अब्दुल्लाखाँ हे भास्करबुवां बखलेंचे समकालीन होते. त्या काळात ते अतिशय उत्तम गायक होते. इचलकरंजी दरबारात ते गायला येत असत. त्यावेळी त्यांचे वास्तव्य मिरजेला सतारमेकर यांचेकडे असे. त्यांची व विष्णुपंत काणे यांची मैत्री होती व त्यांचे गाणे त्यांना आवडायचे. तसेच १९२० च्या आधी पं. बाळकृष्णबुवांच्या बरोबरच विलायतहुसेन खाँ साहेबांचे वडील, म. नथ्थन खाँ यांचे फार नाव होते. त्यामुळे काणेबुवांच्या वडिलांचा आग्रेवाल्यांवर अतिशय लोभ होता. आग्रा गायकी आपल्या घरात आलीच पाहिजे, अशी त्यांची इच्छा, त्यांनी आपल्या मुलाला सांगितली होती. ही इच्छा पूर्ण करण्याची काणेबुवांची तीव्र इच्छा होती. पण खाँसाहेब सतत दौऱ्यावर असत. त्यांची तितकी ओळख नसल्यामुळे आणि १९४५ सालीच विष्णुपंतांचे छत्र हरपल्यामुळे ही इच्छा अपुरीच राहिली होती. पण खाँसाहेबांपर्यंत पोचण्यासाठी स्वतःची संगीताची तयारी ते कसून करत होते. आता ही इच्छा पूर्ण करण्याची वेळ आली होती. मिराशीबुवांच्या खडतर तालमीमुळे ग्वाल्हेर गायकीची भक्कम बैठक तयार झाली होती. विलायत हुसेनखाँ, म्हैसूर सोडून मुंबईस कायम वास्तव्यास आले होते. पण ही इच्छा पूर्ण करणे इतके सोपे नव्हते. कारण म. विलायत हुसेन खाँ यांच्या शिकवणीची फी बरीच होती. मुंबईला शंभर रु. फी देऊन शिकणे काणेबुवांना

परवडण्यासारखे नव्हते. काणेबुवांना पंचवीस रु. फी देऊन शिकणेदेखील शक्य नव्हते. इचलकरंजीला जमिनी होत्या. पण संस्थाने विलीन झाल्यावर सगळ्या कूळकायद्यांत अडकलेल्या होत्या. वडिलांच्या मृत्यूनंतर १९४५ सालापासून गोविंदराव गोंधळीकर, इचलकरंजी येथील कारभार बघत होते आणि बुवा संगीत शिक्षणासाठी पुण्यातच होते. एकूण कलाकारांना या परिस्थितीला सततच तोंड द्यावे लागे.

□ **पं. जगन्नाथबुवांची भेट** : या अडचणीतून मार्ग काढण्यासाठी काणेबुवांनी जगन्नाथबुवांची कोल्हापूरला भेट घेतली. कारण जगन्नाथबुवा खाँसाहेबांचे लाडके शिष्य होते. त्या भेटीत काणेबुवांनी जगन्नाथबुवांच्याकडे विलायतहुसेन खाँ यांच्याकडे शिकण्यासाठी मार्ग दाखवावा अशी विनंती केली. पुरोहितबुवांना काणेबुवांची परिस्थिती माहीत होती. त्यामुळे काणेबुवांनी विलायत हुसेन खाँ साहेबांचा गंडा बांधला तर त्यांचे सर्व शिक्षण फुकट होऊ शकेल, असा तोडगा सुचविला. त्यावेळी महिना दोन महिन्यातून, जगन्नाथबुवा, कोल्हापूरहून मुंबईला खाँसाहेबांच्याकडे जात असत. 'काणेबुवा उत्तम गाणारे आहेत व ते खाँ साहेबांचे गंडाबद्ध शिष्य होऊ इच्छितात' असे खाँसाहेबांना जगन्नाथबुवांनी सांगितले. जगन्नाथबुवा चौतीस सालापासूनच खाँसाहेबांकडे विद्याग्रहण करीत होते. त्या गुरुशिष्यांचे नाते अतिशय दृढ व प्रेमाचे होते. त्यामुळे जगन्नाथबुवांचा शब्द खाँसाहेबांना मोडता आला नाही. खाँसाहेबांची संमती जगन्नाथबुवांनी काणेबुवांना सांगितली. काणेबुवांना हुरूप आला. पण गंडाबद्ध समारंभाला लागणारे पैसे एकदम कसे उभे करायचे हा प्रश्न उभा राहिला. त्यावेळी जगन्नाथबुवांनी काणेबुवांना त्यांच्या नावावरील काही जमीन आठ हजार रुपयांना विकण्यास सांगितले. काणेबुवांनी ते ताबडतोब मान्य केले. कारण जगन्नाथबुवा त्यांना गुरुस्थानी होते. आणि आता ते गुरुबंधू होणार होते. पैशाची सोय केल्यावर गंडाबंधन समारंभ १९४८ साली सुप्रसिद्ध लेखक ना. सी. फडके यांच्या अध्यक्षतेखाली थाटात पार पडला.

□ **गंडाबंधन सोहळा** : काणेबुवा आणि त्यांच्या घराला ज्यांनी आधार दिला ते इचलकरंजीचे दादासाहेब भिडे व त्यांच्या सौ. ताई यांनी या सोहळ्यात पुढाकार घेऊन दोन–तीन दिवस वेगवेगळी पक्वान्ने करून हा सोहळा अविस्मरणीय केला. जिलबीची ताटे गावात घरोघरी पोचती केली गेली होती. या निमित्ताने नारायण सभागृहात गाण्यांच्या मैफली झाल्या. त्यात अजमत हुसेन खाँ, भूर्जीखाँ, जगन्नाथबुवा पुरोहित, गजाननबुवा जोशी अशा एकापेक्षा एक दिग्गज

कलाकारांच्या बैठकींनी इचलकरंजी नगरीस पुन्हा एकदा सुरांनी न्हाऊ घातले. खाँसाहेब स्वतःही गायले. स्वतंत्र तबलावादनासाठी, साथीसाठी पुण्याचे गुलाम रसुल, सांगली मिरजहून गणपतराव डवरी, भानुदास गुरव हे होतेच. समारंभात खाँसाहेबांना, काणेबुवांनी गुरुदक्षिणा म्हणून रु. एक हजार एकचा आहेर केला. खाँसाहेबांनी ही दक्षिणा मान्य करून काणेबुवांना शिष्यत्व बहाल केले आणि 'या मानसपुत्रासमान शिष्याला मुलाप्रमाणे कोणताही आडपडदा न ठेवता सर्व विद्या प्रदान करेन' अशी जाहीर शपथ घेतली. गुरुशिष्यांनी एकमेकांना चणे व खडीसाखर भरवले. सर्व उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात या नूतन गुरुशिष्य जोडीस जाहीर मान्यता दिली. पुढे अनेक गंडाबंधन समारंभ झाले. पं. गजाननबुवा जोशींनी आपल्या वयाच्या पन्नासाव्या वर्षी बांधलेला खाँसाहेबांचा गंडा, दिल्ली येथे सुमती मुटाटकर यांचे घरी, कागलकरबुवांनी बांधलेला खाँसाहेबांचा गंडा इत्यादी पण काणेबुवांचा हा गंडाबंधन कार्यक्रम 'न भूतो न भविष्यति' असाच झाला.

❖❖❖

३

# मुंबईतील वाटचाल

गंडाबंधनानंतर आता पं. विलायतहुसेन खाँ यांच्याकडे पुढील शिक्षण घेण्यासाठी मुंबईत राहण्याचा प्रश्न होता. पण काणेबुवांची गाण्याची तयारी आणि त्यांच्या स्वभावातील गोडवा या गुणांनी त्यांना मदत केली. काणेबुवांची मुंबईतील रसिकाग्रणी दादासाहेब आपटे यांची गाण्यांच्या मैफलीच्या निमित्ताने चांगली ओळख झाली होती. काणेबुवांचा ऋजू स्वभाव, त्यांना खूपच आवडत असे. त्यांच्या गाण्याचेही दादासाहेब व त्यांच्या पत्नी शांताबाई चाहते होते. या प्रेमळ संबंधामुळे दादासाहेबांनी त्यांची राहाण्याची सोय आपल्या घरी करून हा प्रश्न सोडविला. रामभाऊ मराठे व सुरेश हळदणकर या मुंबईतील मित्रांमुळे काणेबुवांना शिकविण्याही मिळाल्यामुळे त्यांचा मुंबईत जम बसू लागला.

काणेबुवा म. विलायत हुसेन खाँ यांचेकडे सलग चार–पाच वर्षे शिकले. त्यावेळी अजमत हुसेन, खादीम हुसेन, लताफत हुसेन खाँसाहेबांचे भाचे एका खोलीत राहात असत. त्यांचा रियाज चालूच असे. खाँसाहेबांचेकडे खाँसाहेबांचा भाचा युनूस व काणेबुवा यांची खास तालीम चालत असे. सकाळी आठ ते बारा व दुपारी चार ते आठ असे सारखे गाणे चालू असे. 'जावयाच्या पंक्तीला जेवावे व गुरुजींच्या पुत्रासोबत शिकावे' अगदी तसेच बुवांचे शिक्षण चालू होते. खाँसाहेबाकडे बुवांची, फैयाज खाँ यांच्याशी चांगली ओळख झाली. मोठमोठ्या गवयांची खाँसाहेबांकडे ये–जा होती त्यामुळे तेथे त्यांना चांगले गाणे भरपूर ऐकायला मिळाले. त्याचा फायदा स्वतःचे गाणे समृद्ध करण्यासाठी बुवांना झाला. केसरबाई केरकर, त्यावेळी दादासाहेब आपटेंच्या घराशेजारीच राहात असत. त्या काणेबुवांना आपल्या कार्यक्रमास घेऊन जात असत. त्यामुळे त्यांचेही गाणे खूप ऐकायला मिळाले. फैयाज खाँ आपल्या मैफलीच्या वेळी ''देखो वो काणेबुवा किधर है, उसको भेज दो मेरे साथ'' असे म्हणून काणेबुवांना आपल्या साथीला घेऊन जात.

एकदा खाँसाहेबांच्याकडे ओळीने चार दिवस सकाळी आठ ते रात्री बारा पर्यंत अखंड शिकवणी–रियाज असे सत्र चालू होते. त्या सत्रानंतर आलेल्या ताणामुळे

काणेबुवांना शीण आला होता आणि म्हणूनच 'खाँसाहेबांची तब्येत बरी नाही म्हणून चार दिवस सुट्टी आहे' असे खोटे सांगून काणेबुवा, दादासाहेब आणि शांताबाई यांचेबरोबर शिवाजीपार्क्वर फिरायला गेले होते. फिरून घरी येतात तोच त्यांना तिसऱ्या मजल्यावरून त्यांच्या घरातून तानपुरा छेडण्याचे सूर ऐकू येऊ लागले. तिघंही आश्चर्यचकित झाले. घरात येऊन बघतात तर प्रत्यक्ष विलायतहुसेन खांसाहेब स्वतः तंबोरा छेडत बसले होते. दादासाहेबांनी आश्चर्य व्यक्त केल्यावर खाँसाहेब म्हणाले, 'दो दिनसे काणेबुवा आए नही, इसलिए सोचा उनकी तबियत ठीक है की नही देख आवू.' या घटनेने काणेबुवांचा चेहरा मात्र बघण्यासारखा झाला होता. त्यांचा मिष्किलपणा त्यांच्या अंगाशी आला होता.

एकदा खाँसाहेबांनी, आग्रेवाल्याचा खास **'बिभास'** काणेबुवांना शिकविला आणि बंदिशीची मेहनत करण्यास सांगून गावाला गेले. अजमतहुसेन खाँ नेहमीप्रमाणे खाँसाहेबांना भेटण्यास आले तेव्हा बुवा आंणि युनूसखाँ, खाँसाहेबांनी शिकविलेल्या **बिभास**ची मेहनत करत होते. त्यांचा रियाझ थांबवून, त्याच रागातील 'एक वेगळी सुंदर बंदिश शिकवितो' असे सांगून अजमत हुसेननी त्या दोघांना बंदिश शिकवली. या दोघांनाही ती बंदिश आवडली व त्याचीच मेहनत त्यांनी सुरू केली. पुढे खाँसाहेब गावाहून परत आले, दारातच खाँसाहेबांनी ही मेहनत ऐकली आणि आत येऊन कपडे उतरवत काणेबुवांना म्हणाले, 'तुम्हारा धैवत थोडा कम लगता है' परत परत तसेच झाल्यावर 'तुम्हारा धैवत कोमल लगता है ऐसा क्यो' असा प्रश्न त्यांनी केला. त्यावर आपण कोमल धैवतच लावत असल्याचे खाँसाहेबांना सांगितले. म्हणजे **सां ध प ध प** अशी सुरावट घेण्यास अजमत हुसेनखाँ यांनी सांगितल्याचे काणेबुवांनी खाँसाहेबांना सांगितले. हे कळल्यावर खाँसाहेबांनी अजमतहुसेनना बोलावून घेतले व खुलासा विचारला. अजमत म्हणाले, त्यांच्या मामांनी खुबीदार चीज म्हणून अशी सुरावट सांगितली होती. तेव्हा खाँसाहेब म्हणाले 'खुबी वगैरे अपने पास रखो, हमारे बच्चोंको मत सिखाओ.' अशी बंडलबाजी पुढे कधीही शिकवायची नाही, असा दम मिळाल्यामुळे अमजत खाँ यांनी त्या दिवसापासून या दोघांना पुढे काहीही शिकविले नाही.

खाँसाहेबांना भेसळ, लबाडी अजिबात चालत नसे. थोडकं चालेल पण शुद्ध असावे असा त्यांचा भर असे. ते म्हणत **मिया मल्हार** गाताना **दरबारी** इतका जर ठाम गायलात तर तो **मिया मल्हार** राहणारच नाही, **दरबारीच** होईल. जो अर्धा तास गाण्याचा राग आहे तो तासभर लांबवू नका. अमिर खाँला ते मानत नसत. घराण्याच्या

खुबीतील बदल त्यांना सहन होत नसे. **मलुहा केदार** मधल्या **मोरि आली मोरा मन...** या चीजेला अंतरा नव्हता तरी 'खादिम' म्हणणार 'मी केला.' लताफत म्हणणार, 'मी केला' पण याला अंतरा नाही असे सांगणारे खाँसाहेबच होते. १९५० पर्यंत **धनाश्री, सावनीनट** हे राग कोणाला माहीतही नव्हते. खाँसाहेबांचेमुळे ते प्रचारात आले. **देवोदेरो** या चीजेला जोड नव्हती. तसेच **रायसा कानडांतील रि तुम समझ....** यालाही जोड नव्हती. खाँसाहेबांनी ती बांधली. लयीत गाणे व गाण्यात लय मुरलेली असे खाँसाहेबांचे गाणे होते. त्यांचा फारसी भाषेचा अभ्यास चांगला होता. बंदिशी बांधणे शिकणे म्हणजे नुसती हिंदी येऊन चालत नाही त्याबरोबर ऊर्दू, मेवाडी, ब्रीज, पंजाबी या भाषांचीही माहिती हवी, कारण लाहोरचे हिंदी उर्दू मिश्रीत, राजस्थानचे मेवाडी हिंदी, बनारसचे ब्रजभाषी हिंदी वेगळे, महाराष्ट्राचे आणखीनच वेगळे. त्यामुळे त्या त्या चीजेच्या भाषेतून त्या त्या प्रदेशांचा सुगंध अनुभवता येतो. चीजेच्या भाषेतून, त्या–त्या प्रदेशांचा सुगंध अनुभवायाचा असेल तर या सर्व भाषा अवगत व्हायला हव्यात अशी त्यांची श्रद्धा होती. खाँसाहेबांचा सर्व भाषांचाही अभ्यास होता. खाँसाहेबांना प्रत्येक रागात अनेक बंदिशी येत होत्या. त्यांनी गाण्यातील प्राथमिक धडे कधीही दिले नाहीत. त्यामुळे खाँसाहेबांच्या पुढील पिढीचे नुकसान झाले. पुढची पिढी गवई होऊ शकली नाही. त्यांच्या गाण्याची परंपरा पुढे चालविली ती त्यांच्या शिष्यांनीच.

खाँसाहेब शिकविताना सुरुवातीला राग स्वरूप सांगत. एक आलाप त्यांनी घ्यायचा. दुसरा आलाप शिष्यांनी घ्यायचा. असे गाणे चढत जाई. त्यांच्या गायकीत, क्लासमध्ये शिक्षण दिले जाते तसे आलाप, बोलतान व तान असे तीन भाग नव्हते. बोलतानऐवजी बोलअंग असे. जे बोलण्यास हिंदी भाषेचे ज्ञान आवश्यक असे. ननदिया म्हणजे नदी नव्हती एवढेच हिंदीचे ज्ञान त्यावेळी होते. त्यामुळे महाराष्ट्रात बोलअंग लुप्तच झाले होते. भाषेचे शिक्षण नाही त्यामुळे अर्थ माहीत नाही. त्यामुळे त्यावेळचे गायक उत्तानशृंगाराच्या चिजा गात असत व लोक ऐकून घेत असत. उच्चवर्णीय समाजात लावणी गायली जात नसे, परंतु हिंदीचे ज्ञान नसल्यामुळे त्याहून शृंगारिक बंदिशी मात्र सर्रास बायकांसमोरही गायल्या जात. पुढे अर्थ समजू लागल्यावर नवीन महाराष्ट्रीयन गायकांना बोल फिरविणे अवघड जाई. त्यामुळे बोलअंग कमी झाले व आलाप व तान या दोन गोष्टी राहिल्या. मराठी नाट्यसंगीतामुळेही बोलअंग गेले. ठासून उच्चार म्हणजे गद्य गायकी, स्वरांचें अधिष्ठान करून चीज गायली, की स्वर ऐकू येत पण बोल लपला जाई. खाँसाहेबांनी स्वरांचा व व्यंजनांचा उच्चार कसा करायचा यावर

फार अभ्यास केला होता. हिंदी, ब्रज, फारशी, ऊर्दू, या भाषांवरील प्रभुत्वामुळे त्यांनी चिजाही चांगल्या बांधल्या होत्या व त्यांचे उच्चारही त्या त्या ढंगांनी ते करत असत. खाँसाहेबांनी प्रथम पाच–सहा वर्षे धृपद धमारचा अभ्यास केला होता. त्यात आलाप, तान नाही फक्त बोलअंग व लयकारीचा अंतर्भाव होता. त्याचा उपयोग त्यांनी ख्याल गायकीत केला. त्यामुळे खाँसाहेबांनी, ख्याल गायकीत नवीन दालनं उघडली. त्यावेळी संगीत मार्गदर्शनाची, पुस्तकेही नव्हती. त्यांचे रागाचे आडाखे होते. वेद विद्येतही संथाशिक्षणाची प्रथा होती आणि तीच प्रथा, तानसेनापासून संगीतात रूढ होती. लिहून ठेवले म्हणजे माणूस त्याचे मनन करत नाही पण न लिहिल्यामुळे सर्व लक्षात ठेवावे लागते. त्याची उजळणी करावी लागते. अशा पद्धतीमुळे स्मरणशक्तीला तजेला मिळतो. स्वरांचा लगाव आणि उपज कशी करायची याचे शिक्षण रोज निराळे असे. एक स्वरसमूह, त्याला लावलेला बोल, प्रत्येक वेळी निराळ्या आविष्काराने गायला जातो. मग त्याचे काही बारकावे चेहऱ्यावरचा हावभाव, हाताची हालचाल अशा अनेक रितीनी दाखविले जातात. एकच तुकडा प्रत्येक वेळी बदलला जातो आणि मग बढत होते. हे सर्व पुस्तकात लिहिणे केवळ अशक्य आहे. उदा. कॅसेट ऐकली तर तीच पुनरावृत्ती शंभरवेळा ऐकावी लागते. पण गायकाचे गाणे प्रत्यक्ष ऐकणे हा एक दिव्य अनुभव असतो म्हणून गुरुमुखीच विद्या पाहिजे अस्ताई अंतरा आत्मसात व्हायला पाहिजे. बोलअंगात आपण त्याला वेगळी चाल लावत असतो आणि मूळ चालीचा उपयोग करून घेतो म्हणून मूळ चीज चालीसह बरोबर पाठ पाहिजे. शब्द व स्वर यांची एकरूपता म्हणजेच बोलअंग. या गोष्टींची पाठांतराने ठराविक काळ नक्कलच होते. पण ती करावीच लागते. तो राग, चीज, स्वर, शब्द, अलंकार, आत्मसात झाल्यांनतर स्वबुद्धी वापरून जेव्हा गायक गाऊ लागतो तेव्हा त्याला खरा राग समजतो. खाँसाहेबांचे वैशिष्ट्य म्हणजे वेगळा विचार मांडला तरी रागस्वरूप बिघडू न देणे कुठलाही राग तासभर गायलाच पाहिजे असा त्याचा हट्ट नसे. त्या रागाच्या प्रकृतीप्रमाणे विस्तार करत व आपल्या ताकदीप्रमाणे होईल तेवढ्यातच पुनरावृत्ती न होऊ देता तो ते मांडत, राग पुष्कळ आहेत पण कुठला राग कुठे व किती गायचा हा विचार त्यांच्या गायकीत दिसतो. प्रचलित रागातील प्रत्येक रागात ध्रुपद, धमार झपताल, तेवरा, सवारी हे सर्व प्रकार खाँसाहेबांना येत असत. मत्ततालासारखे तालही ते गात असत त्याचे कारण त्यांचे आजोबा गुलाम आब्बास यांच्याकडे ध्रुपद धमाराचे शिक्षण त्यांनी घेतले होते.

पं. काणेबुवांचे गुरुबंधू पं. वि. रा. आठवले त्या सुमारास दिल्ली आकाशवाणीवर

होते. खाँसाहेब कार्यक्रमाच्या निमित्ताने, दिल्लीला गेले की आठवले वेगवेगळ्या बंदिशी खाँसाहेबांकडून शिकत. मग प्रत्येक नवीन रागातल्या नवीन बंदीशीची तोंडे म्हणत. आठवले काणेबुवांना विचारतं, 'तुम्हाला या चिजा येतात का?' तेव्हा काणेबुवा सांगत, 'खाँ साहेबांनी तुम्हाला नवीन नवीन चिजा शिकविल्या पण आम्हाला गाणे कसे गावे हे शिकविले.' अशाप्रकारे संगीताचा सर्व बाजूंनी विचार करणाऱ्या समर्थ गुरुंचे मार्गदर्शन घेऊन पं. काणेबुवांची वाटचाल आता गुरुपद भूषविण्यापर्यंत गेली होती. आयुष्यात बुवांना खरोखरीच उत्तम आणि निकोप तालीम देणारेच गुरू भेटत गेले. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची घडण, गायक व गुरू म्हणून फार वरच्या दर्जाची झाली.

मुंबईमधील बुवांचे कलाविश्व सर्व बाजूंनी खुलत होते. शिष्यशाखा पसरत होत्या. प्रसाद सावकारांची बायको ही बुवांची पहिली शिष्या होती. त्या शिकवणीने बुवांनी आपल्या गुरुपदाचा श्रीगणेशा केला. त्यानंतर शिवाजी पार्कलाच राहणाऱ्या मंजुताई मोडक या बुवांच्या शिष्या बनल्या. मंजुताईंचा मुंबईत बुवांना अतिशय मोठा आधार होता. बुवांची गरज जाणून त्यांनीही बुवांना शिकविण्या मिळवून दिल्या. ज्यांच्याकडे बुवा राहात होते त्या दादासाहेबांच्या पत्नी शांताबाई बुवांकडे शिकू लागल्या. बुवा स्वतः जवळजवळ गुरुकुल पद्धतीने शिकले आणि पुण्यात तर त्यांचे शिक्षण शिष्यवृत्तीवरच झाले. त्यामुळे शिष्याकडून फी घेणे त्यांना प्रशस्त वाटत नव्हते. तो त्यांचा स्वभावही नव्हता पण मुंबईसारख्या ठिकाणी राहून उदरनिर्वाह करायचा म्हणजे फी घेणे भागच होते. काही शिकविण्या ते दादासाहेब आपटे यांच्या घरीच घ्यायचे. पण बऱ्याच शिकवण्या ते शिष्यांच्या घरी जाऊन करत असत. जाण्या-येण्याचा प्रवासखर्च व इतर आवश्यक गोष्टी स्वतःच्या हिंमतीवर मिळविणे आवश्यक होते आणि म्हणूनच त्यांना फी घ्यावी लागली. पण समोर शिकणाऱ्या शिष्याची कुवत आणि परिस्थिती बघून ते फी घेत. गुरुकुल पद्धतीने मुंबईत शिकविणे परवडण्यासारखे नव्हते. बुवांच्या बरोबरीने इतर लोकही संगीताच्या शिकवण्या करत. पण त्यांची फी भरमसाठ होती. बुवांचा पिंड सहृदयतेचा होता. परिस्थिती नसताना स्वतःची पदरमोड करून इतरांना मदत करत होते. सर्वसाधारणपणे सर्व शिष्यांकडून ते पंधरा रुपये घेत. पण ज्यांची फी देण्याची कुवत होती त्यांच्याकडून ते शंभर रुपयेही घेत असत.

बुवांच्या मुंबईतील शिष्यवर्गाची यादी केली तर खूपच मोठी होईल. त्यापैकी साँबप्रसाद सावकारांच्या सौभाग्यवती, मंजूताई मोडक, कुमाताई राजवाडे, वझे, शांताबाई आपटे, माधवराव आपटेंच्या सौभाग्यवती, विमल कट्टी, निर्मला गोगटे, इंदुताई दंडवते, सुमन शेवडे, काकासाहेब तुळपुळे, नरेंद्र कणेकर, बाळासाहेब

टिकेकर मैफल सुरू झाल्यावर काही वेळाने आपल्या नेहमीच्या पद्धतीने उजवी भुवई उडवत, बुवांनी मागे स्वर लावण्यास सांगितले. गायची संधी मिळताच दोन्ही साथीदारांनी जुगलबंदीच सुरू केली. शेवटी बुवा शांतपणे म्हणाले, 'गाणे माझे आहे मला थोडे गाऊ द्या.' शिकविताना एखादी जागा, विद्यार्थ्याला आली नाही तर ते पुन्हा पुन्हा कंटाळा न करता न चिडता सांगत. पण ती जागा आल्याखेरीज त्या दिवसाची शिकवणी संपत नसे.

घरी बसून बुवांना जगाची माहिती असे. सगळ्या क्षेत्रात ते हुकमतीने बोलत आणि योग्य सल्ले देत. जगनाथबुवांची पहिली पुण्यतिथी १९६९ साली **संशयकल्लोळ** नाटकाने साजरी झाली होती. त्यावेळी काणेबुवांनी, सुमती टिकेकरांनीच **'रेवती'** केली पाहिजे असा आग्रह धरला व तो सुमतीबाईंनी मान्य केला. बुवांचा शब्द कोणीही टाळत नसत. पं. काणेबुवांच्या बद्दल आपल्या भावना व्यक्त करत असताना बाळासाहेब टिकेकर म्हणतात, पं. काणेबुवा हे अतिशय विद्वान आणि कुशाग्र बुद्धीचे होते. प्रसिद्धीपराङ्मुख होते. त्यांना संगीताबरोबरच इतर विषयांमध्येही रुची होती. कुठल्याही विषयावरचे त्यांचे अभ्यासपूर्ण बोलणे त्यांच्या सर्व शिष्यांना चकित करून टाकत असे. त्यांच्या गाण्याप्रमाणेच, त्यांच्या गप्पाही रोचक असत. अशाच एका गप्पासत्रात बुवा एकदा चप्पल आणि बूट या विषयावर जवळजवळ एक तास बोलत होते. घरात बसून त्यांना एवढी माहिती कशी याचे आम्हाला आश्चर्य वाटे. डिझेलची मोटार बिघडली तर मेकॅनिकची वाट न बघता ते स्वतःच मोटार दुरुस्ती करत. असं त्यांचं बहुआयामी व्यक्तिमत्त्व होतं. त्यांचे वाक्‌चातुर्य, बुद्धिवैभव, बहुश्रुतता मैफलीतली मांडणी, शिकवणीतील नेमकेपणा सर्वच शिष्यांना आवाक करणारे होते.

मुंबईत दर शनिवारी काणेबुवा घरगुती बैठकी आयोजित करत असत. त्यांत शिष्यांना मुद्दाम नवीन शिकवलेला राग गायला सांगत. ते म्हणत ''अशा खासगी मैफलीतून वारंवार म्हणून नवीन राग घटविला जातो आणि मग सार्वजनिक मैफलीत तो आत्मविश्वासाने मांडता येतो.''

नवीन शिकलेला राग कमीतकमी दहा–पंधरा वेळा तरी बैठकीत म्हटला गेला पाहिजे म्हणजे तो गळ्यावर चढतो. असे त्यांचे मत होते. मुंबईला अशा बैठकांना वेळेचे बंधन नसे.

एकदा अशीच पहाटेपर्यंत मैफल चालली होती. लोक कंटाळले होते. त्याच वेळी फैय्याज खाँना गायचे होते. त्यांनी आळसावलेल्या श्रोत्यांकडे एक नजर टाकत उत्तररात्रीत प्रथम भैरवीच सुरू केली. त्या स्वरांच्या सुगंधांनी श्रोत्यांची झोप तर

उडालीच पण आता पुढे काय ? अशी उत्सुकताही निर्माण झाली. फैय्याज खाँनी भैरवीनंतर ठुमरी आणि मग राग असा उलटा क्रम लावून श्रोत्यांची मने जिंकली. अशा तऱ्हेने श्रोत्यांची नाडी ओळखणे हे जातिवंत कलाकाराचे लक्षण आहे, अशा अनेक गोष्टी शिष्यांना सांगून बुवा त्यांना खिळवून तर ठेवतच पण जाता जाता नवीन धडा आपल्या संभाषण चातुर्यातून देत असत.

बुवांच्या मुंबईतील वास्तव्यात त्यांच्याबरोबरीचे कलाकार राम मराठे, सुरेश हळदणकर, माणिक वर्मा यांनाही खाँसाहेबांच्या मैफलीची भुरळ पडली होती. खाँसाहेबांकडे आपल्याला शिकायला मिळावे, असे त्यांना वाटू लागले. काणेबुवा खाँसाहेबांचे चांगले शिष्य व राम मराठे वगैरेंचे चांगले स्नेही होते. त्यामुळे काणेबुवांकडे त्यांनी खाँसाहेबाकडे शिकण्याची इच्छा बोलून दाखविली. परंतु खाँसाहेबांकडे शिकणे शक्य नव्हते म्हणून काणेबुवांनी त्या तोडीचा गुरू म्हणून जगन्नाथबुवांचे नाव या मंडळींना सुचवले. त्याच सुमारास काणेबुवांच्या आग्रहामुळे जगन्नाथबुवा मुंबईला वास्तव्यासाठी आले होते. जगन्नाथबुवा आणि काणेबुवा यांचे गुरुबंधू म्हणून प्रेमाचे संबंध होते. अशा तऱ्हेने काणेबुवांनी निर्माण केलेल्या स्नेहबंधामुळे राम मराठे, सुरेश हळदणकर व माणिक वर्मा यांचे शिक्षण जगन्नाथबुवांकडे सुरू झाले.

मुंबईत बुवांचे बस्तान चांगले बसले होते. १९५२ साली विलायतहुसेन खाँ यांची बदली दिल्ली आकाशवाणी केंद्रावर झाली. त्यामुळे खाँसाहेबाची तालीम बंद झाली.

त्यावर्षी बुवांच्या मातोश्री श्रीमती काशीबाई यांना देवाज्ञा झाली. वडिलांच्या निधनानंतर गोविंदराव गोंधळीकर जरी सर्व कारभार बघत असले तरी बुवांची आई तेथे होती. पण आईच्या निधनानंतर वारसाहक्काने मिळालेल्या जमिनीचे रक्षण करण्यासाठी बुवांना इचलकरंजीत परतणे आवश्यक वाटू लागले होते. १९५३ साली खाँसाहेबांच्यामुळे ग्वाल्हेरला तानसेन समारंभात गायची चांगली संधी बुवांना मिळाली. दिल्ली आकाशवाणीवर रेकॉर्डिंग करून बुवांनी बनारस, लखनौ असा दौरा केला. लखनौला यावेळी गजाननबुवा जोशी होते. तिथे मैफली करून ग्वाल्हेरला तानसेन समारंभात गायनास ते गेले. त्या समारंभात बुवांचे गाणे उत्तम झाले. श्रोत्यांमध्ये कृष्णराव पंडित, हाफीजअल्ली अजमत हुसेन, गजाननबुवा जोशी, केसकर व स्वतः खाँसाहेब अशी दर्दी मंडळी होती. आणि साथीला आकाशवाणीचा स्टाफ होता. असा उत्तरेचा दौरा यशस्वी करून बुवा मुंबईला आले.

□ **बुवांचा विवाह** : इकडे दादासाहेब आपटे यांनी काणेबुवांच्या लग्नाचा घाट घातला होता. बुवांसाठी मुलगी पाहण्यात जगन्नाथबुवांचा पुढाकार असे. कोकणातल्या पेण

टिकेकर, शरद जांभेकर, रघु काळे असे अनेक शिष्य होते. बुवांनी सर्वांना सारख्याच प्रेमाने शिकविले. शंभर रु. फी देणाऱ्याला पंधरा रु. फी देणाऱ्यां पेक्षा जास्त शिकवायचे हे बुवांच्या स्वभावात बसणारे नव्हते. समोर शिकणाऱ्या माणसाची उचलण्याची कुवत कशी आहे त्या त्या प्रमाणे ते शिकवत असत. फी न देणाऱ्यांना किंवा कमी पैसे देणाऱ्यांना बुवांनी तसे कधीही जाणवू दिले नाही. उलट फी न देणाऱ्यांना ते जास्त प्रेमाने व नियमित शिकवत असत. त्यांना माहीत होते की शंभर रु. फी देणारे, त्यांच्या कार्यक्रमात मागे बसून तंबोरे वाजविणार नाहीत किंवा त्यांना गाण्यामध्ये साथही करणार नाहीत. तंबोऱ्यावर बसण्यास रघु काळे, जांभेकर, टिकेकर, कणेकर अशीच मंडळी येणार.

बाळासाहेब टिकेकर हायकोर्टात वकील होते. त्यांना 'मागे साथीला बसा', असे सांगणे बुवांना जड जाई. अर्थात या मंडळींना तसे सांगण्याची वेळ येत नसे. कारण मैफलीसाठी बुवा दोन तंबोऱ्याच्यामध्ये बसले की बुवांना साथ करण्यासाठी तू का मी अशी स्पर्धाच त्यांच्यात लागत असे. बुवांच्या लाघवी, प्रेमळ आणि मृदूभाषी स्वभावानीच, शिष्यांच्यात अशी प्रेमळ चढाओढीची भावना निर्माण केली. त्यांच्या शिष्यवर्गात रघु काळे आणि सुमन शेवडे अतिशय तयारीने गाणारे होते. त्यांचा गोड आवाज, गळ्यातील फिरत या सर्व बाजू जमेच्या बाजू होत्या. त्यामुळे दिवसभर बाकीच्या शिकवण्या उरकून रात्री बुवा, रघुकडे शिकविण्यास जात. म्हणजे त्या शिकवणीनंतर दुसऱ्या शिकवणीचे व्यवधान नसायचे. रघु काळेंना शिकविताना, रात्रीचे किती वाजले याचे दोघांना भानही नसायचे. अर्थात सगळ्याच शिकविण्यांच्या बाबतीत बुवांची ही अवस्था होती. घड्याळाचा काटा त्यांना गाणे शिकविण्यापासून रोखू शकत नव्हता. त्यामुळे एकदा शिकवणीला बसल्यानंतर सांगितलेली जागा, शिष्याच्या गळ्यातून निघेपर्यंत ते पुढे शिकवत नसत व आपले सांगणे थांबवत नसत. बुवांची चिकाटी आणि सातत्य यामुळे प्रत्येक शिष्य उत्साही आणि शिस्तप्रिय बनला होता. उगाच काहीतरी वाटले म्हणून गायले हे बुवांना अजिबात चालत नसे. बुवांना त्यांच्या एकापेक्षा एक सरस गुरुंकडून मिळालेली संस्कारित शिस्तबद्धता ते आपल्या शिष्यांच्यात उतरविण्याचा काटेकोरपणे प्रयत्न करीत. बुवांना एक गोष्टीची पुरेपुर जाणीव होती की बुट्टीभर कलाकार तयार होत नाहीत. उत्तम गळा आणि बुद्धिचे लेणे घेऊन एखादाच जन्माला येतो आणि अशी माणसे निवडणे हे काम गुरुचे असते. म्हणूनच फी न देणारा रघु काळे बुवांना अतिशय प्रिय होता. त्यांच्या या शिष्यावर बुवांनी मनापासून मेहनत घेतली होती. पण १९६८ साली तो अचानक

हृदयविकाराच्या झटक्याने गेला आणि तो धक्का पचविणे बुवांना अत्यंत कठीण गेले. खडीसाखरेसारखा गोड आवाज, देखणे व्यक्तिमत्त्व, बोलण्यात कमालीचा लाघवीपणा, नम्रता अशा स्वभाव गुणांनी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला वेगळीच झळाळी येत असे. प्रसन्नचित्त रघु काळे दोन तंबोऱ्यांच्या मधे बसून बारीक हरकती घेत, लयीशी लडिवाळ खेळत रागाची बढत करून, दाणेदार तानेनी आकर्षकपणे समेवर येत तेव्हा सभोवतालचे वातावरण उदबत्तीच्या सुवासानी भरल्यासारखे वाटे. असा हा सत्शिष्य अकाली गेल्यामुळे बुवा सुन्न झाले होते. अर्थात या दुःखावर काळ हेच एकमेव रामबाण औषध होते. बुवांना गप्प बसून चालणारच नव्हते. शेक्सपिअरच्या उक्तीप्रमाणे 'शो मस्ट गो ऑन.....'

मुंबईतील शिष्यांच्यात आणि सहाध्यायी गायकात खेळीमेळीचे वातावरण बुवांनी निर्माण केले होते. त्या काळात मुंबईत शिकणारे कणेकरांसारखे नवोदित कलाकार पुष्कळ होते. पण खाँसाहेब सगळ्यांच्या वाट्याला येणे केवळ अशक्य होते. खाँसाहेबांच्या खुबी काणेबुवांनी उचलल्या होत्या. गुरुकुल पद्धतीच्या शिक्षणांनी त्यांच्याजवळील खाँसाहेबांची गायकी श्रीमंत होती. तेव्हा जे खाँसाहेबांकडे शिकून मिळणार तेच काणेबुवांकडे मिळणार. असे म्हटल्यावर बुवांचे शिष्य आणखी वाढले नाहीत तर नवलच.

१९५२ साली दादरला गजाननबुवांचे गाणे वनमाळी हॉलमध्ये झाले होते. तंबोऱ्याला काणेबुवा होते. समोर अनेक श्रोते होते. त्यांच्यात हायकोर्टचे वकील बाळासाहेब टिकेकर होते. गजाननबुवांचे गाणे तर टिकेकरांना आवडलेच पण काणेबुवांच्या साथीने ते प्रभावित झाले आणि गाणे संपल्यावर दादर स्टेशनपर्यंत बाळासाहेबांनी काणेबुवांचा पाठलाग केला आणि त्यांना नमस्कार करीत त्यांच्याकडे शिकण्याची इच्छा व्यक्त केली. काणेबुवांनी, बाळासाहेब कुठे राहातात वगैरे चौकशी करून शिकवणीस मान्यता दिली. दुसऱ्या दिवसापासून, गिरगावला माधवाश्रमांत टिकेकरांच्या घरी जाऊन बुवा शिकवू लागले. एकदा शिकवणी सुरू झाली की त्यांना जेवणाचेही भान राहात नसे. गाणे शिकणाऱ्या व म्हणणाऱ्या सर्वच कलाकारांच्यात बुवा रस घेत असत. १९६९ साली मुंबईला मराठा मंदिरच्या स्पर्धेत **'रघुवीर आज घरी येणार'** बाळासाहेबांच्या पत्नी सौ. सुमती टिकेकर म्हणणार होत्या. त्या वास्तविक कमल तांबेकडे गाणे शिकत पण तरीसुद्धा बुवांनी त्यांचे नाट्यगीत ठाकठीक करून दिले. त्या स्पर्धेत सुमतीबाईंनी प्रथम क्रमांक पटकावला. मंजुताई मोडकांकडे एकदा काणेबुवांची मैफल होती. तंबोऱ्याला होते नीळकंठबुवा अभ्यंकर. पं. बाळासाहेब

तालुक्यातील वावोशी गावच्या विष्णुपंत पेंडसे यांची मुलगी वत्सला हिला गिरगावात तिच्या आत्याकडे बघण्याचा कार्यक्रम जगन्नाथबुवा, दादासाहेब व त्यांच्या पत्नी यांनी काणेबुवा येण्यापूर्वीच उरकून घेतला होता व मुलगी पसंतही केली होती. बुवांना या तिघांचा शब्द प्रमाण होता. परंतु मुलीला, मुलगा बघण्याची इच्छा होती म्हणून परत एकदा जगन्नाथबुवा काणेबुवांना घेऊन गिरगावी गेले. एकमेकांची पसंती झाली. अशा तऱ्हेने दादासाहेब, शांताताई आणि जगन्नाथबुवा यांच्या पुढाकाराने वत्सला पेंडसे आणि दत्तात्रय काणे यांचा विवाह सोहळा ब्राह्मण साहाय्यक संघ दादर येथे १२ जून १९५४ रोजी संपन्न झाला. लग्न सोहळ्याला अनेक दिग्गज उपस्थित होते. लग्नात आमरसाचा जंगी बेत होता. रात्री म. विलायत हुसेनखाँ यांचे गाणे झाले. त्या दिवशीचे खाँसाहेबांचे गाणे अतिशय हृद्य झाले ते गाणे ऐकून गजाननबुवा जोशींच्या डोळ्यात पाणी आले. आणि त्यांचा गंडाबंध शिष्य होण्याची इच्छा काणेबुवांकडे प्रकट केली बुवांच्या मध्यस्थीमुळे ही त्यांची इच्छा पुढे पूर्णही झ।ली.

आता बुवा चतुर्भुज झाल्यामुळे जबाबदारी वाढली होती. दादासाहेबांच्या घरी राहाणे मालतीताईंना प्रशस्त वाटत नव्हते. म्हणून तात्पुरती शिवाजी पार्कला ५० रु. भाडे देऊन एक खोली घेऊन बुवांनी आपला नवा संसार मांडला. शिकविण्या चालूच होत्या ८ मार्च १९५५ साली बुवांना पुत्ररत्न झाले. आता मात्र एका खोलीत संसार करण्यापेक्षा इचलकरंजीला स्वतःच्या घरात जाणे वहिनींना (बुवांच्या पत्नी) पसंत पडले. इचलकरंजीत नात्याचे दुसरे कोणीच नव्हते. त्यांच्या पत्नींनी एकटे राहायची तयारी दर्शविली. खरंतर बुवांची आई गेल्यावर कलेक्टर शेखनी काणेबुवांना इचलकरंजीत येऊन राहायला हवे, असे फर्मान आधीच काढले होते. त्यामुळे वैनींच्या प्रस्तावाला बुवांनी ताबडतोब मान्यता दिली आणि बुवा त्यांना घेऊन १९५५ साली इचलकरंजीला आले. प्रथम काही दिवस डॉ. दादासाहेब भिडे यांच्या घरी मुक्काम केला. आपल्या घरातील भाड्याची काही बिऱ्हाडे खाली करून राहाण्यापुरती जागा तयार केली आणि स्वतःच्या घरात सहकुटुंब राहण्यास गेले. पत्नीचा धाकटा भाऊ यशवंत यांसही त्याच्या शिक्षणाची सोय करण्यासाठी व पत्नीला सोबत करण्यासाठी बोलावून घेतले. अशा तऱ्हेने कुटुंबाची व्यवस्था करून बुवा मुंबईला परतले.

आता बुवांना सतत मुंबई–इचलकरंजी अशा वाऱ्या कराव्या लागत होत्या. मुंबईत पसरलेला शिष्यवर्ग आणि तेथे बुवांचे बसलेले बस्तान एकदम थांबविणे शक्य नव्हते. त्यानंतर आठवड्यातून तीन दिवसांऐवजी मुंबईला सलग पंधरा दिवस राहून पुढील काळ इचलकरंजीत घालविण्याचा आपला मानस असल्याचे बुवांनी

शिष्यवर्गाला सांगितले व शिष्यवर्गाने ते मान्य केले. अशाप्रकारे १९५५ ते १९५८ या काळात इचलकरंजी–मुंबई अशी कसरत करीत बुवांनी इचलकरंजीतल्या शेती व घरात लक्ष दिले. कुळकायद्यात अडकलेली शेती सोडवून घेतली. घरातील बाकी बिऱ्हाडे हलवून घर ताब्यात घेतले.९ सप्टेंबर १९५६ ला बुवांना दुसरे पुत्ररत्न झाले. बुवांचा संसार वाढू लागला होता. आता बुवांना इचलकरंजीतच राहायला बोलवावे, अशी चर्चाही सुरू झाली होती. १९५७ च्या देवदिवाळीला बुवांना कन्यारत्न झाले. बुवांच्या या सुखी संसारात त्यांच्या पत्नी सावलीसारख्या खंबीरपणे बुवांच्या पाठीशी उभ्या होत्या.

संगीताबरोबरच इतर अनेक गोष्टीत, बुवा रस घेत असत. ते इचलकरंजीत आले की त्यांचा सल्ला घेण्यासाठी त्यांच्या घरी अनेक क्षेत्रातल्या लोकांची ये–जा असायची. 'शेतात बी कुठले पेरू ? गुरांच्या बाजारातून कुठला बैल खरेदी करू?' अशा गोष्टींत सुद्धा बुवा योग्य सल्ला देत असत. एकदा मुंबईत कणेकरांकडे सुताराचे काम चालू होते. तिथे खिळा ठोकण्यापासून शोकेसच्या रचनेपर्यंत सर्व गोष्टी बुवांनी आपल्या मार्गदर्शनाखाली करून घेतल्या होत्या चलाख आणि कुशाग्र बुद्धीचा माणूस कुठल्याही क्षेत्रात आपला ठसा उमटवू शकतो याचे काणेबुवा हे मूर्तीमंत उदाहरण होते.

बुवांची इचलकरंजीतली पहिली गाण्याची शिकवणी गुलगुंजेबुवांच्या सांगण्यावरून १९५८ साली सुरू झाली. बुवांचे पहिले शिष्य कुलको कारखान्याचे मालक गजाननराव माणकापुरे हे होत. त्यांना महिन्यातून आठ दिवस शिकवून व शंभर रु. फी घेऊन बुवा मुंबईस जात पण गजाननरावांचे एवढ्या शिकवणीने समाधान होत नसे. ते बुवांना म्हणाले, 'तुम्ही मुंबईहून परत येईपर्यंत मागील शिकवलेले सर्व मी विसरून जातो.' हे टाळण्यासाठी मुंबई सोडून बुवांनी कायमचे वास्तव्यास इचलकरंजीत यावे, असा आग्रह गजाननराव करू लागले. बुवांची या गोष्टीला हरकत नव्हती पण रोजच्या शिकवणीनी गजाननरावांना कंटाळा येऊन शिकवणी सोडली तर सर्वच उत्पन्न बंद होईल. मुंबईत उत्तम बसलेले बस्तान तुटेल, अशी धास्ती बुवांना वाटत होती.

विलायतहुसेन खाँकडे शिकत असताना घडलेल्या एका प्रसंगामुळे एक अनामिक भीती बुवांच्या मनात घर करून होती. एक दिवस म. विलायत हुसेन खाँ यांनी काणेबुवांकडे पन्नास रुपयांची मागणी केली. एकादशी घरी शिवरात्र असाच तो प्रसंग होता. त्यामुळे ती मागणी बुवांना पुरविता आली नव्हती. त्यासाठी बुवा दोन दिवस शिकवणीला गेले नव्हते. खाँसाहेबांना शिकवण्यावर बऱ्यापैकी पैसे मिळत होते.

पण पाठीच्या दुखण्याच्या आजाराने त्यांचा खूप पैसा खर्च झाला होता. तिसऱ्या दिवशी बुवा शिकवणीला गेल्यावर 'दहा रुपये तरी दे म्हणजे आजच्या जेवणापुरते तूप विकत घेईन' असे खाँसाहेब म्हणाले. त्या काळात दिल्ली, आग्राकडील मुसलमान तेलातले पदार्थ खात नसत. अस्सल तुपातच त्यांचे जेवण बनत असे. एवढा कोठीवाला महान गायक पण रोजच्या जेवणाला दहा रुपयेसुद्धा नसावेत या गायकाच्या आयुष्यातील विदारक सत्याची जाणीव बुवांना झाली. सुदैवाने बुवांकडे त्यावेळी बारा रुपये होते. त्यापैकी दहा रुपये बुवांनी खाँसाहेबांना दिले आणि गुरुंची इच्छा पूर्ण केल्याचे समाधान त्यांना मिळाले. पण हा प्रसंग बुवांच्या मनात खोल रुजला होता. एवढ्या मोठ्या माणसाचे जर असे हाल, तर आपले काय होईल, या कल्पनेने ते कधीकधी बेचैन होत असत. त्यामुळे मुंबई सोडून इचलकरंजीत कायमचे वास्तव्याला येण्याचा निर्णय घेण्यापूर्वी या सर्व बाबींचा विचार करणे त्यांना आवश्यक वाटत होते.

❖❖❖

४

# इचलकरंजीतील दिमाखदार कारकीर्द

बुवांना वाटत असलेली आर्थिक भीती दूर करण्यासाठी इचलकरंजीतील अनंतराव भिडे, दत्ताजीराव कदम ही कारखानदार मंडळी बुवांच्या साहाय्याला उभी राहिली. बुवांच्या चरितार्थासाठी माग घालून देण्याचे ठरविले गेले. बुवांचे शिष्य. गजाननराव माणकापुरे यांनी रोख दहा हजार रुपये शिकवणीची आगावू फी म्हणून देण्याचे मान्य केले. या सर्व मंडळींच्या पाठिंब्याच्या बळावर काणेबुवा १९६० साली मुंबई सोडून इचलकरंजी येथे कायमच्या वास्तव्यसाठी आले. इकडे आल्यानंतर नवीन मांडलेल्या मागाच्या व्यवसायात जम बसविणे आणि शेतीकडे लक्ष देणे, असा राबता सुरू झाला. गजाननरावांबरोबर बुवांनी फी मागायची नाही, आणि गजाननरावांनी द्यायची नाही, असा अलिखित करार झाला होता. बुवा रोज सकाळी दोन तास व संध्याकाळी दोन तास असे पाच–सहा वर्षे गजाननरावांना शिकविण्यास जात होते. मोहितेबुवा, भानुदास गुरव, गणपतराव डवरी आठवड्यातून एक दिवस साथीला येत असत. ते महिना शंभर रुपये पगार घेत. त्या सुमारास बाबूराव गुरव नोकरीनिमित्ताने इचलकरंजीला आले होते. साथीपुरता ठेका बाबूराव धरतात हे बुवांना माहीत होते. नव्यानी आलेल्या या मुलाचे आयुष्य मार्गी लागावे म्हणून बुवांनी गजाननरावांना रोज साथीला तबला हवा, असा आग्रह करून बाबुरावांना साथीला ठेवण्यास सांगितले. बाबूरावांना शंभर रु. फी देण्याचे नक्की झाले. त्या निमित्ताने बाबूरावांनाही बुवांच्या मार्गदर्शनाखाली रोज सकाळ, संध्याकाळ तबल्याची मेहनत करता आली. गजाननराव तंबोराही स्वतः वाजवत नसत. करीमसाहेबांना एक हजार रु. देऊन तंबोरा वाजविण्यासाठी बोलावत असत. कार्यक्रम असेल तेव्हा भानुदास किंवा गणपतराव साथीला असत. गजाननरावांना पैशांची कमी नव्हती म्हणूनच काणेबुवांची शिकवणी चालू झाल्यानंतरही बुवांच्या सांगण्यावरून त्यांनी गुलगुंजेबुवांची शिकवणी बंद न करता उलट त्यांना फी पंचवीस रुपये वरून चाळीस रुपये अशी वाढवून दिली. बुवांच्या शिकवणीमुळे गजाननराव आता हौशी कलाकार म्हणून नाव मिळवू लागले होते. मिरजेच्या अंबाबाईच्या उत्सवात, नरसोबावाडीच्या कृष्णाबाई उत्सवात त्यांनी

मैफली रंगवल्या होत्या. बाळकृष्ण बुवांची पुण्यतिथी साजरी करण्यासाठी गजाननरावांनी हातभारही लावला होता. बुवांना या शिकवणीमुळे धंद्यातील दगदग विसरण्यास मदत होत होती. कारण संगीत हाच बुवांचा खरा श्वास होता. धंद्याच्या प्रदूषणात संगीताच्या शिकवणीची स्वच्छ हवा उपभोगल्याचा आनंद त्यांना मिळे. पुढे गजाननरावांना किडनीचा त्रास सुरू झाला व त्याचा गाण्यावर परिणाम होऊ लागला. काणेबुवांच्या ओळखीने गजाननरावांना पुण्याच्या जहाँगीर हॉस्पिटल मधे डॉ. सरदेसाई यांची ट्रीटमेंट सुरू करण्यात आली. या ट्रीटमेंटचा उपयोग होत नाही, असे जाणवल्यामुळे त्यांना अमेरिका व जर्मनीला पुढील उपचारासाठी न्यायची तयारी करण्यात आली. परंतु तत्पूर्वीच १९६७ साली त्यांचे निधन झाले. बुवांचा एक गुणी, उदार व प्रेमळ, श्रीमंत शिष्य हरपल्यामुळे बुवांचा एक मोठा आधार गेला.

त्याचवेळी सूतमाग व्यवसायातही प्रचंड मंदी आली. मालाला उठाव येईना. माग चालविणे म्हणजे नुकसानीचे, अशी स्थिती झाली. लोक आपापले माग विकू लागले. या परिस्थितीचा परिणाम बुवांच्या आर्थिक स्थितीवर झाला. माग घेण्यासाठी काढलेले कर्जही अद्याप फिटले नव्हते. नवीन कर्ज देण्यासाठी बँका तयार होत नव्हत्या. अशा बिकट परिस्थितीत दत्ताजीराव कदम आणि स्टेट बँकेचे मॅनेजर घारपुरे यांनी बुवांना मदतीचा हात दिला आणि शेतीच्या तारणावर कर्ज मंजूर केले. पण आलेल्या मंदीचा फटका इतका जबरदस्त होता की परिस्थिती अवघडच होती. सगळे विकले तरी घेतलेले कर्ज फेडता येईल, याची खात्री वाटत नव्हती. या सर्व ताणतणावामुळे बुवांना मधुमेहासारखा असाध्य विकार जडला. तरीही हातपाय गाळून न बसता बुवांनी आणि सौ. वहिनींनी धीरानी परिस्थितीचा सामना केला. आपल्या मुलांच्या शिक्षणाकडे पूर्ण लक्ष दिले. परिस्थितीचा परिणाम मुलांच्या शिक्षणावर होणार नाही याची काळजी घेतली आणि अशा तऱ्हेने मोठ्या जिद्दीने व निश्चयाने परिस्थीतीवर मात केली.

आज बुवांची दोन्ही मुले सुस्थितीत आहेत. मोठा मुलगा चंद्रकांत याने टेक्स्टॉईल शाखेत डॉक्टरेट ही उच्च पदवी प्राप्त केलेली आहे आणि डी. के. टी. कॉलेजमध्ये काही दिवस प्राचार्यपद भूषवूण कार्यकारी संचालक म्हणून कार्यरत आहे. धाकटा मुलगा गजानन वकील असून कोल्हापूरात प्रॅक्टिस करत आहे. चंद्रकांतने मुंबईतील रेमंड कंपनीतील मोठ्या पगाराची नोकरी सोडून इचलकरंजीच्या विकासासाठी परत यावे आणि इचलकरंजी येथे नव्याने सुरू होत असलेल्या दत्ताजीराव कदम, टेक्स्टाईलचे कॉलेजमध्ये काम करावे, असा आग्रह कल्लापाण्णा

आवाडे आणि इतर ज्येष्ठांनी धरल्यामुळे त्यांच्या आग्रहाला मान देऊन इचलकरंजीत सन्मानाने स्थायिक होण्याचे ठरविले. आज त्याने आपल्या कर्तृत्वाने कॉलेजला भारतात मानाचे स्थान मिळवून दिले आहे. अशा तऱ्हेने मुंबई सोडून इचलकरंजीत सन्मान मिळविण्याची वडिलांची परंपरा त्याने कायम राखली आहे. आता चंद्रकांत याचा मुलगा अजित वडिलांच्या पाऊलावर पाऊल टाकत इंजिनियर झाला असून, अमेरिकेत उच्च शिक्षण घेत आहे. गंमतीची गोष्ट म्हणजे इचलकरंजीतील नागरिकांनी या बापलेकांच्या कर्तृत्वाची दखल घेऊन काणेबुवा आणि त्यांचा मुलगा दोघांनाही फाय फाऊंडेशन पुरस्कारांनी सन्मानित केले आहे. चंद्रकांतची पत्नी, प्रतिभा आणि गजानन यांची पत्नी सुखदा, आपल्या संसाराची जबाबदारी खंबीरपणे सांभाळत आहेत. सुखदा विशारद असून संगीत क्षेत्रात काम करत आहे. तर प्रतिभाची मुलगी आश्विनी, संगीताचे धडे घेत आहे. प्रतिभा वहिनींच्या (काणेबुवांच्या पत्नी) पावलावर पाऊल ठेवून हसतमुखाने येणाऱ्या पाहुण्यांचे, कलाकारांचे आदरातिथ्य करत आहे. अशा तऱ्हेने संगीतातील सुरेलपणाबरोबरच संसाराचा सूरही बुवांनी उत्तमपणे साधला आहे.

संगीताच्या बळावर बुवांनी जशी आपली घरची मजबूत मांडणी केली तशीच मांडणी इचलकरंजीतील समस्त सांगीतिक संसारातही केली. इचलकरंजी नगरीत बुवा आल्याने एक वेगळेच संगीतमय चैतन्य पुन्हा एकदा नगरीला अनुभवायला मिळू लागले. बुवा मुंबईत असताना बाळुबुवा इजारेनी बाळकृष्णबुवा संगीत मंडळातर्फे दरवर्षी एका मोठ्या गवयाचा कार्यक्रम करून संगीताचे वातावरण सुरेल ठेवण्याचा एकाकी प्रयत्न केला होता. काणेबुवा नगरीत परतल्यावर त्याला आणखी वेग आला. बुवांनी इचलकरंजीतील दत्तोबा नवनाळे यांनी स्थापन केलेल्या ज्ञानेश्वर भजनी मंडळात जायला सुरुवात केली. या भजनी मंडळातर्फे गजाननराव कांबळे यांच्या माडीवर ज्ञानेश्वर पुण्यतिथी साजरी होत असे व दर गुरुवारी व शनिवारी भजन होत असे. **जे जे आपणासी ठावे ते ते दुसऱ्यासी सांगावे शहाणे करून सोडावे सकल जन ।** या रामदासांच्या उक्तीप्रमाणे बुवांनी त्या भजनी मंडळातल्या लोकांची संगीताची शास्त्रीय बैठक भजनांच्या माध्यमातून तयार केली. काळी पाचचा षडज करून गाणारे बुवा हे एकमेव होते. गंधर्वांचे अभंग **पतित तू पावना.. जोहार मायबाप.... धाव घाली विठु आता...** अगदी हुबेहुब बालगंधर्वांसारखे गात. **कशी जाऊ मी वृंदावना....** अशासारख्या गवळणी वेगवेगळ्या चाली लावून म्हणत असत. त्यांची भजनातील गायकी पूर्णपणे वेगळी होती. शब्दांची फेक, आवाजातील भक्तीपूर्ण आर्तता, मांडणीतला मोजकेपणा, तारसप्तकात सहजपणे जाणारी आवाजाची झेप.

तितक्याच ताकदीचा मंद्रातील भारदस्त भरीवपणा ह्यांनी ईश्वराच्या गाभाऱ्यातच आपण बसलो आहोत, अशी प्रत्येकाची अवस्था होत असे.

दत्तुबुवा नवनाळे, शंकरराव नवनाळे, महालिंग मुरदंडे,, सौदागर कडतारे, करीमसाहेब बापूसाहेब खारपंदे, वस्ताद नवलगुंदकर, बाबुराव गुरव, रमेश सुभेदार, आण्णाबुवा बुगड इत्यादींचा या भजनी मंडळात समावेश होता. मंडळातला प्रत्येक जण बुवांच्या तालमीत तयार झाला होता. तेथे जात–पात लहान–मोठा, उच्च–नीच श्रीमंत–गरीब कसलाच भेद नव्हता. सगळेच जण स्वरसागराचे पुजारी होते. बुवांनी या मंडळींना घेऊन अनेक कार्यक्रम केले. आजही या भजनी मंडळीतील प्रत्येकजण गाताना शब्दसुरांच्या लडिवाळ फेकीनी वातावरण भरून टाकतो. बुवांनी प्रत्येकात आत्मविश्वास निर्माण केला. त्यामुळे एक–एक भजन अर्धा–अर्धा तास ही मंडळी गाऊ शकतात. प्रत्येक जणाने आलाप घेऊन भजनात आपली स्वतंत्र हजेरी लावलीच पाहिजे, असा बुवांचा कटाक्ष असे. त्यामुळे भजनी मंडळात कितीही लोक असले तरी बुवांचे जातीने, वैयक्तिक लक्ष असे. आळस व शॉर्टकट बुवांना चालत नसे. नियमितपणे ते स्वतः जात त्यामुळे बाकीचे आपोआपच ती शिस्त पाळत. बुवांच्या गाण्याबद्दल या लोकांना विचारले तर 'आमचे गाणे म्हणजे अत्तराच्या मोकळ्या बाटलीचा वास आहे' असे ते म्हणतात.

बुवांच्या मनमिळाऊ स्वभावाबद्दल आणि क्षणात भक्तिरसांत बुडविणाऱ्या गाण्याबद्दल प्रत्येकजण भारावून बोलत असतात.

□ **बुवांच्या सहवासात :** १९६०–६१ साली नारायण बाबासाहेब एज्युकेशन सोसायटीचे गोविंदराव हायस्कूल खूपच नावारूपाला आले होते. त्या शाळेचा सगळीकडे दबदबा होता. मी त्यावेळी सहावी इयत्तेत होते. आम्हाला प्रभाकरबुवा शेंडे संगीत शिक्षक म्हणून लाभले होते. शेंडेबुवा संगीत छान शिकवित आणि कीर्तनही उत्तम करत. प्रभाकर लक्ष्मण शेंडेबुवा मुळचे वाईजवळच्या पाचवड गावचे. नोकरीच्या शोधार्थ ते इचलकरंजीत आले होते. संगीत विशारद ही नोकरीस आवश्यक पदवी नसतानाही त्यांच्या कलेतील प्रगती बघून त्या वेळी मुख्याध्यापक असलेल्या माझ्या वडिलांनी म्हणजेच पी. एम. रानडे सरांनी शेंडेबुवांना संगीत शिक्षक म्हणून रुजू करून घेतले होते. मात्र लवकरात लवकर बुवांनी संगीत विशारद ही परीक्षा पास झाले पाहिजे, अशी अटही त्याचवेळी घातली होती. त्या काळात गोविंदराव हायस्कूलचे स्नेहसंमेलन म्हणजे इचलकरंजीतले मोठे आकर्षण असायचे. पी. एम सरांनी मुलांचे ऐतिहासिक, मुलींचे पौराणिक नाटक बसविण्याचा पायंडा पाडला होता. त्यावेळी आमच्या शाळेची नाटके, नेहमी जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवित आणि संगीताचे

विशेष पारितोषिक शाळेलाच मिळे. मी सहावीत असतानाच शाळेत **सुवर्णतुला** हे संगीत नाटक बसविण्याचे ठरले. माझी त्यात सत्यभामेची भूमिका होती. आमच्या तालमी रात्री दोन-तीन पर्यंत चालत आणि नाटकाची संगीताची बाजू सांभाळण्यासाठी शेंडेबुवाही रात्रंदिवस धडपड करीत असत. त्यामुळे विशारदचा अभ्यास करण्यासाठी त्यांना दिवसभर वेळच नसे. इचलकरंजीत नुकतेच वास्तव्यात आलेले काणेबुवा आमची व शेंडेबुवांची ही सर्व धडपड बघत होते. शेंडेबुवांची विशारद होण्याची इच्छा आहे आणि नोकरी टिकविण्यासाठी त्यांना विशारद होणे आवश्यक आहे हेही त्यांना माहीत होते आणि म्हणूनच जेव्हा शेंडेबुवांनी 'रात्री अडीच नंतर आपण मला शिकविण्यासाठी वेळ दिलात तर मी तुमचा आभारी होईन,' अशी विनंती केली तेव्हा त्यांच्या चिकाटीचे कौतुक करीत काणेबुवांनी अशा अपरात्रीही शेंडेबुवांना शिकविण्याचे मान्य केले. मग नाटकाची तालीम संपल्यावर शेंडेबुवा आम्हा मुलींना घरी पोचवून, रागांची तालीम घेण्यास काणेबुवांकडे जात असत आणि काणेबुवाही त्या वेळी त्यांना शिकविण्याच्या तयारीत वाट पाहात बसलेले असत. खरोखरीच धन्य तो गुरू व धन्य तो शिष्य !

मुंबईसारखीच इचलकरंजीतही बुवांकडे शिक्षण घेण्यास येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या हळूहळू वाढू लागली. बुवा मेहनतीला बसले की तबल्याच्या साथीला असत वस्ताद नवलगुंदकर. बाबुराव गुरव तर कधी स्वामी. बाबुराव तर तंबोऱ्यावरही बुवांच्या मागे बुवांची साथ करीत. **विठू माझा लेकुरवाळा... यदुमनी सदना... सुखालागी करिसी तळमळ...** अशी अनेक भजने व नाट्यगीते ते अतिशय उत्तम तऱ्हेने सादर करीत असत. शास्त्रीय संगीत असो वा उपशास्त्रीय संगीत असो, बुवांनी शिकवलेल्या जागा ते तंतोतंत काढीत असत. अपघाताने बोटे रक्तबंबाळ झाली तरी तबल्याच्या साथीत कुठे कमी पडू देत नसत. अडचणीत असलेल्यांना मदत करण्यात ते अग्रेसर होते. एकूणच 'जिथे कमी तिथे आम्ही' या उक्तीप्रमाणे सर्वात रंगून जाणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे बाबूराव गुरव.

असेच एक गुणी शिष्य म्हणजे रमेश सुभेदार. आवाज अतिशय गोड. मला तर वाटायचे या माणसाला ठरवूनही बेसूर होता येणार नाही. **दिलरुबा मधुर** या सारखी नाट्यगीते ते अतिशय गोड गात असत. पण व्यवसायात पडल्यामुळे पुढे त्यांची प्रगती होऊ शकली नाही.

उत्तम पेटीची साथ करणारे, बापूसाहेब खारपंदे हे असेच एक नम्र व साधे

व्यक्तिमत्त्व होते. तर वस्ताद नवलगुंदकर तबल्यावर अतिशय उत्तम हात असलेले होते. त्यांचे बोलणे गोड होते आणि गाण्यात रस घेऊन त्याला पोषक अशी साथ ते करत असत.

एकूणच इचलकरंजीत आल्यावर, बुवांनी आपल्याभोवती जमविलेली मंडळी एकसे एक बढकर होती.

माझा बुवांचा प्रत्यक्ष परिचय १९६६ मध्ये झाला. पुढे तो वाढत गेला. जून १९६६ साली मॅट्रिकच्या परिक्षेत संगीत विषयात पहिली आल्यानंतर पेढ्यांचा पुडा घेऊन मी बुवांकडे गेले. मनात आदरयुक्त भीती होती पण अज्ञानी निर्भयताही होती. म्हणूनच बेधडक मी त्यांना सांगितले, 'बैठकीचे गाणे शिकण्याची खूप इच्छा आहे.' बुवा अगदी शांतपणे गंभीरस्वरात म्हणाले, 'बसा.' मग त्यांनी तंबोरा काढला व पेटीवर काळी चार धरण्यास मला सांगितले. बाबूराव तबला घेऊन बसलेलेच होते. बुवांनी तंबोरा जुळवून माझ्या हातात दिला आणि स्वतः पेटी घेत म्हणाले, 'तुम्हाला काय गावे वाटते, ते गाऊन दाखवा.' मी ताबडतोब **यमन** मधील **अब प्यारे प्यारे आवेंगे...** ही त्रितालातील चीज बेधडक गायला सुरुवात केली. बुवा डोळे मिटून पाच ते सात मिनिटे ऐकत समोर बसले होते. मी माझे गाणे संपविले तेव्हा 'ठीक आहे पण पहिली पाटी कोरी करून त्याच्यावर मला नवीन अक्षरे काढायला वेळ लागेल. तेवढी चिकाटी आहे तुमच्याजवळ?' असा सवाल मला केला मी न घाबरता 'हो' म्हणून सांगितले.

दुसऱ्या दिवसापासून शिकवणीला सुरुवात झाली. सुरुवातीला मी पटकन विचारले, 'बुवा फी किती द्यायची ?' बुवा मिष्कीलपणे गालात हसले आणि म्हणाले, 'मला पैसे लागले म्हणजे तुमच्या वडिलांच्याकडून मागून घेईन.' पण ती वेळ नंतर कधीच आली नाही. बुवांनी **भीमपलास** शिकवायला घेतला. एक-एक स्वराची बढत अशी करायचे की मी चक्रावूनच जात असे. **अब तो बडी बेर...** ही ख्यालाची बंदिश, प्रथम त्यांनी व्यवस्थित बसवून घेतली. जवळजवळ दोन महिन्यांनी त्यांनी वस्ताद नवलगुंदकरांना शिकवणीच्या वेळी बोलाविले. विलंबित एक तालचा ठेका त्यांना वाजवायला सांगून मला तो दहा-पंधरा वेळा ऐकायला सांगितला. भरीच्या मात्रा कशा येतात, लय कशी धरायची याच्याकडे माझे लक्ष वेधत ठेका सुरू असताना माझ्याबरोबर सुरुवातीला त्यांनी ख्यालाचे तोंड म्हटले व पुरी बंदिश मला म्हणायला लावली. एका मात्रेचाही फरक न पडता ही बंदिश, पहिल्याच दिवशी तबल्यावर न चुकता मी बरोबर कशी म्हणून दाखविली याचे माझे मलाच आश्चर्य वाटले. दोन महिने नुसते स्वर आलाप आणि बंदिश याच्याखेरीज दुसरे काहीच नव्हते. त्यामुळे एकदम

तबल्यावर गायला सांगितल्यावर माझ्या मनात भीती होती. पण बंदिशींनी, तबल्याशी साधलेल्या एकरूपतेने माझ्या मनातून तालाची भीती पूर्ण नाहीशी झाली. खरच बुवांची शिकविण्याची धाटणीच वेगळी होती. तशीच त्यांची रागावण्याची पद्धतही फार निराळी होती. स्वर लागेनासे झाले की पेटी पुढे सरकवून तोंड फिरवून, डोळे मिटून बसायचे. पहिल्यांदा याची मला कल्पना नव्हती. काय करावे काहीच सुचायचे नाही. शेजारी बसलेल्या बाबूरावांनी 'गाणे चालू ठेवा' अशा अर्थाच्या केलेल्या खुणा समजायच्या नाहीत आणि मग आमची शिकवणी तेथेच संपायची. बाबूरावांनी व वस्तादांनी पुढे मला हळूहळू बुवांच्या स्वभावाची कल्पना दिली. बुवांना गप्प बसलेले आवडत नसे आणि त्यांच्यासमोर गुणगुणलेले तर त्याहून आवडत नसे. जवळजवळ सात ते आठ महिने नुसता **'भीमपलास'** चालला होता. घरी आल्यावर आज काय शिकविले या प्रश्नाला **'भीमपलास'** या खेरीज माझे उत्तर नसायचे. कधी–कधी मलाच सांगायला लाज वाटायची तेव्हा तात्या, माझे वडील मला म्हणायचे, ही गोष्ट लाज वाटण्याची नाही तर अभिमानाची आहे. तू अजिबात कंटाळा करू नकोस आणि आपणहून बुवांना दुसरा राग घ्या म्हणून सांगू नकोस.

बुवांच्या अशा शिकविण्याच्या परंपरागत पठडीच्या पद्धतीमुळे आणि असे शिक्षण घेण्याची सवय नसल्यामुळे मी येण्यापूर्वी मला माहीत नाही पण माझे बुवांकडे शिक्षण सुरू झाल्यानंतर अनेक लोक शिकायला आले आणि गेले.

बुवांच्या पसंतीला खरे उतरणे म्हणजे एक दिव्यच होते. व्यवहारात आणि गाण्यात गैर त्यांना बिलकूल खपत नसे. शिकवणीला गेल्यावर गप्पा मारत बसलेले त्यांना आवडत नसे. 'तंबोरे काढून गायला सुरुवात करा' असे ते आतून ओरडायचे. एकदा शिकवायला सुरुवात झाली की त्यांना भेटायला आलेली व्यक्ती न बोलता, शिकवणीच्या खोलीत येऊन बसायची. आमचे थोडे दुर्लक्ष झाले तर 'लक्ष कोठे आहे' एवढेच बोलायचे. अशावेळी काहीही कारणे द्यायची हिंमत कोणी करत नसे. मनासारखी शिकवणी झाली की बुवा खुलायचे आणि मग त्यांच्यावेळच्या गोष्टी सांगायला सुरुवात करायचे. बोलण्यामध्ये पं. जगन्नाथबुवा पुरोहित हा त्यांचा जिव्हाळ्याचा विषय असे. त्यांच्याबद्दल बुवा अतिशय आदराने बोलत–गाण्यात नवीन नवीन रागांची आणि उत्तमोत्तम चीजांची भर घातली, ती जगन्नाथबुवांनीचं, असे ते म्हणत. ते म्हणायचे 'मी देखील जगन्नाथबुवांकडून अनेक बंदिशी घेतल्या आहेत.' ते माझे गुरुबंधू असले तरी मी त्यांना गुरुस्थानी मानतो.

बुवांना शिकवणीला येताना वही आणलेली अजिबात चालत नव्हती.

बंदिशीच इतक्या घोटल्या जात की त्या आपोआपच पाठ होत असत.

एकदा गंमत झाली. बॅडमिंटन खेळून मी घरी आले आणि लगेचच गाण्याच्या क्लासला गेले. मग आवाज लागतोय कशाला ? बुवा नेहमीप्रमाणे पेटी सरकवून बसले. मला रडू आवरेना. पाच–दहा मिनिटे तशीच गेली. परत रडणे आवरून आवाज लावायला सुरुवात केली आणि घाबरतच बुवांना म्हटले, आताच बॅडमिंटन खेळून लगेचच इकडे आले त्यामुळे... त्यामुळे बुवा म्हणाले, 'असं करा, या वर्षी बॅडमिंटन चॅम्पियन व्हा. पुढल्या वर्षी अडथळा शर्यतीत बक्षिस मिळवा. नंतर लिंबू चमचा व त्यानंतर हुतूतू, बास्केटबॉल काहीतरी निवडून त्यात यश मिळवा आणि मग सवड झाली तर गाण्याला या.' त्या दिवसापासून बॅडमिंटनला पूर्णविराम दिला. बॅडमिंटन चॅम्पियनचे भूत उतरायला तो एक दिवस पुरेसा ठरला.

परीक्षा असली की नेमके बुवा कोठेतरी कार्यक्रम ठरवायचे. माझी त्यामुळे त्रेधा उडायची. कॉलेजच्या रोजच्या हजेरीत प्राचार्य पांडुरंगी यांनी मला सवलत दिली होती. पण परिक्षेला पर्याय नव्हता. सतत बुवांच्या बरोबर परगावी जावे लागे, कधी स्पर्धा म्हणून तर कधी कार्यक्रम म्हणून. त्यामुळे अभ्यास पेपरच्या आदल्या दिवशीच असायचा पण हे बुवांना सांगणार कोण आणि पटविणार कसे ? माझा नाईलाज व्हायचा. एक दिवस दुसऱ्या दिवशी पेपर म्हणून मी पुस्तक उघडून गच्चीत बसले होते. गाडीचा हॉर्न वाजला आणि बाबूराव घरात आले. त्यांचा आवाज खणखणीत होता. त्यामुळे ते आल्याचे मला लगेच कळले. 'वैनी (माझी आई) उषा आहे का घरात ? कराडला जायचे आहे. बुवांनी बोलावले आहे गाडी दारात थांबविली आहे.' बाबूराव ओरडत होते. आता बाबूरावांच्याकडून बुवांचा बुलावा म्हणजे नो एक्सक्युज. झाले, पुस्तक बंद केले. खाली येऊन तयारी केली व तंबोरा घेऊन मुकाट्याने गाडीत बसले. एरवी परीक्षा म्हटलं की आई मला रेडिओवरची गाणीसुद्धा ऐकू द्यायची नाही. पण बुवांनी बोलाविले म्हटल्यावर आई मला कधीच आडवायची नाही. आम्ही कराडच्या प्रवासला लागलो. बुवांना मी म्हटंले

'बुवा उद्या माझी परीक्षा आहे.'

'पेपर किती वाजता ?' बुवा म्हणाले.

मी म्हटले, 'सकाळी साडेसात वाजता.'

'असे होय. मग कराड काही लांब नाही. तुला पेपरच्या आत घरी सोडतो.' बुवा थंडपणे म्हणाले.

'अहो बुवा,पण माझा अभ्यास..... ?'

या माझ्या उद्गारावर ते म्हणाले,

'मग वर्षभर कॉलेजमध्ये जाऊन काय करता ?'

याला उत्तर काय देणार याच्यावर आणखीन काही बोलणे म्हणजे आणखीन दहा वाक्ये ऐकायची तयारी ठेवणे होते. मी पेपरचे विचार बाजूला ठेवले आणि पाच-दहा मिनिटे नुसती शांत बसून राहिले. मनात कार्यक्रमात काय म्हणायचे याची जुळवाजुळव चालली होती. त्या नादात कार्यक्रमाचे ठिकाण कधी आले ते कळलेच नाही.

प्रचंड जनसमुदाय समोर होता. मुंबईहून ऐतवडेकरांना तबल्याला बोलाविले होते. पेटीला बुवा बसणार होते. त्यामुळे गाण्यांत थापाथापी चालणार नव्हती. मग बेशिस्त बैठक तर फार दूरची गोष्ट. मी ठरविला होता 'पूर्वी' राग, आणि बुवांनी पेटीवर स्वर दिले पूरियाचे. मी बुवांकडे नुसते बघितले पण बोलायची हिंमत कोठे होती? बुवांनी नेहमीचा मिष्कील भाव चेहऱ्यावर आणत व उजवी भुवई उडवत खूण केली,

'करा सुरू.'

त्या बैठकीत मी काय गायचे हे तेच ठरवित असल्यामुळे शिकविलेल्या गोष्टी तयार असायला पाहिजेत, असा त्यांचा कटाक्ष असे. त्यांचा स्वतःच्या शिकविण्यावर इतका विश्वास होता की ऐनवेळी सांगितले तरी अमूक एक राग किंवा पद आपला शिष्य गाणारच, याची त्यांना खात्री असे. बुवा अतिशय आत्मियतेने व तळमळीने शिकवत. त्यामुळे त्यांच्या शब्दाबाहेर जायचे धाडस कोणीच करीत नसे. त्या दिवशीचा माझा कार्यक्रम अतिशय चांगला झाल्याचे अनेक श्रोत्यांनी मला सांगितले. कार्यक्रम यशस्वी करून पहाटे चार वाजता मी घरी पोचले आणि मग चहासुद्धा न घेता पेपरच्या तयारीला लागले..

असे मंतरलेले दिवस असतानाच १९६७ साली काणेबुवांनी इचलकरंजीतील कलोपासक मंडळींना एकत्र करून बाळकृष्णबुवा संगीत साधना मंडळाची स्थापना केली. इचलकरंजी नगरीतील संगीताचे वातावरण जोपासले जावे आणि त्यायोगे, महाराष्ट्राचे मँचेस्टर बनत असताना निर्माण झालेल्या यांत्रिकी जीवनातील ताणतणाव, संगीताच्या संतुलनाने साधता यावेत, असा उद्देश या मंडळाच्या स्थापनेमागे होता. मंडळाची संस्थापना करण्यास दत्ताजीराव कदम, रामशेट कांबळे, वसंतराव दातार, गजाननराव कांबळे, व्ही. के. कांबळे, अनंतराव भिडे, बाबासाहेब पाटील, ना. म. वाटवे, पु. मा. रानडे, रावसाहेब उत्तुरकर, गोविंदराव गोवंडे, शरद इजारे, गं. ना. थोरात, मधुमामा वेंगुर्लेकर, रामभाऊ गोळे, शंकरराव

नवनाळे, इंदिराबाई मराठे, माळीमास्तर आणि शेंडेबुवा यांनी पुढाकार घेतला होता. ज्येष्ठ साहित्यिक पु. ल. देशपांडे आणि इतर अनेक ज्येष्ठ कलाकारांनी गायनाचार्य पं. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकरांचे स्मारक इचलकरंजीत व्हावे, अशी इच्छा वेळोवेळी प्रदर्शित केली होती. ती इच्छा या मंडळाच्या स्थापनेमुळे पूर्ण झाली. १९६७ साली बुवांनी स्थापन केलेल्या पं. बाळकृष्णबुवा संगीत साधना मंडळातर्फे पं. बाळकृष्णबुवांच्या ५२ व्या पुण्यतिथी निमित्ताने त्यांच्या स्मृत्यर्थ 'पं. बाळकृष्णबुवा स्मृति मंदिर' या वास्तूचा उद्‌घाटन सोहळा पार पडला. स्मृतिमंदिराचे उद्‌घाटन पं. मल्लिकार्जुन मन्सूर यांच्या शुभ हस्ते तर पं. बाळकृष्णबुवांच्या पुतळ्याचे अनावरण पं. कुमार गंधर्व यांनी केले. या समारंभाचे अध्यक्ष होते पु. ल. देशपांडे ! शुक्रवार ९ फेब्रु १९७९ रोजी हा उद्‌घाटन सोहळा मोठ्या दिमाखात पार पडला. त्या दिवसापासून दरवर्षी बाळकृष्णबुवांची पुण्यतिथी स्मृती मंदिरात सातत्यानी साजरी होते. या स्मृतिमंदिरात राबवल्या जाणाऱ्या कार्यक्रमांमुळे नवोदित कलाकारांना व्यासपीठ आणि इचलकरंजीवासियांना बुजूर्ग कलाकारांचे गायन पुन्हा ऐकायला मिळू लागले. या मंडळींनी नवीन गायकांना उत्तेजन देण्यासाठी संगीतस्पर्धा आयोजित करण्याचा उपक्रमही सुरू केला. असे बहुद्देशाने उभे राहिलेले स्मृतिमंदिर आता इचलकरंजी नगरीचे भूषण ठरले आहे.

१९६८ सालापासून बालगंधर्व नाट्यसंगीत स्पर्धांना महाराष्ट्रात उधाण आले होते. त्यावेळी बाळकृष्णबुवा संगीत मंडळातर्फे इचलकरंजी येथे नाट्यसंगीत स्पर्धा आयोजित केल्या होत्या. बुवांनी मला त्या स्पर्धेत भाग घेण्यास सांगितले आणि त्यांनी **रुपबली तो** आणि **नरवर कृष्णा समान** ही दोन गाणी अतिशय उत्तम बसवून घेतली. नव्यांनी नाट्यगीत शिकवण्याची बुवांनी केलेली सुरुवात मला एक वेगळाच आनंद देऊन गेली. बुवांच्या गायकीत बालगंधर्व गायकी पुरेपुर मुरली होती. कुठल्या शब्दावर किती जोर द्यायचा, आलापी कशी करायची, तानांची लड कशी गुंफायची, शब्द कसा तोडायचा, श्वास कसा आणि कोठे घ्यायचा,सर्व बारकावे बुवा अतिशय सहजपणे स्वतः गावून शिकवत असत. असं वाटायचं बुवांनीच गात राहावं आणि आपण फक्त ऐकावं. तो स्वर्गीय आनंद होता. इचलकरंजीतील नाट्यसंगीत स्पर्धेत मला प्रथम पारितोषिक मिळाले. पुढे बालगंधर्वांच्या प्रथम पुण्यतिथीनिमित्त महाराष्ट्रभर बालगंधर्व नाट्यसंगीत स्पर्धांची एक साखळीच सुरू झाली. कोल्हापूर, सांगली, उगार, इचलकरंजी, पुणे, अहमदनगर, नाशिक अशा ठिकाणी स्पर्धा आयोजित केल्या गेल्या. या सर्व स्पर्धांतून मी प्रथम पारितोषिक मिळविले होते. पुण्याच्या बालगंधर्व स्पर्धा

कमिटीचे अध्यक्ष पु. ल. देशपांडे होते. त्यावेळी स्पर्धेत नंबर आल्यानंतर विजेत्यांची गाणी बालगंधर्व मंदिरात झाली. बक्षीस समारंभाचे अध्यक्ष होते मा. कृष्णराव.. मा. कृष्णराव यांनी बक्षीस देत असताना माझ्या पाठीवरून हात फिरविला.आणि सांगितले, ''काणेबुवा हा संगीताचा सागर आहे, त्याच्याकडून जेवढे म्हणून मोती वेचता येतील तेवढे वेच.'' हा सल्ला पुढे मी कायम लक्षात ठेवला.

समारंभाची वेगळी तयारी करून घेण्यासाठी पु. ल. नी पुण्यातील नारळकरांच्या बंगल्यावर मला **'नाथ हा माझा'** हे गाणे शिकवले होते. साहित्य, कला असं एकही क्षेत्र वर्ज्य नसलेल्या या महान व्यक्तिमत्त्वाबरोबर संगीत आराधनेत घालवलेले ते क्षण मी माझ्या हृदयात सोनेरी अक्षरांनी लिहून कोरून ठेवले आहेत.

पुण्याची स्पर्धा यशस्वी करून इचलकरंजीत परतल्यावर मला मिळालेल्या बक्षीसाची रक्कम मी बुवांना फूल ना फूलाची पाकळी म्हणून देण्यासाठी बुवांच्या घरी गेले. त्यावेळी ते म्हणाले, 'ही रक्कम मी घेतो. पण उद्यापासून इकडे शिकवणीला यायचे नाही' या एका वाक्याने माझी बोलती बंद झाली आणि त्यानंतर पुन्हा कधीही असे काही करण्याचे धाडस केले नाही.

काणेबुवा आपल्या शिष्यांना अशा सर्व बाजूंनी घडवत होते. त्यामुळे बड्या कलाकारांसमोर जाण्याचे मनोधैर्य आपसुकच तयार होत असे. त्यांच्यासारख्या चिकित्सक जाणकार गुरुची तालीम मिळाल्यामुळे, त्यांच्या पाठिंब्यामुळे मी अनेक बड्या कलाकारांसमोर माझी मैफल सादर करू शकले. माझे शिक्षण चालू असतानाच एकदा 'मी संगीत विशारद होऊ का ?' असा विचार बुवांसमोर काढला तेव्हा काही न बोलता बुवांनी एक दिवस **पूरिया धनश्री**, दुसऱ्या दिवशी **श्री**, त्यानंतर **बहार**, **सोहनी** असे एकापाठोपाठ एक राग शिकवायला सुरुवात केली. मला काहीच कळेना. शेवटी न राहवून मी बुवांना म्हटले 'बुवा हे काय चालले आहे ?'

तेव्हा तिरकसपणे म्हणाले, 'पोर्शन पूर्ण व्हायला हवा' त्यांच्या बोलण्याचा मतितार्थ समजण्यास मला बिलकूल वेळ लागला नाही. बुवांना नमस्कार करून मी म्हटले, 'इतक्या जलद मला बिलकूल शिकायचे नाही आणि परीक्षाही द्यायची नाही.' तेव्हा कोठे आमचे नेहमीचे संगीत शिक्षण पूर्ववत सुरू झाले.

नंतर कुंदगोळ येथील सवाई गंधर्व उत्सवात देखील बुवा मला आपल्याबरोबर गायला घेऊन गेले. अशा रितीने अनेक मैफली आणि स्पर्धांमध्ये भाग घ्यायला लावून संगीत शिक्षणाबरोबर बुवा मला अनुभव संपन्नही बनवत होते. कोजागिरी पौर्णिमा आली की रात्री सर्व शिष्यांची गाण्याची मैफल ठरवित आणि मसाले

दूध आणि कांदे पोहे करण्यास पत्नीच्या बरोबरीने स्वतः जातीने उभे राहात असत.

एकूणच त्यांच्या वागण्यात, बोलण्यात, शेती, माग यांच्यामुळे कराव्या लागणाऱ्या कष्टांचा ताण–ताणावांचा मागमूसही जाणवत नसे. एकदा एखाद्याला आपले म्हटले की त्याच्यासाठी काय वाटेल ते करायची त्यांची तयारी असे. स्पर्धेच्या काळात तर संध्याकाळची नेहमीची शिकवणी झाल्यावर रात्री पुन्हा नऊनंतर बुवा नाट्यसंगीताच्या तयारीसाठी घरी बोलवत असत. त्यावेळी त्यांचे तंबोरे मंडळात असल्यामुळे मला स्वतःचा तंबोरा घेऊन जावे लागे. रात्री घरी परतायला खूप उशीर होई. हे टाळण्यासाठी पुढे बुवाच माझ्या घरी रात्री साडेनऊ वाजता येत व दोन अडीच पर्यंत आमची शिकवणी चाले. शिष्यांच्या काळजीपोटी स्वतःच्या त्रासाची त्यांना बिलकुल पर्वा नसे. शिकवणीनंतरच्या गप्पात ते आपल्या भूतकाळात रमायचे. ते म्हणत, ''पंधराव्या–सोळाव्या वर्षापर्यंत उदरनिर्वाहासाठी पैसा मिळवावा लागतो, हे आम्हाला माहीत नव्हते.'' घर, दार, जमीन जुमला भरपूर होता. काही न करता बसून खाणारे जे स्थळ ते उत्तम स्थळ अशी त्या काळातील कल्पना होती. आता तशी परिस्थितीत नाही. कुळ कायद्यामुळे जमिनी राहिल्या नाहीत, त्यामुळे नोकऱ्या करणे आणि पैसा मिळविणे, ही गरज निर्माण झाली आहे. पूर्वी बालगंधर्वांचे नाटक उजाडेपर्यंत झाले नाही तर नाटक जमले नाही,असे म्हणत. आता काळ बदलला. लोकांची मानसिकता बदलली. आता रात्रीची बारा–दहाची लोकल पकडण्यासाठी नाटकाचा शेवटचा अंक गेला तरी चालेल अशी स्थिती आहे. गाण्याच्या मैफलीसुद्धा उशिरापर्यंत ऐकत बसायला लोकांना आता वेळ नाही. अशा बदललेल्या काळात देखील बुवांचे रोज तीन तास शिकवणे ही माझ्यासाठी पर्वणी होती.

पुढे १९७२ साली माझे लग्न झाले आणि त्याचवर्षी मुंबईत मराठा मंदिर या संस्थेचा रौप्यमहोत्सव होता. त्यानिमित्त नाट्यसंगीत स्पर्धा आयोजित केल्या होत्या. माझे गाणे त्यावेळी तयार होते व माझे सासरही कल्याणलाच होते. काणेबुवांच्या परवानगीने त्या स्पर्धेत मी भाग घेतला. स्पर्धेत एकूण तीनशे स्पर्धक होते. (तीन फेऱ्यात स्पर्धा पार पडल्या. सहा परीक्षक होते.) त्यात मी उषा रानडे म्हणून नाही तर सौ. मंगला सुधीर आपटे म्हणून स्पर्धक होते. परंतु इथेही माझे प्रथम पारितोषिक मी चुकवले नाही. श्रीपाद नागेशकरांची उत्तम तबला साथ त्यावेळी मला मिळाली होती. प्रतापराव गावडे, समितीचे अध्यक्ष होते. सर्वानुमते ***नरवर कृष्णासमान*** आणि ***मला मदन भासे*** या दोन गाण्यांची रेकॉर्ड एच. एम. व्ही. तर्फे काढण्याचे ठरले होते. पण त्याच वेळी मला मातृपदाचा लाभ होणार होता. त्यामुळे मी ह्या संधीचा फायदा घेऊ

शकले नाही. आयुष्यात संधी सतत आपला दरवाजा ठोठावत नाही. याचे प्रत्यंतर मला नंतर आले. नंतर माझे बुवांकडे जाणे कमी झाले.

माझ्यानंतर बुवांकडे मंगल जोशी शिकू लागली. इचलकरंजीतील पं. बाळकृष्णबुवा मंडळातर्फे होणाऱ्या वार्षिक नाट्य संगीत स्पर्धेत ती पहिली आली होती. बुवाच तिला परीक्षक म्हणून होते. सांगलीत वास्तव्यास असणारे मंगल जोशीचे वडील, माधवराव नारायण यांनी अतिशय आग्रह आणि गळ घातल्यामुळे बुवांनी मंगलला शिकविण्यास सुरुवात केली. मंगल आपल्या शिकवणीतले अनुभव सांगाताना म्हणाली, 'बुवा शिकवायला बसताना, तंबोरा अतिशय सुंदर लावून देत असत. षडज् उत्तम लागल्याशिवाय बुवा पुढे जात नसत. गाताना आवाजात जोर नको तर स्वरात मार्दवता हवी तसेच गाताना हातवारे केलेले तर बुवांना बिलकूल आवडत नसत.'

अशी डोळस तालीम बुवांकडून मंगलला मिळत होती. नैसर्गिक आवाजाची देणगी आणि फिरत लाभलेली मंगल बुवांनी सांगितलेली प्रत्येक जागा व्यवस्थित उचलत होती. परंतु त्या काळात तिची ग्रहणशक्ती व रियाज कमी पडायचा. सांगलीहून जाऊन दुसऱ्या दिवशी परत येईतोपर्यंत काही जागा लक्षात राहायच्या व काही विसरायच्या बुवा अशा वेळी विसरलेल्या जागा परत परत शिकवत असत. वास्तविक मधुमेहासारखी व्याधी जडल्यामुळे बुवांची सहनशक्ती कमी झाली होती. पण तरीसुद्धा शिकवायला बसले की ते त्यात तडजोड अजिबात करत नसत. बायकांनी कसे गावे, पुरुषांनी कसे गावे हे ते वेळोवेळी सांगत. हिराबाई बडोदेकर आणि माणिक वर्मा यांचा आदर्श स्त्रियांनी गाताना ठेवला पाहिजे असे त्यांचे मत होते. एकदा मंगलला **पंचम-राग** शिकवायला घेत असताना **आवोगावो** ही चीज पूर्ण बसली तरी काही केल्या तिला पाठ होत नव्हती. त्यामुळे शिकवणीला येताना ती वही घेऊन येई आणि वारंवार चिजेचे शब्द त्यात बघून म्हणे- बुवांना ही गोष्ट अजिबात सहन झाली नाही. चार-पाच वेळा असे झाल्यावर एकदम 'फेकून द्या ती वही' असे बुवा थोड्या वरच्या आवाजातच रागावले. एरवी घरात अगदी मोकळेपणानी आणि प्रत्येकाला नवीनतेचा स्वीकार करण्यासाठी आग्रही असलेले बुवा संगीताच्या बाबतीत सनातनी होते. संगीत हे आहे तसे पुढे जावे, चुकीचे जाऊ नये, ही त्यांची कळकळ असे.गाताना रागाची शुद्धता काटेकोरपणे पाळली पाहिजे, ठुमरी, नाट्यसंगीत, अभंग म्हणा, पण प्रथम शास्त्रीय गा. असा त्यांचा आग्रह असे. कुठल्याही शिष्याची अपेक्षेप्रमाणे चांगली जागा आली की त्यांचा तृप्त चेहरा बघण्यासारखा असायचा. एकदा कोडोलीला मंगलची मैफल पहाटे चार वाजता सुरू झाली. तिने **'ललत'** गायचे ठरविले होते. पण नेहमीच्या सवयीप्रमाणे

बुवांनी तिला **सोहोनी** म्हण म्हणून सांगितले. शिकविलेले सर्व तयारच पाहिजे असा त्यांचा कटाक्ष असे. तिचे **रवि मी** हे पद बुवांना खूप आवडायचे. आलेल्या प्रत्येकासमोर हे पद गाण्याचा आग्रह बुवा तिला करत आणि जे चांगले असेल त्याची मुक्तपणे स्तुतीही करत असत. पण शिष्य हुरळून जाऊ नये म्हणून वेळी जागेवर आणायलाही बुवा कधीच मागे-पुढे बघत नसत. उलट मंगलचे प्रथम गुरू कोल्हापूरचे सुधाकरबुवा डिग्रजकर यांनी शिकवलेली **शुद्ध कल्याण**ची चीज तशीच ठेवून बुवांनी त्यात तिला रागविस्तार शिकविला. एकदा त्यांची आणखीन एक शिष्या वर्षा भावे आणि मंगल दोघींची एकत्र शिकवणी बाळकृष्णबुवा मंडळात सकाळी सुरू होती. ती शिकवणी संपायला बराच वेळ लागला. आता मुलींना सांगलीला जायला उशीर होणार म्हणून 'कुकर झाला असेल वरणभात खाऊन जा' असे बुवांनी सांगितले. पण उगीच फार वेळ मोडेल म्हणून बुवांची नजर चुकवून या दोघी स्टँडवर गेल्या. काही वेळातच आपली दुचाकी घेऊन बुवा स्टँडवर हजर झाले. 'आता बारा वाजून गेले आहेत. चला घरी, जेवल्याशिवाय जायचे नाही' असे त्यांनी दरडावले. याप्रसंगानी दोघीही खजिल झाल्या. बुवांचा शब्द मोडून पुढे जाण्याची हिंमत त्यांनी पुन्हा केली नाही.

मंगल आज आकाशवाणीच्या सांगली केंद्रावर संगीत विभागात काम करत आहे. संगीताचे कार्यक्रमही ठिकठिकाणी करत आहे. मंगलच्या बरोबरीने सांगली आकाशवाणीवर कार्यरत असलेले मिरजेचे ऋषीकेष बोडस देखील काणेबुवांचेच तयार शिष्य आहेत. १९७२ साली भावे नाट्यमंडळाने बसविलेल्या **संगीत सौभद्र** मधे ऋषिकेष बोडस आणि वर्षा भावे यांनी कामे केली होती. त्यातील गाणी काणेबुवांनी बसवून घेतली होती. त्यांच्या शिकवण्याच्या पद्धतीने ऋषिकेष बोडस अतिशय प्रभावित झाले आणि बुवांकडे शिकायचेच हा ध्यास त्यांनी धरला. प्रथम बुवांनी शेतावर जायचे आहे, मागाकडे बघायचे आहे बाकीच्यांना शिकवायचे आहे अशी कारणे देत बोडसांना शिकवण्यास नकार दिला होता. बोडसांचे वडील हरेरामपंत बोडस हे उत्तम निरुपणकार व अतिशय विद्वान व्यक्तिमत्त्व होते. शिवाय हृषिकेशचे नाटकातील काम व त्यांनी गायलेली पदे यांनी बुवांना प्रभावित केले होते. काणेबुवांचे मित्र मोहन उत्तुरकर, बोडसांचे जवळचे नातलग होते. मोहन उत्तुरकरांनी आग्रह धरल्यामुळे, शिवानंद पाटील बरोबर हृषिकेशची शिकवणी मंडळात सुरू झाली. **जो अब कर** या **भैरव** रागातील बंदिशीने शिकवणीस आरंभ झाला. त्यानंतर बुवांना जडलेल्या मधुमेहाच्या व्याधीने उचल घेतली व त्यांचे मुंबईत मोठे ऑपरेशन झाले. त्याच सुमारास हृषिकेशचे इचलकरंजीला चौंडेश्वरी बँकेत, किर्तनोत्तर जागराच्या भजनाचा

कार्यक्रम होता. ऑपरेशन नुकतेच झाल्यामुळे बुवा कार्यक्रमाला येणार नाहीत अशी बोडसांना खात्री होती. म्हणून अगदी मोकळेपणाने बोडसने आपल्या कार्यक्रमाला सुरुवात केली आणि तेवढ्यात शाल पांघरुन बुवा श्रोत्यात अगदी पुढे येऊन बसले. बोडसांना आश्चर्याचा धक्काच बसला. आपल्या शिष्याबद्दल आपुलकी, प्रेम, जिव्हाळा बुवांना किती होता याचे हे मूर्तीमंत उदाहरणच होते. तेवढ्या तब्येतीत कार्यक्रम झाल्यावर बुवा बोडसांना म्हणाले, टाळांच्या आवाजात तंबोरा ऐकू येत नाही तेव्हा तुम्ही इलेक्ट्रॉनिक्स तंबोरा वापरा, म्हणजे त्याचा आवाज कितीही मोठा करता येतो. यावरून बुवांना आधुनिकीकरण वर्ज्य नव्हते पण त्याचा अतिरेक मान्य नव्हता हे दिसते.

बुवा खूप धार्मिक होते. एकदा पुण्याला डॉ. फडणीसांकडे बुवांचे भजन होते. पुण्यात आल्यावर कार्यक्रमापूर्वी ते आळंदीला जाऊन आले. रात्री भजनात त्यांचा आवाज अजिबात लागेना. मध्यंतरात 'आळंदीला जाऊन आल्यामुळे आवाज बसला असे कसे झाले' असे बुवा म्हणाले आणि त्यानंतरच्या बैठकीत बुवांचा आवाज अतिशय सुंदर लागला. भजन रात्रभर चालले होते. सर्वजण भक्तिरसाने मंत्रमुग्ध झाले होते. कार्यक्रम संपल्यावर बुवा म्हणाले, 'मध्यंतरात मी जे बोललो तो निरोप आळंदीपर्यंत गेला वाटते. म्हणूनच आवाज इतका चांगला लागला.' बुवा आपल्या तब्येतीची काळजी अजिबात घेत नसत. एकदा तब्येतीच्या तपासणीत शुगर काऊंट चारशे निघाला. पण बुवा कामात कुठेही कमी नव्हते उलट ते म्हणत डॉक्टरांनी औषधे देऊन एकशे पन्नास पर्यंत काउंट आणला की मी कॉटवरचा जिवंत मुडदा असतो. मला खूप दमायला होते. चारशे शुगरमध्येच मी नॉर्मल असतो असं ते म्हणत असत.

आजची आघाडीची तरुण गायिका मंजुषा कुलकर्णी (पाटील) ही बुवांचीच शिष्या. सांगलीच्या कराळे स्पर्धेत, बुवा पाहुणे म्हणून गेले होते. त्या स्पर्धेत सांगलीची मंजूषा कुलकर्णी चांगलीच चमकली. पुढच्या फेरीपूर्वी तिचे **रूप बली तो** हे गाणे ठीकठाक करून देण्यासाठी बुवा मुद्दाम उठून स्टेजच्या मागे ड्रेसिंगरूममध्ये गेले व तिथेच तिला गाण्यातल्या काही सुधारणा सांगितल्या. आपण शिकत नसताना देखील बुवा आपणहून आपल्या चुका दुरुस्त करायला आले ही गोष्ट मंजूषाने आपल्या वडिलांना सांगितली. त्याचवेळी तिचे वडील विद्याधर यांनी आपल्या मुलीला काणेबुवांकडेच शिकायला पाठवायचा निर्णय घेतला. त्यावेळी सांगली-मिरज येथून हृषिकेश बोडस, मंगल जोशी, बुवांकडे येतच होते. आता मंजुषाही बुवांकडे येऊ लागली. पहिले वर्ष ती आठवड्यातून दोन दिवस येत असे. तिच्या शिकवणीची

सुरुवातच **रूप बली तो...** आणि **बलसागर तुम्ही...** या नाट्यसंगीताने झाली. इतर दिवशी ती रेखा रायरीकर यांचेकडे शिकण्यास जात असे. पण 'कुठेतरी एकीकडे शिक' असा सल्ला रेखाताईंनी दिल्यामुळे पुढे मंजुषा रोज बुवांकडे येऊ लागली. दुपारी अडीचच्या बसने यायचे. चहा वगैरे बुवांकडेच घ्यायचा व चार पासून सात–साडेसात पर्यंत शिकवणी. रेखा रायरीकरनी शिकवलेली ..**येरी लाल हीच बंदिश** घेऊन **यमन** रागाने मंजुषाच्या शास्त्रीय संगीत शिक्षणाची सुरुवात झाली. आवाज गोड आणि खडा. तार सप्तकात आरामात जाणारा, फिरतही उत्तम अशा या हिऱ्याला पैलू पाडायला काणेबुवांसारखा जोहरी गुरू लाभला होता. त्यामुळे शिकविताना अनेक नवीन–नवीन प्रयोग बुवांनी तिच्यावर केले. एकाच वेळी दोन–दोन, तीन–तीन राग, बुवा तिला शिकवायला घेत. बुवा म्हणत एकदा राग शिकवायला घेतला की तो एकाच वेळी पूर्ण शिकवून कधीच होत नाही. शिष्याच्या कुवतीप्रमाणे तो शिकवायचा आणि मग दुसरा राग घ्यायचा. रागातील सर्व सौंदर्यस्थळे एकदम एकाचवेळी येण्यासाठी आग्रह धरला तर एकच राग आयुष्यभर शिकला पाहिजे. म्हणूच दोन–दोन राग सुरू करायचे. ते महिना दोन महिने झाले की थांबवायचे आणि काही वर्षांनी परत तेच राग घ्यायचे. त्यावेळी बुद्धिची प्रगल्भता वाढलेली असते. गळ्याची तयारी त्या दृष्टिकोनातून झालेली असते. मग त्या रागातल्या पुढच्या सौंदर्यबाबी शिष्याच्या गळ्यात उतरवणे सोपे जाते.

अलीकडे नोकऱ्या करत गाणे शिकतात. मग आठवड्यातून दोन दिवस क्लास. त्यामुळे जी गोष्ट चार वर्षात यायला हवी त्याला आठ वर्षे लागतात. अर्धातास शिकवून गाणे येत नाही मग येईल त्यातच समाधन मानायचं आता जमाना बदलला, पूर्वीचे श्रोतेही संपले आणि लोकांची अभिरुचीही बदलली.

मंजुषाची शिकवणी चालू असताना कारणपरत्वे बुवा पुण्यात येत असत मी देखील त्याच सुमारास, जगभर फिरून पुण्यात स्थायिक झाले होते. पुण्यात आल्यावर आकाशवाणीची परिक्षाही मी पास झाले होते व संगीत विशारदही झाले होते. त्यानंतर १९९५ साली एस. एन. डी. टी. त एम. ए. केले होते. बुवा पुण्यात आले की मुक्कामाला आमच्याकडे येत आणि मला शिकवत. अशाच एका मुक्कामात बुवांनी रात्री दहा वाजता मला **स्वानंदी** शिकविण्यास सुरुवात केली. दोन–अडीच पर्यंत शिकवणी चालू होती. दुसऱ्या दिवशी बुवा लगेच परतणार होते. त्यामुळे स्वतःच्या हातांनी बुवांनी माझ्या वहीत **स्वानंदी** च्या चीजेचे नोटेशन लिहिले होते. वहीचा तिरस्कार करणाऱ्या बुवांचे हे रूप मला अगदी नवीन होते. पण पुन्हा माझी भेट केव्हा होणार या काळजीने त्यांनी ते नोटेशन लिहून मला धन्य केले होते. गुरू प्रेमाचे अनेक अनुभव मी घेतले आहेत, त्या

दिवशी बुवा परत इचलकरंजीला निघाल्यावर मला बुवांच्या या नवीन रूपानुभवामुळे अश्रू आवरता आले नाहीत. पुढे आम्ही सेनापती बापट रस्त्यावरील शिवाजी हौसिंग सोसायटीत राहायला गेलो तिथे बुवा आपली तब्येत डॉ. शिवहरी बापट यांना दाखवण्याच्या निमित्ताने आमच्याकडे आले होते. बुवा, मंजूषा, वहिनी व काणेबुवांचा धाकटा मुलगा गजू आठ दिवस मुक्कामाला होते. त्यावेळी मी आणि मंजू रात्री व मला वेळ असेल तेव्हा सकाळी बुवांकडे गाणे शिकत होतो. त्यावेळी मी संगीताचार्य परिक्षेचा अभ्यास करीत होते. बुवांना मी मला मिळालेली काफी **कानड्यातील** चीज म्हणून दाखविली पण बुवांना काही ती पसंत पडली नाही. मग त्या रात्री, मला, मंजूला पहाटे तीन वाजेपर्यंत बुवा दिवाणावर बसून **काफी कानडातील लाई री..** ही चीज शिकवित होते. सुरांच्या तंद्रीत ते आपल्या यातना केव्हाच विसरले होते.

माझा मुलगा चि. भूषण, त्याच सुमारास वालचंद कॉलेजमध्ये कॉम्प्युटर इंजिनियरिंगचे शिक्षण घेत होता. त्याचवेळी बुवांचे मुंबईतील शिष्य शरद जांभेकर यांची बदली सांगली आकाशवाणीवर झाली होती आणि त्यांनी नोकरी सांभाळून बुवांकडे पुन्हा शिकायला सुरुवात केली होती. भूषण तबला उत्तम वाजवतो हे जांभेकरांना माहीत होते म्हणूनच आकाशवाणीतून सुटका झाली की जांभेकर कॉलेजवरून भूषणला घेऊन इचलकरंजीला, बुवांकडे जात. जांभेकर गाणे शिकत असताना भूषणलाही बुवा तबल्याच्या साथीसंबंधी सूचना स्वतः तबला वाजवून देत असत. त्यांना भूषणचे खूप कौतुक होते.

मंडळात साजऱ्या होणाऱ्या बाळकृष्णबुवांच्या पुण्यतिथी समारोहात बडे कलाकार बोलावणे म्हणजे एक आव्हानच होते. पण बुवांचे जबरदस्त व्यक्तिमत्त्व मंडळाच्या पाठीशी असल्यामुळे ती अडचण मंडळाला कधीच जाणवली नाही. कलाकार वर्तुळात बुवांचे सगळ्यांशी सलोख्याचे आणि स्नेहाचे संबंध होते. बुवांना कुणालाही नावे ठेवलेली अजिबात आवडत नसत. एकदा नीळकंठ अभ्यंकरबुवा तावातावानी आपल्या शिष्यांची तक्रार बुवांकडे करत होते. बुवा अभ्यंकरबुवांना म्हणाले, शिष्य बाहेर काय करतात ते तुम्हाला काय करायचे ? आपण शिकवायचे काम करायचे. हे ऐकून अभ्यंकरबुवा डोके खाजवीतच बाहेर आले आणि खुर्चीत शांत बसले वास्तविक अभ्यंकरबुवा अतिशय तापट कुणाचेही ऐकून न घेणारे. पण काणेबुवांसमोर ते अवाक्षरही काढत नसत. ते म्हणायचे काणेबुवांनी मला घडविले आहे. नाव मिळवून दिले आहे. आज मी जो काही आहे तो काणेबुवांचेमुळे. असे आदरयुक्त उद्गार अभ्यंकरबुवा नेहमीच काढत असत. बुवांच्या स्नेह संबंधाचे आणखीन एक

उदाहरण म्हणजे बुवा मुंबईत असताना केसरबाई आणि गजाननबुवा जोशी यांच्यात सलोख्याचे संबंध प्रस्थापित करण्याचे काम काणेबुवांनी केले. गजाननबुवा मैफलीत आलेले, केसरबाईंना चालत नसे पण काणेबुवांशिवाय त्यांची मैफल होत नसे. बुवा अतिशय मृदूभाषी होते त्यामुळे त्यांनी कलाकारांना काही शब्द टाकला की कलाकार तो सहसा मोडत नसत. त्यामुळे इचलकरंजीवासियांना कुमार गंधर्व, माणिक वर्मा, राम मराठे, भीमसेन जोशी, जसराज, मल्लिकार्जुन मन्सूर, गंगुबाई हनगल, जितेंद्र अभिषेकी, राजन–साजन मिश्रा, मालिनी राजुरकर, परवीन सुलताना, शोभा गुर्टू, बसवराज राजगुरू, किशोरी अमोणकर, प्रभा अत्रे अशा अनेक दिग्गज कलाकारांच्या मैफली भरभरून ऐकायला मिळाल्या आहेत. पूर्वी दिवाळी पाडव्याला कांबळ्यांच्या माडीवर गाण्याची मैफल असे. त्यात मुंबई, इचलकरंजीचे बुवांचे शिष्य तर गातच पण तिरखवाँसारखे कलाकारही आनंदाने हजेरी लावत. असे कार्यक्रम इचलकरंजीत आयोजित केले की बुवांचे घर म्हणजे कालाकारांचे माहेरघरच व्हायचे. एकदा तर **मंदारमाला**चा प्रयोग इचलकरंजीत होता. प्रयोग झाल्यावर पहाटे चार वाजता सर्व कलाकार मंडळी, जेवायला बुवांच्या घरी हजर झाली. अशा वेळी त्यांच्या पत्नी सर्वांची व्यवस्था उत्तम ठेवत असत. अगत्य आणि आदरातिथ्य यांचा जिथे सत्कार होतो असा बुवांचा गृहस्थाश्रम होता. आमच्या सारख्या शिष्यांना, बुवांच्या भोवती गोल करून कलाकार गप्पा मारत असताना संगीतातल्या व इतर क्षेत्रातल्या रोचक गोष्टी ऐकायला मिळत असत. बुवांचे घर म्हणजे खरच मानवतेचे मंदिर होते.

एकदा माणिक वर्मांची बुवांनी गेस्टहाऊसवर सोय केली होती. एक रात्र कशीबशी तिथे काढून दुसऱ्या दिवशी सकाळी सर्व सामानासह माणिकताई बुवांच्या दारात हजर झाल्या. बुवा म्हणत, माझ्या वडिलांनी बांधलेल्या घरात मी समाधानी आहे. वासे कुजायला लागले तरी मी ते बदलले नव्हते आता मुलांच्या ताब्यात सर्व दिले आहे. मुले माझ्यापेक्षा बुद्धीमान निघाली आहेत म्हणूनच आवडत नसताना, गरज म्हणून सुरू केलेला, मागाचा व्यवसाय बंद केला आहे. आता जुन्या वाड्याच्या ठिकाणी चंद्रकांतने भव्य वास्तू उभी केली आहे. दिवसभर शेती, माग बघून शिष्यांना उत्साहानी संगीत शिकविण्याच्या बुवांच्या कष्टाचे अशा तऱ्हेने चीज झाले आहे.. चंद्रकांतने उभारलेल्या नव्या वास्तुत जुन्या वाड्याच्या दिमाखातच कलाकारांची वर्दळ, गप्पा, गाणी, खाणी चालूच असतात..

एकदा बुवांच्याकडे मी स्वतः चाली लावलेली साईगीते म्हणून दाखविण्यासाठी गेले होते. बुवांना चाली व गीते आवडली म्हणून त्याच रात्री मंडळाच्या

रेकॉर्ड रूमध्ये स्वतःसमोर बसून माझी सर्व गाणी रेकॉर्ड करण्याची व्यवस्था त्यांनी केली. त्यावेळी बाबूराव गुरव तबल्याला, आण्णाबुवा बुगड पेटीला व सत्यनारायण पारीखना रेकॉर्डिंगला बोलावले होते. रात्री साडेनऊ ते पहाटे तीन पर्यंत सर्व गाणी रेकॉर्ड झाल्याशिवाय बुवा जागचे हलले नव्हते. असे असले तरी बुवांच्या शिकवण्याचा खरा लाभ मंजूषालाच मिळाला, असे म्हटले पाहिजे. कारण १९८७ ते १९९७ असे सलग दहा वर्षे तिला बुवांच्या हाताखाली शिकण्यास मिळाले. **बसंती केदार, काफी कानडा** सारखे जोड राग बुवा अतिशय सुंदर उकल करून तिला शिकवत असत. बुवांचे मुंबईतील शिष्य नरेंद्र कणेकर रत्नाकर पैं कडून जोड रागांच्या चिजा शिकून इचलकरंजीत कार्यक्रमासाठी आले की बुवा समोर बसून त्या चिजा मंजूला शिकवायला सांगत आणि मग त्या चिजेच्या अनुषंगाने त्याचा विस्तार सोपा करून बुवा नंतर तिला सांगत असत. म्हणजे दुसऱ्यांकडे काय चांगले आहे ते आपण शिकले पाहिजे, असा विशाल दृष्टिकोन संगीत शिक्षणाच्या बाबतीत बुवांचा होता. तिला अधुनमधून नाट्यगीत व भजनाचे धडेही द्यायचे. आजकाल नुसत्या शास्त्रीय संगीतावर मैफल मारण्यापेक्षा इतरही गोष्टी आल्या पाहिजेत म्हणूनच **नाथ हा माझा, जोहार मायबाप** सारखी लाइट क्लासिकल गाणीही बुवांनी मंजुला शिकवली. श्रोत्यांची नाडी बुवांनी ओळखली होती. बुवांकडे जेव्हा जेव्हा कणेकर, टिकेकर येत तेव्हा तेव्हा त्यांच्यामागे तंबोऱ्याला बुवा मंजूला बसवत असत. त्यांच्या शिकवणीबरोबर मधून मधून तिलाही काही जागा घ्यायला सांगत. जवळजवळ पन्नास राग, बुवांनी मंजूला शिकविले आहेत. **बागेश्री, भैरव, बिहाग ललत** असे विजातीय राग एकदम बुवा शिकवायला घेत असत. त्यामुळे मंजूषाला एका रागातून दुसऱ्या रागात शिरणे सहज शक्य होते. असे मंजूषा म्हणते. बुवांनी तिला **दरबारी कानडा** शिकविला नाही तर **नायकी** शिकविला. **बिहारी नट, धनाश्री** सारखे माहितीसाठी म्हणून शिकविले, नेहमी गाण्यासाठी नाही. आम श्रोत्यांपुढे शुद्ध राग गायनच रागांची शुध्दता राखून करावे आणि खास मैफलीमध्ये अनवट रागांची निवड करावी, असे ते म्हणत. तान मोत्यांच्या लडीप्रमाणे एकसारखी दाणेदार आली पाहिजे. मेहनत आरशात बघूनच केली पाहिजे म्हणजे वेडावाकडा चेहरा आणि हावभाव करणे टाळता येते. शास्त्रीय आणि सुगम शास्त्रीय दोन्ही गायचे असल्यामुळे फार खर्जाची मेहनत उपयोगी नाही, असे बुवा म्हणत.

दुर्गा भिडे, सुधा मिराशी, मीरा देशपांडे, रेखा गोखले, आशा पाटणकर

(खाडीलकर), गिरीश कुलकर्णी, शिवानंद पाटील, डॉ. बागेवाडीकर, बाळू फातले, अनू माणकापुरे, छाया लिमये, सौ. स्वादी, सौ. निरंतर, सौ. घारपुरे, सौ. घाटे, मृदूला काळे, सुखदा काणे (बुवांची धाकटी सून) वैशाली टोणपे, कांचन जोशी, रामभाऊ कांबळे असे अनेक शिष्य आपापल्या कुवतीप्रमाणे संगीत शिक्षणाचे धडे बुवांकडे घेत असत.

बुवांचे इचलकरंजीतील शिष्य शिवानंद पाटील यांनी दादर माटुंगा हॉलवर बुवांचा फार मोठ्या प्रमाणावर षष्ट्यब्दी सोहळा साजरा केला होता. आम्हा सर्व शिष्यांचा कार्यक्रम त्यावेळी झाला होता. सुधीर फडके यांच्या हस्ते बुवांचा सत्कार केला गेला होता. त्यानंतर भरत नाट्य मंदिर, पुणे इथे पंच्याहत्तरी निमित्त बुवांचा सत्कार झाला होता. तसेच फाय फाऊंडेशनतर्फे इचलकरंजी भूषण म्हणून इचलकरंजीत थैली आणि मानचिन्ह देऊन बुवांना गौरवण्यात आले होते.

१९९५ नंतर बुवांची मधुमेहाची व्याधी चांगलीच बळावली पण शिकविण्याचा जोश, उत्साह कायमच होता. प्रकृती उत्साहाच्या आड येत होती. कधी-कधी तर बुवा झोपून शिकवत असत. मंगल, ऋषीकेष, मंजूषा सांगलीहून येतात. त्यांचा वेळ फुकट जाऊ नये म्हणून तब्येत बरी नसताना 'अर्धा तास तरी बसू या' म्हणून बसायचे आणि एकदा बसले की आण्णाबुवांना पेटीला बोलवत. तबल्याला बाबूराव किंवा त्यांचा मुलगा विनायक किंवा कल्याण देशपांडे कुणाला तरी बोलवत. कोणी नाही तर मंजूची बहीण संजीवनी कायम मंजूबरोबर तबला साथीला इचलकरंजीस येत असे. या दोन्ही बहिणींची जोडी आताच्या संगीत क्षेत्राला मिळालेली दैवी देणगी आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

एकदा मंजूची शिकवणी चालली असताना बुवा एक पाय दुसऱ्या गुडघ्यावर ठेऊन, खुर्चीत बसून, मंजूला शिकवत होते. नेमके दिवे गेले मग बुवांची सून प्रतिभा हिनं मेणबत्ती आणून शेजारच्या टीपॉयवर लावली. शिकवणी मोठी रंगात आली होती. अचानक मांस जळल्याचा वास येऊ लागला. बुवा म्हणाले 'मासे कोण तळतंय' त्यावेळी खरं तर बुवांचा अंगठा, मेणबत्तीच्या ज्योतीवर भाजून निघत होता. पण ते बुवांना जाणवतच नव्हते.

बुवांच्या मधुमेहाने चांगलेच डोके वर काढले होते.

इचलकरंजी येथील हॉस्पिटलमध्ये बुवांना ताबडतोब हलविण्यात आले. दोन दिवसांनी कणेकर आपला कार्यक्रम रद्द करून बुवांना बघण्यास आले तेव्हा

तशा अवस्थेतसुद्धा बुवांनी 'रात्रीचा कार्यक्रम करून या' असे सांगून कणेकरांना त्याच पावली परत पाठविले. दवाखान्यात सुद्धा भेटायला आलेल्या शिष्यांचे ते शंका निरसन करत असत. या अपघातातून बरे होऊन ते घरी आले आणि त्यानंतर अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयातर्फे मानद संगीताचार्य ही पदवी काणेबुवांना जाहीर झाली. आजारपणातून उठल्यावर, कॅथॅटरची पिशवी खांद्यावर अडकवून ते सगळीकडे पूर्वीच्याच उत्साहाने जात असत. ही गोष्ट संगीतात मुरलेला कलाकारच करू शकतो. त्या अवस्थेतही बुवांची विनोदबुद्धी जागरूक होती. एकदा जाता-जाता ते मला म्हणाले 'आता आमचे जिकडे तिकडे सत्कार होऊ लागले म्हणजे जायचे दिवस जवळ आले.' इतक्या सहज बुवा बोलून गेले खरे पण माझ्या काळजात चर्र् झाले.

'बुवा हे काय बोलता ? तुम्हाला लोकमान्यता जाहीरपणे मिळाली त्यांनी आम्ही खूप आनंदित झालो आहोत ही गोष्ट या पूर्वीच व्हायला हवी होती.'

बुवा यावर फक्त हसले.

अ. भा. गां. विद्यालयाचा सहासष्टाव्या दीक्षांत सोहळा कोल्हापूरला देवल क्लबच्या सहकार्याने केशवराव भोसले नाट्यगृहात १६ फेब्रुवारी १९९७ रोजी पार पडला. अध्यक्षस्थानी होते श्रीमंत छत्रपती शाहू महाराज. अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाच्या या दीक्षांत समारंभात श्रीमंत शाहू महाराजांच्या हस्ते पं. द. वि. काणेबुवांना मानद संगीताचार्य पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. टाळ्यांच्या कडकडाटात हा पुरस्कार समारंभ चालू असताना बुवांनीच गायलेल्या **ललिता गौरी**ची चीज संयोजकांनी रेकॉर्डवर सुरू केली. त्या अप्रतिम स्वरमाधुर्याने सर्व वातावरण आनंदाने भरून गेले होते. या सत्काराला आमच्या बुवांनी दिलेले उत्तर अतिशय हृद्य आणि प्रभावी होते. बुवा म्हणाले,

'गुरू हा नदीच्या प्रवाहासारखा वाहात असतो. प्रत्येक शिष्य हा वाहत्या प्रवाहातून आपल्या पात्रात जेवढे ज्ञान मिळवता येईल, तेवढे मिळविण्याचा प्रयत्न करीत असतो. मी देखील माझ्या गुरुंकडून माझ्या पात्रामध्ये मिळविता येईल तेवढे ज्ञान मिळविले. त्यामध्ये मी पूर्ण समाधानी आहे. माझे भांडे लहान होते; त्यामध्ये घेता येईल तेवढे तीर्थ मी घेतले.'

असे सांगून पुढे बुवा म्हणाले, 'कलानगरीतील इचलकरंजीसारख्या जहागिरीत राहणारा मी एक सामान्य माणूस आहे. विनायकराव पटवर्धन, खाँसाहेब, भूर्जीखाँसाहेब, गोविंदराव टेंबे, मिराशीबुवा या गुरुंकडे गाणे ऐकून

तसेच शिकून मी मोठा झालो. माझ्या मोठं होण्यात या गुरुंचा फार मोठा वाटा आहे. नुसते गवई होऊन चालणार नाही तर सन्माननीय नागरिक झाले पाहिजे, हा गुरुंचा उपदेश मी मानला. संगीत कलेचे शिक्षण घेणाऱ्यांनी उत्तम गवई बनण्याबरोबरच समाजात आदर्श नागरिकही बनावे' असे आवाहन पं. काणेबुवांनी दिक्षांत समारोहात बोलताना केले. आणि म्हणाले,

'कलेचा मोठा वारसा लाभलेल्या या कलानगरीत मानद संगीताचार्य ही पदवी देऊन माझा जो गौरव करण्यात आला हा मी माझा मोठा सन्मान समजतो.'

प्रमुख पाहुणे म्हणून असलेल्या पं. काणेबुवांच्या हस्ते दीडशेहून अधिक स्नातकांना संगीत अलंकार, संगीत विशारद आणि संगीताचार्य इत्यादी पदव्या बहाल करण्यात आल्या.

समारंभ उरकून घरी आल्यावर बुवांच्या भोवती सर्व शिष्य हा आनंद सोहळा साजरा करण्यासाठी बसले होते तेव्हा बुवा म्हणाले, ''विश्वविद्यालयीन शिक्षण ही काळाची गरज आहे. मानसन्मान कोणाला नको आहे. प्रत्येक माणसाला आपला सन्मान व्हावा असे वाटत असते पण काही मिळविण्यासाठी करणाऱ्यातले आम्ही नव्हे, असे असूनसुद्धा हा सन्मान दिला, हे त्यांचे कौतुक. आम्ही कुठेतरी गौरव करण्यासारखे कार्य केले आहे हे लोकांनी मान्य केले आहे. त्याची दखल घेतली आहे त्याबद्दल त्यांचे आभार मानलेच पाहिजे.'' एका सच्च्या कलाकाराचे हे मनोगत बुवांनी अशा सरळ व सोप्या भाषेत सांगून समोर बसलेल्या आम्हा शिष्यांना जाताजाता 'प्रसिद्धीमागे धावू नका, तीच तुमचा पाठलाग करत येईल' असा विश्वास दिला होता. एक रुपयादेखील फी न घेता त्यांनी आम्हा सर्व शिष्यांना गान विद्या हातचे न राखता भरभरून दिली आहे. आम्हा शिष्यांचे ते वंदनीय प्रेषित आहेत. त्यानंतर मंडळात साजऱ्या झालेल्या गुरुपौर्णिमा सोहळ्यात मी **चंद्रकंस** गायले होते. गेल्या काही वर्षांपासून बुवा आरामखुर्चीत बसूनच कार्यक्रमाचा आस्वाद घेत असत.

तो गुरुपौर्णिमा उत्सव गायनाबरोबर गप्पांच्या मैफलीने अवर्णनीय ठरला होता. पण बुवांच्या सहवासातील हा उत्सव शेवटचाच ठरणार याची मात्र कोणालाच कल्पना नव्हती.

आता थोडीसुद्धा दगदग बुवांना सहन होईनाशी झाली. अखेर बुवांना मिरज येथील मिशन हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी हलविण्यात आले. तिथे

तेवढ्या अवस्थेतही आयुष्याचा श्वास असलेले गाणे शिष्यांना देण्यात त्यांनी कसूर केली नाही. माझे संगीताचार्य परीक्षेचे मार्गदर्शक, पं. नारायणराव पटवर्धन, बुवांना मिशनमध्ये भेटण्यास गेले होते. त्यावेळीसुद्धा 'प्रबंधाचे काम कोठवर आले आहे?' असे विचारायला आणि 'तुम्ही तिला व्यवस्थित मार्गदर्शन करा' असे सांगायला बुवा विसरले नाहीत.

त्यानंतरच्या वाशी येथे झालेल्या भेटीत नारायणरावांकडून ही गोष्ट मला समजली. त्यांनी 'एकदा त्यांना भेटून ये' हा सल्लाही दिला. अर्थात हे कळल्यावर मी शांत बसणे शक्यच नव्हते. त्यावेळी घरच्या नवरात्रापेक्षासुद्धा माझ्या गुरुचे दर्शन हे मला महत्त्वाचे वाटले. विजयादशमीच्या दिवशी रात्री एक वाजता मी थेट दवाखान्यात गेले. त्यांची अवस्था पाहून कळवळून बुवांना हाक मारली तेव्हा डोळे उघडून नुसता हुंकार त्यांनी दिला होता. मिरजेत राहणारी माझी मुलगी धनश्री हिच्याकडून पहाटे चहा आणावा म्हणून मी गेले खरी पण त्यामुळे त्यांच्या शेवटच्या श्वासाचे साक्षीदार ठरले त्यांचे शिष्य ऋषिकेश बोडस. १२ ऑक्टोबर १९९७. आश्विन शुद्ध एकादशी. हा दिवस आम्हा सर्व शिष्यांना, संगीतप्रेमींना आणि बुवांच्या कुटुंबियांना दुःखसागरात लोटणारा ठरला.

आज बुवा आमच्यात नाहीत पण त्यांच्या स्मृती आम्ही आमच्या हृदयात चिरंतन जपलेल्या आहेत. आजही काणेबुवांचा स्मृतिदिन बाळकृष्णबुवा संगीत साधना मंडळातर्फे अतिशय आत्मियतेने साजरा केला जातो. त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी अनेक दिग्गज कलाकार आणि शिष्य आपली कला इचलकरंजीला येऊन सादर करतात.

**नाहं वसामी वैकुंठे, योगिनाम् हृदये नच् ।**
**मद्भक्ता यत्र गायन्ती, तत्र तिष्ठामी नारद ।।**

हा संदेश बुवांनी स्वतः तर जपलाच, शिवाय आपल्या प्रत्येक शिष्याच्या मनावर तो ठसविला आहे. बुवांनी आम्हा शिष्यांना स्वतःवर नाही तर संगीतावर प्रेम करायला आणि त्याची जपणूक, संगोपन आणि संवर्धन करायला शिकवले. बुवांनी संगीताच्या परंपरा आणि नाविन्य यांच्या संकरातून उभ्या केलेल्या संगीत वटवृक्षाच्या आम्ही सर्व शिष्य पारंब्या बनून बुवांचे विचार आणि संगीत तसेच्या तसे पुढच्या पिढीपर्यंत पोचविण्यासाठी कार्यरत आहोत.

बुवा आणि वहिनींच्या (बुवांच्या पत्नीच्या) गृहस्थाश्रमांनी जपलेले सुसंस्कृत संस्कारी घरपण जसेच्या तसेच जपण्याचे काम बुवांची मोठी सून

सौ. प्रतिभा आणि मुलगा श्री. चंद्रकांत काणे आणि कुटुंबिय करीत आहेत. बुवांचे वेळचे वातावरणही जसेच्या तसे या घराने जपले आहे. म्हणूनच कधीही केव्हाही या घरात प्रवेश करताना प्रत्येकाला क्रीम कलरचा सिल्कचा झब्बा, पांढरी शुभ्र विजार आणि खांद्यावर नॅपकीन टाकून घरात वावरणाऱ्या बुवांच्या आस्तित्वाचा भास होतो  आणि कानात भैरवीचे सूर शब्दरूप घेतात.

**येता तरी सुखे या, जाता तरी सुखे जा,**
**कोणा वरी ना बोजा, या झोपडीत माझ्या ।।**

❖❖❖

## पं. द. वि. काणेबुवा यांच्या जीवनातील ठळक घटनांची अंदाजे सनावळी

| | |
|---|---|
| इचलकरंजी येथे जन्म | माघ व. अष्टमी शके १८४२, २ मार्च १९२१ |
| दरबार गवई श्री. दत्तोपंत काळे यांचेकडे संगीत शिक्षणास प्रारंभ | इ. स. १९३५ ते इ.स. १९३९ |
| पं. विनायकबुवा पटवर्धन यांचेकडे पुण्यात विद्याग्रहण. | इ. स. १९३९ ते १९४४ |
| पिताश्री श्री. विष्णुपंत यांचे निधन. | इ. स. १९४५ |
| पं. मिराशीबुवा यांचेकडे विद्याग्रहण. | इ. स.१९४६पासून दोन वर्षे |
| पं.विलायत हुसेन खाँ यांचे गंडाबंधन. | इ. स. १९४८ |
| मुंबईतील संगीत क्षेत्रात वास्तव्य. | इ. स. १९४८ पासून |
| मातोश्री काशीताई यांचे निधन. | इ. स. १९५२ |
| वत्सला पेंडसे यांच्याबरोबर शुभविवाह | १२ जून १९५४ |
| इचलकरंजी येथे स्थायिक होण्यासाठी पुनरागमन. | इ. स. १९६१ |
| पं. बाळकृष्णबुवा संगीत साधना मंडळाची स्थापना. | इ. स. १९६७ |
| पं. बाळकृष्णबुवा स्मृती मंदिर या वास्तूचे उद्‌घाटन. | ९ फेब्रुवारी १९७९ |
| दादर माटुंगा कल्चरल सेंटर मुंबई येथे सत्कार. | इ. स. १९८१ |
| भरत नाट्य मंदिर पुणे येथे सत्कार. | इ.स. १९९५ |
| फाय फाऊंडेशन 'इचलकरंजी भूषण' हा पुरस्कार प्रदान. | इ. स. १९९५ |
| अ.भा.गां.महाविद्यालयातर्फे मानद संगीताचार्य पदवीने सन्मानीत. | १६.२.१९९७ |
| मिरज येथे मिशन हॉस्पिटलमध्ये दुःखद निधन. | १२.१०.१९९७ |

❖❖❖

# धृपद

पंधराव्या शतकात ग्वाल्हेरचा राजा मानसिंह तोमर ह्याने प्रथम धृपद प्रकार प्रचारात आणला. त्याने स्वत:ही धृपदाच्या काही रचना केल्या आहेत. प्राचीन काळात संस्कृत श्लोक धृपदात गाऊन आपले ऋषीमुनी परमेश्वराची उपासना करीत असत.

वर्तमान काळात धृपद गायकी हा गंभीर आणि जोरकस गानप्रकार मानला जातो. धृपदे ही हिन्दी उर्दू तसेच ब्रज भाषेत मिळतात. ह्यात वीर, शृंगार, शांत रस असतात.

धृपदामध्ये स्थायी अंतरा, संचारी आणि अभोग असे चार भाग असतात. अकबराच्या काळात हरिदास स्वामी डागूर आणि त्यांचे शिष्य तानसेन बैनू रामदास यांनी अनेक धृपदाच्या रचना केल्या तानसेनने धृपद गायकी लोकप्रिय केली. एवढी लोकप्रिय केली की त्याच्या समकालीन गायकांनी चारबानी म्हणजे तऱ्हा शोधून धृपदगायकीचे क्षेत्र विस्तारले. आणि ही गायकी बहुरंगी बनविली

१) गोबरहार वाणी :– हिला गुणी रसिकांनी राजाचे स्थान दिले.

२) डागुर वाणी :– हिला मंत्रीपदाचा दर्जा दिला.

३) खंडहर वाणी :– हिला सेनापतीचे स्थान दिले आणि

४) नोहार वाणी :– हिला सेवकाचा दर्जा मिळाला.

धृपद गायन सुरु करण्यापूर्वी नोम्–तोम् प्रकारांनी आलापी करतात. धृपद गाताना आलापी किंवा ताना घेत नाहीत. धृपदाचे गीत चरण दुगण, तिगण, चौगण, वगैरे लय प्रकारात गाऊन दाखवायचे असतात. धृपदा पेक्षा ख्याल रंजक असला तरी धृपद–धमारमुळे स्वर–ताल–लय हे प्रकार पक्के होतात. धृपद गायकीसाठी उपयोगात येणारे ताल – चार ताल किंवा चौताल हा महत्वाचा या शिवाय सूलताल, मत्तताल, धमार, तेवरा किंवा तीव्रा झंपा ब्रह्मताल रूद्रताल

या तालांची माहीती खालील प्रमाणे –

**१) चौताल – मात्रा १२ भाग ६**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ २ | ३ ४ | ५ ६ | ७ ८ | ९ १० | ११ १२ |
| धा धा | दिं ता | किट धा | दीं ता | किटु तक | गदि गन |
| × | ० | २ | ० | ३ | ४ |

२) सूलताल – (मात्रा १० भाग ५)

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| धा | धा | दिं | ता | किटु | धा | किट | तक | गदि | गन |
| × | | ० | | २ | | ३ | | ० | |

३) मत्तताल – १ ( मात्रा १८ भाग ९)

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ २ | ३ ४ | ५ ६ | ७ ८ | ९ १० | ११ १२ | १३ १४ | १५ १६ | १७ १८ |
| धा ऽ | धि ड | न क | धि ड | न क | ति ट | क त | ग दि | ग न |
| × | ० | २ | ३ | ० | ४ | ० | ५ | ० |

४) धमार – (मात्रा १४ भाग ४)

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| क | धी | ट | धि | ट | धा | ऽ | क | ति | ट | ति | ट | ता | ऽ |
| × | | | | | २ | | ० | | ३ | | | | |

५) तेवरा किंवा तीव्रा – (मात्रा ७ भाग ३)

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| धा | दिं | ता | तिट | कत | गदी | गन |
| × | | | २ | | ३ | |

६) झंपा – (मात्रा १० भाग ४)

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| धा | ऽ | धा | गे | ति | ट | ति | दा | कि | ट |
| × | | २ | | | ० | | ३ | | |

७) **ब्रह्म ताल – (२८ मात्रा भाग ४)**

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ |
| धा | धि | धिं | धा | तृक | धी | धीं | धा | ती | ती | ना | ती | ती | ना |
| × | | ० | | २ | | ३ | | ० | | ४ | | ५ | |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ | २८ |
| ती | ना | तू | ना | क | त्ता | धीं | ना | धागे | नधा | तक | धिं | गदि | गन |
| ६ | ० | ७ | | ८ | ९ | १० | ० | | | | | | |

८) **रुद्र ताल – (मात्रा ११ भाग ११)**

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ |
| धी | ना | धी | ना | ता | ति | ना | क | ता | धी | ना |
| × | २ | ० | ३ | ४ | ५ | ० | ६ | ७ | ८ | ० |

**धमार** – होरीची गीते धमार तालात गातात तेव्हा त्याला धमार म्हणतात. धमार गायनात होळीचे वर्णन असते.म्हणून त्याला होरी –धमार असे दुसरे नाव आहे. जेव्हा धृपदे या तालात गातात तेव्हा त्याला 'धृपद–धमार' म्हणतात. यात ख्यालाप्रमाणे ताना नसतात दुगण, तिगण, चौगण, आड असे लयीचे प्रकार करून दाखवायचे असतात. धमार हा चौदा मात्राचा धृपद बाजाचा ताल आहे.

ख्याल – फारसी भाषेत ख्याल या शब्दाच अर्थ आहे. विचार केला कल्पना आपले मुळचे गायन धृपद गायन पण नाविन्य आणि रचना कौशल्याच्या विशेषामुळे ख्याल गायकी प्रचारात आली. गायकाच्या विचारांना, कल्पनांना, बुद्धी कौशल्याला ख्याल गायकीत वाव आहे. आपल्या कल्पनेनी निरनिराळे स्वरसमूह उत्पन्न करून विलंबित तालात आलापीच्या माध्यामातून गीत म्हणणे यालाच 'ख्याल' म्हणतात. याची गती सावकाश आणि विस्तारक्षम असते.धृपदाच्या दुगुण तिगुणाची बंधने त्याला नसतात. त्यामुळे ख्याल गायन धृपदापेक्षा वैचित्र्यपूर्ण असते. सुलतान हुसने शर्की ने 'ख्याल' गायकी प्रचारात आणली असे म्हणतात. ख्यालीयांची गायकीच्या अंगानी वेगवेगळी 'घराणी' प्रसिद्ध आहेत आलाप, तान, बोल–आलाप, बोलतान, गमक असे ख्याल गायनात गायकीचे सर्व प्रकार येतात. त्यामुळे श्रोते त्यात रंगून जातात.

ख्याल – विलंबित तीन ताल, विलंबित एक ताल, झूमरा, आडाचौताल, तिलवाडा, आणि क्वचित प्रसंगी सवारी आणि रूपक मधे गातात.

**तीनताल (त्रिताल) – (मात्रा १६ भाग ४)**

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ |
| धा | धिं | धिं | धा | धा | धिं | धिं | धा | धा | तिं | तिं | ता | ता | धिं | धिं | धा |
| | × | | | २ | | | | ० | | | | ३ | | | |

## वि. एकताल – (मात्रा १२ भाग ६)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ २ | ३ ४ | ५ ६ | ७ ८ | ९ १० | ११ १२ |
| धीं धी | धागे तिरकिट | तू ना | कतु तिं | धागे तिरकीट | थिं ना |
| × | ० | २ | ० | ३ | ४ |

## झूमरा (मात्रा १४ भाग ४)

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ २ | ३ ४ | ५ ६ | ७ ८ | ९ १० | ११ १२ १३ १४ |
| धीऽ धातिरकट | धीं धीं | धागे तिरकीट | तींऽ ता | तिरकिट ना | धी धी धागे तिरकिट |
| | × | | ० | ३ | |

## आडा चौताल (मात्रा १४ भाग ७)

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ २ | ३ ४ | ५ ६ | ७ ८ | ९ १० | ११ १२ | १३ १४ |
| धी धीं | धोडा तिरकिट | तू ना | क ता | धी धी | ना धी | धी ना |
| × | २ | ० | ३ | ० | ४ | ० |

## तिलवाडा (मात्रा १६ भाग ४)

| | | | |
|---|---|---|---|
| १ २ ३ ४ | ५ ६ ७ ८ | ९ १० ११ १२ | १३ १४ १५ १६ |
| धीति कीट धीं धीं | धा धा तीं तीं | ता तिरकीट धीं धी | धा धी धीं धीं |
| × | २ | ० | ३ |

## सवारी (मात्रा १५ भाग ७)

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ २ ३ | ४ ५ | ६ ७ | ८ ९ | १० ११ | १२ १३ | १४ १५ |
| धीत्री टि धीना | कत धीधी | बाधी धीन | तीना तीत | ऋतूना रिकना | कत्ता धीधी | नाधी धीना |

## रूपक (मात्रा ७ भाग ३)

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| तीं | तीं | ना | धी | ना | धी | ना |
| | ० | | २ | | ३ | |

❖❖❖

# लेखिका परिचय



डॉ. सौ. मंगला सुधीर आपटे

बी.ए. (हिंदी), एम्.ए. (संगीत)

- संगीताचार्य –अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालय.
- शास्त्रीय,नाट्य आणि सुगम संगीत स्पर्धात अनेक पारितोषिकांच्या मानकरी
- शास्त्रीय, नाट्य आणि सुगम संगीत यांच्या महाराष्ट्र आणि कर्नाटकातील विविध भागांत तसेच परदेशात अमेरिका, ओमान व येमेन मध्ये विविध ठिकाणी अनेक मैफली
- ।। श्री साईगीतायन।। या श्रीसाईबाबा यांचे चरित्रावर आधारित कार्यक्रमातील गीतांना स्वत: स्वरबद्ध करून गोवा,महाराष्ट्र दिल्ली व परदेशात गीत गायन.
- संगीत विषयक मासिकात नियमित लेखन.
- जगन्नाथबुवा पुरोहित यांचे संगीतातील योगदान व कार्य या विषयावर प्रबंध.
- शास्त्रीय संगीत आणि सुगम संगीताची पुणे आकशवाणी मान्यता प्राप्त कलाकार.

# गुनि-गुरू

पंडित जगन्नाथबुवा उर्फ गुनिदास हे एक महान व्यक्तिमत्त्व होते. त्यांनी असंख्य शिष्य आणि मित्र नुसते जमविलेच नाहीत तर वर्षानुवर्षे टिकविले. विद्वत्ता, संभाषणचातुर्य, बहुश्रुतपणा, शिष्टाचार आणि लाघवी, प्रेमळ स्वभाव अशा अनेक सद्‌गुणांमुळे लोक त्यांच्याकडे आकर्षित होत. त्यांनी जपलेले राग संगीताचे सनातनत्व, सौंदर्यतत्त्व व स्वराकारांत लपलेले भावतत्त्व, बुवांच्या निर्मितीला अमरत्व देणारे आहे.

लेखिका सौ. मंगला आपटे यांचे गानगुरू पं. द. वि. काणेबुवा यांच्या चरित्रात मला आढळतो, तो त्यांचा वज्रादपि कठोराणी आणि मृदुनि कुसुमादपी हा स्वभाव. पं. काणेबुवांनी ग्वाल्हेर गायकी, आग्रा गायकी आणि सर्वांनाच डोलत ठेवणारी गंधर्व गायकी या तीन गायन शैलींचा सखोल अभ्यास करून त्यावर अविश्रांत रियाझाने नादब्रह्माच्या दरबारात आपले स्थान सिद्ध केले आहे.

सौ. मंगलाचे 'गुनि-गुरू' हे ललित चरित्र सर्व संगीत रसिक व बुवाद्वयांचे चाहते यांना एक संदर्भ पुस्तक म्हणून उपयोगी पडेल अशी माझी धारणा आहे. चि. सौ. मंगलाने हा उपक्रम तडीला नेल्याबद्दल तिचे मन:पूर्वक अभिनंदन करतो आणि तिच्या भावी संगीत वाटचालीस माझ्या अनेक अनेक शुभेच्छा देतो.

**पं. माधव इंगळे**

अनुबंध
प्रकाशन